04-12-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

SSG/ 10:00



**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष डॉ. सतीश पाटील )**

**पृ.शी. :** मराठवाड्याच्या विकासासाठी मागील अनेक वर्षांपासून अर्थसंकल्पात माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीची तरतूद करण्यात येऊनही प्रत्यक्षात निधी खर्च न होणे तसेच यावर्षी अवर्षणामुळे संपूर्ण राज्यात पडलेला भीषण दुष्काळ, परिणामी पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा निर्माण झालेला प्रश्न आणि शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध न झाल्याने शेतकरी आत्महत्यांमध्ये झालेली वाढ

**मु.शी. :** मराठवाड्याच्या विकासासाठी मागील अनेक वर्षांपासून अर्थसंकल्पात माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीची तरतूद करण्यात येऊनही प्रत्यक्षात निधी खर्च न होणे या विषयासंबंधी सर्वश्री प्रशांत बंब, अर्जुन खोतकर, अतुल सावे, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री सुधाकर भालेराव, सुभाष साबणे, संभाजी निलंगेकर-पाटील, ज्ञानराज चौगुले, संतोष दानवे, हेमंत पाटील,प्रा.संगीता ठोंबरे, डॉ.राहुल पाटील, सर्वश्री लक्ष्मण पवार, आर.टी.देशमुख, भिमराव धोंडे, नारायण कुचे, तानाजी मुटकुळे, वि.स.स. यांचा तसेच, यावर्षी अवर्षणामुळे संपूर्ण राज्यात पडलेला भीषण दुष्काळ, परिणामी पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा निर्माण झालेला प्रश्न आणि शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध न झाल्याने शेतकरी आत्महत्यांमध्ये झालेली वाढ या विषया संबंधी सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, गणपतराव देशमुख, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, जयदत्त क्षीरसागर, डॉ.पतंगराव कदम, सर्वश्री भास्कर जाधव, विजय वडेट्टीवार, बबनराव शिंदे, बाळासाहेब थोरात, राहुल मोटे, अब्दुल सत्तार, हसन मुश्रीफ, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री दत्तात्रय भरणे, सुनिल केदार, बाळासाहेब पाटील, गोपालदास अग्रवाल, संग्राम जगताप, मो.आरीफ नसीम खान, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री अमित देशमुख, हनुमंत डोळस, ॲड.यशोमती ठाकूर, सर्वश्री विजय भांबळे, जयकुमार गोरे, वैभव पिचड, भाऊसाहेब कांबळे, दिपक चव्हाण, डी.एस.अहिरे, संजय कदम, डी.पी.सावंत, राहुल जगताप, मधुकरराव चव्हाण, नरहरी झिरवाळ, कालिदास कोळंबकर, बसवराज पाटील, वसंतराव चव्हाण, अमीन पटेल, ॲड.के.सी.पाडवी, सर्वश्री कुणाल पाटील, काशिराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, सुभाष ऊर्फ पंडितशेठ पाटील,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ.संतोष टारफे,

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावीत, श्री.अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, त्र्यंबक भिसे, कु.प्रणिती शिंदे, सर्वश्री सिद्धाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

( प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाले .....

श्री. जयंत पाटील ( इस्लामपूर ) : अध्यक्ष महोदय, मराठवाड्याच्या विकासासंदर्भात आणि विरोधी पक्षाच्यावतीने दिलेल्या संपूर्ण महाराष्ट्रातील अवर्षणामुळे शेतकऱ्यांवर आलेले संकट या दोन्ही विषयांवरील म.वि.स नियम 293 अन्वयेच्या प्रस्तावावर आपण कालपासून एकत्रित चर्चा करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील दुष्काळाचा सामना कसा करायचा, हा राज्यासमोरील कायमचा मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. आज बहुतांश पाटबंधारे प्रकल्पातील पाण्याने जवळपास तळ गाठलेला आहे. राज्याच्या माननीय जलसिंचन मंत्र्यांनी कोणत्याही धरणाची आकडेवारी काढली तर, आज ती मायनस किंवा शून्य येऊ लागली आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रात असे चित्र आपण यापूर्वी कधी अनुभवले नव्हते. चारा टंचाईची समस्या फार मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. विदर्भ विशेषतः मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागामध्ये दुष्काळाची तीव्रता हळूहळू वाढलेली आहे. केवळ एकट्या लातूर मधून 50 हजार कुटुंबांनी आपले शहर सोडून मुंबईकडे येणे पत्करलेले आहे. कालच सन्माननीय सदस्य श्री. जयदत्त क्षीरसागर मला म्हणाले की, घाटकोपरला एका मैदानात बीड मधील जवळपास 800 ते 900 कुटुंबे आलेली आहेत, चला त्यांना भेटून येऊ. याचा अर्थ सरकारने आता स्थलांतर होत नाही, असे सांगण्यापेक्षा स्थलांतरित झालेल्यांना मुंबई, पुण्यामध्ये काय अधिक सोई देता येतील हे पाहणे जास्त शहाणपणाचे ठरेल असे आम्हाला वाटते. आम्ही काही सांगायचे आणि तुम्ही स्थलांतर होत, होणार नाही असे सांगण्यापेक्षा आम्ही 50 हजार लोकांचे स्थलांतर झाले असे म्हणत असू तर वास्तवात थोडे स्थलांतर होत असेल, 10 हजार लोक स्थलांतरित झाले असतील. परंतु, आपल्याला काळजीने त्यांचीही सोय पाहिली पाहिजे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील ....

अध्यक्ष महोदय, पूर्वी आपल्याकडे अशी म्हण होती की, 'नेमेची येतो मग पावसाळा' आता त्याऐवजी 'नेमेची येतो दुष्काळ' अशी उलटी म्हण महाराष्ट्रात रुढ होण्याची आवश्यकता आहे. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात दुष्काळ का आहे, या विषयी बरेच चिंतन चालले आहे. आपण ज्यांना फार मानतो ते हिंदू धर्माचे शंकराचार्य यांनी काय म्हटले ते पहावे. रायव्हलरी कशा कशात असू शकते म्हणजे तुमच्यामध्ये आणि माननीय श्री. गिरीश बापट यांच्यामध्ये रायव्हलरी आहे की नाही हे सांगता येत नाही. तसेच शंकराचार्य आणि आपले सत्यसाईबाबामध्ये नाही तर साईबाबांमध्ये रायव्हलरी सुरु झाल्यासारखे दिसत आहे, कारण शंकरार्यांनी असे म्हटले आहे की, महाराष्ट्रात साईबाबांची पूजा केली जाते, त्यांची पुजा केल्यामुळे महाराष्ट्रावर हे अरिष्ट आलेले आहे. महाराष्ट्रामध्ये शनीच्या चौथऱ्यावर महिला जाऊ लागल्या व शनी चौथऱ्याला स्पर्श करुन पूजा करु लागल्या म्हणून सन्माननीय सदस्या श्रीमती देवयानी फरांदे शंकराचार्यांनी या दोन गोष्टींना ऑब्जेक्शन घेण्यास सुरुवात केलेली आहे. ते येण्यास अजून फार वेळ आहे, तुम्ही त्यांच्या प्रतिनिधी म्हणून आला आहात. शंकराचार्य सभागृहात येण्यास फार वेळ आहे. साईबाबा आणि शनीदेवाचे महिलांनी दर्शन घेण्याच्या बाबीला हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे विरोध का होतो हे अनाकलनीय आहे. परंतु, महाराष्ट्रातील दुष्काळाच्या बाबतीत लोक असे उद्‌गार काढू लागले आहेत. त्यामुळे दुष्काळ किती टोकाचा आहे हे सांगण्यासाठी वेगळे काही सांगण्याची आवश्यकता नाही.

अध्यक्ष महोदय, दुष्काळाच्या चर्चेवर उत्तरे देताना दुष्काळात प्रामुख्याने वाढलेल्या आत्महत्या पाहिल्या तर आज महाराष्ट्रात 4 हजारापेक्षा जास्त आत्महत्या झालेल्या आहेत. आत्महत्येचे प्रमाण कमी करण्यासाठी काय करायचे हा प्रश्न देखील आपल्याला सतत भेडसावतो आहे. या दुष्काळाचा गुंता हळूहळू वाढू लागला आहे. पाणी घेण्यासाठी पळणाऱ्या लहान मुलांचे जीव जावू लागले आहेत. कालच सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, पाणी भरण्यासाठी रेल्वेरुळाच्या पलीकडे जाणाऱ्या मुलीला रेल्वेने उडविल्यामुळे ती मृत्युमुखी पडली. त्यामुळे आपल्याला जाणीवपूर्वक या दुष्काळावर कायमचा काहीना काही उपाय करण्याची आवश्यकता आहे.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील ....

अध्यक्ष महोदय, आता सांगली, मिरेजेवरुन लातूरला पाणी नेण्याचे चालले आहे. हे फार चांगले काम आहे. परंतु, माननीय श्री. बबनराव लोणीकर हा निर्णय थोडासा उशिरा झाला. माननीय श्री. सुरेश प्रभू यांनी आपल्याला एकच रेक दिलेली आहे. त्याद्वारे आपण काल 5 लाख लिटर पाणी पोहोचविण्याची व्यवस्था केलेली आहे. परंतु, केवळ लातूर शहरामध्येच नाही तर पुढच्या दोन-अडीच महिन्यांमध्ये आणखी शहरे, लहान गाव, लातुर आणि आसपासच्या जिल्ह्यातील तालुक्याची ठिकाणे आपल्याकडे रेल्वेने पाणी मागू लागतील. त्यावेळेस मात्र आपल्याला रेक कमी पडतील. माननीय श्री. बबनराव लोणीकर यांना माझी विनंती आहे की, त्यांनी बोलून लवकरात लवकर आणखी 5 ते 10 रेक आपल्या ताब्यात घ्याव्यात. एप्रिल, मे व जून या तिन्ही महिन्यांत आपल्याला या संकटाचा सामना करण्यासाठी फार मोठी यंत्रणा राबविली पाहिजे. कृष्णा काठावरुन पाहिजे तेवढे पाणी आपण घेण्यास हरकत नाही. मिरजेला आपण ही व्यवस्था करीत आहोत. परंतु, मिरजेची व्यवस्था खूप तोकडी आहे. तेथे जरा मोठ्या पाईपलाईन केल्या पाहिजेत. कारण टँकर भरायलाच जवळपास 4-5 तास लागतात. त्यामुळे नॉर्मल सेवा देणाऱ्या रेल्वेमध्ये आपण जसे पाणी भरतो, त्या पध्दतीने पाणी भरणे म्हणजे लातूरला पाणी पोहोचण्यास फार वेळ लागण्याचे लक्षण आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाड्याकडे आता ग्रामविकास खाते, पाणी पुरवठ्यासारखे सक्षम खाते आहे. दुर्दैवाने आज पुन्हा दुष्काळाचे वर्ष आपल्या वाट्याला आलेले आहे. त्यामुळे माननीय श्री. बबनराव लोणीकर यांच्याकडून मराठवाड्याच्या फार अपेक्षा आहेत. परंतु, त्यांच्या पाणी पुरवठा खात्याला किती निधी दिलेला आहे हे देखील पाहण् गरजेचे आहे. माननीय श्री. बबनराव लोणीकर यांना त्यांच्या अबोल स्वभावामुळे मंत्रिमंडळात किती दुर्लक्षित करायचे, हे देखील ठरविण्याची गरज आहे. फक्त 500 कोटी रुपये आणि ती देखील मुख्यमंत्री महोदयांची योजना आहे. याचा अर्थ पाणी पुरवठा खात्याची योजनाच नाही. मुख्यमंत्री पाणी पुरवठा योजना सुचविलेली आहे. त्याचे काम 500 कोटी रुपयांनी होणार नाही. नवीन सोर्स टॅप करुन तेथून पाणी आणण्यासाठी कदाचित आपल्याला हजार ते पंधराशे रुपये पुढच्या वर्ष, सहा महिन्यांत खर्च करावे

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील ....

लागतील. पाऊस आला नाही तर काय, याचा विचार करुन सरकारने काम करण्याची आवश्यकता असते. त्यामुळे माननीय श्री. बबनराव लोणीकर यांच्या खात्याला थोडासा जास्त निधी उपलब्ध करुन दिला तरच बरे होईल.

अध्यक्ष महोदय, दुसरी कंडिशन आपण अशी घातलेली आहे की, आम्ही कोणतीही नवीन योजना आता सुरु करणार नाही. दुष्काळाची जेथे जास्त तीव्रता आहे, पाण्याचा दुसरा सोर्स नाही तेथे खास बाब म्हणून काही गावांनी मागणी केली तर आपण जवळ असणाऱ्या नव्या सोर्सपासून पाणी आणण्याची तात्पुरती तरी का होईना परंतु, व्यवस्था करण्यासाठी पैसे खर्च करण्यास सुरुवात करावी, अशी विनंती मी करतो.

अध्यक्ष महोदय, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आपण मराठवाड्याचा विषय सतत चर्चेकरिता घेतलेला आहे. गोदावरी खोऱ्यामध्ये मराठवाड्यातील 8 जिल्ह्यात जवळपास 17 ते 18 टक्के लोकसंख्या आहे. मराठवाड्यामध्ये कोरडवाहू शेतीचे 90 टक्के प्रमाण आहे. कोरडवाहू शेती एवढ्या मोठ्या प्रमाणात असताना मराठवाड्याची आकडेवारी पाहिली तर, महाराष्ट्रातील दर हेक्टरी कृषी उत्पन्न सरासरी साडेहजार असेल तर मराठवाड्यात ते सात हजार आहे. रासायनिक खतांचा वापर महाराष्ट्रातील शेतकरी 54 किलो करीत असेल तर, मराठवाड्यातील शेतकरी 40 किलो करतो. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दरडोई विजेचा वापर जर 423 के.व्ही. इतका असेल तर मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या दरडोई विजेचा वापर 224 के.व्ही. इतका होतो. मराठवाड्यामध्ये काम करणाऱ्या लोकांचे दर लाख लोकसंख्येमागील प्रमाण पहावे. महाराष्ट्राची सरासरी सांगावयाची झाली तर, महाराष्ट्रात 1 लाख लोकसंख्येमागे 1469 लोक काम करतात. परंतु, मराठवाड्यामध्ये 1 लाखातील फक्त 561 लोक काम करतात.

B-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

त्यामुळे आज मराठवाड्यातील 76 तालुक्यांपैकी 74 तालुक्यामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. काल आबासाहेबांनी भाषण करतांना सांगितले. त्यांच्या मतदार संघात, सांगोला येथे जाण्याची परवा मलाही संधी मिळाली. त्या तालुक्यामध्ये टँकर मागितल्यावर जिल्हाधिकारी यांच्याकडून सांगितले जाते की, तुम्हाला टँकर दिला जाणार नाही. दुसरा सोर्स हुडकावून काढण्याचा प्रयत्न करायचा. सर्व गाव सांगत असतानाही टँकर चालू न करण्याचे धोरण जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांचे आहे. त्यामुळे सडळ हस्ते दुष्काळी भागाला मदत होत नाही, असा अनुभव सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात मी स्वतः घेतलेला आहे. आबासाहेबांनी तोच अनुभव आपल्याला सांगितलेला आहे.

अध्यक्ष महोदय, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये आणि हिंगोली जिल्ह्यामध्ये सोयगाव आणि सेनगाव हे दोनच तालुके असे आहे की ते टँकरमुक्त आहेत. खरे म्हणजे आता लहान धरणात आणि मोठ्या धरणांमध्ये तीन, चार टक्के पाणी शिल्लक आहे. ग्रामस्थांची तहान भागविण्यासाठी विहिरींचे अधिग्रहण करुन आपण आता टँकरने पाणी पुरवठा करीत आहोत. सरकार मराठवाड्याकडे कशा दृष्टीने पहात आहे. जलसंपदा मंत्री महोदयांनी मराठवाड्यासाठी काय केले, याची आकडेवारी पहाणे गरजेचे आहे. विदर्भाला सिंचनासाठी 2 हजार 421 कोटी रुपये देण्यात आले. पश्चिम महाराष्ट्राला 2 हजार 24 कोटी रुपये देण्यात आले. परंतु मराठवाड्याला केवळ 964 कोटी रुपये देण्यात आले. गोसीखुर्द सारख्या प्रकल्पाकरिता 1 हजार कोटी रुपये देण्यात आले परंतु मराठवाड्याला सर्व प्रकल्प मिळून 964 कोटी रुपये मिळालेले आहेत. आपण उर्वरित निधीपैकी 1 हजार कोटी रुपये गोसीखुर्द प्रकल्पाचे सोडले तर विदर्भाला 2 हजार 421 कोटी रुपये, पश्चिम महाराष्ट्राला 2 हजार 24 कोटी रुपये आणि मराठवाड्याला केवळ 924 कोटी रुपये दिलेले आहेत. मराठवाड्यावर किती अन्याय करायचा याला काही मर्यादा राहिलेली नाही. दुष्काळ असल्यामुळे यावर्षी मराठवाड्याकरिता दोन, चारशे कोटी रुपये जास्त निधी देऊन शेवटच्या टप्प्यातील प्रकल्प पूर्ण केले असते तर मागील तीन वर्षात ज्यांनी सतत दुष्काळ भोगला त्या मराठवाड्यातील जनतेला पाऊस आल्यावर फार मोठा दिलासा मिळणार होता. परंतु तीही संधी सरकारने गमावलेली दिसते.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदय, गोसीखुर्द प्रकल्पासाठी 1 हजार कोटी रुपये, आंतरराज्य प्रकल्पासाठी 200 कोटी रुपये, प्रधानमंत्री कृषी योजनेसाठी 300 कोटी रुपये असे 1500 कोटी रुपये बाजूला काढल्यास अनुशेषाच्या प्रमाणात निधी वाटप करण्याची राज्य शासनाची शिफारस माननीय राज्यपालांनी मान्य करुन त्याचे वाटप केले. ज्या चार जिल्ह्यामध्ये भौतिक अनुशेष शिल्लक आहे, त्यांना प्राधान्याने 750 कोटी रुपयांची अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात यावी, असे माननीय राज्यपालांनी देखील निर्देश दिलेले आहेत. राज्यात जवळपास 403 प्रोजेक्टरवर आपले काम चालू आहे आणि जवळपास 74 हजार कोटी रुपये याकरिता लागणार आहे. विदर्भात सर्वाधिक 172 प्रकल्प असून त्यांना 26 हजार कोटी रुपयांची गरज आहे. उर्वरित महाराष्ट्रात 159 प्रकल्प आहेत, त्याकरिता 34 हजार कोटी रुपये आणि मराठवाड्यातील 72 प्रकल्पांना 13 हजार 500 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. मराठवाड्यातील दुष्काळाचे चित्र बघितले तर माझी शासनाला विनंती आहे की, मराठवाड्यासाठी खास बाब म्हणून 13 हजार 500 कोटी रुपये पुढील दोन वर्षात देण्याचा वेगळा प्लॅन करण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, मराठवाड्यातील दुष्काळ असेल किंवा महाराष्ट्रातील जे दुष्काळी तालुके आहेत, त्याकरिता आपण विशेष तरतूद करुन दुष्काळी भागात पाणी पोहचविण्यासाठी काय करणार आहात, यातून या चर्चेचे फलीत झाले तर मराठवाड्यातील जनतेला दिलासा मिळाल्याशिवाय रहाणार नाही.

अध्यक्ष महोदय, आम्ही सुरुवातीला सांगत होतो की, बजेटरी प्रोव्हिजन कमी आहे. त्यात डीव्हीजीबल ठेवलेले पैसे 5 हजार 300 कोटी रुपये आहे. त्यामुळे यावेळी मराठवाड्यावर अन्याय झालेला आहे. आपण उत्तरात कदाचित सांगाल की, आम्ही गोदावरी खोऱ्याला 1362 कोटी रुपये दिलेले आहेत. परंतु त्यातील 272 कोटी रुपये नगर आणि नाशिक जिल्ह्यासाठी आहेत. ते बाजूला काढून मी हा आकडा सांगत आहे. त्यामुळे मराठवाड्याला 954 कोटी रुपये मिळाले तर मराठवाड्याने पाण्याच्या बाबतीतील टंचाईवर कशी मात करायची हा प्रश्न मराठवाड्यातील जनतेला पडलेला आहे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदय, दुष्काळावर मात करण्याचा संकल्प आपल्या सरकारने केलेला आहे. मराठवाड्यातील उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यासाठी कृष्णा मराठवाडा प्रकल्प महत्त्वाचा आहे. 23.42 टीएमसी पाणी देण्याचे कबूल करण्यात आले होते. परंतु आपले सरकार मात्र 7 टीएमसीची हमी घ्यायला लागले आहे. यंदा या प्रकल्पासाठी 35 कोटी रुपये मिळाले. 7 हजार 500 कोटी रुपयांची आवश्यकता या प्रकल्पाला आहे. परंतु या गतीने 35 आणि 20 कोटी रुपये द्यायला लागले तर कृष्णेचे पाणी तेथे पोहचायला कदाचित दोन ते अडीच दशके म्हणजेच 25 वर्षे लागतील. म्हणून मराठवाड्यातील सर्व प्रकल्पासाठी खास बाब म्हणून 15 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी, अशी मी मागणी करतो. खरे म्हणजे याकरिता भरीव तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री यांनी काल कोकणासाठी नवीन पर्यटन महामंडळ काढण्याचा निर्णय घोषित केलेला आहे. अगोदर एमटीडीसी होते. त्यातून आणखी एक महामंडळ केवळ कोकणाची काळजी घेण्यासाठी केलेले आहे. आता आपण कोकणाच्या एमटीडीसीला पैसे देणार की, ओव्हरऑल महाराष्ट्राच्या एमटीडीसीला पैसे देणार, हा बघण्याचा प्रश्न आहे...(अडथळा)...आमचा विरोध नाही. दोन्हीला पैसे मिळाले पाहीजे. कारण औरंगाबाद जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. परंतु तेथे भरीव तरतूद नाही, असा माझा मुद्दा आहे. आमचे सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांनी सांगितलेले विचार सभागृहाला मान्यच झालेले आहेत. त्यातून आता आपल्याला मागे जाता येणार नाही. आमची यापुढील मागणी आहे की, मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्याला पर्यटनासाठी जास्त निधी देण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये ज्येष्ठ नेते स्व.गोपिनाथराव मुंडे यांच्या नावाने अद्यासन केंद्र सुरु करण्याचा निर्णय केला. परंतु त्याबाबत अर्थसंकल्पात तरतूद केलेली नाही. तसेच अशाच पद्धतीने तेजस्वीनी बस सुरु करण्याचा निर्णय घेतला. परंतु या नवीन योजनेत मराठवाड्यातील एकाही शहराचा समावेश झालेला नाही. याचाच अर्थ आपण मराठवाड्याला विसरलेले आहात. आपल्या योजना झाल्याच तर विदर्भासाठी, जळगाव जिल्ह्यासाठी आणि जमलेच तर मुंबईसाठी कारण सद्या आपला महानगरपालिकेवर डोळा आहे.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

याच्या पलिकडे निधीचे वाटप होत नाही. त्यामुळे दुष्काळग्रस्त आणि अन्यायग्रस्त भागातील मराठवाड्याला आपल्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळत नाही.

अध्यक्ष महोदय, सतत सांगायचे की, आम्ही हे करतो, आम्ही ते करतो. खरे म्हणजे महावितरणला जे पैसे दिले, त्यातील 250 कोटी रुपयांचे पॅकेज विदर्भाकडे वळविण्यात आले आहे. खरे म्हणजे दुष्काळासाठी शेतकऱ्यांना वीज बिलातून माफी देण्याचा दिलासादायक निर्णय झाला. हा निर्णय झाल्यानंतर राज्य सरकारने 460 कोटी रुपये मराठवाड्यासाठी, विदर्भासाठी 359 कोटी रुपये आणि दोन्ही विभागमिळून 859 कोटी रुपयांचे पॅकेज महावितरणला जाहीर केले. परंतु यातील 250 कोटी रुपये आता वळविले जाणार आहे आणि मराठवाड्याच्या पदरात केवळ 460 कोटी रुपयांमधील 296 कोटी रुपये पडणार आहेत. ऊर्जा मंत्रालय आणि संबंधित विभागाचे सर्व मंत्री विदर्भातील असल्यामुळे आपल्यावर अशी वेळ यायला लागली असल्याची भावना मराठवाड्यात पसरलेली आहे. मी आपल्याला आकडेवारी सांगतो. औरंगाबादला 92 कोटी रुपये जाहीर झाले होते, परंतु तेथे आता 26 कोटी रुपयेच मिळणार आहे. जालना येथे 43 कोटीपैकी 29 कोटी रुपये मिळणार, बीडला 59 कोटी रुपयांपैकी 83 कोटी रुपये मिळणार आहे. म्हणजेच बीड येथील जास्तीचा निधी संबंधित खासदार आणि माननीय मंत्र्यांनी वाढवून घेतल्याचे दिसते. परंतु लातूरला 50 कोटी रुपयामधील रक्कम आता कमी होणार आहे. धाराशीव म्हणजेच उस्मानाबाद जिल्ह्यात 86 कोटी रुपयाऐवजी 75 कोटी रुपये मिळणार, नांदेडला 29 कोटी रुपयांऐवजी 60 कोटी रुपये मिळणार, परभणी येथे 74 कोटी रुपयांएवजी 21 कोटी रुपये मिळणार, हिंगोलीला 27 कोटी रुपये जाहीर झाले परंतु तेथे एकही रुपयाही दिलेला नाही. हे मी यासाठी सांगत आहे की, बुलडाणा येथे 70 कोटी रुपयावरुन 103 कोटी रुपये, वाशिम जिल्ह्याला 25 कोटी रुपयावरुन 37 कोटी रुपये, अमरावती जिल्ह्याला 47 कोटी रुपयावरुन 110 कोटी रुपये देण्यात येणार आहे. विदर्भाला निधी देण्यास अडचण नाही. परंतु आज मराठवाडा सर्वात अडचणीमध्ये आहे. मराठवाड्याचा विषय सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब यांनी सभागृहामध्ये आणलेला आहे. त्यांनी आणलेल्या विषयात विजेच्या संदर्भातील आपली सबसीडी देण्याचे धोरण मराठवाड्यावर अन्यायकारक आहे.

...C/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

मराठवाड्याला न्याय देण्यासाठी सरकार बोलते एक पण कृती त्याच्या उलट करुन मराठवाड्याच्या तोंडाला पाणी पुसत आहे.

अध्यक्ष महोदय, मुखेड तालुक्यातील एका गावातील एका महिलेला ती 12 वी पास एवढे शिकलेली असल्यामुळे तिला सरपंच करण्यात आले. या सरपंच महिलेसह त्या गावातील काही लोक गावातील पाण्याच्या वाईट स्थितीमुळे कामाच्या शोधासाठी मुंबई येथे येऊ लागली आहेत, अशी माझ्याकडे एक बातमी आहे. हे चित्र बदलण्याची गरज सरकारला आहे व त्याकरिता काही ना काही प्रयत्न सरकारने करावा.

अध्यक्ष महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. कारण प्रस्तावावरील दोन्ही विषयाचे एकत्रिकरण करण्यात आले. काल माझ्यापूर्वी एका सन्माननीय सदस्यांनी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भातील विषय मांडला होता. त्यासंदर्भात आम्ही मागील 3-4 वर्षापासून सांगत आहोत. सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची एक प्रोसिजर आहे. आज या सरकारमार्फत सुधारित प्रशासकीय मान्यतेसंदर्भातील विषय मंत्रिमंडळात घेऊन ठरविण्यात येते की, इल्लीगल झालेल्या गोष्टींना आम्ही प्रिस्क्राईब करीत नाही परंतु सुधारित प्रशासकीय मान्यता देतो. सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येते म्हणजे 100 कोटी रुपयांच्या कामांना 500 कोटी रुपये मान्यता देण्यात येते व सदरहू किंमत वाढण्याची जी वेगवेगळी कारणे देण्यात येतात त्यासही इन्डायरेक्टली हे सरकार मान्यता देत आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेसंदर्भात तुम्ही अशा पध्दतीने मान्यता दिलेली आहे किंवा देत आहात, असे म्हणून या विषयावर आज सत्ताधारी पक्षात असणारे लोक विरोधी पक्षामध्ये असताना आमच्या सरकारवर टिका करीत होते. त्यासंदर्भात सध्या सरकारचे चौकशीचे मोठे कार्यक्रम सुरु आहेत. परंतु हे सरकार देखील त्याच पध्दतीने सुधारित प्रशासकीय मान्यता देत आहे. जाणीवपूर्वक कामाच्या किंमती वाढलेल्या आहेत त्यांना नाईलाजास्तव का होईना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याशिवाय पर्याय नसतो. सुप्रमा संदर्भात सत्ताधारी पक्षातील लोक आम्ही सत्तेत असताना "तुम्ही भ्रष्टाचार केला", असे आम्हाला म्हणत होते. आता या सत्ताधारी पक्षाने दिलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेची यादी आम्ही घेण्यास सुरुवात केली असून ती

...2

श्री.जयंत पाटील.....

हळूहळू वाढेल. महाराष्ट्रात इरिगेशनसाठी देण्यात आलेले पैसे खर्च करावयाचे असतील तर त्यासाठीच्या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावी लागेल. ही मान्यता देताना 150 कोटी रुपयांचे प्रकल्प 600 ते 800 रुपयांवर गेले तर याचा अर्थ 500 कोटी रुपयांचा "भ्रष्टाचार तुम्ही केला", असा निष्कर्ष सत्ताधारी पक्षातील लोक विरोधी बाकावर बसत असताना काढत होते. आज आम्ही देखील तेच निष्कर्ष काढू शकतो. त्यामुळे याप्रकरणी तपशिलात जाऊन सत्ताधारी पक्षाने विरोधी बाकावर बसून ज्या पध्दतीने आमच्या सरकारवर टिका केली होती. आता देण्यात येणारी सुधारित प्रशासकीय मान्यता ही त्यावेळच्या पध्दतीने देण्यात येत असेल व त्यावेळच्या सगळ्याच पध्दती या सरकारने व्यवस्थित चालू ठेवल्या असतील तर त्यांनी आमच्यावर केलेल्या आरोपामध्ये तथ्य नाही. सत्ताधारी पक्षाने विरोधी पक्षाच्या भुमिकेत असताना त्यांनी जे आरोप आमच्यावर केले होते त्याबाबत काळाच्या ओघात महाराष्ट्राला कळून येईल की ते ज्या पध्दतीने केले होते ते खोटे होते. सुधारित प्रशासकीय मान्यता स्कोप वाढल्यामुळे व खर्चाची किंमत वाढल्यामुळे होते. आपणही सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असेल तर आपणही भ्रष्टाचार केला, असा त्याचा दुसरा अर्थ निघेल. मी जाता जाता जलसिंचन मंत्री महोदयांना विनंती करतो की, आपण हे सरकार आल्यानंतर ज्या सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत त्या कामांची यादी, मुळ किंमत व नवीन किंमतीसह सभागृहाच्या पटलावर ठेवावी. त्यामुळे सभागृहातील सर्व सदस्यांना आपल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा वेग कमी आहे, अधिक आहे किंवा तो थंडावला याचा अदमास येईल.

अध्यक्ष महोदय, माझी जलसंपदा व महसूल मंत्री महोदयांना विनंती आहे की, दुष्काळावर ठोस उपाययोजना काय केली जाणार आहे, हे त्यांनी त्यांच्या उत्तरामध्ये सांगावे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो, धन्यवाद !

----------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजाभाऊ वाजे (सिन्नर) : अध्यक्ष महोदय, या अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यामध्ये दुष्काळाच्या प्रश्नावर चर्चा उपस्थित करण्यात आली होती. त्यावेळी मी जनावरांच्या पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात मुद्दा मांडला होता. त्यावर महसूल मंत्री महोदयांनी मोठ्या मनाने सांगितले होते की, 25 टक्के लोकसंख्येच्या प्रमाणात गावांना जनावरांसाठी पिण्याचे पाणी देण्यात येईल. सदरहू प्रकरणी अद्याप आदेश निर्गमित करण्यात आले नसून ते निर्गमित करण्यात यावेत, अशी माझी विनंती आहे. तहसिलदारांना टँकर संदर्भात महसूल मंत्री महोदयांनी आदेश दिले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

-------------

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये वरिष्ठ सभागृहामध्ये व कनिष्ठ सभागृहामध्ये दुष्काळावर सातव्यांदा चर्चा होत आहे. राज्यातील दुष्काळाच्या भयान परिस्थितीचे प्रतिबिंब विधानसभेतील चर्चेतून कामकाजात दिसत आहे. ही वस्तुस्थिती आहे की, मागील 3 वर्षात राज्यात अवर्षणामुळे दुष्काळसदृष्य स्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळ ही बाब महाराष्ट्राला नवीन नाही. वर्षानुवर्षे म्हणजे सन 1962 व त्याआधी सन 1952 पासून राज्यातील जनतेला दुष्काळाचा भीषण सामना करावा लागलेला आहे. इतक्या प्रदीर्घ कालखंडामध्ये दुष्काळासंदर्भात कायम स्वरुपी उपाययोजना तयार करण्याची आवश्यकता होती व त्यासंदर्भात तत्कालीन सरकारने पावलले उचलली होती. दुष्काळावर चर्चा करीत असताना दुर्दैवाने सांगावे लागत आहे की, वर्षानुवर्षे दुष्काळाशी मुकाबला करण्यात येत असून त्याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. दुष्काळावर बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील यांनी सांगितले की, दुष्काळासंदर्भात कायमस्वरुपी उपाययोजना तयार करावयास पाहिजेते, त्यांच्या या मतास मी सहमत आहे. कायस्वरुपी उपाययोजना मागील 60-70 वर्षांच्या कालावधीमध्ये थोड्या थोड्या प्रमाणात केल्या असत्या तर आज दुष्काळाचा चटका, फटका व तीव्रता जाणवते ती जाणवली नसती.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.ग.आ.देशमुख यांचे नाव दुष्काळी आमदार आहे. ते सदनामध्ये नवव्यांदा निवडून आले असून ते पहिल्यांदा निवडून आले होते त्यावेळ प्रमाणेच आजही त्यांच्या मतदार संघामध्ये दुष्काळ आहे, याची मला जाण आहे. दुष्काळावर सातत्याने चर्चा घेण्यात येते, त्याच उपाययोजना करण्यात येतात, तात्पुरते निर्णय घेण्यात येतात, त्यामुळे राज्यातील दुष्काळी परिस्थिती फारशी बदलत नाही. याद्वारे तात्पुरता दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. दुष्काळासंदर्भात जी उपाययोजना करावी लागेल ती करण्याची तयारी राज्य सरकारची आहे. त्यानुसार आवश्यक त्यासंदर्भात निकष बदलण्याची तयारी या सरकारने दाखविली आहे.

अध्यक्ष महोदय, यापूर्वी दुष्काळाच्या संदर्भात असलेले निकष मोठ्या प्रमाणात या सरकारने बदलून जनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. दुष्काळसदृष्य परिस्थितीत सन 2015 मध्ये पहिल्यांदा सरकारने 15,747 गावे दुष्काळी जाहीर केले त्यानंतर रब्बीच्या हंगामात त्यामध्ये

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे......

1,053 गावांची भर पडली. त्यामुळे यावर्षी मोठ्या प्रमाणात दुष्काळी गावांची संख्या वाढली आहे. पूर्वीचे दुष्काळाचे निकष यावर्षी एनडीआरएफने बदलले आहेत. दुष्काळी आपत्तीच्या संदर्भातच नव्हे तर नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भातील निकषही बदलण्यात आले. पूर्वीच्या निकषानुसार 50 पैशांच्या वर नुकसान झाले तर नुकसान भरपाई देण्याची तरतूद होती ती यावर्षी केंद्र सरकारने 33 टक्क्यांच्यावर नुकसान झाले तरीही नुकसान भरपाई नाही तर सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतला. दुष्काळी निकष मोठ्या प्रमाणात बदलल्याने गावांची संख्या वाढली, लाभार्थींची संख्या वाढली व त्याप्रमाणात निधीच्या उपलब्धतेची आवश्यकता भासली. अशा पध्दतीने सुधारित पीक पैसेवारीची पध्दत बदलली व त्यामुळे गावांची संख्या वाढली. गावांची संख्या वाढत असताना काही ठिकाणी लोकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई व काही ठिकाणी लोकांसाठी व जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे, काही ठिकाणी पाऊस न पडल्याने जमिनीमध्ये काहीच उगवले नाही, अशी स्थिती राज्यात आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये मराठवाड्यातील दुष्काळावर प्रामुख्याने चर्चा झाली. मराठवाड्यातील 3-4 जिल्ह्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती आहे. लातूर, उस्मानाबाद व बीड या तीन्ही जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. जनावरांसाठी छावण्या काढता येतील, चारा देण्यात येईल, पाणी वाढवून उपलब्ध करुन देण्यात येईल परंतु पाणी आणणार कोठून ? या जिल्ह्यामध्ये आहे त्या पाण्याची उपलब्धता कमी असल्याने दुष्काळी भागात 40 लिटर माणसी याप्रमाणे पाणी देण्याची आवश्यकता असताना आम्ही ते 20 लिटरही देऊ शकत नाही, अशी स्थिती आहे.

यानंतर D-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे........

शासनाची पाणी देण्याची तयारी आहे. पाणी कोठूनही उपलब्ध करुन देण्यासंदर्भात राज्य सरकारची तयारी आहे. पण पाणी उपलब्ध पाहिजे. ज्या मराठवाड्याविषयी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी आस्थेने अर्धा तास भाषण केले. त्या मराठवाड्याच्या परिस्थितीमध्ये बदल करावयाचा असता तर आतापर्यंत मराठवाड्याच्या हिश्याचे 23 टीएमसी पाणी पश्चिम महाराष्ट्रातून आले असते तर कदाचित यामध्ये काही फरक पडला असता. त्यासाठी विरोध केला आणि ते पाणी मराठवाड्यात येऊ शकले नाही. हे पाणी कोठे येणार होते तर लातूर, उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यामध्ये की, ज्या ठिकाणी तीव्र दुष्काळ असलेल्या या तिन्ही जिल्ह्यांमध्येच हे पाणी येणार होते. या दुष्काळग्रस्त जिल्ह्यांना हे पाणी मिळाले असते तर कदाचित दुष्काळाची तीव्रता कमी झाली असती.

अध्यक्ष महोदय, आम्ही रेल्वेने मिरजहून पाणी आणण्याचा प्रयत्न केला आहे. आम्ही हा यशस्वी प्रयत्न करुन ट्रायल बेसीसवर त्या ठिकाणी 10 डबे पोहोचले आहेत आणि उद्यापासून 50 डबे त्या ठिकाणी सुरू होतील. याबाबतीत काही असे प्रकार झाले की, आपण मिरजचे पाणी मराठवाड्यात का देता, असे असेल तर आम्ही त्याला विरोध करु. पण मला सन्माननीय सदस्य डॉ. पतंगराव कदम यांचे कौतुक करावयाचे आहे. पिण्याच्या पाण्यामध्ये राजकारण आणू नये असे म्हणत असताना काही प्रवृत्ती अशाही पुढे आल्या आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. पतंगराव कदम यांचे खास करुन अभिनंदन करील आणि ते केले सुध्दा पाहिजे. कारण त्यांनी त्या ठिकाणी ठणकावून सांगितले आहे की, हा पाण्याचा प्रश्न आहे, राजकारणाच्या पलिकडचा प्रश्न आहे. राज्य आपले आहे आणि तेथील माणूसही आपला आहे. त्यामुळे आपल्याकडे पुरेसे पाणी उपलब्ध आहे तर ते देण्यासाठी कोणीही अडथळा आणू नये असे जाहीर आवाहन त्यांनी सभेमध्ये केले, पत्रकारांसमोर केले आणि त्यामुळे त्या ठिकाणी जी विरोधाची तीव्रता होती ती त्या क्षणाला थांबली आणि त्यामुळे या ठिकाणी पाणी आपल्याला आणता आले आहे.

अध्यक्ष महोदय, आज अशी परिस्थिती आहे की, या आपतग्रस्त तालुक्यांसंदर्भात सरकार गंभीर नाही, सरकार संवेदनशील नाही, सरकारने काहीच केले नाही अशी टीका केली जाते. मी त्यांना सांगू इच्छितो की, सरकार हातात हात घालून बसलेले नाही. या मराठवाड्यामध्ये ज्या ज्या

2......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे........

ठिकाणी टंचाई जाणवली त्या त्या ठिकाणी छावण्या उघडण्याचा निर्णय घेतला. त्या ठिकाणी छावण्या उघडत असताना पूर्वी आपण जो चाऱ्यासाठी पैसा देत होतो त्यासंबंधी आता 70 रुपये प्रति जनावर देण्याचा निर्णय घेतला आहे. लहान जनावरांसाठी पूर्वी 25 रुपये देत होतो त्यामध्ये आता 35 रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. मागेल त्याला शेततळे या योजनेपासून जलयुक्त शिवाराची योजना घेतली. पावसाचे पडणारे पाणी आपण आतापर्यंत जिरविले असते तर कदाचित पाण्याची पातळी थोडीशी वाढली असती. मी कायम वाढेल असे म्हणत नाही. पण आहे ते पाणी जिरविण्याची प्रक्रिया सातत्याने झाली असती तर कदाचित पाण्याची पातळी वाढली असती. दुष्काळाशी सामना करताना हा दुष्काळ व त्याची तीव्रता आणि टंचाई ही एका वर्षात निर्माण झाली नाही तर वर्षानुवर्षे आपण त्याकडे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे दुर्लक्ष केले आहे आणि त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. या दुष्काळाशी सामना करताना आपल्याला काय केले पाहिजे तर दुष्काळग्रस्तांना मदत दिली पाहिजे. मग ही मदत राज्य सरकारने केली नाही काय, तर राज्य सरकारने ज्या ज्या ठिकाणी पिकांचे नुकसान झाले आहे त्यासाठी मदतीचा निर्णय घेतला. आपण यासाठी नागपूरच्या अधिवेशनामध्ये 10 हजार कोटी रुपयांचे पॅकेज घोषित केले. नुसते घोषित केले नाही तर शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पैशाच्या माध्यमातून मदत दिली आहे. हा निधी आपण शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू केली आहे. याचबरोबर केंद्र सरकारने इतिहासामध्ये कधी नव्हे तर पहिल्यांदा 3052 कोटी रुपयांचा हप्ता दिला. राज्याच्या इतिहासामध्ये केंद्र सरकारकडून एवढी मदत कधीही आलेली नाही. पण यावेळी केंद्र शासनाने या मदतीची तयारी दाखविली.

अध्यक्ष महोदय, रेल्वेने पाणी आणण्याचा अशा प्रकारचा प्रयोग या राज्यामध्ये यापूर्वी कधीही झाला नाही तो आज राज्य सरकारने केला आहे. आता हा प्रयोग केला तर काही जण म्हणतात की, उशिरा का केला. पाणी आणले तर उशिरा का आणले, पाणी आणले पण ते 50 डबे का आणले, पाणी आणले तर मग एकाच दिवशी एकच रेल्वे का वाहता. अहो, पण पाणी आणले आहे ना, निदान मूल जन्माला आले ना, आपल्या वेळेस मागील 50 वर्षामध्ये तर तेही झाले नाही. मग जे झाले आहे ते, काळे आहे का गोरे आहे, नकटे आहे का, चपटे आहे हे कशाला बोलत बसता.

3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे........

पाणी आणले आहे ना. आम्ही पाणी आणणार. एक काय आम्ही रोज पाण्याच्या बोग्या पाठवू. पण काही वेळ लागू शकतो. साडे तीनशे किलोमिटर लांबीवरुन यायचे असेल तर सर्व रेल्वे ट्रॅक आम्हाला अडविता येत नाहीत. मी तर खास करुन रेल्वे मंत्री माननीय श्री. सुरेश प्रभू यांचे या सभागृहामध्ये अभिनंदन करेल की, एक महिन्यापूर्वी आम्ही ही त्यांच्यासमोर कल्पना मांडली होती आणि मी पुढच्या 3-4 दिवसामध्ये विसरुनही गेलो होतो. पण 4 दिवसानंतर त्यांचा मला फोन आला होता आणि ते म्हणाले की, खडसे साहेब आपण जे सांगितले ते मी मार्गी लावतो आहे. मी म्हटले काय, तर ते म्हणाले मराठवाड्याला पाणी देण्याचे आपणच सांगितले आहे. त्यांनी या संबंधी गंभीरतेने लक्ष घातले. यासंबंधी ज्यावेळी माननीय मुख्यमंत्री आणि मी ज्यावेळी त्यांना भेटलो होतो आणि विनंती केली होती की, आम्हाला यासाठी निधी खूप लागणार आहे. कारण रेल्वेने पाणी आणणे ही खर्चिक बाब आहे आणि ती राज्य शासनाला परवडणारी नाही. माननीय सुरेश प्रभूसाहेबांनी सांगितले की, आपण पैशांची चिंता करु नका, त्यामधील काही खर्च आम्ही सोसू. काही आपण सहन करा आणि काही आम्ही सहन करु. आम्ही त्यांना एक रॅक मागितली होती तर ते म्हणाले आपले एक रॅकमध्ये काम पूर्ण कसे होईल, त्यांनी स्वत: दोन रॅक देण्याची तयारी दर्शविली. काल रात्री ते परदेशात असताना अभिनंदन करण्यासाठी मी त्यांना फोन केला तर ते म्हणाले मी परदेशात आहे. मी त्यांना म्हटले की, साहेब आपले टँकर आता सकाळी पोहोचत आहेत म्हणून आपले खास करुन अभिनंदन. साहेब आपण मला खूप दिले आहे. आपल्याला मागावे की नाही काही समजत नाही. पण माझी इच्छा आहे की, या दोन रॅकऐवजी आणखी एखादी रॅक आम्हाला दिली तर आम्हाला दररोज पाणी देता येईल. आता हे पाणी तीन दिवसातून एकवेळ जाईल. त्यांनी मला सांगितले की, मी परवा पोहोचतो आहे आणि पोहोचल्यानंतर त्याचा आढावा घेतो आणि त्याप्रमाणे कार्यवाही करतो. यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात तीव्रता आहे, टंचाई आहे, जनावरांची काळजी घेणे आवश्यक आहे. पण याचा अर्थ आम्ही त्याकडे दुर्लक्ष करतो असे नाही. सरकारच्या माध्यमातून यावर मात करण्याचा आम्ही प्रयत्न करतो आहे. वेळ कमी आहे पण राज्य सरकारने या संदर्भात अनेक निर्णय घेतले आहेत. शेतकऱ्यांच्या संदर्भात जो दुष्काळी आणि

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे........

आत्महत्याग्रस्त भाग आहे त्या ठिकाणी पूर्वीचे दुष्काळ पाहिले तर ते अन्नाचे दुष्काळ होते. त्यामध्ये सन 1952, 1962 आणि 1972 सालचा दुष्काळ पाहिला तर त्या ठिकाणी पाण्याचा दुष्काळ कमी होता आणि अन्नाचा दुष्काळ जास्त होता. अशा स्थितीत शेतकऱ्यांच्या पोटाला अन्न मिळाले पाहिजे आणि त्या दृष्टीकोनातून 2 रुपये किलोने गहू आणि 3 रुपये किलोने तांदूळ देण्याची अन्न सुरक्षा मोहीम आपण या सर्व जिल्ह्यांमध्ये सुरू केली आहे. अन्नावाचून कोणी तडफडून मरता कामा नये याची दक्षता सरकारने घेतली आहे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना संरक्षण मिळाले पाहिजे या दृष्टीकोनातून स्वर्गीय गोपिनाथराव मुंडे अपघात विमा योजना सुरू केली आहे. दुर्दैवाने जर एखादा खातेदार शेतकरी अपघातामध्ये मृत पावला तर त्याच्या परिवाराला 2 लाख रुपये देण्याचा निर्णय या योजनेतून घेतला आहे. शेतकऱ्याच्या विम्याचा पैसा सरकारने भरला आहे. अन्न सुरक्षा योजना असेल आणि त्याचबरोबर अन्य व्यवस्था असतील, कोणताही शेतकरी कोणत्याही आजाराने आजारी पडला तर त्याला जीवनदायी योजनेंतर्गत सर्वच्या सर्व म्हणजे 100 टक्के संरक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आता शेतकरी आजारी पडला तर त्याला या योजनेचा फायदा होईल. शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत एखाद्या शेतकऱ्याचा एखादा अवयव म्हणजे हात किंवा डोळा निकामी झाला तरी त्याला या अपघात विमा योजनेतून त्याला संरक्षण मिळेल, अशा स्वरुपाची व्यवस्था शासनाने केलेली आहे. हे सर्व करीत असताना जलयुक्त शिवार योजनेचा एक महत्वाकांक्षी कार्यक्रम स्वीकारला आहे. या बाबतीत आमचा विश्वास आहे की, प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक गावापर्यंत जर जलयुक्त शिवाराचे काम झाले आणि योगायोगाने जर पाऊस पडला तर पाणी थांबल्यानंतर पाण्याची पातळी निश्चितपणे वाढणार आहे. ही योजना सातत्याने 4 वर्षे सुरू ठेवण्याचे आम्ही ठरविले आहे आणि त्यापुढेही चालेल. परंतु मला विश्वास आहे की, या चार पाच वर्षामध्ये पाऊस नियमित पडत गेला आणि पाणी जर आपण जिरवित गेलो तर भविष्यातील पाण्याची तीव्रता आज जी भेडसावत आहे ती होणार नाही. काही जलयुक्त शिवार योजनेच्या संदर्भात मागेल त्याला शेततळे देण्याचे आपण धोरण घेतले आहे. बऱ्याच जणांनी सांगितले की,

5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे........

मागेल त्याला शेततळे या योजनेमध्ये आम्ही 80 हजार रुपयांचा निधी देत होतो तर आता आपण ते प्रमाण 50 हजारावर आणून ठेवले आहे. आपण शेतकऱ्याला ज्यावेळी 50 हजार रुपयांचे जलयुक्त शिवार योजनेचे तळे घेण्यास सांगितले त्याचवेळी त्याला मशिनरीने ते खोदण्याची परवानगी दिली आहे. जेसीबी किंवा तत्सम साहित्य वापरावयाचे असेल त्याची परवानगी आपण शेतकऱ्याला दिली आहे. शेतकऱ्याला जर 5 लाखाचे मोठे शेततळे घ्यावयाचे असेल तर ते घेऊ शकतात. 10 लाखाचे घ्यायचे असेल तर ते घेऊ शकतात. आमची परवानगी आहे, फक्त ते मनरेगामधून घ्यावे. आपल्याला लागणारा निधी आम्ही मनरेगामधून देण्यास तयार आहोत.

E-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.......

हाताला काम नाही असा आपला आक्षेप असतो. जलयुक्त शिवारामध्ये मागेल त्याला काम मनरेगातून काम देत असतो. हे सर्व अधिकार सरकारने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत. टँकर लावण्याचे अधिकार तहसिलदारांना देऊन टाकलेले आहेत. कामे मंजूर करण्याच्या संदर्भातील अधिकार ग्रामपंचायतीला देऊन टाकले. ग्रामपंचायतीला पैसे वर्ग करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. याचा उपयोग अधिकाधिक उत्पादक कामांसाठी करावा म्हणून याबाबतचे आदेश सरकार काढत आहे. मनरेगामधून जर मजूर उपलब्ध असतील तर रस्ते व जलसंधारणाच्या कामाला प्राधान्य देण्यात येईल. त्या बरोबरीला राज्यातील रस्ते गावातील रस्ते, शहरातील रस्ते, छोटे छोटे रस्ते मजूरांच्या माध्यमातून करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. यात जे काही निकष आहेत ते शिथील करण्याच्या संदर्भातील सूचना देण्यात आलेल्या आहेत. अधिवेशन संपण्याच्या आत यांसदर्भातील आदेश निर्गमित करण्यासाठी छाननी सुरु केलेली आहे. नैसर्गिक आपत्ती आहे त्याला तुम्ही आम्ही काहीही करु शकत नाही. परंतु या माध्यमातून त्याला दिलासा देणे, विश्वास निर्माण करणे, त्याला सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे.

अध्यक्ष महोदय, जनावरांच्या छावणीच्या संदर्भात सुध्दा ज्या-ज्या ठिकाणी जनावरांच्या छावणीची मागणी येईल, त्या-त्या ठिकाणी छावण्यांना परवानगी देण्यासाठी कलेक्टरच्या कॉन्फरन्समध्ये सूचना दिलेल्या आहेत. हा लातूर, बीड, उस्मानाबादपुरता मर्यादित प्रश्न नाही तर सांगली, सांगोला अशा बऱ्याच ठिकाणी प्रश्न निर्माण होऊ शकतात. ज्या-ज्या ठिकाणी असे प्रश्न निर्माण होतील त्या-त्या ठिकाणी राहिलेले तीन महिने यांसदर्भातील सर्व अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आदेश निर्गमित केलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले आहे की, तुम्हाला याठिकाणी विचारायची आवश्यकता नाही. पूर्वी परवानगीसाठी मंत्रालयामध्ये यावे लागत होते तेही आता यायची गरज नाही. तुम्ही त्याठिकाणी निर्णय घ्यायचा आहे. टँकर, विहिर खोदकाम, विहिर खोल करायची आहे हे सर्व अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत आणि याला एक लाखापर्यंतची मर्यादा होती ती काढून जेवढा पैसा आवश्यक असेल तेवढा खर्च करण्याची परवानगी दिलेली आहे. कमांड

.......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.......

क्षेत्रामध्ये बोअर करायला परवानगी देत नाही. कॅचमेंट एरियामध्ये सुध्दा जवळपास पाणी मिळत असेल तर एखादी बोअर किंवा विहिर करायला परवानगी दिलेली आहे. लातूरला मांजरा धरणाच्या शेजारी चर खोदले आणि त्या चरामध्ये पाणी मिळाले. जर चर खोदून पाणी उपलब्ध होत असेल तर तेही करायला परवानगी दिलेली आहे. जिथे-जिथे पाणी मिळेल अशा ठिकाणी सारे निकष बाजूला ठेवून जर जिल्हाधिकाऱ्याला वाटले की ते करायचे आहे तर सरकारची पूर्णत: परवानगी आहे.

अध्यक्ष महोदय, टँकर लावण्याचे जसे अधिकार ठेवलेले आहेत त्या बरोबरीला तात्पुरती वॉटर सप्लाय स्कीममध्ये दीड किलोमीटरच्या वर घेता येत नव्हते. जिल्हाधिकाऱ्यांना सांगण्यात आले की, अगदी 5 किमीपर्यंत पाणी उपलब्ध असेल त्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. 5 किमीपर्यंत पाणी असेल तरी पाईप लाईन टाकून त्या गावाला पाणी आणण्यासाठी खर्चाची मर्यादा टाकलेली नाही. पाण्याच्या कोणत्याच कामासाठी कोणतीच मर्यादा ठेवलेली नाही. कामे मंजूर करण्यासाठीच 15-20 दिवस निघून जातात, काम व्हायला 15-20 दिवस निघून जातात, मग महिनाभरात अंमलबजावणी होते. यापेक्षा आता आर्थिक वित्तीय मर्यादा शिथील केलेली आहे. लांबवरुन पाणी आणण्यासंदर्भातील जे निकष होते तेही आता शिथील करण्यात आलेले आहेत. पैसा उपलब्ध करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना एक वेगळे हेड दिलेले आहे. रेग्युलर हेडपेक्षा टंचाईच्या हेडमधून पैसा उपलब्ध करुन द्यावा. सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख यांची मागणी होती की, उपसा सिंचनाचे वीज बिल भरले तर काही उपसा सिंचन योजना सुरु होण्यासारख्या आहेत. यातून पाण्याचा प्रश्न मिटण्यासारखा आहे. त्यातून टँकर भरता येतील किंवा काही गावांना पाणी देता येईल. या दोन दिवसामध्ये राज्य सरकार हाही निर्णय घेईल.

**तालिका सभाध्यक्ष** : सभागृहाची वेळ 10 मिनिटांसाठी वाढविण्यात आलेली आहे.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, उपसा सिंचन योजनेच्या थकलेल्या वीज बिलाची रक्कम सरकार या कालावधीपुरती सुरु करेल. उपसा सिंचन योजना सुरु करण्यासाठी पैसे भरुन व वीज बिल भरुन त्याठिकाणी निश्चित मदत करण्यात येईल. ज्याठिकाणी उपसा सिंचन योजनांचे

........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.......
सरकारी, सहकारी वीज बिल थकलेले असेल ते सर्व उद्या अधिवेशन संपण्याच्या आत यासंदर्भातील सूचना मिळतील. किंबहूना मी आजच सांगतो की, जिल्हाधिकाऱ्यांना तशाप्रकारच्या सूचना देऊ. पैशासाठी जीआर काढायला एक दिवस जातो. आपल्याकडे जीआर नावाचा जो माणूस आहे त्याला यायला थोडा वेळ लागतो. त्यामुळे अशा ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांकडून जे प्रस्ताव आले असतील त्याला आपण मान्यता देऊ आणि वीज बिल भरण्याच्या संदर्भामध्ये निर्णय घेऊ.

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, उत्तर महाराष्ट्रामध्ये अंतोदय योजना लागू करु असे माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांनी मागच्या वेळेस उत्तरामध्ये सांगितले होते. पश्चिम महाराष्ट्र हा 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारीमध्ये आहे. ज्याप्रमाणे विदर्भ आणि मराठवाड्याला अंतोदय योजना लागू केलेली आहे. याठिकाणचे लोक सुध्दा आता सुरतकडे स्थलांतरीत व्हायला लागलेले आहेत. माझी विनंती आहे की, या तीन जिल्ह्यांचा फार मोठा भार पडणार नाही. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्राचा यामध्ये समावेश करावा अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, आकडेवारीमध्ये असे लक्षात आले आहे की, काही क्षेत्रामध्ये आत्महत्यांचे प्रमाण जास्त आहे. जळगाव जिल्ह्याच क्रमांक मधल्या कालखंडामध्ये आत्महत्यांमध्ये वरती यायला लागलेला होता. आता थोडा कमी झालेला आहे. अशा ज्या-ज्या ठिकाणी आत्महत्यांचे आकडे जास्त आहेत. दुष्काळी परिस्थिती संपूर्ण जिल्ह्यामध्ये आहे अशा ठिकाणी ही योजना राबविण्याच्या संदर्भात शासन विचार करेल. माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन याबाबत निश्चित निर्णय घेऊ. मी एवढेच सांगतो की, यांसदर्भात सरकार गंभीर आहे. हा विषय असा आहे की, तुम्ही तिकडून बोलणार, मी इकडून बोलेल. तरी या माध्यमातून हे प्रश्न सुटणार नाहीत. लातूरबाबत अनेक चर्चा झाल्या. लातूरच्या विषयाबाबत मला खरोखरच दु:ख होते की, याठिकाणी वर्षानुवर्षे दुष्काळ आहे. लातूरला कायम स्वरुपी पाणी आणण्याच्या संदर्भात प्रस्ताव आलेला आहे. उजनी धरणातून पाणी आणण्यासंदर्भातील जवळपास 450 हजार कोटी रुपयांची योजना आहे आणि त्याची तपासणी सुरु आहे. कायम स्वरुपी यावर मार्ग काढण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. धान्य असेल, रोजगार असेल, जनावरांच्या चाऱ्यासंदर्भात जे काही निकष

.......4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.......

असतील ते सर्व निकष बदलविण्याची सरकारची तयारी आहे. भक्कमपणे सरकार दुष्काळग्रस्तांच्या पाठीशी उभे आहे. आपण सर्वांचे सहकार्य मिळत आलेले आहे. टिका टिप्पणी होत राहिल, तो काही विषय नाही. परंतु सर्वांनी मिळून या दुष्काळाशी सामना करायचा आहे. याबाबत राज्य सरकारची आवश्यक ते सर्व नियम शिथील करायची तयारी आहे. वेळ कमी असल्यामुळे मी या चर्चेत थांबतो आणि या चर्चेमध्ये ज्यांनी-ज्यांनी सहभाग घेतला या सर्वांचे आभार मानतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------------

........5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री) : अध्यक्ष महोदय, मराठवाड्याच्या दुष्काळावर सन्माननीय सदस्य सर्वश्री.प्रशांत बंब, जयदत्त क्षीरसागर, सुभाष साबणे तसेच साधारणत: 20-22 सदस्यांनी मराठवाड्याचा दुष्काळ, पाणीटंचाई, पाणी पुरवठ्याची अपूर्ण कामे, मराठवाड्यातील टँकरची संख्या, मराठवाडा आणि राज्याच्या टंचाई आराखडा या विषयावर अतिशय महत्वाचे मुद्दे याठिकाणी उपस्थित केलेले आहेत. ही गोष्ट खरी आहे की, गेल्या 3-4 वर्षापासून जो पडतो, 100 दिवस पडणारा पाऊस आता 100 तासावर आलेला आहे. पावसाचे प्रमाण कमी झालेले आहे. धरणातील पाणी असेल, विहिरीतील पाणी असेल, मोठ्या नद्यांमधील पाणी असेल, हे सर्व पाणी यावर्षी मराठवाड्यातील संपत आलेले आहे.

F-1...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बबनराव लोणीकर........

म्हणून पाणी टंचाईवरच्या शासनाने काही उपाययोजना केलेल्या आहेत. राज्याचा पाणी टंचाईचा 776 कोटी रुपयांचा प्रति आराखडा राज्य शासनाने तयार केलेला आहे. 776 कोटी रुपयांचा आराखडा तयार झाला आणि आतापर्यंत राज्य शासनाने 449 कोटी रुपये टंचाई आराखडयाचे त्या-त्या जिल्हाधिका-यांना वितरीत केलेले आहेत. प्रामुख्याने मराठवाडयाच्या औरंगाबाद जिल्हयासाठी 68 कोटी 92 लक्ष रुपये वितरीत केलेले आहेत. जालना जिल्हयासाठी 24 कोटी 67 लक्ष वितरीत केलेले आहेत. बीड 60 कोटी, उस्मानाबाद 35 कोटी, लातूर 24 कोटी, परभणी 11 कोटी, नांदेड 46 कोटी, हिंगोली 3 कोटी आणि पूर्ण राज्य मिळून 449 कोटी रुपये शासनाने टंचाई आराखडयासाठी, पिण्याच्या पाण्याच्या उपाय योजना तयार करण्यासाठी या आराखडयाच्या माध्यमातून वितरीत केलेले आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी राष्ट्रीय पेयजल योजना केंद्र सरकारने बंद केलेली आहे, गेल्या वर्ष भरापासून राष्ट्रीय पेयजल योजनेला निधी उपलब्ध नाही, अशा प्रकारचे या ठिकाणी त्यांनी मत व्यक्त केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय पेयजल योजना रद्द झालेली नाही. राष्ट्रीय पेयजल योजनेला केंद्र सरकारने स्थगिती दिलेली आहे. यासंदर्भात सातत्याने माननीय मुख्यमंत्री, माननीय श्री.नाथाभाऊ खडसे, माननीय अर्थ मंत्री आणि स्वत: मी माननीय केंद्रीय मंत्र्यांच्या संपर्कात आहोत. जी स्थगिती दिलेली आहे ती स्थगिती उठविण्याच्या संदर्भात केंद्र सरकारला विनंती केलेली आहे. राष्ट्रीय पेयजल योजना बंद झालेली नाही. जी जुनी कामे आहेत, अपुर्ण आहेत, गेल्या 10 वर्षापासून मोठया प्रमाणावर योजना हाती घेण्यात आल्या या योजनेची कामे पूर्ण झालेली नाहीत. ही कामे पूर्ण होईपर्यंत नवीन योजना हाती घेऊ नये, अशा प्रकारचे सरकारचे आदेश होते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजनेला निधी कमी आहे असा मुद्दा उपस्थित केला. अनेक सन्माननीय आमदारांनी हा निधी अपूरा आहे अशा प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत. 4 वर्षासाठी 2 हजार कोटी रुपयांची तरतूद मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजनेमध्ये ठेवलेली आहे. शेवटी पाण्याचा प्रश्न

..2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बबनराव लोणीकर.....

आहे म्हणून माननीय मुख्यमंत्री, माननीय अर्थ मंत्री माननीय श्री.नाथाभाऊ यांनी पाण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही असे वेळोवेळी सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी मला मदत केलेली आहे. योजनेला 500 रुपये कमी होतात. आपले माननीय मुख्यंत्र्यांशी चांगले संबंध आहेत. त्याबाबत आपणही बोलावे. सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा योजनेला सक्षम करण्यात येईल. धन्यवाद.

.........

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन (जलसंपदा मंत्री): अध्यक्ष महोदय, नियम 293 च्या प्रस्तावावरील चर्चेचा आजचा शेवटचा दिवस म्हणावा लागेल, अतिशय उशीरा तो या ठिकाणी आला. परंतु सन्माननीय सदस्य श्री.प्रशांत बंब, सन्माननीय सदस्य श्री.क्षिरसागर साहेब व जवळजवळ 20 सदस्यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. मला हा विषय 5 मिनिटांत पूर्ण करायचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रशांत बंब यांनी समन्यायिक पाणी वाटपाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही बाबतचा प्रश्न उपस्थित केला. या ठिकाणी राज्याचे धोरण आहे. एम.डब्ल्यू.आर.आर.ए. नी.......

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, विशेष बैठक आता 10.55 वाजता बंद होणार आहे. आपल्याला विनंती आहे की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर दुखवटयाचा ठराव झाल्यानंतर माननीय श्री.गिरीष महाजन उत्तर देतील.

**तालिका सभाध्यक्ष** : आता या सभागृहाची वेळ संपलेली आहे. नियमित बैठक सकाळी 11.00 वाजता सुरु होईल.

( सभागृहाची विशेष बैठक 10 वाजून 54 मिनिटांनी स्थगित झाली.)

.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

**कंत्राटी कामगार सेवा विधेयक मंजूर केल्याबाबत**

श्री.धैर्यशिल पाटील : अध्यक्ष महोदय, माझी हरकत आहे. काल कंत्राटी कामगार सेवा विधेयक मंजूर झाले अशा प्रकारची बातमी टी.व्ही.वर आली. मी तपासणी केली तेव्हा ही बातमी खरी असल्याचे सांगितले गेले. असे या विधेयकामध्ये काय आहे की, यावरील चर्चा काळया रात्री 11 वाजता झाली पाहिजे. दिवस येथे उजेड येऊ शकत नाही का ?

अध्यक्ष महोदय, या विधेयकावर मला बोलायचे होते. मी अध्यक्ष महोदयांना तसे सांगितले होते व मी विचारणा केली होती. मला सांगितले गेले की, हे विधेयक उद्या घेऊ. मी लेखी दिल्यानंतर आपल्या खुर्चीकडून मला आलेले ते उत्तर आहे. हे मोठे विधेयक होते. आम्ही आमदार म्हणतो की, आम्ही शेतकऱ्यांची मुले आहोत. उरलेले लोक म्हणतात की आम्ही कामगारांची मुले आहोत. त्या कामगारांच्या संदर्भातील हे विधेयक या सभागृहात पाच सदस्यांच्या उपस्थितीत मंजूर होते. शासनाची अशी भूमिका का नाही की यावर चर्चा केली जावी किंवा यावर चर्चा होऊ नये अशी शासनाची भूमिका का आहे ? प्रश्न असा आहे की, शेतकऱ्यांचा व कामगारांचा कळवळा आपणास असला पाहिजे. कारण महाराष्ट्राच्या प्रत्येक चळवळीमध्ये अर्धयू म्हणून हे दोन घटक राहिलेले आहेत. त्यांच्या आयुष्याबद्दलचा निर्णय या सभागृहात रात्री पाच सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत घेतला जातो. आम्ही विनंती केली व परवानगी घेतली होती की, यावर आम्हाला बोलायचे आहे. हे कामकाज होणार नव्हते म्हणून रात्री 9 वाजता आम्ही येथून जाण्याची परवानगी घेतली. तरीसुध्दा मला सांगावेसे वाटते की, या महत्वाच्या विधेयकाच्या विरोधात केवळ डावे नाहीत, केवळ समाजवादी कामगार संघटना नाहीत तर हिंदुत्ववादी विचाराला जवळ असणाऱ्या कामगार संघटनाही या विधेयकाला विरोध करीत आहेत. कंत्राटी कामगार हा मुळातच घटनेच्या विचाराला छेद देणारा, समान काम समान वेतन या तत्वाला छेद देणारा कायदा आहे. हा कायदा आपण रात्री मंजूर केलेला आहे.

**अध्यक्ष** : मी तपासून घेतो व सांगतो.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, काल पीठासीन अधिकाऱ्यांनी सांगितले होते की, कंत्राटी कामगार सेवा विधेयकावर चर्चा होणार नाही. सभागृहात पाच सदस्य उपस्थित असताना हे महत्वाचे विधेयक मंजूर झालेले आहे हे बरोबर नाही. याबाबतीत पुन्हा चर्चा करण्यात यावी असे मी म्हणणार नाही कारण हे विधेयक मंजूर झालेले आहे. पण अशा तऱ्हेची घटना होऊ नये असे वाटते.

**अध्यक्ष** : याबाबत आपण काळजी घेऊ.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**अध्यक्ष** : आता दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक 52056 घेण्यात येईल.

**लातूर जिल्ह्यातील उद्योग पाण्याअभावी बंद पडल्याबाबत**

***(१) * ५२०५६ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित देशमुख (लातूर शहर) :*** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१) लातूर*** जिल्ह्यातील दुष्काळाची दाहकता वाढत असून लातूर एमआयडीसीतील सुमारे ६०० तर इतर तालुक्यातील सुमारे ६०० असे एकूण १२०० उद्योग असून त्यापैकी सुमारे ५० टक्के उद्योग पाण्याअभावी बंद पडल्याचे माहे ***फेब्रुवारी,*** २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले ***आहे,*** हे खरे आहे ***काय,***
***(२) असल्यास,*** जिल्ह्यातील या उद्योगांमध्ये सुमारे २० हजार कामगार कार्यरत असून यातील निम्मे उद्योग बंद केल्यामुळे दहा हजार मजुरांवर बेकारीची वेळ आली असून सदर प्रश्नाची तीव्रता लक्षात घेता राज्य शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करणार ***का,***
***(३) नसल्यास,*** विलंबाची कारणे काय आहेत ***?***

***श्री.प्रवीण पोटे-पाटील, श्री. सुभाष देसाई यांच्याकरिता :*** (१) हे अंशतः खरे आहे.

2. मांजरा धरणातील पाणीसाठी संपल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महमंडळातर्फे लातूर, अतिरिक्त लातूर व औसा औद्योगिक क्षेत्राला होणारा पाणीपुरवठा बंद झालेला आहे. मात्र बहुतांश उद्योग खाजगी टँकरद्वारे पाणी घेवून उत्पादन करीत आहेत. तथापि, पाण्याअभावी 79 उद्योग व इतर कारणामुळे 76 उद्योग बंद झाले असून अंदाजे 3741 कामगार तात्पुरत्या स्वरुपात प्रभावित झाल्याचे आढळले आहे. तथापि, महामंडळाने सदर औद्योगिक क्षेत्रात पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.

(1) लातूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना त्यांचे मागणीप्रमाणे व भूजल सर्वेक्षण विभागाच्या शिफारशीनुसार विंधन विहिरी खोदण्याची परवानगी देण्यात येते.

(2) महामंडळाने खुली जागा व सोयी-सुविधांसाठी ठेवलेल्या जागेत वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, लातूर यांनी सुचविलेल्या ठिकाणी विंधन विहिरी घेतल्या जातात.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रविण पोटे-पाटील .....

(3) महामंडळाने लातूर महानगरपालिका व जिल्हा प्रशासन, लातूर यांना इतर स्त्रोतातून पिण्यासाठी पाणी पुरवठा करण्याची मागणी केली आहे.

3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.त्रिंबकराव भिसे : अध्यक्ष महोदय, लातूर जिल्हयातील उद्योग एमआयडीसीने पाणीपुरवठा बंद केल्यामुळे बंद आहेत. उद्योगांचे झालेले आर्थिक नुकसान शासन भरुन देणार आहे का, या उद्योगांना भविष्यात पुन्हा त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी सवलती देणार आहे का, या उद्योगांमुळे कामगारांवर बेकारीची पाळी आलेली आहे त्यामुळे या दुष्काळी परिस्थितीत शासन त्यांच्या हाताला काम देणार आहे का, त्यांच्या उपजिविकेकरिता अन्नधान्याबाबत शासन मदत करणार आहे का ? दिनांक 4 एप्रिल, 2016 रोजी दिलेले उत्तर चुकीचे व विसंगत होते. ज्या अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांकडे चुकीचे उत्तर दिले होते, त्यांच्यावर कोणती कारवाई करणार ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी लातूर जिल्हयात पाण्याअभावी उद्योग बंद पडल्याबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. पाण्याअभावी उद्योग पडल्यास त्याकरिता शासनाची त्यांच्याकरिता स्पेशल काही व्यवस्था करण्याची जबाबदारी नाही व अशी आपली कोणतीही व्यवस्थाही नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, यांना अन्नधान्य पुरविणार का, आपली मोठया प्रमाणात बीपीएल धारकांना अन्नधान्य पुरविण्याची व्यवस्था चालू आहे. कामगार बीपीएलमध्ये येत आहे. त्यामुळे त्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या सर्व योजना पुरविल्या जातील. पण उद्योग विभागाकडून अशा कोणत्याही योजना पुरविण्याची व्यवस्था नाही.

श्री.अब्दूल सत्तार : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, सर्व कामगार बीपीएलमध्ये नाहीत. परंतु दुष्काळी परिस्थितीत जे कारखाने पाण्यामुळे बंद आहेत अशा कामगारांना आपण अन्नधान्य पुरविणार का, ज्या उद्योगामुळे कामगारांचे नुकसान होत आहे त्या कंपनीच्या कामगारांना सरकार काही मदत करणार का ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीस सांगितले आहे की, अशी कोणतीही प्रोव्हीजन नाही.

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिष पिंपळे : अध्यक्ष महोदय, आपणा सर्वांना माहिती आहे की, लातूरला पाणी टंचाई असल्यामुळे रेल्वेने पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे सहाजिकच उद्योगांना पाणी नसल्यामुळे उद्योग बंद पडत आहेत. यामुळे मोठया प्रमाणावर लोंढे मुंबईसारख्या शहरात येत आहेत. आपण त्यांना थांबविले नाही, त्यांना दिलासा दिला नाही तर ते मोठया संख्येने शहरात येतील आणि येथील व्यवस्था कोलमडेल अशी परिस्थिती आहे. मदतीची प्रोव्हीजन नाही ही बाब खरी आहे पण किमान हे 2 महिने मजुरांना विशेष बाब म्हणून दिलासा देण्यासाठी दोन महिन्याचे अन्नधान्य व दोन महिने संजय गांधी निराधार योजनेचा पगार किंवा विशेष मदत आपण त्यांच्याकरिता जाहिर करणार का ?

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, लातूर येथील पाण्याचा प्रश्न गंभीर आहे हे आपण सर्वजण जाणतो. आपण राज्याची जलनिती स्वीकारली आहे की, पिण्याच्या पाण्याला प्राधान्य द्यावे. दुसरा क्रमांक शेतीला व तिसरा क्रमांक उद्योगाला आहे. मांजरा धरणातून लातूर परिसराला व उद्योगांना पाणीपुरवठा होतो तेथील पाणीसाठा आता शुन्यावर आलेला आहे. त्यामुळे इतर स्त्रोत नाहीत व जिल्हाधिकाऱ्यांनी या जिल्हयामध्ये फक्त पिण्याच्या पाण्यासाठी सर्व स्त्रोताचे अधिग्रहण केलेले आहे. आम्ही उद्योजकांशीसुध्दा चर्चा करीत आहोत. उद्योगांच्या मालकांनीही कामगारांना कशा रितीने मदत करता येईल, याबाबत चर्चा सुरु केलेली आहे. पर्यायी व्यवस्था काय होईल हे बघितले आहे. दाल मील, इंजिनियरींग वगैरे असे काही उद्योग आहेत की, त्यांना त्यांच्या प्रक्रियेकरिता पाणी लागतच नाही. त्यामुळे असे उद्योग सतत सुरु राहणे अपेक्षीत आहे. पण ज्यांना किमान पाणी लागते त्यांच्या बाबतीत काय करता येईल, हे उद्योग व मालकांशी थेट बोलत आहोत. कामगारांना कमीत कमी झळ पोहचावी, प्रभावीत झालेल्या कामगारांचा आकडा वाढू नये. याकरिता आम्ही प्रयत्न सुरु केलेले आहेत. या कामगारांना अन्नधान्याच्या पुरवठयाच्या बाबतीत आम्ही सकारात्मक विचार करीत आहोत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, लेखी उत्तरात सांगितले आहे की, उद्योगधंदे अंशतः बंद झालेले आहेत. सविस्तर उत्तरात 69 उद्योग बंद झाल्याचे म्हटले आहे. त्यामुळे 3200 कामगारांवर याचा परिणाम झाला आहे. हे 69 उद्योगधंदे कशा प्रकारचे आहेत. उत्तरात सांगितले आहे की, काही उद्योजक स्वतः पाणी आणून उद्योग चालवित आहेत. स्वतः पाणी आणून उद्योग चालवित असतील तर बंद पडलेल्या उद्योगांना काही मदत करुन तशाच प्रकारे हे उद्योगधंदे सुरु करता येणार नाही का ? हे शक्य आहे पण असा प्रयत्न सरकार करणार आहे का ?

अध्यक्ष महोदय, मी कामगारांच्या बाबतीत बोलू इच्छितो. जोपर्यंत हे उद्योगधंदे बंद आहेत. तोपर्यंत अन्न सुरक्षा योजनेखाली त्यांना माणसी पाच किलो धान्य देण्याकरिता दिलेले आश्वासन किती दिवसात पूर्ण करणार ?

यानंतर एच-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

JN/ AKN/ MMP/ 11:10

ता.प्र.क्र.52056......

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, यामुळे प्रभावित झालेल्या 3741 कामगारांना रेशनचे स्वस्त धान्य देण्याची निश्चितपणे शासनामार्फत कार्यवाही केली जाईल. प्रभावित कामगारांची संख्या वाढू दिली जाणार नाही, याकरिता शासन प्रयत्न करीत आहे. ज्या उद्योगांना पाण्याची गरज नाही, ते पाण्याविना चालू राहू शकतात, ते उद्योग चालू ठेवण्याची गरज आहे. जे उद्योग पाण्याविना चालू राहू शकतात, याबाबत शासन प्रत्यक्ष चर्चा करीत आहे. पुढील काळात जास्तीत जास्त कामगार कसे कमी प्रभावित होतील, यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. उद्योजकांच्या सहकार्याने हा प्रश्न कसा सोडविता येईल, याकरिता शासन प्रयत्नशील आहे.

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, लातूर औद्योगिक क्षेत्राचे पाणी कमी होणार आहे, उद्योगांना पाणीपुरवठा करता येणार नाही, याची माहिती विभागाने आपल्याला दिली होती का ? पाणीपुरवठया अभावी जे उद्योग आता बंद आहेत, ज्याची माहिती आपण सभागृहाला दिलेली आहे. यामुळे ज्या उद्योगांना जे नुकसान होणार आहे, त्याची भरपाई देण्याचा विचार शासन करणार आहे का ? यामध्ये कर्जाचे पुर्नगठन, व्याजमाफी संदर्भात सरकार बँकांना सूचना देणार आहे का ? दुष्काळी परिस्थिती आहे, पाऊस पुढे येईल की नाही याची कल्पना आता आपल्या कोणालाच नाही. उद्योग किती दिवस बंद राहतील याची शक्यता आता आपल्या कोणालाच वर्तविता येणार नाही. शाश्वत पाणीपुरवठा उद्योगांना देण्यासंदर्भात विभागाला नवीन पाण्याचा स्त्रोत शोधण्याच्य सचूना शासन देणार आहे का ? जे काही कामगार यामुळे आता बेकार झालेले आहेत, ज्यांच्या हाताला काम नाही. त्यांना बेकारी भत्ता देण्यासंदर्भात शासन विचार करणार आहे का ?

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, या संदर्भात संबंधितांना शाश्वत पाणीपुरवठयाचा नवीन स्त्रोत शोधण्याच्या सूचना शासनाने दिलेल्या आहेत. त्यात जर काही प्रगती झाली तर त्याकडे शासनाचे लक्ष आहे. कामगारांना किमान अन्नधान्याच्या बाबतीत अडचण होऊ नये यासाठी शासन मदत करणार आहे. कामगारांना स्वस्त अन्नधान्य शासन निश्चितपणे देण्यात येणार आहे. शासन कामगारांना रेशनचे अन्नधान्य देणार आहे. या भागात पाणीटंचाईची परिस्थिती आहे, याचे कारण नैसर्गिक संकट आहे आणि पूर्वीचे पाण्याचे नियोजन फसलेले आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. हे दुष्काळी वर्ष आहेच, पण इतर वेळेलाही या भागात पाणी टंचाईच असते.

....2



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.52056......

श्री.सुभाष देसाई.....

असे असताना या भागामध्ये 12-14 साखर कारखाने सुरु करण्याचे नियोजन फसलेले आहे. यामुळे छोटया मोठया उद्योगांना शेतीला व पिण्याकरिता पाणी मिळेनासे झालेले आहे. केवळ साखर कारखान्यांसाठी पाणी वापरले गेलेले आहे, हे चुकलेले आहे. पूर्वीच्या शासनाने पाणी टंचाईच्या परिस्थितीतही साखर कारखान्यांना पाणी दिले होते, ते पाण्याचे नियोजन फसलेले आहे. यापुढील काळात अशी चूक होऊ नये, याकरिता शासन काळजी घेईल.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागात वृक्षप्राधिकरण समितीची परवानगी न घेता वृक्षाची छाटणी केल्याबाबत**

***(१)*** * **४७५९६ *श्री.रमेश* लटके (अंधेरी पूर्व)वःव** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागातील न.भू.मा.क्र.३४३,मौजे-गुंदवली या भूखंडावर असलेल्या मांजरेकरवाडी येथील एकाच जागेवरील २० वृक्ष, रमेश मोरे चौकातील २ पिंपळाचे वृक्ष, राजर्षि शाहू महाराज मार्ग व ना.सी.फडके मार्गाच्या वळणावरील ४ पिंपळाचे वृक्ष, जिजामाता मार्गावरील ४ वृक्ष, महाकाली गुंफा मार्ग येथून एम.आय.डी.सी.रोड क्र.११ कडे जाणाऱ्या मार्गावरील बदामाचे वृक्ष असे अनेक वृक्ष एकाच महिन्यात वृक्षप्राधिकरणाची परवानगी न घेता तोडण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

***(२)*** असल्यास,समहाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये कायदा अस्तित्वात असताना आणि वृक्षप्राधिकरण समिती अस्तित्वात असून, झाडे कापणे व पुर्नरोपण करण्याचा अधिकार सदर समितीस असतांनाही, सहाय्यक आयुक्त के/पूर्व यांनी परस्पर निर्णय घेऊन कायद्याचे उल्लंघन करुन वृक्षांची छाटणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

***(३)*** असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे तक्रार करुन कायदा हातात घेणाऱ्या सहाय्यक आयुक्तांची चौकशी करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

***(४)*** असल्यास, प्रश्नोक्त भाग (१) व (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा ाकरण्यात येत आहे,

***(५)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

पथनिर्मिती व रस्ता रुंदीकरणाच्या कामात बाधित होणारे मांजरेकरवाडी येथील १६ वृक्ष, रमेश मोरे चौकातील २ वृक्ष, राजर्षी शाहू महाराज मार्ग व ना.सी. फडके मार्गाच्या वळणावरील ४ वृक्ष वव जिजामाता मार्गावरील ४ वृक्ष असे एकूण २६ धोकादायक वृक्ष वेरावली येथे पुनर्रोपित करण्यात आले आहेत.

तसेच, मांजरेकरवाडी येथील ४ वृक्ष व एम. आय. डी. सी. रोड क्र. ११ येथील १ वृक्ष असे एकूण ५ धोकादायक वृक्षांची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कापणी करण्यात आली आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, सदर ठिकाणी कापण्यास परवानगी दिलेल्या वृक्षांच्या बदल्यात १:३ प्रमाणात व वृक्ष प्राधिकरणाच्या मानांकनानुसार १५ झाडे लावणे आवश्यक आहे. तथापि, कापलेल्या ५ धोकादायक वृक्षांच्या बदल्यात मांजरेकरवाडी व वेरावली येथे २० नवीन वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे. पुनर्रोपित केलेल्या २६ धोकादायक व कापणी केलेल्या ५ धोकादायक अशा एकूण ३१ धोकादायक वृक्षांच्या प्रस्तावास वृक्ष प्राधिकरणाच्या दि. ११.०३.२०१६ च्या सभेत कार्योत्तर मंजुरी मिळाली आहे.

***(२)*** महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम १९७५ च्या कलम ५ मधील तरतुदींनुसार सहाय्यक आयुक्त यांची, त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या क्षेत्रातील वृक्षांचे पतनापासून विनियमन करण्यासाठी, ***वृक्ष*** अधिकारी ी म्हणून नेमणुक करण्यात आली आहे.

धोकादायक तसेच वाहतुकीस अडथळा करणारी झाडे तात्काळ काढण्याकरिता महानगरपालिकेच्या दिनांक २९.०९.२०१० च्या परिपत्रकातील सूचनांनुसार, धोकादायक वृक्षांची कामे करण्यात आली आहेत.ततत

वृक्ष अधिकारी या नात्याने धोकादायक वृक्षांचे पुनर्रोपण व कापणी करण्यात आली असल्याने व केलेल्या सदर कामांना वृक्ष प्राधिकरणाने दि. ११.०३.२०१६ रोजी कार्योत्तर मंजुरी दिली आहे. त्यामुळे सदर कायद्याचे उल्लंघन झाले असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

***(३)*** होय, हे खरे आहे.

....४



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*ता.प्र.क्र.४७५९६....*

***श्री.देवेंद्र फडणवीस....***

*(४)* व (५) वृक्ष अधिकारी या नात्याने धोकादायक वृक्षांचे पुनर्रोपण व कापणी करण्यात आली असल्याने व केलेल्या कामांना वृक्ष प्राधिकरणाने दि. ११.०३.२०१६ रोजी कार्योत्तर मंजुरी दिली आहे. त्यामुळे त्यांचेवर याप्रकरणी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

श्री.रमेश लटके : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात काही बदल करावयाचा आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांमुळे माझे मतपरिवर्तन व मनपरिवर्तन झाले तर मी उत्तरात बदल करीन.

श्री.रमेश लटके : अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागामध्ये सहायक आयुक्त यांनी पथनिर्मिती, रस्ते रुंदीकरण, धोकादायक या सबबीखाली त्यांना नसलेल्या अधिकाराचा वापर करुन जवळ जवळ 30-40 वृक्ष तोडलेले आहेत. सदर वृक्ष तोडल्यानंतर वेरावली भागामध्ये त्यापैकी 26 वृक्ष पुर्नरोपित केलेली आहेत,असे त्यांचे म्हणणे आहे. मी वेरावली येथे प्रत्यक्ष गेलो असता तेथे कोणतेही वृक्ष पुर्नरोपित केलेले नाहीत. मांजरेकरवाडी येथील 20 वृक्ष काढले होते. तेथे कोणत्याही प्रकारचा रस्ता तेथे अस्तित्वात नसून सदर जागेवरील वृक्ष काढण्याची सहायक आयुक्तांना गरज होती का ? गरज असल्यास तेथे रस्ता अस्तित्वात नसताना रितसर प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणाकडे दाखल करु शकले असते आणि रितसर परवानगी घेऊ शकले असते. त्यापुढे त्यांनी महाराष्ट्र नागरीक्षेत्र वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम 1975 च्या कलम 5 मधील तरतुदीनुसार सहायक आयुक्त यांच्या अखत्यारित येणा-या क्षेत्रातील वृक्ष पतनापासून विनियमन करण्यास वृक्ष अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आल्याचे म्हटलेले आहे. कलम 5 मध्ये अधिका-यांची नेमणूक कशी करावी हे दिलेले आहे. या अधिका-यांचे इंटेन्शन चांगले नव्हते. अधिकारी कलम 5 नुार पतनाची भाषा करीत आहेत, हे अधिकारी वृक्ष जतनाची भाषा करीत नाही. जे 26 वृक्ष वेरावली येथे पुर्नरोपित करण्यात आलेले आहेत, हे वस्तुस्थितीवर आधारित नसलेले उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांना आणि सभागृहाला दिलेले आहे, त्याबद्दल मुख्यमंत्री काय कारवाई करणार आहेत? कलम 5 मध्ये पतनाचे अधिकार वृक्ष अधिका-याला दिलेले नसून ते वृक्ष प्राधिकरणाला दिलेले असतानाही त्यामध्ये अशा प्रकारचे अधिकार सहायक आयुक्तांनी का वापरले ? नोव्हेंबर,2015 मध्ये वृक्ष कापले. जानेवारी महिन्यात याबाबत मी आयुक्तांकडे तक्रार केली. . ...5





UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*ता.प्र.क्र.४७५९६....*

***श्री.रमेश लटके....***

फेब्रुवारी महिन्यात मी तारांकित प्रश्न टाकला. मार्च महिन्यात अधिवेशन चालू असताना आयुक्तांनी सहायक आयुक्तांना वाचविण्यासाठी अधिकचा विषय वृक्ष प्राधिकरणाच्या सभेत आणून कार्योत्तर मंजूरी मागितली. जिवंत झाड कापल्यानंतर कार्योत्तर मंजूरी देता येत नाही. आजपर्यंत असे कोणतेही उदाहरण मुंबई महानगरपालिकेत अस्तित्त्वात नाही. वृक्ष प्राधिकरणात असे कोणतेही उदाहरण आजपर्यंत अस्तित्त्वात नाही. त्यामुळे अशा अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे ? शासन अशा अधिका-यांना पाठीशी घालणार आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचे प्रश्न ऐकून माझे मतपरिवर्तन झाले नसून ठाम मत झालेले आहे की, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. मुंबई महानगरपालिकेच्या परिपत्रकामध्ये वृक्ष प्राधिकरणाच्या मान्यतेच्या आधी एक परिपत्रक असे आहे की, काही वृक्ष काढता येतील. परंतु त्यात त्यांनी तीन कॅटेगरीज निश्चित केलेल्या आहेत. मृत वृक्ष, रोगग्रस्त वृक्ष, धोकादायक वृक्ष अशा त्या कॅटेगरीज आहेत. या तीनही कॅटेगरीमध्ये उक्त वृक्ष बसत नव्हते. जरी याकरिता पोस्ट फॅक्टो मान्यता मिळाली असती, तरी ती आधी घेता आली असती, ती आधी घेण्यात आली नाही. यामध्ये निश्चितपणे अनियमितता झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी हा तारांकित प्रश्न टाकला नसता तर याकरिता पोस्ट फॅक्टो मान्यता घेतली गेली नसती. तारांकित प्रश्न टाकल्यामुळे याकरिता पोस्ट फॅक्टो मान्यता घेण्यात आलेली आहे. वेरावली या भागामध्ये सन्माननीय सदस्य स्वतः जाऊन आले. तेथे कोणत्याही प्रकारचे रिप्लांटेशन झालेले नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती सत्य मानून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल. कोणत्याही स्टेजला जर कोणी दोषी असेल तर ते अॅसर्टन केले जाईल आणि दोषींविरुध्द कारवाई केली जाईल.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.रमेश लटके यांनी तारांकित प्रश्नावर बोलत असताना खोटे उत्तर दिलेले आहे, असे म्हटलेले आहे. त्याऐवजी वस्तुस्थितीवर आधारित नसल्याचे असा बदल करण्यात यावा.

....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION



*ता.प्र.क्र.४७५९६....*

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, मी माननीय मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानतो की, त्यांनी या संदर्भात चौकशीचे आदेश दिलेले आहेत. मी आता हा विषय थोडा पुढे नेणार आहे. वृक्ष अधिकारी आणि वृक्ष प्राधिकरणाची सध्याची स्थिती मुंबईत असलेल्या झाडांना वाचविण्याची मुंबईकरांची इच्छा या संदर्भात मी बोलणार आहे. 3 कॅटेगरीमध्ये वृक्ष तोडले जाऊ शकतात असे माननीय मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केलेले आहे. 2007 च्या सेन्ससनुसार 19 लाख वृक्ष असण्याची माहिती समोर आलेली आहे. दीड दोन वर्षापासून जे 100 वर्ष जुने रेनट्रीज आहेत. ते सांताक्रुझ, दादर, माटुंगा, खार, बोरिवली, पारला या ठिकाणी होते. याबाबत आम्ही वर्तमानपत्रात बातमी वाचलेली आहे आणि प्रत्यक्षही पाहिलेले आहे की, या झाडांना फंगस ॲटॅक हा फेटल डिसीज झाला होता. यामुळे मोठमोठी वृक्ष मेलेली आहेत. यामुळे माझ्या खार मतदारसंघातील मोठमोठी 100 वर्षे जुनी वृक्ष मेलेली आहेत. तो ॲटॅक व डिसीज स्प्रेड झाल्यामुळे इतरही अनेक वर्षानुवर्षापासूनची वृक्ष मृत झालेली आहेत.

आय-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47596..........

ॲड. आशिष शेलार.......

अध्यक्ष महोदय, वृक्ष मेल्यानंतर ती तोडण्यात आली होती. जनतेमध्ये ती सर्व झाडे जाणुनबजून तोडण्यात आली, अशा प्रकारची तीव्र भावना निर्माण झाली होती. अशा पध्दतीच्या फंगस ॲटचमुळे जी झाडे मेली जात आहेत, अशा झाडांना वाचविण्यासाठी वृक्ष प्राधिकरण आणि मुंबई महानगरपालिकेकडून कोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत असा माझा पहिला प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, सद्य:स्थितीत डिसीज असतील, पण ते मृतप्राय झालेले नसतील अशा रेनट्रीजना वाचविण्यासाठी एक्सपर्ट समिती गठित केली जाईल काय असा माझा दुसरा प्रश्न आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी महत्वपूर्ण सूचना केलेली आहे. त्यानुसार वृक्ष प्राधिकरण आणि महानगरपालिकेला झाडांवर जो ॲटक होत आहे, तो थांबविण्यासाठी योग्य त्या सूचना दिल्या जातील. तसेच वृक्ष प्राधिकरण आणि महानगरपालिकेला हे सर्व थांबविण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याबाबत सांगितले जाणार आहे. तसेच एक्सपर्ट समिती गठित केली पाहिजे, अशी देखील सूचना केली जाणार आहे.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रश्न मुंबई महानगरपालिकेशी संबंधित आहे. असे असले तरी राज्यातील सर्व महानगरपालिकेत वृक्ष प्राधिकरण समित्यांच्यामार्फत संगनमताने काम सुरु असते. वृक्ष प्राधिकरण समिला अपेक्षेप्रमाणे काही तरी मिळाल्यानंतर कोणतीही झाडे तोडण्याची परवानगी देतात, अशी वस्तुस्थिती आहे. त्यामुळे वृक्ष प्राधिकरण समितीची खरोखर गरज आहे काय, असा माझा प्रश्न आहे. त्या समितीवर आयएएस अधिकारी काम करीत असतात. यामधील काही आयएएस अधिकाऱ्यांना झाडांप्रती प्रेम असते तर काही अधिकाऱ्यांना नसते. यासंदर्भात राज्याचे प्रमुख या नात्याने एक वेगळा विचार केला जाणार काय ?

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47596..........

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, तशा प्रकारच्या तक्रारी वारंवार प्राप्त झालेल्या आहेत. वृक्ष प्राधिकरण समितीमध्ये अडवणूक केली जाणे, नियोजित कालावधीमध्ये परवानगी दिली नाही तर त्यावेळी आयुक्तांची परवानगी घेऊन झाडे तोडता येतात. सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती मांडलेली आहे. सदर निर्णय प्रक्रियेमध्ये ऑब्जेक्टिव्हिटी कशी आणता येईल, या दृष्टीने शासनाकडून काही नियम तयार केले जाणार आहेत आणि ते महानगरपालिकांना लागू केले जातील.

**अध्यक्ष** : ठीक आहे. आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

-------

........3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*नागपूर शहरातील व विदर्भातील इतर जिल्ह्यामध्ये ऐलिना एम्प्लॉयमेंटच्या संचालकांनी हजारो गुतंवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत*

*(२) * ३९९६७ uuडॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर)र:र सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*
*(१) नागपूर शहरातील आम्रपाली नगर, हुडकेश्वर रोड, व विदर्भातील इतर जिल्ह्यामध्ये ऐलिना एम्प्लॉयमेंट च्या संचालकांनी दुप्पट पैसे देण्याचे आमिष दाखवून हजारो गुतंवणूकदारांची कोटयावधी रुपयांची ी फसवणूक केल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.*
*(२) असल्यास, या प्रकरणी आरोपी हेमलता चिरकुडे त्यांचे सहकारी परदावाला पिता-पुत्रांना मुंबई येथून अटक केली आहे, हे ही खरे आहे काय.*
*(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच गुंतवणूकदारांना रक्कम परत मिळणेकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे*
*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) सदर प्रकरणातील आरोपी यांनी ऐलिना एम्प्लॉयमेंट रिर्सोसेस ही फर्म काढून गुंतवणूकदारांना लिफाफ्यात कागद भरण्याचे व रायटिंग वर्कची स्किम समजावून सांगून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी हुडकेश्वर पोलीस स्टेशन, नागपूर येथे अप.क्र.५३०/१५, भा.दं.वि. कलम, ४२०, सहकलम ३ एम.पी.आय.डी. ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील ३ आरोपी १) सौ. हेमलता राकेश चिरकुटे, नागपूर*
*२) तयब अली अब्देअली परदावाला ३) मुर्तजा उर्फ मो. शेख तयबअली परदावाला यांना अटक करण्यात आली असून सद्या न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्ह्याच्या तपासाअंती एकूण रु. ४४,०३,५१४/- रकमेची मालमत्ता जप्त करण्यात आली असून महाराष्ट्र ठेवीदारांच्या ा (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ मधील कलम ४ अन्वये कार्यवाही करण्यात येत आहे. विदर्भातील इतर जिल्ह्यात अशी कोणतीही तक्रार अथवा गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.*
*(४) प्रश्न उद्भवत नाही.*

डॉ. मिलिंद माने : अध्यक्ष महोदय, नागपूर शहरामध्ये फसवणुकीची अनेक प्रकरणे घडलेली असून, त्यामध्ये 44 लाख, 3 हजार 514 रुपयांची मालमत्ता जप्त केलेली आहे. अनेक ठेवीदारांना आपल्या ठेवी परत मिळालेल्या नाहीत. महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम 1999 कलम 4 नुसार ठेवीदारांचे पैसे परत मिळतील काय ?

अध्यक्ष महोदय, नागपूर शहरामध्ये केवळ हेच प्रकरण नाही तर श्री. सूया जोशी, वासनकर समुह, सपकाळकर आणि अनेक लोकांकडून पैसे घेऊन त्यांची फसवणूक केलेली आहे. लोकांना सतर्क करण्यासाठी जनजागृतीचा कार्यक्रम घेतला जाईल काय ? ......4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.39967.......

डॉ. मिलिंद माने........

अध्यक्ष महोदय, इतर प्रकरणांमध्ये देखील लाखो ठेवीदारांचे पैसे अडकलेले आहेत. अशा ठेवीदारांना त्यांची ठेवी परत मिळवून देण्यासाठी शासनाकडून कोणते प्रयत्न केले जाणार ?

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आतापर्यंत 44 लाख रुपयांची जप्ती केलेली आहे. 1 कोटी 60 लाख रुपयांची फसवणूक झालेली आहे आणि ती 2 कोटी रुपयांच्या आसपास जाऊ शकते, अशा प्रकारची परिस्थिती आहे. अटक आणि फरार असलेल्या लोकांची संपत्ती जप्त करण्याचे काम सुरु आहे. यामध्ये संबंधित दोषा लोकांच्या बँकेचे अकाऊंट सिल केलेली आहेत, तसेच त्यांच्या नावे संपत्ती ज्या ठिकाणी दिसून आलेली आहे अशी संपत्ती ॲटच केलेली आहे. तसेच मिरा-भाईंदरमधील फ्लॅट अटॅच केलेला आहे. काही ठेवीदारांच्या ठेवी परत मिळालेल्या आहेत. पहिल्यांदा 7 हजार भरा, त्यानंतर 4 हजार भरा अशी बोगस आणि मुर्ख बनविणारी स्कीम होती. यामध्ये जे ठेवीदार फसलेले आहेत, त्यामधील काही ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळालेल्या आहेत. काही लोकांना व्याजाचे पैसे मिळाले नाही तर काही लोकांना काहीच मिळाले नाही.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियमा अंतर्गत मालमत्तेची विल्हेवाट लाऊन, त्या हिशेबाने ठेवीदारांचे पैसे परत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या लोकांच्या संदर्भात तक्रारी दिलेल्या आहे, अशा संबंधित दोषी लोकांच्या विरोधात यापूर्वीच कारवाई केलेली आहे. दोषी लोक जेलमध्ये आहेत आणि त्यांच्या संपत्तीवर टाच आणण्याची कारवाई सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, मागील आठवड्यात अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर मी पोलीस विभागाला निधी उपलब्ध करुन दिला आणि जनजागृतीचे काम सुरु झाल्याची माहिती दिली होती. सद्य:स्थितीत रेडीओ आणि एफएमवर पॉंझाईस स्कीमच्या विरोधात जनजागृतीची मोहीम सुरु केलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.39967.......

श्री. सुधाकर कोहळे : अध्यक्ष महोदय, नागपूर शहरातील ऐलीना एम्प्लॉयमेंटमधील संचालकांनी अनेक लोकांची फसवणूक केलेली आहे. अशा प्रकारची फसवणूक फ्लॉट होल्डर म्हणजे बिल्डर डेव्हलपर्स आणि काही असोसिएट यांच्या माध्यमातून केली जात आहे. रेवती असोसिएटचे मालक श्री. सुहास मोरे आणि श्रीमती विद्या मोरे या आहेत. यांनी वानाडोंगरीमध्ये लोकांची जमीन हस्तगत करुन आणि लहान फ्लॅटधारकांना घरकुल मिळवून देण्याच्या नावाखाली फसवणूक केलेली आहे. सामान्य जनतेची लूट रोखण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांकडून विशेष अभियान राबविले जाणार काय ? तसेच रेवती असोसीएटची यांची चौकशी करुन कारवाई केली जाईल काय ? मोठ्या प्रमाणावर गुंतवणुकीच्या जाहीरातीच्या माध्यमातून सामान्य आणि गरीब लोकांची फसवणूक होत असल्यामुळे ते रोखण्यासाठी शासनाकडून धोरण आखले जाईल काय ? पोलीस विभाग या सर्व प्रकरणांकडे फक्त बघ्याची भूमिका घेत असते.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी रेवती असोसीएटची यांची चौकशी करुन कारवाई करावी, अशी मागणी केलेली आहे. रेवती असोसीएटची यांची चौकशी करुन कारवाई केली जाणार आहे. पूर्वी तक्रार प्राप्त होताच पुढील कारवाई केली जात होती. आता जनजागृतीची मोहीम सुरु केलेली आहे. प्रोॲक्टिव्ह काम सुरु केलेले आहे. पोलीसांची ईओडब्ल्युची विंग तयार केलेली आहे. त्यांच्या माध्यमातून जाहीरातींवर लक्ष ठेवण्याचे काम होणार आहे. तसेच काही ठिकाणी संशय आला तर लगेचच कारवाई करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामध्ये अजून स्टेंदन करण्याचे काम निश्चितपणे केले जाणार आहे.

श्री. सुधाकर देशमुख : अध्यक्ष महोदय, नागपूर शहरात साऊथमधील अण्णा, श्रीराम अग्रवाल, जोशी, वासनकर आणि आता हे एक प्रकरण घडलेले आहे. नागपूर शहरामध्ये सामान्य लोकांना फसविल्याबाबतची अनेक प्रकरणे घडलेली आहेत. मुख्यमंत्री महोदयांनी ठेवीदारांची फसवणूक होणार नाही, यादृष्टीकोनातून काळजी घेऊ असे उत्तर दिलेले आहे. ज्यावेळी वर्ष किंवा दोन वर्षात रक्कमा दुप्पट करुन देण्याच्या जाहीराती देतात, त्याचवेळी गृहविभागाने चौकशी करुन

.......6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.39967.......

श्री. सुधाकर देशमुख......

त्यांच्यावर अंकुष निर्माण करण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. असे केले तर ठेवीदारांची फसवणूक होणार नाही. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. सहकार आणि गृह विभागाने फसव्या जाहीरातींवर लक्ष ठेवले तर ठेवीदारांची फसवणूक होणार नाही. अशा प्रकारच्या फसव्या जाहीराती किंवा वित्तीय संस्था निर्माण झाल्यानंतर त्यांची ताबडतोब चौकशी केली तर अंकुष ठेवण्यास मदत होणार आहे. असा निर्णय मुख्यमंत्री महोदय, घेतील काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मी यापूर्वीच उत्तर दिलेले आहे. संबंधितांना योग्य ते आदेश दिलेले आहेत. जाहीरातींची तपासणी करुन पुढील कारवाई करण्याबाबत मी आदेश दिलेले आहेत. आता शासनाकडून लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, मी सार्वभौम सभागृहाच्या माध्यमातून जनतेला अशा प्रकारच्या फसव्या जाहीरातींना बळी पडू नका असे आवाहन करीत आहे. अनेक योजनेच्या माध्यमातून रेट ऑफ इंटरेस्ट दिला जात आहे, अशा योजनांचा ड्युडिलिजन्स केल्याशिवाय लोकांनी त्यामध्ये गुंतवणुक करु नये.

J-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस... ता.प्र.क्र.39967...

जे लोक बँकापेक्षा दुप्पट इंटरेस्ट देऊ म्हणून सांगतात एक तर त्यांच्याकडे झाडाला पैसे लागत असतील अन्यथा ते चोरी करीत असतील, परंतु एखादा अपवाग वगळता ड्यू डिलीजन्स हा जनतेने करावा याकरिताच आपण ॲडव्हर्टाईजमेंटची कॅम्पेन सुरु केलेली आहे. या कॅम्पेनच्या माध्यमातून आपण लोकांना जागृत करीत आहोत. आपण केलेल्या सूचनेप्रमाणे यामध्ये अधिक प्रो ॲक्टीव्हली काम करण्याचा प्रयत्न केला जाईल.

---------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पुणे नाशिक महामार्गावर रिक्षामधून १२ ते २० माणसांची
अवैध वाहतूक केली जात असल्याबाबत**

***(३)*** * **५११४६ *श्री.सुरेश* गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
***(१)*** पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्गावर चाकण, भोसरी, आंबेठाण चौक या रस्त्यांवर पॅगो रिक्षामधून १२ ते २० माणसांची धोकादायक पद्धतीने अवैध वाहतूक केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, अवैध वाहतूक बंद करून जीवित हानी टाळणेकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री यांना दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
***(३)*** असल्यास, अवैध वाहतूक बंद करणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
***(४)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
तरीही नमूद मार्गावर पॅगो रिक्षातून अवैध प्रवासी वाहतूक निदर्शनास आल्यास स्थानिक पोलीस ठाणे तसेच वाहतूक पोलीसांकडून दंडात्मक कारवाई करण्यात येते.
***(२)*** होय, हे खरे आहे.
***(३)*** पुणे-नाशिक मार्गावर चाकण, भोसरी, आंबेठाण चौक येथे पॅगो रिक्षा विविध ठिकाणाहून चोरटी प्रवासी वाहतूक करतात. अशा चोरट्या अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या पॅगोंवर पोलीसांकडून तसेच परिवहन विभागाकडून वारंवार दंडात्मक व निलंबनात्मक कारवाई केली जाते.
अवैध खाजगी वाहतूकदारांकडून छुप्या पध्दतीने चालणाऱ्या वाहतूकीस प्रतिबंध करण्याबाबत १४.१.२०१६ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत.
***(४)*** प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुरेश गोरे : अध्यक्ष महाराज, पुणे नाशिक राष्ट्रीय महामर्गावर अवैध रितीने प्रवासी वाहतूक केली जाते असा प्रश्न विचारला असता या प्रश्नाला उत्तर दिले आहे की, हे खरे नाही. वाहतूक पोलिसांकडून दंडात्मक कारवाई केली जाते, असा उल्लेख केलेला आहे. मी मंत्री महोदयांना जानेवारी 2016 मध्ये अवैध वाहतुकीच्यासंदर्भात निवेदन दिले होते. अवैध वाहतूक त्यांच्या निदर्शनास आणून देऊन त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. पुणे नाशिक या राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक होते. एकेका गाडीमध्ये दहा, दहा, बारा-बारा लोक बसवून क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक केली जाते. यामुळे रस्त्यावर कोंडी होऊन अनेकदा अपघात झालेले आहेत. या अवैध वाहतुकीमुळे अनेकांना आपले जीव गमवावे लागले आहेत.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अशा अवैध वाहतूकदारांवर कारवाईची मागणी केली जात असताना आजपर्यंत अशी कारवाई झाली नाही. अशा वाहनांवर कारवाई करण्याऐवजी पोलीस यंत्रणेकडून त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम होत असते आणि एक विशिष्ट यंत्रणा हप्ते वसुली करण्याचे काम करते. अशा अवैध वाहतुकदारांवर प्रशासन कारवाई करणार आहे काय, याबाबत कृपया मंत्री महोदय खुलासा करतील काय?

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश गोरे यांनी अवैध वाहतुकीच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, दिनांक 14 जानेवारी 2016 रोजीच्या एका जनहित याचिकेच्या अनुषंगाने निदेश देण्यात आले आहेत की, सर्व आयुक्त, परिवहन विभागाला यासंदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत, तसेच पोलीस विभागालाही सूचना देण्यात आलेल्या आहेत. कोठलीही अवैध प्रवासी वाहतूक त्या कार्यक्षेत्रात आढळली तर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्याची दखल घेण्यात येते आणि त्यांचेवर कारवाई करण्यात येते. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश गोरे यांनी सांगितले की, अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असताना दंडात्मक कारवाई, निलंबनाची कारवाई तसेच कर वसुलीची कारवाई करण्यात येते. अशा प्रकारचस गंभीर स्वरूपाचा गुन्हा असेल तर सदरहू वाहन निलंबित केले जाते. वारंवार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दखल घेण्यात येते, अशा पध्दतीने सातत्याने अवैध वाहतूक ज्यांच्या कार्यक्षेत्रात आढळले तर त्या अधिकाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येते.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महाराज, मुख्यमंत्री महोदय आपण सभागृहात उपस्थित आहेत. एखाद्या जिल्ह्याचा पोलीस अधिक्षक कडक असेल तर त्या जिल्ह्यात अजिबात अवैध वाहतूक होत नाही, असा अनुभव आपणा सर्वांना येतो. जर एखादा पोलीस अधिक्षक आणि त्या खालची यंत्रणा अवैध वाहतूक करणाऱ्यांकडून हप्ते घेत असतील सोईस्कररित्या त्याकडे दुर्लक्ष केले जाते. काल आपण बघितले की, वसईला एकाची हत्या झाली. तो कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आणि त्याने भोसकले. तो इकडे तिकडे बघत होतो. तेथून 100- 200 लोक पळून गेले. आता सर्वांकडे मोबाईल आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश गोरे यांनी पुणे जिल्ह्याचा प्रश्न उपस्थित केला. पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अवैध वाहतूक नाशिक पुणे रोड, पुणे-नगर, किंवा पुणे-सोलापूर रोड असेल या कोठल्याही रोडवर अवैध वाहतूक चालू असेल तर यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांची ती



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अजित पवार.... ता.प्र.क्र. 51146....

साखळी असते म्हणून ती अवैध वाहतूक चालू राहते. जर अधिकारी कडक असतील तर अवैध वाहतूक करणारे धाडस करीत नाहीत. एखाद्या ठिकाणची व्हिडीओ शुटींग दाखविली गेली की त्या भागामध्ये कशी अवैध वाहतूक चालते, त्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर ॲक्शन घेतली जाणार आहे काय? तसे केले तर ताबडतोब हे प्रकार थांबतील आणि कोणीही अवैध वाहतूक करणार नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महाराज, अवैध वाहतूक करणाऱ्या विरुध्द मोठ्या प्रमाणात कारवाई झालेली आहे. जानेवारी 2015 ते 15 मार्च 2016 पर्यंत जवळपास 85 वाहनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. एप्रिल 2015 ते 2016 या कालावधीत 129 रजिस्टेशन्स निलंबित करण्यात आले आणि 125 वाहने जप्त करण्यात आलेली आहेत. वेगवेगळ्या नियमांचे उल्लंघन केले म्हणून 77 हजार वाहन चालकांवर या भागामध्ये कारवाई झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा सांगितला त्याप्रमाणे अवैध वाहतूक होत असेल आणि जाणुनबुजून कारवाई होत नाही असे पुरावे मिळाले तर त्या अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल.

श्री.बाबुराव पाचर्णे : अध्यक्ष महाराज, परिवहन विभागाकडून वारंवार दंडात्मक कारवाई केली जाते, परंतु ही कारवाई अत्यंत जुजबी स्वरूपाची असते. बऱ्याच वेळा ही अवैध वाहतूक होत असताना त्यांची जीप पकडली तर ते लोकप्रतिनिधिंना फोन करतात, त्यानंतर चौकशी केली तर त्या गाड्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या अवैध मार्गाने वाहतूक करतात, ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यांच्यावर कोठलीही कारवाई होत नाही. अशा पोलीस कर्मचाऱ्यांची अवैध मार्गाने पॅगो, जीप चाललेल्या आहेत, त्यांची आपण चौकशी करून कारवाई करणार आहात काय ?

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अत्यंत जुजबी आणि अल्पशी कारवाई करण्यात येते. बदलत्या परिस्थितीमध्ये थोडक्यात सांगावयाचे झाले तर पार्कींग मध्ये, नो एंट्री मध्ये गाडी गेली तर त्यासाठी दंडाची रक्कम अतिशय कमी आहे, त्यामुळे सातत्याने माणसांचे मनोधैर्य नियम तोडण्याचे जास्तीचे होत असते. माननीय परिवहन मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. सदरचा कायदा केंद्र सरकारचा असल्यामुळे दंडात्मक कारवाईची रक्कम वाढविण्याच्या दृष्टीने राज्य सरकार केंद्र सरकारकडे पाठपुरावा करीत आहे. सन्माननीय सदस्य

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाबुराव पाचर्णे यांनी दुसरा प्रश्न उपस्थित केला की, ज्या गाड्या अवैधरित्या चालतात त्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या किंवा परिवहन विभागातील किंवा कोणत्या अधिकाऱ्यांच्या असतील की ज्याचे नियंत्रण ज्यांच्या हातात आहे, अशा काही गोष्टी तपासाअंती निदर्शनास आली तर निश्चित स्वरुपात त्या त्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात येतील.

डॉ.पतंगराव कदम : अध्यक्ष महाराज, एकेकाळी महाराष्ट्रामध्ये खाजगी ऑपरेटरचे जाळे मोठ्या प्रमाणात जबरदस्त होते, परंतु ते परिपूर्ण बंद करण्यात आले. एस.टी. गावात आली की लोकांना असे वाटते की, स्वातंत्र्य आले. परंतु आता हळू हळू परमिट सिस्टीम सुरु झाली आहे. जे रुट प्रॉफिटमध्ये आहेत, त्यावर परमिट न देता ते रुट प्रॉफिटमध्ये चालत नाहीत अशा ठिकाणी या छोट्या गाड्यांना परमिट दिली पाहिजेत तरच एस.टी. आपली वाचेल अन्यथा आज का उद्या एस.टी. ची अतिशय वाईट अवस्था होईल.

श्री.दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य डॉ.पतंगराव गदम आपण अनुभवातून सांगितले आहे त्यामुळे आपल्या सूचनांचा जरूर विचार करण्यात येईल.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष् महाराज, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश गोरे यांनी माननीय राज्यमंत्र्यांना प्रश्न विचारला आणि मंत्री महोदयांनी त्या प्रश्नाला उत्तर दिले. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार यांनी प्रश्न विचारला त्या प्रश्नाला मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले. प्रश्नाचे उत्तर बघून मलाच गंमत वाटायला लागली. प्रश्नाचे गांभीर्य असे आहे की, अवैध रिक्षा वाहतुकीमुळे अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागतात. माझ्या मतदारसंघात धरमलेवाडी, ता. राधानगरी मध्ये दहा लोक एकाचवेळी मृत पावले. त्या रस्त्यांची आणि त्या जीपची अत्यंत वाईट अवस्था होती म्हणून ते लोक गेले. त्या लोकांकडे इन्शुरन्स नव्हता म्हणून आजपर्यंत त्या लोकांना एक रुपया देखील मिळाला नाही. मुख्यमंत्री महोदय आणि माननीय परिवहन मंत्री या सभागृहात उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार आपण सांगत आहात तो गंमतीचा भाग आहे, परंतु पोलीस हप्ते घेऊनच परवानगी देतात. रस्त्यावरुन धावणारी प्रत्येक जीप, ट्रक किंवा कोणतेही वाहन असेल तर त्यांचा थर्ड पार्टी विमा काढण्याची मोहिम शासन हाती घेणार आहे काय? माझ्या मतदारसंघात झालेल्या अपघातात बारा लोकांपैकी सात लोक मृत्यू पावले त्यांना

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश आबिटकर.... ता.प्र.क्र. 51146....

इन्शुरन्स नसल्यामुळे एक रुपयाही त्यांना मिळाला नाही. आपल्याकडे एक विशेष बाब म्हणून मदत मिळण्यासाठी प्रस्ताव दिलेला आहे. त्या लोकांना तसेच त्या कुटुंबियाना आधार देण्याच्या दृष्टीकोनातून मुख्यमंत्री निधीतून मदत दिली जाईल काय?

यानंतर K-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 51146....

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न पूर्णपणे वेगळा आहे. मी आपल्याला एवढीच माहिती देतो की, इन्शुरन्स करणे बंधनकारकच आहे. प्रत्येक गाडीला तो असतो. तो मिळत नाही कारण इन्शुरन्स करताना आठचे पासिंग असेल आणि 8 लोक असताना अपघात झाला तर इन्शुरन्स मिळतो. परंतु, 8 च्या पासिंगमध्ये 16 लोक बसविले तर इन्शुरन्स मिळत नाही. त्यामुळे इन्शुरन्स असतोच. सन्माननीय सदस्यांनी जी स्पेसिफिक बाब सांगितलेली आहे ती तपासून पाहू आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून काही मदत करण्याचा प्रयत्न करू.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, 12 ते 20 माणसांची अवैध वाहतूक केली जाते, याबाबतचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. वाहन मालकावर या संदर्भात कारवाई होईल, त्याला दंड लावला जाईल. तरीही प्रवासीही अशा वाहनांमध्ये बसतात ही देखील वस्तुस्थिती आहे. याकरिता शासनाचे धोरण कोठे तरी चुकत आहे असे वाटत नाही काय, या धोरणात काही सुधारणा करण्याची शासनाची तयारी आहे काय ?

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, या अगोदरच्या पहिल्या प्रश्नाला उत्तर देताना मी हे सांगितले होते की, हायकोर्टामध्ये एक जनहित याचिका दाखल होती. ती जनहित याचिका दाखल झाल्यानंतर दिनांक 14 जानेवारी, 2016 रोजी शासनाने एक परिपत्रक काढलेले आहे. त्या माध्यमातून अवैध प्रवासी वाहतुकीमध्ये कोणी बसू नये. त्याच बरोबर रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या माध्यमातून आपण लोकांमध्ये प्रबोधन व अवेअरनेस आणत असतो. महिती पत्रके, हँडबिल्स व जनजागृती करण्यासंदर्भात तसेच, अवैध प्रवासी वाहतुकीचा जनतेने उपयोग करु नये, या संदर्भात सातत्याने वेगवेगळ्या स्तरावर एस.टी. महामंडळ असेल, परिवहन असेल, पोलीस खाते असेल, पोलिसांची वाहतूक शाखा असेल या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केला जातो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या बाबतीत स्पेशल ड्राईव्ह घेऊन निश्चित स्वरूपात काही करता येईल का, या संदर्भातही राज्य सरकार गांभीर्याने विचार करील.

............

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*उल्हासनगर पाणी वितरण व्यवस्थेची चौकशी करण्याबाबत*

*(४) * ५०१६७ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) उल्हासनगरमध्ये पाणीटंचाई प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी एका नामांकित कंपनी सोबत २७५ कोटीचा करार केला आहे तसेच करारानुसार ९० टक्के काम पूर्ण झाल्याचे कंपनी व महानगरपालिका प्रशासन संगनमताने दर्शवीत आहे, मात्र वस्तुस्थिती वेगळी असल्याने माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी महानगरपालिकेच्या महासभेत सदर योजनेची चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, सदर योजनेचे काम पूर्ण झालेले नसतानाही संबंधित ठेकेदाराला उल्हासनगर महानगरपालिकेने बिल अदा केले आहे, हे ही खरे आहे काय,*
*(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दोषी ठेकेदारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,*
*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. देवेंद्र फडणवीस : (१)*

- *केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचे व त्याअनुषंगाने महानगरपालिकेने घेतलेल्या वाढीव कामाचे असे मिळून रु.२५८.२५ कोटी किंमतीचे काम कंत्राटदारास देण्यात आले होते.*
- *सदर योजनेची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी महानगरपालिकेच्या महासभेत केली होती हे खरे आहे.*

*(२) हे खरे नाही.*

*सदर निविदे अंतर्गत रु. २५६.५४ कोटी रकमेचे काम झाले असून ठेकेदारास रु. २४३.५४ कोटी रकमेची देयके अदा केली आहेत.*

*(३) व (४)*

- *उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत या योजनेचे तांत्रिक परीक्षण अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचेकडून करुन घेण्यात आले आहे.*
- *सदर कामाच्या तांत्रिक परीक्षणात ठेकेदार दोषी आढळून न आल्याने ठेकेदारावर कारवाई करण्यात आली नाही.*
- *जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून मंजूर उल्हासनगर पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेची कामे पूर्ण झाली असून पाणीपुरवठा सुरु झाला आहे.*
- *महानगरपालिकेने योजनेत समाविष्ट केलेली वाढीव कामे अंतिम टप्प्यात आहेत.*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 50167 ....

श्रीमती ज्योती कलानी : अध्यक्ष महोदय, मेरे प्रश्न के संबंध में जो भी उत्तर दिए गए हैं वह सही नहीं है. यह योजना कोलार कंपनी को दी गई है. 6 साल से यह योजना चलती आ रही है. आज तक यह योजना पूरी नहीं हुई है, उसका रिजल्ट नहीं मिला है. इस योजना को तीन बार एक्सटेंशन दिया गया है. यह योजना 127 करोड़ रुपये से शुरु होकर 257 करोड़ रुपये तक पहुंच गई है. अभी भी 45 करोड़ रुपये का एक प्रपोजल आपके पास पेंडिंग पड़ा है. आपने जो भी उत्तर दिया है...आमसभा की रिपोर्ट मांगी गई थी तो उसका जवाब दिया गया है कि "नहीं." मैं भी मेम्बर हूं. कार्पोरेशन की मैं भी नगरसेविका हूं. मैंने कई बार यह प्रश्न लिखित रुप से जनरल बॉडी को दिया है. पेपर की कटींग से एक बुक बन जाएगी. इसमें बहुत सारा पैसा खर्च हुआ है. इसमें बहुत सारा भ्रष्टाचार हुआ है. जो टेन्डन्ट कंपनी है...भ्रष्टाचार का प्रश्न है. यहाँ पर जो जवाब दिया गया है, वह गलत है. जो कंपनी, एजेन्सी है, उसने जो रिपोर्ट बनायी है, वह आधी रिपोर्ट बनायी है. 74 के डी.पी. के हिसाब से उन्होंने रिपोर्ट बनायी है. उसको फिर एक्सटेंशन किया गया. 57 करोड़ रुपये का एक्सटेंशन दिया गया. अब वे चौथी बार एक्सटेंशन मांग रहे है. एक ही कंपनी वह प्लान बनाती है तो एकसाथ बनाना चाहिए. दूसरी बात यह है कि अगर वह मटेरियालाईज हो गई है, 99 प्रतिशत काम पूरा हो गया है तो उसके रिजल्ट कहां है? जवाब दिया गया है कि जितनी भी लाइनें बिछायी गई हैं, जितनी भी टांकियां बनायी गई है, वह काम कर रही हैं और उससे पानी पुरवठा हो रहा है. यह बात बिल्कुल गलत है. आपने पढ़ा होगा कि एक टांकी का सर्वेक्षण करने के लिए पूरी टांकी में पानी भरा और वह एरिया ही पूरी तरह से नदी बन गई. यहां पर जो भी जवाब दिए गए हैं, वे सही नहीं है. इस बारे में अच्छी तरह से जांच की जानी चाहिए. यहां पर बताया गया कि यह पूना की लेबॉरेटरी के पास भेजा गया था. इसकी रिपोर्ट कहां है ? इसकी रिपोर्ट न कार्पोरेशन में दी गई और न ही किसी को दी गई है. यह टोटली गलत है, फ्रॉड है, भ्रष्टाचार है. 257 करोड़ रुपये पूरे पानी में चले गए हैं.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...4/-

ता.प्र.क्र. 50167 ....

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मुळात ही योजना सन 2007-2008 मध्ये जेएनएनयुआरएमच्या अंतर्गत मंजूर केली होती. ही 127 कोटी रुपयांची योजना होती. 2 वर्षांचा काळ निविदा स्वीकृतीमध्ये गेला तोपर्यंत ही योजना 160 कोटी रुपयांची झाली. त्यानंतर अतिरिक्त कामांचा समावेश करुन ही योजना 258 कोटी रुपयांची झाली. त्यामध्ये आता जवळपास 243 कोटी रुपये एवढ्या रक्कमेची देयके अदा केलेली आहेत. या संदर्भात कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे यांच्या माध्यमातून याची पूर्ण तपासणी करण्यात आली असता, जो काही निधी या ठिकाणी खर्च झालेला आहे, ती कामे झालेली आहेत, अशाप्रकारचा रिपोर्ट त्यांनी दिलेला आहे. तथापि, सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले आहे की, या रिपोर्टच्या संदर्भात त्यांच्या मनात काही शंका आहेत, या ठिकाणी जी कामे झालेली आहेत ती, योग्य झालेली नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगिलेली बाब खरी मानून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव किंवा मुख्य अभियंता यांची समिती तयार करुन पुन्हा एकदा याची चौकशी करण्यात येईल.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, यामध्ये महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, एखादे काम दिल्यानंतर जी मुदत असते तिचे चार भाग पाडून 25-25 टक्के काम त्या मर्यादेतच पूर्ण झाले पाहिजे. नसल्यास त्या दिवसापासून त्या कॉंट्रॅक्टरला फाईन लावला जाते. त्याने 25 टक्के काम केलेले नसेल, तर आपल्या अधिकाऱ्यांकडून त्याला नोटीस देण्यात आली होती काय, जर नोटीस दिली गेली नसेल तर त्यांना 100 टक्के एक्सलेशन दिले गेले असणार. अधिकाऱ्यांची ही जी चूक झाली, त्या संदर्भात आपण सखोल चौकशी करणार काय ? मुद्दा असा आहे की, 1-1 काम 7-7, 8-8 वर्षे सुरु राहते त्यामुळे याबाबतीत जितका पैसा वेस्ट गेलेला आहे त्याबाबत क्लॉज, 2, 3 असे सर्व नियम आहेत. त्याप्रमाणे ज्यांच्यामुळे हा लॉस झाला त्यांच्याकडून रिकव्हरी करण्याचीही प्रोसिजर झाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या कामांच्या स्पेसिफिकेशनमध्ये फार मोठा प्रॉब्लेम आहे. जे स्पेसिफिकेशन टेंडर नोटमध्ये दिले गेले होते, त्या स्पेसिफिकेशन प्रमाणे काम झालेले नाही. याकरिता त्याच खात्यातील अधिकाऱ्यांकडून चौकशी न होता दुसऱ्या खात्यातील अधिकाऱ्यांकडून आपण ही चौकशी करणार काय ?

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 50167 ....

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, पहिली गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या बाबी सांगितल्या, त्या सर्व बाबी चौकशीत समाविष्ट करू. हे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेले नाही. हे काम महानगरपालिकेने केलेले आहे. त्यामुळे मी असे सांगितले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव किंवा त्यांचे मुख्य अभियंता यांच्यामार्फत ही चौकशी करू. मुळात याला मुदतवाढ स्टँडिंग कमिटीने दिली आहे. ती मुदतवाढ देताना त्यांनी त्याला कोणताही दंड लावलेला नाही. तरीही ज्या ज्या बाबी आपण या ठिकाणी निदर्शनास आणल्या आहेत, त्या सर्व बाबींवर चौकशी करण्यास सांगितले जाईल.

...........

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्रकल्प विभागांत १४ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत***

***(५) * ५१२११ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-***

***(१) औरंगाबाद महानगरपालिकेतीललप्रकल्प विभागांत १४ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,***

***(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनाकडून महानगरपालिकेने बोगस यादी तयार करुन व बोगस लाभार्थी दाखवून दारिद्रय रेषेखालील बेरोजगार तरुणांसाठीचे गत ५ वर्षातील १४ कोटी रुपयांचे अनुदान घेतले आहे, हे ही खरे आहे काय,***

***(३) असल्यास, महानगरपालिकेतील अधिकार्‍यांना हाताशी धरुन दलालांनी निधीचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,***

***(४) असल्यास, या सर्व प्रकरणांची चौकशी करुन, शासनाने बोगस लाभार्थी, जबाबदार अधिकारी व दलालांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,***

***(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?***

***श्री. देवेंद्र फडणवीस : (१) दिनांक २३.०८.२०१५ रोजीच्या स्थानिक वर्तमानपत्रात या संदर्भात बातमी प्रसिध्द झाली आहे. तसेच या संदर्भात औरंगाबाद महानगरपालिकेकडे तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत.***

***(२), (३) व (४)***

***सदर प्रकरणी अतिरिक्त आयुक्त व उप आयुक्त यांची दोन सदस्यीय समिती आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी गठीत केली असून सदर समितीद्वारे चौकशी सुरु आहे.***

***(५) प्रश्न उद्‌भवत नाही.***

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, मुद्दा असा आहे की, या स्कीममध्ये बेरोजगार व व्यावसायिकांना केंद्र व राज्य शासनाचा निधी मिळून महानगरपालिकेतर्फे बँकेमार्फत व्यवसाय करण्याकरिता फंड दिला जातो. त्यामध्ये लाभधारकाचा 5 ते 10 टक्के हिस्सा असतो. राज्य व केंद्र शासनाची ही योजना असते. जे खरे लाभार्थी आहेत, त्यांना या योजनेचा अजिबात लाभ होत नाही. यामध्ये अक्षरशः काही नगरसेवक व इतर दलालांमार्फत त्या फाईल्स अगोदरच निश्चित केल्या जातात. कायद्याप्रमाणे पेपरमध्ये जाहीरात दिली पाहिजे, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये ती दिली जात नाही. या स्कीममध्ये जवळपास 5 हजार योग्य कुटुंबांना अर्थसहाय्य मिळाले पाहिजे होते. त्यांचे कुटुंब योग्यरित्या वाढीस लागले पाहिजे हा केंद्र व राज्य शासनाचा जो हेतू आहे, त्याला धक्का बसलेला आहे. पैसेवाल्यांना हे सर्व पैसे गेले आहेत. या बाबीचा गरिबांच्या 5 हजार कुटुंबावर परिणाम झालेला आहे. बँकेतून पैसे उचलल्यानंतर दलालांना 50 टक्के पैसे द्यावे

..7/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 51211 ....

श्री. प्रशांत बंब ....

लागतात, अशी स्थिती आहे.त्यामुळे याबाबीची पुन्हा वेगळ्या अधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी करणार काय ? कारण याबाबतीत बँकेत पुन्हा एकही पैसा आलेला नाही. ते खरे लाभार्थी होते काय, त्यांना समजा व्यवसायामध्ये लॉस झाला असेल तर, आपण सोडून देऊ. परंतु, हे योग्यरित्या दिले गेलेले नाही, त्यामुळे ज्या योग्य कुटुंबाना ते मिळाले पाहिजे होते, त्यांच्यावर परिणाम झालेला आहे म्हणून ही चौकशी करुन संबंधितांवर आपण कडक कारवाई करणार काय ? कारवाई कशी करायची हे मी सांगत नाही. परंतु, या अनुषंगाने आपण कडक कारवाई करणार काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, 837 लाभार्थ्यांना 3 कोटी 71 लाख रुपये वितरित झाले आहेत. सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्या वस्तुस्थितीमध्ये काही तथ्य निश्चित आहे. कारण आपण सांगितल्याप्रमाणे काही केसेसमध्ये हे लाभार्थी योग्य नाहीत असे प्रायमा-फेसी दिसतेच आहे. त्यामुळे निश्चितपणे याची पूर्ण चौकशी केली जाईल आणि चौकशीचा जो काही निष्कर्ष असेल, त्यावर आधारित कडक कारवाई केली जाईल.

.............



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***नवी मुंबई येथे बांधकाम व्यवसायकांनी बनावट दस्ताऐवज तयार करुन ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत***

*(६) *४४५३५ श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) नवी मुंबई येथे बांधकाम व्यवसायिकांनी बनावट सरकारी कागदपत्र बनवून ग्राहकांची फसवणूक केल्या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने विशेष तपास पथक नेमण्याचे शासनास आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,*
*(२) तसेच बनावट कागदपत्र तयार करुन अन्य ठिकाणी झालेल्या जमिनींचा खरेदी-विक्री व्यवहार तपासून एम.आय.डी.सी, सिडको व महानगरपालिका इ. यंत्रणांनी तात्काळ पोलिस स्टेशनला संबंधित बांधकाम व्यवसायकांची माहिती द्यावी असे निर्देश दिनांक २१ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,*
*(३) असल्यास, उक्त प्रकरणी आतापर्यंत किती बांधकाम व्यवसायिकांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच फसवणूक झालेल्या ग्राहकांना संबंधिताकडून भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या जनहित याचिका क्र. ८०/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२८.१०.२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी अवैध बांधकाम व्यावसायिकांबाबत पूढील कार्यवाहीसाठी सहा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांची नेमणूक केली आहे. तसेच त्यांच्या कामकाजावर देखरेख करण्यासाठी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, वाशी, नवी मुंबई यांची नेमणूक केलेली आहे.*
*(३) पोलीस आयुक्त, नवी मुंबई अंतर्गत रबाले पोलीस ठाणे येथे सन २०१५-२०१६ मध्ये एकूण ५९ गुन्हे दाखल असून एकूण ९२ बांधकाम व्यावसायिकांवर कारवाई करण्यात आली आहे.*
*(४) प्रश्न उद्भवत नाही.*

श्री. संजय केळकर : अध्यक्ष महोदय, कोर्टाच्या निदेशाप्रमाणे तेथे इमारतीमध्ये रहाणाऱ्या हजारो लोकांची फसवणूक झाली असल्यामुळे 92 बांधकाम व्यवसायिकांवर गुन्हे दाखल झालेले आहेत. तेथे वीज चालू होती, पाणी सुरु होते, रस्ते बनविण्यात आले होते. या 92 बांधकाम व्यावसायिकांपैकी आतापर्यंत किती जणांना अटक झालेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे यामध्ये काही नगरसेवक देखील आहेत. त्यामुळे नगरसेवकाने अनधिकृत काम केले असेल, अनधिकृत बांधकाम केले असेल तर असे कोणते नगरसेवक आहे व त्यांच्यावर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे काय. तसेच यामध्ये बनावट कागदपत्रे बनविलेली असली, रजिस्ट्रेशन केले असले तरी

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय केळकर..... ता.प्र.क्र.44535

यामध्ये एमआयडीसी महानगरपालिका, वीजमंडळ अशी निरनिराळे विभाग आहेत. यांना वीज देण्यात आली, पाणी देण्यात आले परंतु तेव्हा महानगरपालिकेच्या अधिकारी झोपा काढत होते काय? त्या ठिकाणी इतक्या वर्षापासून राजरोसपणे असे चालू आहे. याला महानगरपालकेचे कोणते अधिकारी जबाबदार आहेत, यासंदर्भात चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय, असा माझा आपल्या मार्फत मुख्यमंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नामध्ये रबाळे एमआयडीसीच्या अंतर्गत फसवणुकीचे 12 गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एमआरटीपीच्या अंतर्गत 47 गुन्हे दाखल केले आहेत. एमआयडीसीने फिर्याद केली त्यामध्ये 47 गुन्हे दाखल केले आहेत. पब्लिकने केलेल्या फिर्यादीमधून 12 गुन्हे दाखल केले आहेत. एकूण 49 आरोपींना अटक करण्यात आलेल आहे. एकूण 59 गुन्हे दाखल केलेले आहेत आणि दोषारोपपत्र 18 केसेसमध्ये दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत एमआरटीपीचे 47 गुन्हे दाखल केलेले आहेत. 58 आरोपी निष्पन्न झालेले आहेत. त्यातील 31 आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. यासंदर्भात मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी नगरसेवकांचा देखील उल्लेख केला आहे. जे नगरसेवक यामध्ये इनव्हॉल्व असतील, म्हणजेच ज्यांनी स्वत: अशा प्रकारचे बांधकाम केले असेल, नियमानुसार त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याची कारवाई केली जाईल. आम्ही अशा सूचना दिलेल्या आहेत की, एमआरटीपी ॲक्ट सोबत त्यांच्यावर फसवणुकीचे गुन्हे देखील दाखल केले पाहीजे. कारण एकीकडे आपण तेथे रहाणाऱ्या सामान्य माणसाला प्रोटेक्ट करतो. परंतु त्यांना प्रोटेक्ट करण्याच्या नावाखाली यांच्यावर कारवाई होऊ नये, अशी बाब नाही. त्यामुळे आपण त्यांच्यावर कडक कारवाई निश्चितपणे करीत आहोत. तसेच आपण सांगितलेला दुसरा मुद्दा देखील महत्त्वाचा आहे. इतक्या मोठ्या इमारती बनत असताना, महानगरपालिका, एमआयडीसी यांचे अधिकारी नेमके काय करतात, हा प्रश्न व्हॅलीड आहे. त्यामुळे त्यांचीही चौकशी करण्याचे आदेश दिले जातील.

श्री. संदीप नाईक : अध्यक्ष महोदय, नवी मुंबईतील दिघा येथील अनधिकृत बांधकामाकरिता शासन धोरण आखत आहे. सदरहू नागरिकांच्या हिताचे धोरण कधीपर्यंत जाहीर करणार आहात, असा माझा आपल्या मार्फत मुख्यमंत्री महोदयांना प्रश्न आहे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44535

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आपण धोरण जाहीर केलेले आहे. त्यासंदर्भात आपल्याला हाय कोर्टाने असे सांगितले होते की, कॅबिनेटची मान्यता घेतल्यानंतर ते आमच्याकडे पुन्हा सबमिट करावे. त्याप्रमाणे सदरहू धोरण हाय कोर्टासमोर सबमिट झाले आहे. त्याला आता हाय कोर्टाची मान्यता मिळेल. त्यानंतर त्याची नोटीफिकेशन्स निघेल.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रकरणामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी यातील दोषी असलेल्यांवर, अगदी नगरसेवकांवर देखील कारवाई करण्याची घोषणा केली. या प्रकरणामध्ये उच्च न्यायालयाने जनहित याचिकेत अशा पद्धतीचे पोलीस आयुक्तांना निर्देश दिले आणि सहायक पोलीस आयुक्त नवी मुंबई यांची नेमणूक झाली. अवैध बांधकामांवर आणि बोगस कादपत्रे घेऊन अशा प्रकारे करणाऱ्या व्यावसायिकांसंदर्भात पोलीस उपायुक्तांची नेमणूक करण्यात आली. हा विषय कोर्टाने नवी मुंबई पुरता सांगितला असला तरी, मुंबई शहरात अवैध बांधकाम आणि अवैध बांधकाम करणाऱ्या व्यावसायिकांमधून बोगस कागदपत्रांचा सर्रासपणे वापर होतो. नवी मुंबईच्या प्रकरणात कोर्टाने सांगितले म्हणून आपण उपायुक्त यांची नेमणूक केली. मुंबई शहरात कोर्टाने सांगितले नसले तरी असा स्पेसिफिक अधिकारी, उपायुक्त किंवा त्यावरील स्थरावरील अधिकारी मुंबईतील अवैध व्यावसायिक बांधकामांवर नजर ठेवण्यासाठी आणि तक्रार घेण्यासाठी सरकारकडून नेमण्यात येणार आहे काय.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आपण आता एक धोरण तयार केलेले आहे. त्या धोरणाचा एक भाग हा आहे की, अशा प्रकारच्या कारवायामध्ये कडक फौजदारी कारवाई करणे. त्यामुळे आपण नवीन धोरणाप्रमाणे तसा ऑफिसर डेजिगनेटच करणार आहोत. जो पर्यंत अशा प्रकारच्या विकासकांना माहीत आहे की, आपण बांधकाम केले व ते गरिबांना विकले की, मानवतेच्या दृष्टीकोनातून त्या गरिबाला वाचविण्यासाठी राज्यसरकार त्याला नियमित करणार आहे. त्यामुळे सर्रासपणे अशा प्रकारचे काम केले जाते. दिघा येथे एक केस अशी आली की, त्या ठिकाणी अवैध बांधकाम पाडल्यानंतर त्याने पुन्हा तेवढेच बांधकाम केले. लोकांशी करारनामे केले व त्यामध्ये असे लिहिले की, या संदर्भात परवानगी मिळाली तर ठिक आहे. परंतु परवनगी न मिळाल्यास यास विकत घेणारी व्यक्तीच जबाबदार राहील. असे असतानाही लोकांनी तेथे घर विकत घेतले. त्यामुळे अशा प्रकारच्या प्रवृत्तींना मी उदाहरणादाखल सांगतो की, त्यांना मकोका

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44535

श्री. देवेंद्र फडणवीस.....

सारख्या कायद्यांतर्गतच आतमध्ये टाकले पाहीजे. वर्ष, दोन वर्ष बाहेर आले नाही तरच त्यांना समजेल की, अशा प्रकारे काम केल्यावर काय होते. त्यामुळे यासंदर्भात अतिशय कडक कायदा तयार करुन यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, महिन्याभरात ही चौथी, पाचवी वेळ आहे. बिल्डर गुन्हेगार आहेच. परंतु यातील सर्वात मोठा गुन्हेगार महानगरपालिकेचा अधिकारी असतो. त्याच्या आशिर्वादाशिवाय कधीही बांधकाम पूर्ण होत नाही. आम्ही 25, 30 वर्षांपासून महानगरपालिका क्षेत्रात काम करीत आहोत. उगाच पॉलिटीशन्स बदनाम होतात, आमदार बदनाम होतात. आम्ही पत्र दिले की, अधिकाऱ्याकडून त्याची झेरॉक्स काढून अख्ख्या गावभर वाटल्या जातात की, हे अनधिकृत बांधकाम विरुद्ध आहेत, हे गरिबांविरुद्ध आहेत, हे आमदार गरिबांना अडचणीत आणत आहेत. असे केले जाते. आपण जसे बिल्डरला मकोका लावण्याचे म्हणत आहात, तसेच त्या भागातील उपायुक्त, वॉर्ड ऑफीसर, बिल्डींग सर्वे करणारे अधिकारी, अतिक्रमण हटविणारे आणि पोलीस स्टेशनचे अधिकारी हे सर्व त्यामध्ये बांधलेले असतात. शंभर रुपये, दोनशे रुपये, तिनशे रुपयांचा फुटामागे रेट आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या येथे सर्वात जास्त अनधिकृत बांधकाम म्हणजेच 95 टक्के इमारती अनधिकृत आहेत. जोपर्यंत हा पर्टीक्युलर इश्यु रिलेटेड टू ऑफिसर्स करणार नाही, तोपर्यंत स्क्वेअरमध्ये कोणीच येणार नाही. याचे कारण म्हणजे बिल्डींग कोणाच्या नावावर आहे. यलप्पा, मलप्पा गौडी याच्या नावावर बिल्डींग असते. तो तामिळनाडूतील असतो. त्याच्यावर एमआरटीपी होते आणि तो निघून जातो. त्याच्यावर स्पेसिफिक कारवाई करण्यासाठी महानगरपालिका अधिकारी, पोलीस आणि नंतर बिल्डर असे करणार आहात काय, असा माझा आपल्यामार्फत मुख्यमंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, यामध्ये आधी कोण आणि नंतर कोण असे होणार नाही, तर या तिघांवरही कारवाई केली जाईल. निश्चितपणे यामध्ये अधिकाऱ्यांची देखील जबाबदारी फिक्स करण्याच्या दृष्टीने योग्य प्रकारच्या तरतुदी केल्या जातील.

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44535

श्री. चैनसुख संचेती : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी अवैध बांधकाम करणाऱ्या दोषींवर कारवाई होणार आहे, असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले. निश्चितपणे यासंदर्भात फौजदारी गुन्हे दाखल करण्यापर्यंत त्यांनी कारवाई केलेली आहे. परंतु यामुळे सरकारच्या तिजोरीमध्ये काय आले. ज्यांनी अवैध गुन्हे केले किंवा अवैध बांधकाम केले, त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यापलिकडे काहीही झाले नाही. त्यामुळे ज्या वेळेस संबंधिताने अवैध बांधकाम केले, त्यावेळेसच्या रेडीरेकनरच्या दराप्रमाणे जे बांधकाम आता नियमित करण्यात आले आहे, ते पैसे आपण शासनाच्या तिजोरीमध्ये जमा करुन घेणार आहात काय, असा माझा आपल्या मार्फत मुख्यमंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, जे नियमित केले आहे त्याचे पैसे निश्चित जमा करुन घेतले जातील.

श्री. प्रकाश सुर्वे : अध्यक्ष महोदय, मी ज्या विभागामध्ये रहातो, त्या विभागामध्ये अशाच एका विकासकाने 832 लोकांचा तीन एफएसआय पूर्णपणे सेलेबल करुन टाकलेला आहे. याकरिता 2 हजार लोकांनी आंदोलन केले. त्या विकासकावर कमीतकमी 26 गुन्हे दाखल आहेत. विकासक श्री. मंगेश सावंत व यामध्ये म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी देखील भ्रष्टाचार केला असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होणार आहे काय, असा माझा आपल्यामार्फत मुख्यमंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश सुर्वे यांनी विचारलेल्या प्रश्नाचा या प्रश्नाशी काही संबंध नसल्यामुळे त्यांनी वेगळ्या आयुधामार्फत प्रश्न विचारावा.

...M/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : लेखी उत्तरे

**मु. शी.** : तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

प्रधान सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 11 एप्रिल, 2016 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**अध्यक्ष :** दिनांक 11 एप्रिल, 2016 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

-------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : लेखी उत्तरे

**मु. शी.** : अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक 66 ते 93 सभागृहासमोर ठेवणे.

प्रधान सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक 66 ते 93 सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष :** अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक 66 ते 93 सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

--------

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी. :** शोक प्रस्ताव
**मु. शी. :** श्री.जयानंद शिवराम मठकर यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, श्री.जयानंद शिवराम मठकर माजी विधानसभा सदस्य यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री.जयानंद शिवराम मठकर यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

अध्यक्ष महोदय, कै.जयानंद शिवराम मठकर यांचा जन्म दिनांक 12 ऑक्टोबर, 1929 रोजी मुंबई येथे झाला. कै.मठकर यांनी गोवा मुक्ती आंदोलनामध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. तेरेखोल किल्ल्यावर पाठविण्यात आलेल्या सत्याग्रहींच्या एका तुकडीचे त्यांनी नेतृत्व केले होते व त्याबद्दल त्यांना कारावासही झाला होता.

अध्यक्ष महोदय, कै.मठकर यांनी सन 1963 ते 1974 या काळामध्ये दै.नवशक्ती, दै.लोकमान्य व दै.केसरी इत्यादी दैनिकांमध्ये पत्रकार म्हणून दीर्घकाळ सेवा केली होती. तसेच, सावंतवाडीहून प्रकाशित होणऱ्या "वैनतेय" या नियतकालिकाचे संपादक होते. तसेच, त्यांनी "कोकण : स्वप्न आणि वास्तव" या पुस्तकासह अनेक पुस्तकांचे लेखनही त्यांनी केले होते.

अध्यक्ष महोदय, कै.मठकर यांनी दक्षिण रत्नागिरी विडी कामगार संघ, सावंतवाडी म्युन्सिपल कामगार युनियन, रत्नागिरी जिल्हा सार्वजनिक बांधकाम कर्मचारी संघाचे अध्यक्ष, रत्नागिरी जिल्हा शिक्षण मंडळाचे सदस्य, सावंतवाडी येथील श्रीराम वाचनालयाचे अध्यक्ष, डिसेंबर, 1975 मध्ये सावंतवाडी येथील महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषदेचे स्वागताध्यक्ष, रत्नागिरी जिल्हा समाजवादी पक्षाचे सरचिटणीस, सावंतवाडी तालुका संयुक्त महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केले होते. त्यांनी आयुष्यभर कामगार आणि गरीब जनतेचे प्रश्न सोडण्यिासाठी विशेष योगदान दिले होते. "गाव तेथे ग्रंथालय ही चळवळ" त्यांनी राज्यभर राबविली होती. एक प्रभावी समाजवादी नेते अशीच त्यांची ओळख होती.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, कै.मठकर सन 1974 व 1978 असे दोन वेळा सावंतवाडी मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. उत्कृष्ट संसदपटू व एक अभ्यासू लोकप्रतिनिधी अशीच त्यांची प्रतिमा होती.

अध्यक्ष महोदय, मी ज्यावेळी कोकण दौऱ्यावर गेलो होतो त्यावेळी त्यांची व माझी भेट झाली होती. त्यावेळी त्यांनी मला कोकणातील समस्यांचे निवेदन दिले होते व त्यासंदर्भात मला भेटीची वेळ मागितली होती.

अध्यक्ष महोदय, अशा या ज्येष्ठ समाजवादी नेत्याचे गुरुवार दिनांक 7 एप्रिल, 2016 रोजी दु:खद निधन झाले. या ज्येष्ठ समाज सेवकाला सभागृहाच्यावतीने व वैयक्तिकरित्या मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

--------------

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.पतंगराव कदम (पलूस-कडेगाव) : अध्यक्ष महोदय, सदनाचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला काँग्रेस पक्षाच्यावतीने पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, कै.जयानंद मठकर साहेबांचे जीवन हे सामान्य व गोरगरीब नागरिकांसाठी होते. रत्नागिरी जिल्ह्याच्या संयुक्त महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले होते, समाजवादी पक्षाचे ते सरचिटणीस होते, दोन वेळा ते सावंतवाडी मतदार संघातून विधानसभेवर निर्वाचित झाले होते.

अध्यक्ष महोदय, अशा या निष्ठावान समाजवादी नेत्याचे दिनांक 7 एप्रिल, 2016 रोजी दु:खद निधन झाले आहे. त्याबद्दल माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मांडलेल्या शोक प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

-------------

....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अजित पवार (बारामती) : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावास पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माजी आमदार, स्वातंत्र्य सैनिक, पत्रकार व लेखक कै.जयानंद शिवराम मठकर यांचे दु:खद निधन दिनांक 7 एप्रिल, 2016 रोजी बेळगाव येथील रुग्णालयामध्ये झाले.

अध्यक्ष महोदय, कै.मठकर सन 19974 व 1978 असे दोन वेळा सावंतवाडी मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. सन 1948 ते 1960 या काळात त्यांनी गोवा स्वातंत्र्य संग्रामामध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. आझाद गोमांतक दल व गोवा लिब्रेशन आर्मी कार्यात त्यांचा सहभाग होता. सन 1948 मध्ये सावंतवाडी प्रजा संस्था परिषदेच्या विलिनीकरण संग्रामामध्ये ते सहभागी होते. सन 1948 ते 1977 या कालावधी मध्ये त्यांनी अखंड रत्नागिरी जिल्ह्यात समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते म्हणून व नंतर जनता दला नेते म्हणून काम केले होते. सन 1969 मध्ये त्यांनी भूमी बेळगाव सत्याग्रह केला होता, त्याबद्दल त्यांना दोन आठवडे कारावास शिक्षा झाली होती.

अध्यक्ष महोदय, कै.मठकर यांनी सन 1977 मध्ये जनता पक्षाची स्थापना केली होती, तसेच ते रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष व सावंतवाडी तालुका अध्यक्ष होते. सिंधुदुर्ग जिल्हा केंद्रासाठी सन 1982 मध्ये त्यांना एक आठवडा कारावास शिक्षा झाली होती. तसेच, त्यांनी जिल्हा न्यायालय वकील संघटनेच्या आंदोलनाबद्दल एक आठवडा कारावास शिक्षा भोगली होती. आमदार म्हणून दोन ते वेळा विधानसभेवर निर्वाचित होऊन गेल्यानंतर त्यांनी विधिमंडळाच्या विविध समित्यांवर काम केले. तसेच, त्यांनी विडी उद्योग, बांधकाम, पाटबंधारे व कामगारांसाठी त्यांनी लढा दिला होता.

अध्यक्ष महोदय, कै.मठकर यांनी पत्रकारिता क्षेत्रात कार्य करताना विविध वृत्तपत्रे व साहित्यामध्ये विपुल लिखान केले आहे. "वैनतेय" या नियतकालिकाचे ते संपादक होते. ग्रंथालय, सहकार, विडी उद्योग, कौल कारखाना अशा निर्मितीमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग होता. तसेच, त्यांनी साहित्य व पत्रकारिता क्षेत्रात अखंडपणे काम केले. त्यांची काही पुस्तके

...7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION



श्री.अजित पवार......

प्रकाशित झाली असून काही पुस्तके अप्रकाशित आहेत. माजी खासदार बॅ.नाथ पै, माजी रेल्वे मंत्री श्री.मधु दंडवते, श्री.नानासाहेब गोरे, श्री.मृणाल गोरे, श्री.ग.प.प्रधान अशा मान्यवरांसोबत त्यांनी काम केले होते.

अध्यक्ष महोदय, कै.मठकर यांना राज्यस्तरीय "दर्पण", "आर्य भूषण", "ग्रंथमित्र" हे पुरस्कार प्राप्त झाले होते. त्यांनी जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत पत्रकारिता, ग्रंथालय व कामगारांच्या प्रश्नावर आवाज उठविला होता. अशा थोर स्वातंत्र्य सैनिकाला मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

------------------

...8

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथ शिंदे (सार्वजनिक बांाकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून)) : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावास पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, कै.जयानंद शिवराम मठकर यांचा जन्म दिनांक 12 ऑक्टोबर, 1929 रोजी मुंबई येथे झाला. सन 1948 ते 1960 या काळात त्यांनी गोवा स्वातंत्र्य संग्रामामध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. आझाद गोमांतक दल व गोवा लिब्रेशन आर्मी कार्यात त्यांचा सहभाग होता.

अध्यक्ष महोदय, कै.मठकर यांना महाराष्ट्र राज्य सरकार व भारत सरकारकडून स्वातंत्र्य सैनिक म्हणून मान्यता मिळाली होती व त्याबद्दलचे निवृत्ती वेतन त्यांना मंजूर झाले होते.

अध्यक्ष महोदय, सन 1948 साली सावंतवाडी संस्थान प्रजा परिषदेने विलिनीकरणासाठी केलेल्या संग्रामामध्ये ते सहभागी होते. सन 1948 ते 1977 या कालावधी मध्ये त्यांनी अखंड रत्नागिरी जिल्ह्यात समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते व नंतर जनता दलाचे काम केले होते.

अध्यक्ष महोदय, कै.मठकर यांनी सन 1949 मध्ये विलीन संस्थाने व मुलखामध्ये विधानसभा निवडणुका घेण्याचे टाळून आमदारांची नियुक्ती केल्याच्या विरोधात समाजवादी पक्षाच्यावतीने विधानसभा येथे सत्याग्रह केला होता. त्याबद्दल त्यांना एक महिना कारावास झाला होता. सन 1952 मध्ये धान्य भाववाढी विरोधात त्यांनी सत्याग्रह केल्याप्रकरणी त्यांना एक महिना कारावास भोगावा लागला होता. सन 1969 मध्ये भूमी बेळगाव प्रकरणी सत्याग्रह केल्याबद्दल त्यांना दोन आठवडे कारावासाची शिक्षा झाली होती. सिंधुदुर्ग जिल्हा केंद्रासाठी सन 1982 मध्ये त्यांना एक आठवडा कारावास शिक्षा झाली होती. तसेच, जिल्हा न्यायालय वकील संघटनेच्या आंदोलनाबद्दल त्यांनी एक आठवडा कारावास शिक्षा भोगली होती.

अध्यक्ष महोदय, कै.मठकर सन 19974 व 1978 असे दोन वेळा सावंतवाडी मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित होते व त्यांनी विधिमंडळाच्या समित्यांवर चांगले काम केले होते. विविध वृत्तपत्रामध्ये व साप्ताहिकामध्ये त्यांनी लिखान केले होते. सावंतवाडी येथून प्रकाशित होणाऱ्या "वैनतेय" या नियतकालिकाचे ते संपादक होते. त्यांनी लिहिलेली अनेक पुस्तके प्रकाशित झाली असून त्याबद्दल त्यांना राज्यस्तरीय "दर्पण", "आर्य भूषण", "ग्रंथमित्र" पुरस्कार

...9

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथ शिंदे....

त्यांना प्राप्त झाले होते. त्यांनी गंथालय, सहकार, विडी उद्योग, कौल कारखाना निर्मितीमध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. राज्य ग्रंथालय, विडी उद्योग, बांधकाम या क्षेत्रातील कामगारांसाठी त्यांनी शेवटपर्यंत लढा दिला होता. बॅ.नाथ पै, श्री.मधु दंडवते, श्री.नानासाहेब गोरे, श्री.मृणाल गोरे, श्री.ग.प.प्रधान अशा मान्यवरांसोबत त्यांनी काम केले होते.

अध्यक्ष महोदय, अशा ज्येष्ठ समाजवादी नेत्यास माझ्यावतीने व माझ्या पक्षाच्यावतीने भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

--------

यानंतर N-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी ज्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतो त्या सावंतवाडी मतदारसंघाचे आदरणीय मठकर हे दोन वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. समाजवादी चळवळीचे एक अग्रणी नेते म्हणून आमच्या जिल्ह्यामध्ये त्यांची ओळख होती. ज्यावेळी बॅ.नाथ पै यांचे निधन झाले त्यावेळी त्यांच्या पहिल्या चरित्राचे प्रकाशन आणि पुस्तक हे आदरणीय मठकर यांनी लिहिले होते. पूर्वी सावंतवाडी हा विडी कारखान्यासाठी प्रसिध्द होता. त्याठिकाणच्या कामगारांचे त्यांनी समर्थपणे नेतृत्त्व केले. नंतरच्या काळात सावंतवाडी नगरपालिका कर्मचाऱ्यांची संघटना असेल, पीडब्ल्यूडी कामगारांची संघटना असेल या माध्यमातून काम करताना गोव्याच्या स्वातंत्र्य संग्रामातील त्यांचा लढा अत्यंत लक्षणीय होता. परंतु गोवा स्वातंत्र्य संग्राम संपल्यानंतर स्वातंत्र्य सैनिकांच्या चळवळीचे त्यांनी नेतृत्व केले, दिल्ली, मुंबईला जाऊन त्यांनी त्यांना न्याय मिळवून दिला. हल्लीच्या काळात माननीय मुख्यमंत्र्यांकडे स्वातंत्र्य सैनिकांचे शिष्टमंडळ घेऊन ते आले होते. अतिशय चांगल्या समाजवादी कार्यकर्त्यास आम्ही मुकलो आहोत. व्यक्तिगत जीवनामध्ये सुध्दा त्यांचे फार चांगले मार्गदर्शन मला लाभले आणि माझ्या राजकीय जडणघडणीमध्ये सुध्दा त्यांचा फार मोठा वाटा होता. माझ्या मतदार संघाच्या विकासामध्ये त्यांचा फार मोठा वाटा होता. त्यांच्या निधनाने एका मार्गदर्शकाला सिंधुदुर्ग जिल्ह्याची आणि सावंतवाडी मतदार संघाची मुकली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वतीने त्या जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून आणि सावंतवाडी मतदार संघाचा आमदार म्हणून माझ्या मतदार संघातील सर्व नागरिकांच्या वतीने मी त्यांना भावपूर्ण आदरांजली व्यक्त करतो.

-------

2.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री नामदार श्री. देवेंद्र फडणवीस यांनी जयानंद शिवराम मठकर, माजी विधानसभा सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे. सन्माननीय गटनेते तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. कै. मठकर यांनी गोवा मुक्ती आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला होता. तेरेखोल किल्ल्यावर पाठविण्यात आलेल्या एक तुकडीचे नेतृत्वही त्यांनी केले होते. कै. मठकर यांनी विविध दैनिकांमध्ये पत्रकार म्हणून दीर्घकाळ सेवा केली होती. अनेक पुस्तकांचे लेखन त्यांनी केले. त्यांनी आयुष्यभर कामगार आणि गरीब जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष योगदान दिले होते. एक प्रभावी समाजवादी नेता अशी त्यांची ओळख होती. कै. मठकर 1974 आणि 1978 अशा दोन वेळा सावंतवाडी मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. उत्कृष्ट संसदपटू आणि एक अभ्यासू लोकप्रतिनिधी अशी त्यांची प्रतिमा होती. अशा ज्येष्ठ समाजवादी नेत्याचे गुरुवार दिनांक 7 एप्रिल 2016 रोजी दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या स्मृतीस मी अभिवादन करतो व भावपूर्ण आदरांजली वाहतो.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

-------

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित, नवी मुंबई यांचा सन 2013-14 या वर्षाचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो :-

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

डॉ. रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सन 2013-14 व सन 2014-15 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो :-

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री. रविंद्र वायकर (उच्च व तंत्रशिक्षण) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव यांचा सन 2014-15 या वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो :-

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा सन 2014-15 या वर्षाचा वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह) अहवाल सभागृहासमोर ठेवतो :-

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन 2014-15 या वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो :-

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन 2013-14 या वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो :-

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन 2014-15 या वर्षाचा अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो :-

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री. सुभाष देसाई (उद्योगमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र सूक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परिषद नियम (सुधारित) नियम 2016 प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एमएसई-2015/प्र.क्र.154/उद्योग-7, दिनांकित 20 जानेवारी, 2016 सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

5.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. /मु.शी. :** अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

डॉ. शशिकांत खेडेकर (समिती सदस्य) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

**अध्यक्ष :** अंदाज समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----

6.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल
सादर करणे.

डॉ. सुनिल देशमुख (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा सातवा व आठवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**अध्यक्ष :** सार्वजनिक उपक्रम समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

---------

7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** उपविधान समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. विजय औटी (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने उपविधान समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**अध्यक्ष :** उपविधान समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

8.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. गुलाबराव पाटील (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने आश्वासन समितीचा चौथा व पाचवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**अध्यक्ष :** आश्वासन समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

9.....

**पृ.शी. / मु.शी. :** विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. बाळासाहेब सानप (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा सहावा व सातवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**अध्यक्ष :** विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

---------

10.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती मनिषा चौधरी (समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा चौथा व पाचवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**अध्यक्ष :** महिलांचे हक्क व कल्याण समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

---------

11.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा अहवाल सादर करणे.

प्रधान सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा चौथा अहवाल (2015-16) सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष :** वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा चौथा अहवाल (2015-16) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.

---------

12.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**महाराष्ट्र विधानसभा नियम 141 (1) अन्वये मा. अध्यक्षांची घोषणा**

**अध्यक्ष :** महाराष्ट्र विधानसभा नियम 141 (1) अन्वये मी पुढील बाब विधानसभेच्या निदर्शनास आणून देत आहे.

विधानसभेचे दिनांक 17 डिसेंबर 2015 रोजी पारीत केलेले सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 58 मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषद पंचायत, नगरपंचायती व औद्योगिक नगरी सुधारणा विधेयक हे दिनांक 18 डिसेंबर 2015 रोजी विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात आले होते. त्या तारखेपासून तीन महिन्याच्या कालावधीत विधान परिषदेने सदर विधेयक संमत केलेले नाही.

--------

13.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** बृहन्मुंबईतील भाडेकरुंच्या हक्काचे संरक्षण होणेकरिता मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 354 व 499 मध्ये सुधारणा करणे

**मु.शी. :** बृहन्मुंबईतील भाडेकरुंच्या हक्काचे संरक्षण होणेकरिता मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 354 व 499 मध्ये सुधारणा करणे या विषयासंबंधी माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे निवेदन

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये मी पुढीलप्रमाणे निवेदन करतो.

निवेदन

( प्रेस कृपया येथे निवेदन छापावे. )

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** स्थगन प्रस्तावाच्या सूचना

**अध्यक्ष** : आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

----------------

.........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फोर्मेशन है. आज सुबह भिवंडी में बहुत भीषण आग लग गई. चार मंजिल की बिल्डिंग में 250 लोग फंसे रहे. भिवंडी में जो फायरब्रिगेड है वह भिवंडी वेस्ट में है. 5 फायरब्रिगेड पुरानी है. भिवंडी ईस्ट में आबादी बढ़ रही है. वहां फायरब्रिगेड की सुविधा नहीं है. वहां पर टैंकर से पानी भरना पड़ता है. यह तो बहुत अच्छा हुआ कि थाना और कल्याण से फायरब्रिगेड ने आकर बचा लिया गया. वरन् आज 250 लोगों की मौत हो जाती. किसी की कोई मौत नहीं हुई है. भिवंडी ईस्ट में फायरब्रिगेड मॉडर्न टाईप का लगाया जाना चाहिए. वह एक इंडस्ट्रीयल एरिया है. वहां पावरलूम का बहुत बड़ा बिजनेस है. भिवंडी की ओर बिल्कुल ध्यान नहीं दिया जा रहा है. वहां की कार्पोरेशन के पास कुछ भी नहीं है. वहां की कार्पोरेशन को बरखास्त किया जाए.

**अध्यक्ष :** आगीसंबंधी शासनाने तातडीने कारवाई करण्यात यावी.

श्री आसिफ शेख : अध्यक्ष महोदय, मालेगांव शहर में दिनांक 29.9.2008 को भिक्कू चौक में जो ब्लास्ट हुआ उसमें 6 लोग मारे गए थे और 101 लोग जख्मी हुए थे. दो दिन पहले शुक्रवार को वहां पर साध्वी प्राची आयी और उन्होंने ऐसा भाषण किया कि साध्वी प्रज्ञा सिंग ठाकूर जो बंद है और वह फाईल कोर्ट से जानी ही थी, इस तरह का वक्तव्य उन्होंने किया और उन्होंने वहां पर मुस्लिम समाज के बारे में बहुत ही खराब बात बोली है, बहुत खिलाफ में बात बोली है. तो क्या सरकार, वह जो फाईल गई है, क्या यह सही बात है कि कुछ प्लॅनिंग करके वह फाईल गई है, इस बारे में सदन में पिछली बार भी बात उठायी गई थी और निवेदन करने के लिए कहा गया था. मेरी विनती है कि सरकार इस बारे में निवेदन करे और साध्वी प्राची के ऊपर महाराष्ट्र में पाबंदी लगनी चाहिए, ऐसी मैं सरकार से डिमांड करता हूं.

**अध्यक्ष** : शासनाने यासंबंधी योग्य ती कारवाई करावी. पाटबंधारे मंत्र्यांचे एक उत्तर राहिलेले आहे. त्यांना वेळ दिलेला आहे.

..........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** मराठवाड्याच्या विकासासाठी मागील अनेक वर्षांपासून अर्थसंकल्पात माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीची तरतूद करण्यात येऊनही प्रत्यक्षात निधी खर्च न होणे तसेच यावर्षी अवर्षणामुळे संपूर्ण राज्यात पडलेला भीषण दुष्काळ, परिणामी पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा निर्माण झालेला प्रश्न आणि शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध न झाल्याने शेतकरी आत्महत्यांमध्ये झालेली वाढ

**मु.शी. :** मराठवाड्याच्या विकासासाठी मागील अनेक वर्षांपासून अर्थसंकल्पात माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीची तरतूद करण्यात येऊनही प्रत्यक्षात निधी खर्च न होणे या विषयासंबंधी सर्वश्री प्रशांत बंब, अर्जुन खोतकर, अतुल सावे, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री सुधाकर भालेराव, सुभाष साबणे, संभाजी निलंगेकर-पाटील, ज्ञानराज चौगुले, संतोष दानवे, हेमंत पाटील,प्रा.संगीता ठोंबरे, डॉ.राहुल पाटील, सर्वश्री लक्ष्मण पवार, आर.टी.देशमुख, भिमराव धोंडे, नारायण कुचे, तानाजी मुटकुळे, वि.स.स. यांचा तसेच, यावर्षी अवर्षणामुळे संपूर्ण राज्यात पडलेला भीषण दुष्काळ, परिणामी पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा निर्माण झालेला प्रश्न आणि शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध न झाल्याने शेतकरी आत्महत्यांमध्ये झालेली वाढ या विषया संबंधी सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, गणपतराव देशमुख, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, जयदत्त क्षीरसागर, डॉ.पतंगराव कदम, सर्वश्री भास्कर जाधव, विजय वडेट्टीवार, बबनराव शिंदे, बाळासाहेब थोरात, राहुल मोटे, अब्दुल सत्तार, हसन मुश्रीफ, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री दत्तात्रय भरणे, सुनिल केदार, बाळासाहेब पाटील, गोपालदास अग्रवाल, संग्राम जगताप, मो.आरीफ नसीम खान, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री अमित देशमुख, हनुमंत डोळस, ॲड.यशोमती ठाकूर, सर्वश्री विजय भांबळे, जयकुमार गोरे, वैभव पिचड, भाऊसाहेब कांबळे, दिपक चव्हाण, डी.एस.अहिरे, संजय कदम, डी.पी.सावंत, राहुल जगताप, मधुकरराव चव्हाण, नरहरी झिरवाळ, कालिदास कोळंबकर, बसवराज पाटील, वसंतराव चव्हाण, अमीन पटेल, ॲड.के.सी.पाडवी, सर्वश्री कुणाल पाटील, काशिराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, सुभाष ऊर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ.संतोष टारफे,

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावीत, श्री.अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, त्र्यंबक भिसे, कु.प्रणिती शिंदे, सर्वश्री सिद्धाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

( प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाले .....

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सर्वश्री. प्रशांत बंब, जयदत्त क्षीरसागर, मधुकरराव चव्हाण, श्रीमती देवयानी फरांदे, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री.गणपतराव देशमुख, इम्तियाज जलिल, अमित देशमुख, भिमराव धोंडे, विजय कांबळे, हेमंत पाटील, दादाजी मुटकुळे, त्र्यंबक भिसे, ज्ञानराज चौगुले, बाळासाहेब मुरकुटे, राहूल पाटील, शशिकांत खेडेकर, शशिकांत शिंदे आणि श्री.जयंत पाटील यांनी या चर्चेमध्ये सहभाग घेतला. यावर्षी राज्यातील परिस्थिती अतिशय गंभीर आहे. राज्यामध्ये आपल्याला भीषण दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. कधी नव्हता एवढा भीषण दुष्काळ यावर्षी महाराष्ट्रात पडलेला आहे. यावर्षी मराठवाड्यामध्ये फक्त तीन टक्के पाणी शिल्लक आहे. गेल्यावर्षी 12 टक्के पाणी होते. राज्यातील धरणांमध्ये आज फक्त 20 टक्के पाणी शिल्लक आहे. गेल्या वर्षी 34 टक्के पाणी शिल्लक होते. कुणी अनुभवला नसेल एवढा मोठा दुष्काळ, पाणीटंचाई आणि चारा टंचाई महाराष्ट्रामध्ये आहे. विदर्भ, मराठवाडा यासंदर्भातील नियम 293 अन्वये चर्चा सभागृहामध्ये उपस्थित केलेली आहे. सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले की, त्यांनी सातव्यांदा दुष्काळावरील चर्चेवर उत्तर दिलेले आहे. ही गोष्ट खरी आहे की, विधान परिषद सभागृह आणि विधानसभा सभागृहामध्ये सात वेळा ही चर्चा उपस्थित झाली. या चर्चेला माननीय मुख्यमंत्री आणि माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी उत्तर दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा खात्याच्या माध्यमातून गेल्या वर्षी जी बेजेट प्रोव्हीजन केलेली आहे. या वर्षात सर्वात जास्त प्रोव्हीजन आपण केलेली आहे. या बजेटला कोणताही कट लावलेला नाही. 7 हजार 272 कोटी रुपये माननीय मुख्यमंत्री आणि माननीय वित्तमंत्र्यांनी याठिकाणी दिलेले आहेत. त्यांनी सांगितले होते की, या योजनेला आम्ही एक रुपयाचा कट लावणार नाही. संपूर्ण पैसे याठिकाणी दिलेले आहेत ते आपण खर्च केलेले आहेत. यावर्षी

......5



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन........

सुध्दा 7 हजार 800 कोटी रूपये धरणांच्या कामासाठी, भूसंपादनासाठी बजेटची प्रोव्हीजन झ ाालेली आहे. बांधकामाधिन प्रकल्प हे जवळपास 90 हजार कोटीपर्यंत आहेत. 7 आणि 8 हजार कोटी रूपये देऊन हे प्रकल्प पूर्ण करण्याचे ठरविले, किमतीची वाढ जरी धरली तरी तेवढे पैसे यामध्ये पुरे होत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.पतंगराव कदम म्हणाले त्याप्रमाणे काळजी करण्याचे काहीही कारण नाही. दोन-तीन महिन्यांचा अवधी आपण मला द्या.

श्री.पतंगराव कदम : अध्यक्ष महोदय, सुप्रिम कोर्टाच्या बच्छाव समितीने कृष्णा खोऱ्याचे पाणी आपल्या वाट्याला आलेले आहे ते उचलण्याचा सरकार निर्णय घेणार काय?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अनेक प्रश्न याठिकाणी उपस्थित केलेले आहेत. 23 टीएमसीचा प्रश्न लवादाकडे होता. 60 टीएमसी पाण्याचे नियोजन आपण केलेले आहे. त्याला ही निधीची आवश्यकता आहे. त्याला पर्यावरणाची परवानगी होती ती दिल्लीवरुन तात्काळ आणलेली आहे. लेंडी प्रकल्प, मराठवाडा प्रकल्प या सर्व प्रकल्पांच्या परवानग्या दिल्लीवरुन तात्काळ आणलेल्या आहेत आणि या कामाला सुरुवात केलेली आहे. जास्तीत जास्त बजेट आपण गेल्यावर्षी दिलेले आहे. आज सन 2014-2015 मध्ये जवळ जवळ 44 हेक्टर क्षमता या एका वर्षामध्ये वाढविलेली आहे. जे प्रकल्प पूर्णत्वामध्ये आहेत, जे प्रकल्प 70, 80 टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. राज्यामध्ये जवळपास सर्व प्रकल्पांना 90 हजार कोटी रूपये लागणार आहेत. आपल्याकडे निधी 7, 8 हजार कोटी रूपये आहे. मग हा निधी कुणाला द्यायचा, हे प्रकल्प पूर्ण कसे करायचे. अनेक प्रकल्प असे आहेत की, त्याठिकाणी फक्त पाणी साचून पडलेले आहे. त्याला कॅनॉल नाही, डिस्ट्रीब्युशन सिस्टम नाही. त्यामुळे ते फक्त शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहचायचे आहे. परंतु दुर्दैवाने ते होऊ शकत नाही. आपल्याकडे जवळपास कोट्यावधी रूपयांची कामे बांधकामाधिन आहेत. पण या प्रकल्पाला 2 कोटी द्या, त्या प्रकल्पाला 4 कोटी द्या, या प्रकल्पाला 5 कोटी द्या, त्या प्रकल्पाला 10 कोटी द्या असे करत करत एकही प्रकल्प पूर्ण होत नाही आणि मग हे सर्व पाणी फक्त बघत बसावे लागते. शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहचत नाही. सरकारमध्ये आल्याबरोबर आम्ही पहिली भूमिका

........6



SSK/ MMP/ AKN/ 12:20

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन.........

घेतली की, जे 70, 80 टक्क्यांच्या वरील प्रकल्प आहेत त्यांना पूर्ण करण्याचा निर्धार याठिकाणी केला. तसे नियोजन करण्यात आले. सन 2014-2015 मध्ये जवळपास 28 प्रकल्प हे पूर्ण केलेले आहेत. 44 हेक्टर पाणी विविध प्रकल्पांना दिले. या वर्षामध्ये पुन्हा 27 प्रकल्प पूर्ण करणार आहोत. त्यातून जवळपास 1 लाख 60 हेक्टर सिंचन क्षमता वाढणार आहे. याठिकाणी धरणे आहेत, त्यावर कॅनॉल करायचे आहेत. परंतु त्याठिकाणी पाणी देऊ शकत नाही. जर प्राधान्याने आपण त्यांना निधी आणि पाणी उपलब्ध करुन दिले तर जवळपास 1 लाख 60 हजार हेक्टर पाणी देणार आहोत. अनेक चांगले निर्णय शासनाने याठिकाणी घेतलेले आहेत.

p-1............

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन ......

सर्वात महत्वाचा प्रश्न होता तो थेट जमिन खरेदीचा, भूसंपादनाचा होता, आपण निर्णय घेतला, थेट जमिन खरेदीचे अधिकार खाली अधिका-यांना दिले आहेत. तुम्ही शेतकऱ्यांना डायरेक्ट जाऊन भेटा, त्यांच्याशी चर्चा करा, त्यांचे जर समाधान होत असेल तर जमिन खरेदी करा. त्या अनुषंगाने अनेक प्रकल्प, अनेक प्रश्न होते, ते गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित होते, ते मार्गी लागलेले आहेत. अनेक प्रकल्प आहेत त्यांचा मार्ग सुकर झालेला आहे. विदर्भ आणि मराठवाडयातील प्रकल्पांना सुप्रमाचे अधिकार दिले. ते महामंडळाच्या स्तरावर दिलेले आहेत. आपण सांगितले की वरती येण्याची गरज नाही.

अध्यक्ष महोदय, नियम 293 च्या प्रस्तावामध्ये म्हटलेले आहे की, 4000 कोटी रुपये विदर्भाच्या महामंडळाकडे पडून आहेत. परंतु खर्च होत नाही. हे खरे आहे. त्यातील सर्वात मोठी अडचण सुप्रमाची होती, पर्यावरणाची होती, वन जमिनींची होती. तेथे असा निर्णय घेतला आहे की, सुप्रमा हया खाली दिल्या जातील. सुप्रमा खाली देण्याचा निर्णय घेतला आहे. मला सांगायला आनंद वाटत आहे. आपले 4000 कोटी रुपये पडून होते. त्यातील आता फक्त 1800 कोटी रुपये शिल्लक आहेत. त्याचे कारण हेच आहे की, जवळपास 40 प्रकल्पांना वर्षभरामध्ये सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली, महामंडळ स्तरावर दिली.

अध्यक्ष महोदय, भूसंपादनाचे इतक्या वर्षापासून जे शेतक-यांचे पैसे शिल्लक होते ते त्यांना दिले. 2200 कोटी रुपये शेतकऱ्यांना दिल्या बरोबर ज्या प्रकल्पातल्या अडचणी होत्या, त्या मार्गी लागल्या आहेत. अमरावती, वाशिम, बुलढाणा या अनुशेषाच्या जिल्हयात प्रकल्पाच्या तरतुदीचा पुनर्विलोकनाचे अधिकार, संचालक मंडळाकडे दिले. एखादा प्रकल्प अडचणीमध्ये आहे तो त्या ठिकाणी पूर्ण होऊ शकत नाही. 500 कोटी, 200 कोटी रुपये पडले आहेत. बाजूचा प्रकल्प तांत्रिक दृष्टया पूर्ण असेल परंतु पैसे नसतील, निधी नसेल म्हणून तो रखडला असेल तर या प्रकल्पाचे पैसे त्या प्रकल्पावर त्याच विभागामध्ये टाकण्याचे अधिकार खाली

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन.......

दिलेले आहेत. अनेक प्रकल्प मार्गी लागण्याची अडचण दूर झालेली आहे. म्हणून पैसे फिरवून, वळवून त्याच भागामध्ये त्या प्रकल्पावर फिरवल्याने अनेक प्रश्न मार्गी लागलेले आहेत. अनेक चांगले निर्णय आधी घेतले.

अध्यक्ष महोदय, यावर्षी प्रधानमंत्री सिचाई योजनेच्या माध्यमातून 7 प्रकल्प हे देशात आपल्याकडे जास्त घेतले गेले आहेत. काही प्रकल्प पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. जे प्रकल्प एआरबीपी मध्ये होते, त्यांना सुध्दा निधी देण्याचे काम केंद्र सरकारने केलेले आहे. राज्यातला आपला वाटा हा सुध्दा त्यामध्ये टाकला आहे. अनेक सन्माननीय सदस्य म्हणतात आम्हाला निधी कधी देणार ? 7 प्रकल्पांची नावे वाचून दाखवितो. टप्पा एक मध्ये वाघुर प्रकल्प, लोअर पांझरा हे तापी खो-यातील आहेत. बावनथडी लोअर वर्धा, लोअर दुधना, नंदुरपद्मेश्वर आणि तिल्लारी हे सात प्रकल्प आहेत. लोअर दुधना नांदुरपद्मेश्वर हे दोन प्रकल्प मराठवाडयातील आहेत. नांदुर पद्मेश्वर जरी नाशिकला असला तरी त्याचा सर्व फायदा मराठवाडयाला होतो. त्याचे पाणी सर्व खाली येते. हे दोन प्रकल्प त्यातील मराठवाडयातील घेतलेले आहेत. पुढच्या टप्यामध्ये 13 प्रकल्प आहेत. हे प्रकल्प एक एक वर्षामध्ये पूर्ण करायचे आहेत. निश्चितपणे हे प्रकल्प जेव्हा पूर्ण होतील, तेव्हा मोठया प्रमाणामध्ये सिंचन क्षमता वाढणार आहे. म्हणून मला वाटते की, या वर्षी कोणाला किती दिले, या भागातील किती, त्या भागातील किती, याचा विचार करण्यापेक्षा जे अपूर्ण पडलेले प्रकल्प आहेत. त्यांना पूर्ण व्हायला पुढची 10-15 वर्षे लागली असती, परंतु केद्र सरकारने मदत केल्यामुळे जवळपास हे सर्व प्रकल्प चांगले होत आहेत. तीन टप्यातील सर्व प्रकल्प या ठिकाणी पटलावर ठेवू.

श्री.अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही चर्चा मराठवाडयाची आहे. मंत्री महोदय पूर्ण राज्याची माहिती देऊ लागले. मराठवाडयाला काय ठोस देणार ? त्याबद्दल बोलावे.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य महाराष्ट्राच्या पाणीपुरवठयावर किंवा जलसंपदावर बोलले असतील तर त्यांना उत्तरही तसेच द्यावे लागते.

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, नियम 293 चे दोन प्रस्ताव आहेत. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार यांचा सुध्दा प्रस्ताव आहे. त्यांना मी उत्तर द्यायचे की नाही ? आपण सार्वत्रिक प्रश्न विचारलेला आहे. विदर्भ, उत्तर महाराष्ट्राचा उल्लेख केलेला आहे. म्हणून दोन्ही प्रश्नांचे संयुक्त उत्तर संयुक्ती द्यावे लागेल. तुम्ही म्हणाला तर फक्त मराठवाडयाचे प्रकल्प सांगेन. मला याबाबत काही अडचण नाही. गेल्या 5 वर्षामध्ये कुठल्याही सुप्रमा दिलेल्या नव्हत्या. विदर्भामध्ये 44 सुप्रमा दिल्या. मराठवाडयामध्ये 28 सुप्रमा दिलेल्या आहेत. एमकेव्हीडीसीमध्ये 12 सुप्रमा दिलेल्या आहेत. केआडीसीमध्ये 5 सुप्रमा दिल्या, डिआयडीसीमध्ये 4 सुप्रमा दिल्या. जवळपास 98 सुप्रमा यावर्षी दिलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, वाशिमचा उल्लेख आमचे मित्र माननीय श्री.शिंदे साहेबांनी केलेला आहे. वाशिमला इतके पैसे झाले, इतके वाढले. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी असा उल्लेख केला की, वाशिमला 70 कोटी वरुन 700 कोटी रुपये कसे दिले. हा प्रश्न विचारणे सहाजिकच आहे. हा प्रश्नाबाबत माननीय श्री.विखे पाटील यांनी सांगितले की, जलसिंचन खात्याचा येथे पहिला घोटाळा निघाला, 70 कोटी वरुन 700 कोटीला परवानगी कशी काय मिळाली ? कशी काय याला सुप्रमा दिली ? आपला प्रश्न खरा आहे. वाशिममध्ये 11 बॅरेजेसचे काम होते, तो प्रश्न 2008-2009 सालचा होता, त्यावेळी प्रशासकीय मान्यता दिलेली होती. ज्यावेळेला त्याचे डिझाईन झाले, त्यावेळेला मांजरा नदीवरचे जसे डिझाईन होते तसे उचलले आणि ते वाशिमला आणले तेवढच इस्टीमेट ठेऊन टेंडर केले गेले. ज्यावेळेला प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली त्यावेळेला तांत्रिक सर्व बाजू तपासायला पाहिजे होत्या, त्याचे डिझाईन व्यवस्थित करायला पाहिजे होते, घाई गर्दीत का होईना ते टेंडर निघाले. जसेच्या तसे ते इस्टीमेट घेऊन टेंडर सूचना झाली. ठेकेदार ठरला त्या कामाला सुरुवात झाली. पाच ते सात फुटावर मांजरा नदीवर हार्डरॉक होता तो या ठिकाणी 50 ते 100 फुटावर गेला तो सापडेच ना. त्यामुळे जवळपास 324 कोटी रुपये प्लींथमध्ये गेले. कामे आपल्या काळात सुरु झाली आहेत. 400 कोटी जवळपास खर्च होऊ गेला. 80 ते 70 टक्के काम

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन.......

पूर्ण झाले. राहिला 300 कोटींचा प्रश्न. ठेकेदाराने पुढचेही काम करुन टाकले होते. 11 पैकी 2 बॅरेजेस पूर्ण झालेल्या आहेत. 80 टक्के काम पूर्ण झालेले आहे. आपल्या निकषानुसार असे ठरविले. वाशिम जिल्हा हा अनुशेषातील जिल्हा आहे, बॅकलॉग मधील आहे. म्हणून ई.पी.सी.कडे गेलो, डी.सी.ने मंजूरी दिली. ई.पी.सी.ने सांगितले मंजूरी दिली. नियामक मंडळाची परवानगी घेतली नंतर कॅबिनेटमध्ये गेलो, तेथे गेल्यानंतर या प्रकल्पाला मान्यता द्यावी लागली. 400 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. जून महिन्यामध्ये पाणी थांबणार आहे. आपल्याला हे म्हणता येणार नाही हे तोडून टाका, फेकून द्या आम्ही निधी देणार नाही. या दोन महिन्यामध्ये 11 प्रकल्प पूर्ण होऊन त्यामध्ये जवळजवळ साडेसात हजार हेक्टर जमिनीला पाणी मिळणार आहे. म्हणून हे क्रमप्राप्त होते.

अध्यक्ष महोदय, तुम्ही जे म्हणता आहात की, कशी काय परवानगी दिली ? ज्यावेळेला टेंडर केले त्यावेळी सर्व तांत्रिक बाजू पाहिल्या असत्या, परवानग्या घेतल्या असत्या, त्या तपासून पाहिल्या असत्या तर हा प्रश्न उद्‌भवला नसता. असा प्रकल्प हा एकच नाही, राज्यामध्ये अशा अनेक सुप्रमा पुन्हा द्याव्या लागतील. तुम्ही पुन्हा म्हणणार की हयांना सुप्रमा कशा दिल्या. मी मागच्या वेळेला तुम्हाला खुले आव्हान केले की, तुम्ही विरोध पक्ष नेते आहात, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील येते आहेत, अभ्यासू व ज्येष्ठ सदस्य आहात. तुम्ही आपल्या लोकांची कमिटी तयार करा, त्यातुन सुप्रमा देऊ, त्यामध्ये आपणही बसा. यामध्ये 100 टक्के पारदर्शकता आहे. यामध्ये कोणाला थोडी कमतरता आढळली तुम्ही म्हणाल ती शिक्षा आम्ही भोगू. यामध्ये आमचा कोणताही वेगळा हेतू नाही. राज्यामध्ये असे अनेक प्रकल्प 50 टक्के, 60 टक्के, 70 टक्के पूर्ण झालेले आहेत, ते आता सुप्रमासाठी थांबलेले आहेत. अनेक प्रकल्पांमध्ये सन्माननीय सदस्य श्री.बबनराव लोणीकर वारंवार उल्लेख करता आहेत. माझ्याकडे के.टी.वेअरचे बॅरेज कसे झाले ? 50 चे 500 कोटी कसे झालेले आहेत ?

Q-1 ...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन ......

काही तांत्रिक चुका झालेल्या आहेत. काही ठिकाणी अनियमितता झालेली आहे हे सर्वांना मान्य करावे लागेल. पण त्यातील काही प्रकल्प अर्धे अधिक पूर्ण झालेले आहेत. ते आपण सोडून देणार आहोत का ? मला वाटते की, ते आपणास पूर्ण करावे लागतील. पुढील वेळी तुम्ही पुन्हा विचाराल की, या प्रकल्पांना मान्यता कशी दिली आहे ? मला वाटते यावर प्रश्न आणि उत्तरही होऊ शकणार नाही. राज्यातील हे प्रकल्प आपणास मार्गी लावायचे असतील तर ते पूर्ण करावे लागतील.

अध्यक्ष महोदय, अमरावती, अकोला, वाशिम व बुलढाणा या चार जिल्हयात दिनांक 1 जुलै, 2015 रोजी सुमारे 214.27 हजार हेक्टर इतका भौतिक अनुशेष शिल्लक आहे. मराठवाडयातील अनुशेष शिल्लक नाही. अमरावती विभागातील हे चार जिल्हे सोडले तर कोठेही अनुशेष बाकी राहिलेला नाही. म्हणून या भागातील प्रकल्प माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार पूर्ण करावे लागत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी म्हटले की, तुम्ही बाकी ठिकाणी पैसे कसे देणार आहात, विदर्भालाच कसे पैसे देत आहात ? मी सांगतो की, माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे आपण पैसा देत आहोत. कारण आजही तेथे बॅकलॉग आहे. तो आपणास पूर्ण करावयाचा आहे. हे पैसे आम्ही आमच्या मनाने देत नाही.

श्री.जयदत्त क्षिरसागर : अध्यक्ष महोदय, मराठवाडयाचा अनुशेष शिल्लक नाही असे रेकॉर्डवर आलेले आहे. कृपया हे रेकॉर्डवर येऊ देऊ नका.

**अध्यक्ष** : निधीचा नसेल पण कामाच्या अनुशेषाबाबत मंत्री महोदय बोलत असतील.

श्री.जयदत्त क्षिरसागर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय स्पष्ट बोलले आहेत. मराठवाडयाचा अनुशेष शिल्लक नाही ही सरकारची भूमिका असेल तर केळकर समितीचा अहवाल आपण स्वीकारलेला आहे. केळकर समिती माननीय राज्यपालांनी नेमलेली आहे. त्यांनी वेगवेगळे मापदंड व इंडिकेटर दाखवलेले आहेत.

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार येथे उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्यांनी त्यांनाही याबाबत विचारून घ्यावे. मला वाटते की, अमरावती विभागातील चार जिल्हयांमध्ये आज भौतिक अनुशेष शिल्लक आहे. मराठवाडयामध्ये 102 टीएमसी पाण्याचे नियोजन झालेले आहे. आपले प्रकल्प बांधकामाधीन आहेत. अनेक प्रकल्प दुष्काळी

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन .....
परिस्थितीमुळे आम्ही प्रकल्प पूर्ण केलेले आहेत, नियोजन केलेले आहे पण तेथे पाऊसच पडत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे आपल्या धरणात यामुळे पाणी थांबत नाही. उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, कोकणामध्ये आपला अनुशेष शिल्लक राहिलेला नाही कारण तेथील सर्व पाण्याचे नियोजन झालेले आहे. मी नमूद केलेल्या वरील चार जिल्हयामध्ये जास्त अनुशेष असल्यामुळे सहाजिक या भागाला जास्त पैसे द्यावे लागत आहेत. माननीय राज्यपालांच्या निदेशाबाहेर आपणास जाता येत नाही. हा अनुशेष पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

अध्यक्ष महोदय, मी अनुशेषाचा विषय येथे बोलत आहे. जी वस्तुस्थिती आहे ती सांगावी लागेल. मी उगीच कशाला सांगू की तुमचा अनुशेष बाकी आहे. मी पुन्हा सांगतो की, समितीकडून अनुशेषाचे निर्मूलन सुरु आहे.

**अध्यक्ष** : मंत्री महोदय सांगत आहे की, अनुशेष शिल्लक नाही. जो अनुशेष होता तेथे कामे पूर्ण झालेली आहेत असा त्याचा अर्थ निघेल. किती अनुशेष होता व किती पूर्ण केला याबाबत तुमच्याकडे आता माहिती नसेल तर ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी.

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे अनुशेष निर्मूलन सुरु आहे. निदेशांक व समितीच्या अहवालाप्रमाणे अनुशेष निर्मूलन सुरु आहे. असा अनुशेष अमरावती विभागात चार जिल्हयाचा आहे. इतर जिल्हयामध्ये अनुशेष नाही हे खरे आहे. हे आपणास समजूनच घ्यावे लागेल. परंतु मी येथे म्हणणार नाही की आता मराठवाडा स्वयंपूर्ण झालेला आहे व मराठवाडयात सर्व आलबेल चाललेले आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाडयाचा प्रश्न गंभीर आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रशांत बंब यांनी मराठवाडयाकरिता समन्यायी पध्दतीने पाणी वाटपाचा उल्लेख केलेला आहे. हे खरे आहे की, समन्यायी पध्दतीने पाण्याचे वाटप झाले पाहिजे. जायकवाडीच्या उर्ध्व भागामुळे काही ठिकाणी पाणी येऊ शकत नाही, कारण तेथे कमी पाऊस होतो. त्यामुळे तेथे एमडब्ल्यूआरआरएने निदेश दिलेले आहेत, हे प्राधिकरण शासनाने नेमलेले होते व या प्राधिकरणाने निर्णय दिलेला आहे. या

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन.....

निर्णयानुसार जायकवाडीमध्ये 8.5 टीएमसी पाणी सोडलेले आहे. येथे अनेक सन्माननीय सदस्य सांगतात की, आमच्याकडील पाणी खाली का सोडले जाते, येथून पाणी का सोडता, आमचे पाणी का घेता ? याबाबत मी सांगू इच्छितो की, एमडब्ल्यूआरआरएने दिलेल्या निदेशाप्रमाणे हे पाणी सोडणे क्रमप्राप्त आहे. या संदर्भात 25 पीआयएल कोर्टामध्ये प्रलंबित आहेत. आजही त्यावर सुनावणी सुरु आहे. सुरुवातीला याकरिता कोर्टाने स्टे दिला नाही म्हणून तेथे पाणी सोडणे क्रमप्राप्त आहे. एमडब्ल्यूआरआरएच्या निदेशानुसार हे पाणी सोडले जात आहे.

अध्यक्ष महोदय, आता पाणी सोडणे हे कोर्टाच्या आदेशावर अवलंबून आहे. कारण याबाबत 25 पीआयएल झालेल्या आहेत. 25 पीआयएल झाल्यामुळे कोर्टाने स्टे दिलेला नाही. मी नाशिक जिल्हयाचा पालकमंत्री आहे. अनेक लोकांनी पाणी सोडण्यास विरोध केला, अनेक ठिकाणी पुतळे जाळले गेले, निदर्शने झाली, मोर्चे आले आहेत. तरी सुध्दा कोर्टाचा निदेश असल्यामुळे आपणास ते थांबविता आले नाही. सन्माननीय सदस्य प्रा.देवयानी फरांदे यांनी उल्लेख केला आहे की, आमचे पाणी तिकडे का दिले जात आहे. परंतु आज मराठवाडयातील परिस्थिती अतिशय भयावह आहे. मी नाशिक जिल्हयाचा पालकमंत्री असल्याने तेथील पिण्याच्या पाण्याचे नियोजन आम्ही केलेले आहे. नाशिकमध्ये पिण्याच्या पाण्याकरिता आठवडयातून एक दिवस कात्री लावावी लागली आहे. परंतु आपण जुलैपर्यत तेथील पाण्याचे नियोजन केलेले असून त्याप्रमाणे खाली पाणी सोडलेले आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांनासुध्दा कमी पाणी मिळालेले आहे. त्यांच्या शेतीला कमी पाणी दिल्यामुळे बागा खराब झाल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. पण पाणी देणे आपणास क्रमप्राप्त होते. कारण एमडब्ल्यूआरआरएचा निर्णय झाला होता, त्याला कोर्टाने स्टे दिलेला नाही. त्यामुळे पाणी सोडले गेले. भविष्यात पाणी सोडण्याबाबत काही सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. नाशिकवरुन जायकवाडी धरणापर्यत पाणी सोडत व जात असताना त्यामध्ये गळती व लॉसेस होतात. यामुळे अर्धे पाणी देखील जायकवाडीपर्यत पोहचत नाही हे खरे आहे.

.....4

श्री.गिरीष महाजन.....

अध्यक्ष महोदय, सोलापूरला वर्षातून दोन ते अडीच टीएमसी पाणी पिण्याकरिता द्यावे लागते. एमडब्ल्यूआरआरएने दिलेल्या निर्णयाप्रमाणे खाली पाणी सोडले जाते, याबाबत शासन निर्णय करीत नाही. जेव्हा 102 टीएमसीचे जायकवाडी धरण बांधले गेले त्यानंतरही त्याच्या वर तुम्ही धरणे बांधत गेलेला आहात. जे मंत्री झाले त्यांनी त्यांच्या तालुक्यात, जिल्हयात, शेताजवळ धरणे बांधली आहेत, असेही प्रकार तेथे झालेले आहेत. यामुळे जायकवाडी धरणात पूर्ण क्षमतेने पाणी येत नाही हा अडचणीचा भाग आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

अध्यक्ष महोदय, मी एकंदरीत महाराष्ट्राबाबत बोलत आहे, केवळ मराठवाडयापुरते बोलत नाही. जायकवाडीच्या वरच्या बाजूला जी धरणे झालेली आहेत त्याचे कोणतेही नियोजन झालेले नाही त्यामुळे खालच्या धरणात पाणी येत नाही.

**अध्यक्ष** : तुम्ही जायकवाडीच्या वर म्हणजे मराठवाडयात म्हणत असाल, पण मराठवाडयात अशी धरणे झालेली नाहीत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, मी नाशिक विभागात व महाराष्ट्रात म्हणत आहे. आमच्याकडून याबाबत चुका झालेल्या आहेत म्हणून जायकवाडी धरण भरले जात नाही हे खरे आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी येथे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सोलापूरला अडीच टीएमसी पाणी लागते. परंतु अर्धा टीएमसी पाणी तेथे पाहिजे असेल तर त्याकरिता 5 टीएमसी पाणी आपणास सोडावे लागते. 1 टीएमसी पाणी तेथे पाहिजे असेल तर 10 टीएमसी पाणी सोडावे लागते म्हणजे दहा पट पाणी सोडावे लागते. यामध्ये 90 टक्के लॉस होत आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**अध्यक्ष** : मंत्री महोदयांनी नेमके उत्तर द्यावे.

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, मी वस्तुस्थिती मांडत आहे. मला बोलू द्यावे. माझे सांगण्याचे तात्पर्य आहे की, 1 टीएमसीसाठी 10 टीएमसी पाणी सोडावे लागते.

यानंतर R-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन.....

मला वाटते की, भविष्यामध्ये हे पाणी देतांना या गोष्टीचा विचार करावा लागेल. सन्माननीय सदस्या श्रीमती देवयानी फरांदे यांनी सांगितले की, बंद पाईपलाईनने पाणीपुरवठा करावा लागेल. सोलापूर येथे 10 ते 20 टीएमसी वाया घालविले तर......(अडथळा...)

मी एक टीएमसी पाण्याकरिता 10 टीएमसी पाणी द्यावे लागते, असे म्हणालो होतो.

अर्ध्या टीएमसी पाण्याकरिता पाच टीएमसी पाणी सोडावे लागते तर एक टीएमसी पाण्याकरिता दहा टीएमसी पाणी सोडावे लागते,असेच मी म्हणालो.

**अध्यक्ष :** हे एका टीएमसीकरिता दहा टीएमसी पाणी पाणी वेळेवर सोडले असते तर एका टीएमसीकरिता दहा टीएमसी पाणी सोडावे लागले नसते. अवेळी पाणी सोडल्यानंतर एका टीएमसीकरिता दहा टीएमसी पाणी सोडावे लागणार. पावसाळयामध्ये वाहत्या पाण्यात पाणी सोडले तर पाण्याचा लॉस होत नाही. ऑक्टोबर नंतर याबाबत निर्णय घेण्यात येतो. उन्हाळयात मे महिन्यामध्ये पाणी सोडल्यानंतर ते जिरत खाली जाईल त्यामुळे हे लॉसेस होतात.

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, सोलापूर शहराला पिण्याकरिता पाणी सोडावे लागते. तेथील धरणाची क्षमता 500 एमसीएफटीची आहे. पावसाळयात एकदा पाणी सोडले तरी महिना दोन महिनेच पाणी पुरते. पावसाळयात ते पाणी शासन सोडू शकणार नाही. सोलापूरच्या तलावामध्ये पाणी सोडले जाते, तो तलाव 500 एमसीएफटीचा आहे.

**अध्यक्ष :** माननीय मंत्री यांनी सन्माननीय सदस्यांचे प्रश्नांना उत्तर द्यावे.

श्री.मधुकर चव्हाण : अध्यक्ष महोदय, काल रोजी सभागृहामध्ये मराठवाडयासंदर्भातील आणि आणि दुसरी नियम 293 अन्वयेची चर्चा एकत्रित क्लब केली होती. त्याच्या अगोदर सुरुवातीला मराठवाडयाची चर्चा घेतली होती. त्याबाबत आताच मंत्रिमहोदयांनी सांगितले की, मराठवाडयाचा अनुशेष राहिलेला नाही. याबाबतचा शासनाने रेकॉर्ड दाखवावा. अन्यथा आम्ही या संदर्भातील रेकॉर्ड दाखवितो. मराठवाडयातील अनुशेषावर एक चर्चा ठेवण्यात यावी. त्यामध्ये मराठवाडयाचा अनुशेष कुठे आणि कशामध्ये आहे, ते दाखविण्याची आमची तयारी आहे. विशेषतः मराठवाडयाचा इरिगेशनमध्ये फार मोठा अनुशेष आहे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मधुकर चव्हाण....

अनेक वेळेला त्याबाबत शासनाच्या बैठका होऊनही त्यावर चर्चा करुनही प्रश्न सुटलेले नाहीत. काल रोजी सभागृहामध्ये या चर्चेच्या निमित्ताने प्रश्न मांडलेले आहेत. मागील अधिवेशनातही मराठवाडयाबाबत प्रश्न मांडले होते. मराठवाडयातील प्रकल्पांबाबत शासन बोलायला तयार नाही. हे प्रकल्प पूर्ण होणे आवश्यक आहे. उस्मानाबाद जिल्हा दुष्काळी जिल्हा म्हणून सांगण्यात येते. तेथे सतत दौरे केले जातात आणि तेथे शासन पाण्याचा थेंबही देत नाही. या जिल्हयाला कुठून व कसे पाणी देता येईल ? याचा विचार करणे आवश्यक आहे.

श्री.गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, हे सर्व प्रश्न एका वर्षामध्ये सुटणार नाहीत. सन्माननीय सदस्यांनाही हे माहिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण हे देखील मंत्री होते. आता आपण त्या भागाचे प्रतिनिधीत्व करीत आहात. या पुढे भविष्यात ओपन कॅनॉलने पाणी देण्या संदर्भात शासनाला निर्णय करावा लागेल. यामुळे आज अर्ध्या टीएमसीकरिता पाच टीएमसी पाणी द्यावे लागते. अर्ध्या टीएमसीकरिता पाच टीएमसी पाणी सोडणे राज्याला परवडणारे नाही. भविष्यकाळामध्ये पाणी देताना बंद पाईपलाईनमधून पाणी द्यावे लागणार आहे.

**अध्यक्ष :** माननीय मंत्री महोदयांनी भाषण न करता केवळ सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे द्यावीत. भाषण संपल्यानंतर केवळ प्रश्न विचारण्याकरिता संधी दिलेली आहे. केवळ प्रश्नांना उत्तरे देण्यात यावीत.

श्री.जयदत्त क्षिरसागर : अध्यक्ष महोदय, मराठवाडयामध्ये सिंचनाचा भौतिक आणि आर्थिक अनुशेष राहिलेला नाही, अशा प्रकारचे वक्तव्य मंत्री महोदयांनी केलेले आहे. माननीय राज्यपालांनी विभागीय असमतोल ठरविण्याकरिता समिती नेमली होती. मराठवाडयतील तीनही प्रदेशामध्ये सिंचनाचा अनुशेष किती आहे, हे फोर्टिफाय करण्याकरिता डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली होती. या केळकर समितीचा अहवाल कॅबिनेटने स्वीकारला. केळकर समितीच्या अहवालामध्ये मराठवाडयातील सिंचनाचा अनुशेष किती आहे हे स्पष्टपणे दिलेले आहे. असे असतानाही माननीय मंत्री महोदय एवढे बेजबाबदारपणे "मराठवाडयात अनुशेष नाही" असे म्हणत आहेत. असे म्हणून ते शासन म्हणून आमच्या जखमेवर मलम लावण्याऐवजी मीठ चोळत आहेत. अशा पध्दतीचे चुकीचे उत्तर सभागृहात राहू नये या अनुषंगाने मी हे बोलत आहे. अगोदर पाणी उपलब्ध होत नव्हते. आता अठरा टीएमसी पाणी उपलब्ध झालेले आहे, त्याच्यावर शिक्कामोर्तब झालेले आहे. अठरा टीएमसी पाण्यमध्ये छोटे छोटे 269 प्रकल्प होत आहेत.

....3

श्री.जयदत्त क्षिरसागर....

त्याकरिता 3000 कोटी पेक्षा अधिक रक्कम लागणार नाही. वारंवार मंत्री महोदयांना सभागृहात व बाहेर भेटून आम्ही याकरिता आग्रह केला होता. मराठवाडयातील टंचाई दूर करण्याकरिता तेथील दुष्काळाची दाहकता व तीव्रता कमी करण्याकरिता 18 टीएमसी पाणी अडविण्यात येणार आहे का ? त्याकरिता 3000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे का ?

**अध्यक्ष :** 18 टीएमसी पाणी अडवू शकता का एवढाच प्रश्न आहे.

श्री.गिरीश महाजन : मला तुम्ही विषयावर येऊ देत नाही. .....( अडथळा)....विषयावर येऊ की नाही. हेच मला काही समजत नाही. (अडथळा)

**अध्यक्ष :** 18 टीएमसी पाणी मंजूर झालेले आहे, ते शासनाला अडविण्याकरिता किती दिवस लागणार आहेत ? आणि त्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम असेल तर तोही सांगण्यात यावा.

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, या भागाकरिता शासनाने 102 टीएमसी पाण्याचे नियोजन केलेले आहे. त्यापैकी 18 टीएमसी पाण्याचे फेर नियोजन करावे लागणार आहे. त्याबाबतचा अभ्यास सुरु आहे. 600 हेक्टरच्या आतील प्रकल्पाचे जे पाणी आहे, त्याच्या संदर्भात राज्यपाल महोदयांकडे विनंती केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार आपण जलसंपदा मंत्री असताना आपणच याला मान्यता दिलेली आहे. सन्माननीय सदस्य जलसंपदा मंत्री असताना याबाबत माननीय राज्यपालांकडे विनंती केली होती. या 18 टीएमसी पाण्याचे फेरनियोजन करुन पाणी वापरण्याकरिता परवानगी मिळविण्यासंदर्भात मी दोन वेळा राज्यपालांकडे जाऊन आलो. याबाबत शासनाचा पाठपुरावा चालू आहे. लवकरात लवकर अठरा टीएमसी पाण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर 250 हेक्टरच्या आतील जलयुक्त शिवार योजनांच्या कामांच्या माध्यमातून परवानगी दिलेली आहे. त्यातूनही पाणी अडविण्याचे चालू आहे. लवकरात लवकर हे सर्व प्रश्न मार्गी लावण्यात येतील. याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांचे प्रश्न प्रलंबित आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांचा एवढाच आग्रह आहे की, या प्रकल्पांना निधीची आवश्यकता आहे. साडे सात हजार कोटी रुपयांमध्ये काहीच होत नाही, ही सुर्यप्रकाशाइतकी स्वच्छ गोष्ट आहे. आपल्या सर्वांचे प्रश्न हे आहेत की, प्रकल्प पूर्ण होऊन पाणी मिळाले पाहिजे, एवढाच या सर्व गोष्टींचा मतितार्थ आहे. राज्यामध्ये .....(अडथळा) ....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, माननीय जलसंपदा मंत्री दोन 293 अन्वयेच्या प्रस्तावांना उत्तर देत आहेत. अध्यक्ष महोदय आपणही मराठवाडयाचे प्रतिनिधीत्व करीत आहात. याबाबत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना आपण पाहिलेल्या आहेत. मंत्री महोदयानी आता उत्तर देत असताना आपल्याला एमडब्ल्यूआरआरआय प्राधिकरणाला हे करावे लागेल, अमक्याला हे करावे लागेल, असे म्हटलेले आहे. प्राधिकरण शासनानेच नेमलेले आहे. त्यावेळी माननीय श्री.एकनाथराव खडसे हे विरोधी पक्ष नेते होते. प्राधिकरण करीत असताना त्यामध्ये जर त्रुटी राहिलेल्या असतील तर सभागृहामध्ये त्या संदर्भात बदल करण्याकरिता आम्ही सर्व तयार आहोत. प्रत्येक वेळेस वर पाणी अडवायचे आणि खाली पाणी द्यायचे नाही, हे योग्य नाही. दुष्काळ पडल्यानंतर क्रॉप पॅटर्नबाबत बोलायचे नाही, हेही योग्य नाही. दुष्काळाबाबत शासनाने उत्तर दिलेले आहे. त्यामध्ये पीक पध्दत बदलली पाहिजे, त्याबाबत विचार करावा लागेल, असे म्हटलेले आहे. त्याबाबत शासनाने कधी विचार करायचा ? आता दुष्काळी परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रात आहे. अशी परिस्थिती असताना पाठीमागे काही गोष्टी चुकल्या असतील तर त्या दुरूस्त करण्यात याव्यत. प्राधिकरणामध्ये बदल करायचे असतील तर ते करण्यात यावेत. जून-सप्टेंबरपर्यंत पाऊस पडतो. त्यावेळी कोणीही उठायचे आणि औरंगाबद, मुंबई, नागपूर हायकोर्टात जायचे, हे योग्य नाही. हायकोर्टात न जाता सरकार म्हणून आणि जलसंपदा खात्याचे प्रमुख या नात्याने आपणच निर्णय घ्यावा. ते निर्णय घेण्याकरिता सभागृहामध्ये एखादे बिल आणावे लागले तरीही आम्ही सर्व जण त्याला पाठिंबा देऊ. ते बिल कोणावर अन्यायकारक नसले पाहिजे. आम्हालाही कळते की पाणी वरच्यांचही नाही खालच्यांचही नाही. कायद्यानुसार समन्यायी पाणी वाटप केलेले आहे. त्याप्रमाणे सर्वांना समान पाणी दिले पाहिजे. काही भागातील पीक पध्दत बदलली पाहिजे जलसंपदा मंत्री महोदय पीक पध्दत बदलण्याकरिता शासनाने ठोस निर्णय घ्यावा. आपण सभागृहामध्ये तशा पध्दतीने निर्णय घेऊन तो संपूर्ण राज्यामध्ये राबवू. असे काहीतरी उत्तर शासनाने दिले पाहिजे.

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, मला बोलू तरी द्या. मी त्या विषयावर येतोच आहे. एमडब्ल्यूआरआरआयने म्हटल्याप्रमाणे आपल्याच काळामध्ये ते झालेले आहे. यामध्ये जर काही अडचणी असतील तर त्यामध्ये काही बदल करता येतील.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन....

आपण कायदे करतो त्यामध्ये आपल्याला काही बदल करायचे असतील तर निश्चितपणे ते बदल करण्याची सरकारची तयारी आहे. सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार आपण जे म्हटले की, क्रॉप पॅटर्न बदलावे लागेल. ती वस्तुस्थिती आहे. मराठवाडयात ऊसाचे पीक होते. पश्चिम महाराष्ट्रात ऊसाचे पीक होत आहे. ज्या पध्दतीने त्याकरिता पाणी दिले जात आहे, ते बदलण्याची गरज आहे. आज ड्रिप इरिगेशनचा वापर केल्याशिवाय पर्याय नाही.

एस-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश महाजन.....

पडणारे, येणारे आणि थांबविण्यासाठी देखील तेवढेच पाणी आहे. पण आज सरळपध्दतीने पाणी दिल्यामुळे राज्यामध्ये पाण्याचा अपव्यय होत आहे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात. )

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांचा रिप्लाय अजून बाकी आहे. मला राईट टू रिप्लायचा अधिकार आहे. अनेक चुकीच्या गोष्टी रेकॉर्डवर येत आहे, याची मला माहिती आहे. मंत्री महोदयांकडून अपेक्षित उत्तर न आल्यामुळे मराठवाड्यातील जनतेची थट्टा होऊ लागली आहे. माझी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, मंत्री महोदयांचा रिप्लाय होण्याचे बाकी आहे.

मंत्री महोदय, आपला रिप्लाय संपलेला आहे काय ?

श्री. गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, नाही.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, माझी पॉईंट ऑफ ऑर्डरने विनंती आहे. मंत्री महोदयांचा रिप्लाय झाल्यानंतर राईट टू रिप्लायवर मला माननीय अध्यक्षांनी बोलण्याची संधी द्यावी.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात. )

श्री. मधुकर चव्हाण : अध्यक्ष महोदय,...(गोंधळ)....

श्री. गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. मुधकर चव्हाण यांना सांगू इच्छितो की, त्यांनी सभागृहात 25 ते 30 वर्षे काम केलेले आहे. तसेच त्यांनी मंत्री पदावर देखील काम केलेले आहे. मी शासनाचे धोरण काय आहे, त्याबाबत सदनाला माहिती देत आहे. अशा वेळी प्रत्येक सन्माननीय सदस्य माझ्या गावातील काय, असे विचारु लागला तर मला उत्तर देणे कठीण होऊन बसणार आहे. मी 18 टीएमसी पाण्याच्या संदर्भातील उत्तर दिलेले आहे. हा प्रश्न माननीय राज्यपालांकडे प्रलंबित आहे. आपण पाठपुरवा करीत आहोत. मला माननीय अध्यक्षांनी उत्तर देण्यासाठी संरक्षण द्यावे. विराधी पक्षाने 30 वर्षे सत्तेत असताना काय केले हे सांगण्याची वेळ माझ्या आणू नये....( गोंधळ ).....

**अध्यक्ष** : मंत्री महोदयांनी लवकरात लवकर उत्तर संपवावे, अशी माझी त्यांना विनंती आहे.

.......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, भविष्यात पिकांना सरळ पध्दतीने पाणी देण्याऐवजी ठिबक सिंचन पध्दतीनेच पाणी घ्यावे लागणार आहे. जेणेकरुन उपलब्ध पाण्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली कसे आणता येईल या दृष्टीकोनातून विचार करावा लागणार आहे. यासंदर्भातील निर्णय लवकरात लवकर घेतला जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, सर्व प्रकल्पांना पैसे द्यावयाचे आहेत. शेतकरी अडचणीत आहे, पाणी नाही मला याबाबत पूर्ण कल्पना आहे. 7 ते 8 हजार कोटी रुपयांमधून जलसंपदा विभागातील सर्व प्रकल्प पूर्ण होणार नाहीत. माझी या विषयी माननीय मुख्यमंत्री माननीय वित्तमंत्री यांच्याशी चर्चा झालेली आहे. त्यांनी सांगितल्यानुसार प्रकल्पांना जेवढा खर्च लागणार आहे, जो प्रकल्प नियमात बसणारा असेल, पुनर्वसनाची परवानगी असेल, भूसंपादन क्लिअर असेल, पर्यावरणाच्या सर्व परवानग्या मिळालेल्या असतील तर असे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 30 हजार कोटी किंवा 40 हजार कोटी रुपयांचे कर्ज लागले तरी दरवर्षी 20 हजार कोटी रुपयांचे कर्ज घेऊन अर्थसंकल्पात तरतूद करुन प्रकल्प पूर्ण करण्याची तयारी दर्शविलेली आहे. सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील जे प्रकल्प प्रलंबित आहेत, असे प्रकल्प तीन वर्षाच्या कालावधीत पूर्ण केले जातील. या वर्षी महिना दोन महिन्याच्या आत 10 ते 12 हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात येईल. तसेच उर्वरित जेवढे प्रकल्प पूर्ण करणे शक्य असतील असे सर्व प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, पाण्याचे समन्यायी वाटप करणे हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. मराठवाड्यात खरीप हंगाम संपल्यानंतर ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात पाणी दिले जात असल्यामुळे आत्महत्या होत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांनी हिस्स्याच्या बाबतीत माहिती दिलेली आहे. एमडब्ल्युआरआर यांनी सर्व कायदे केलेले आहेत. या पध्दतीने पाण्याचे समन्यायी वाटप करण्याची आवश्यकता आहे. म्हणजेच पावसाळ्यापासून पाणीसाठे 40 टक्क्यापर्यंत साठल्यानंतर किमान 20 टक्के पाणी जायकवाडीत सोडण्याची आवश्यकता आहे. यानंतर 60 टक्के पाणी उर्ध्वभागात दिले तरी चालणार आहे. परंतु, आजतागायत पाण्याचे समन्यायी वाटप होत नाही, असे चित्र अनेक वर्षापासूनचे आहे. शासनाने एमडब्ल्युआरआरला निर्देश देण्याची गरज

.....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रशांत बंब........

आहे. योग्य वेळी शेतकऱ्यांना पाणी मिळाले तर शाश्वत पाणी मिळण्यास मदत होणार आहे. उर्ध्वभागातील एक थेंब पाणी देखील खालच्या भागात देण्याची गरज नाही. अशा प्रकारची रचना करुन, संबंधित सन्माननीय सदस्य आणि संबधित अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक पावसाळा सुरु होण्यापूर्वी घेऊन पाण्याचे समन्यायी वाटप करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणार काय असा माझा प्रश्न आहे.

श्री. गिरीश महाजन : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब यांनी महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात. )

**अध्यक्ष** : पाण्याचे समन्यायी वाटप या पावसाळ्यापासून केले जाईल काय असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला असून, त्याचे मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

( सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब वेलमध्ये येऊन मी विरोधी पक्षनेते यांचा आदर करुन पाण्याचे समन्यायी वाटप केले जाईल काय असा प्रश्न विचारित असतात. )

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब याचा अनादर करु इच्छित नाही. अंतिम सुनावणी माननीय मुंबई, उच्च न्यायालयात सुरु आहे. 16 तारखेला माननीय उच्च न्यायालय सरकारची बाजू ऐकून घेणार आहे. एप्रिल, 2016 अखेरीस माननीय उच्च न्यायालय अंतिम निर्णय देणार आहे. सदर प्रकरण माननीय उच्च न्यायालयात सुरु आहे.

( सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब वेलमध्ये येऊन माननीच विरोधी पक्षनेते मिसगाईड करीत आहे, असे बोलत असतात. )

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब यांना योग्य ते उत्तर देण्याची गरज आहे. परंतु, ही बाब न्यायप्रविष्ठ आहे.

.......4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : आता प्रस्तावासंबंधी चर्चा संपलेली आहे. सभागृहाने सदरहू प्रस्तावासंबंधी विचार केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब यांना अपेक्षित उत्तर मिळाले नाही तर त्यांनी दुसऱ्या आयुधाचा वापर करुन न्याय मागावा, अशी माझी त्यांना विनंती आहे. मंत्री महोदयांनी चुकीचे उत्तर दिलेले असेल तर सन्माननीय सदस्यांनी दुसऱ्या आयुधाचा वापर करुन न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा.

आता औचित्याचे मुद्दे चर्चेला घेण्यात येतील.

T-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

श्री. राहुल जगताप : मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबींवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात सध्या दुष्काळाचे सावट मोठ्या प्रमाणत पसरलेले आहे. अत्यंत भयानक अशी परिस्थिती असतना पशुधन, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जनावरांच्या पाण्याचा प्रश्न या सर्व विषयांबरोबरच कुकडी धरणातून 2.5 टीएमसी पाणी साडण्याचा निर्णय घेतलेला आहे. श्रीगोंदा तालुक्यात 7 ते 8 तळी असल्यामुळे केवळ 2.5 टीएमसी पाणी सोडल्यामुळे श्रीगोंदा तालुक्यातील जनतेवर अन्याय होत आहे. आज 2.5 टीएमसी पाणी सोडलेले आहे त्यामुळे श्रीगोंदा तालुक्याला न्याय मिळत नाही. म्हणून जास्तीत जास्त तलावात पाणी सोडून श्रीगोंदा तालुक्यातील लोकांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवावा, अशी मी शासनास विनंती करतो.

-------

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**अध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, काल रात्री सभागृहात जेव्हा चर्चा सुरु होती तेव्हा सभागृहात कोणी उपस्थित नव्हते. आता त्याच विषयावर बोलण्याची संधी मागत आहेत.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भरतशेठ गोगावले : अध्यक्ष महाराज, माझा औचित्याचा मुद्दा आहे. रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या दीड महिन्यापासून फार मोठ्या प्रमाणात घरफोड्या होत आहेत. माझ्या मतदारसंघात दाभोळ येथे एका महिन्यात दहा घरफोड्या झाल्या. बांदिवली माणगाव येथे आतापर्यंत 17 घरफोड्या झाल्या आहेत. श्रीवर्धन मध्ये आता पाच दिवसापूर्वी 20 घरफोड्या झाल्या. रायगड जिल्ह्यात अशा एकूण 60 ते 70 घरफोड्या झालेल्या आहेत, परंतु घरफोड्या करणारे एकही आरोपी आतापर्यंत पकडले गेले नाहीत. येथील लोक हे नोकरी निमित्ताने पुणे, मुंबई, ठाणे येथे राहतात त्यामुळे त्यांची घरे तेथे बंद राहतात. हे चोर लोक रात्रीच्या वेळेस घरफोड्या करीत असतात. रायगड जिल्ह्यातील तीन चार तालुक्यात 60 ते 70 घरफोड्या झालेल्या आहेत, परंतु त्यातील एकही आरोपी पकडला जात नाही. आपल्या माध्यमातून यावर उपाययोजना करावी आणि लवकरात लवकर आरोपिंना पकडण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती भारती लव्हेकर: अध्यक्ष महाराज, माझा औचित्याचा मुद्दा आहे. स्त्रियांसाठी स्वच्छता गृह उपलब्ध करुन देणे जितके गरजेचे आहे तितकेच महत्वाचे आरोग्याच्या दृष्टीने त्यांना सॅनेटरी नॅपकीन्स सहजगत्या सुलभ आणि किफायतशीर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सार्वजनिक ठिकाणी सॅनेटरी नॅपकीन्स वेन्डींग मशिन्स तसेच डिस्पोजेबल मशिन्स लावण्यात आले पाहिजेत. सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सर्व आश्रमशाळा, शाळा-कॉलेजेस, महिला वसतिगृहे, रेल्वे स्टेशन्स, बसस्टँड, एअरपोर्टस्, रेस्टॉरन्टस, हायवे, सार्वजनिक स्वच्छतागृहे, पोलीस स्टेशन्स, महिला कारागृह, महिला सुधारगृह अशा सर्व ठिकाणी वेन्डींग मशिन्स आणि डिस्पोजेबल मशिन्स बसविण्यात यावेत, आणि लोकप्रतिनिधींच्या निधीचा विनियोग यासाठी करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

---------

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अजय चौधरी : अध्यक्ष महाराज, माझा औचित्याचा मुद्दा आहे. एलिफिस्टन (मुंबई) येथिल फितवाला रोडवरील इंडिया बुल्स या कंपनीने मनमानी कारभार करत परिसरातील संपूर्ण फुटपाथ गिळून टाकून पावसाळी पाणी तसेच शहरातील सांडपाणी वाहून नेणारी गटार व्यवस्था पूर्णपणे बंद करुन टाकली आहे. फुटपाथवर कुठल्याही प्रकारचे बांधकाम न करण्याचे माननीय मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशही कंपनीने डावलले आहेत. महापालिकेच्या नियमातही इंडिया बुल्स कंपनीने केलेली बांधकामे बसत नसतांनाही ती निष्कासित करुन टाकण्याबाबत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून सातत्याने अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. या विभागाचा लोकप्रतिनिधी म्हणून मी स्वतः आयुक्त, महानगरपालिका व विभागीय महानगरपालिका अधिकारी यांच्याकडे वारंवार तक्रारी करुनही कंपनीवर कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नसून साधी नोटीसही बजाविण्यात आलेली नाही. इंडिया बुल्स सारख्या धनदांडग्यांवर कारवाई करण्यात येवू नये यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांमध्ये सातत्याने कैरव्यवहार होत असतात. बेकायदा व नियमबाह्य कंपनीने पदपथावर बांधलेला रॅक याबाबतची महानगरपालिकेला सादर केलेली कागदपत्रे व महानगरपालिकेने मंजूर केलेला आराखडा पालिका अधिकाऱ्यांनी विभागीय आमदार म्हणून मला उपलब्ध करुन द्यावा, अशी मागणी करुनही त्याकडे महानगरपालिका अधिकाऱ्यांनी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. या प्रकरणी मी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांकडे दिनांक 3/3/2016 रोजी निवेदनाद्वारे तक्रार करुनही त्याची साधी दखल शासनाने घेतलेली नाही. परिणामी इंडिया बुल्स कंपनीच्या मनमानी आणि दादागिरी व त्याला महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची साथ यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे. ही परिस्थिती उद्रेगजन्य होऊ नये, यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी तत्काळ विनाविलंब कंपनीचे अनधिकृत व बेकायदेशीर बांधकाम निष्कासित करण्याबाबत व अशा बांधकामांना संरक्षण देणाऱ्या महानगरपलिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर निर्णयात्मक कारवाई करावी, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधून मागणी करीत आहे.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, औचित्याचे मुद्दे मांडतांना थोडक्यात मथितार्थ मांडावा आपण तो पूर्ण वाचून दाखविण्याची गरज नाही. आज सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवर जवळपास आठ लक्षवेधी सूचना आहेत. लक्षवेधी सूचनेवर ज्यांची नावे असतील त्यांनाच प्रश्न विचारण्याची संधी देण्यात येईल. सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया सहकार्य करावे, अशी मी विनंती करतो.

श्रीमती मनिषा चौधरी. मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबींवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महाराज, मुंबईतील बोरिवली पश्चिम येथील मोडकळीस आलेल्या पालिकेच्या भगवती रुग्णालयाची पुनर्बांधणी सात वर्षानंतरही अपूर्ण आहे. सदरहू एक हजार खाटांचे सुपर स्पेशॉलिटी रुग्णालय सन 2014 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते, परंतु 110 खाटांचे बांधकाम असलेले शस्त्रक्रिया विभागाशिवाय इतर परवानग्याशिवाय अर्धवट स्थितीत असलेल्या इमारतींची उद्‌घाटनाची घोषणा केलेली आहे. त्या भागातील गोरगरीब जनतेला लहान मोठ्या शस्त्रक्रिया करण्यासाठी आजुबाजूच्या महागड्या खाजगी रुग्णालयाचा आधार घ्यावा लागत आहे. परिणामी तेथील जनतेची गैरसोय होत आहे. त्याचबरोबर सफाळा, पालघर, गोरेगाव परिसरात भगवती रुग्णालय अतिशय सोईस्कर आहे, परंतु कोट्यवधीचा निधी खर्च करुनही अद्यापही सदरहू रुग्णालय सुरु न झाल्यामुळे गोरगरिबांमध्ये तिव्र असंतोष निर्माण झालेला आहे. गोरगरिबांची होणारी गैरसोय पाहता लवकरात लवकर रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरु करण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजनाची करावयाची आहे. सदरचा मुद्दा मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे.

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष डॉ.सतीश पाटील)**

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अब्दूल सत्तार खानः अध्यक्ष महाराज, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपल्या राज्यात जी भयनाक परिस्थिती घडलेली आहे याला मूळ कारण म्हणजे दारु आहे. या दारुमुळे अनेक शेतकरी आत्महत्या करु लागले आहेत. मी एक छोटसे उदाहरण सांगतो. बिहार सारखे हे गरीब राज्य आहे, परंतु त्यांनी संपूर्ण दारुबंदी केली. त्यांनी देशी, विदेशी, हातभट्टी दारु बंद केली. आपल्या राज्यामध्ये हजारो शेतकरी आत्महत्या करु लागले. या परिस्थितीमध्ये हे लोक दोन तीन पेग मारतात आणि चौथा पेग पिल्यानंतर ते आत्महत्या करतात. या दारुमुळे दरोडेखोर, गुन्हेगार, अनेक गुंडगिरी ही दारुमुळे निर्माण होते. माननीय वित्त मंत्र्यांनी चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी केली त्यामुळे त्या जिल्ह्यात एकही आत्महत्या होत नाही. अशाच पध्दतीने महाराष्ट्रभर या निर्णयाची अंमलबजावणी केली तर निश्चित आत्महत्या व गुन्ह्यांचे प्रमाण कमी होईल. सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांना माझी विनंती आहे की, आपण संपूर्ण राज्यामध्ये दारुबंदी करण्याचा निर्णय घेतला तर कोट्यवधी लोक, महिला भगिनी, लहान मुले आपल्याला आशीर्वाद देतील. संपूर्ण महाराष्ट्रभर दारुबंदी करण्याचा निर्णय शासनाने घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** मंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी.

----------

यानंतर U-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहूल कूल : अध्यक्ष महोदय माझा पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, पाण्याची बचत व्हावी व कमीत कमी पाण्यात शेती व्हावी, या उद्देशाने शेतीमालाचे उत्पन्न घेण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनाने संयुक्तपणे ठिंबक सिंचन योजना राबविली. ठिंबक सिंचनासाठी आवश्यक ठिंबक साहित्य शेतकऱ्यांनी आधी खरेदी करावे व नंतर त्यासाठी अनुदानाची मागणी करावी, अशाप्रकारची ही योजना होती. सन 2011-2012 पर्यंत शेतकऱ्यांना नियमितपणे अनुदान मिळाले. परंतु, सन 2012-2013 पासून ते आजतागायत अनुदान देण्यात आलेले नाही. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील सुमारे 15 हजार शेतकरी त्याच बरोबर राज्यातील लाखो शेतकरी या अनुदानापासून वंचित राहिलेले आहेत. तरी शासनाने याचा विचार करुन शेतकऱ्यांना त्वरित दिलासा देण्याच्या दृष्टीने हे अनुदान वितरित करावे, अशाप्रकारची मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे आपणामार्फत शासनाकडे करीत आहे.

......

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रशांत ठाकूर : अध्यक्ष महोदय, माझा पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद. माझ्या पनवेल विधानसभा मतदारसंघामध्ये मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनीच्या माध्यमातून रामकी औद्योगिक, घातक व जैविक कचरा प्रक्रिया केंद्र ऑक्टोबर, 2002 पासून सुरु आहे. संपूर्ण तळोजा औद्योगिक वसाहतीतील रासायनिक व औद्योगिक कचऱ्यावर त्या ठिकाणी प्रक्रिया केली जाते. संकल्पना अशी होती की, कोणत्याही पध्दतीचे प्रदूषण होऊ नये परंतु, दुर्दैवाने त्या ठिकाणी प्रचंड प्रमाणावर प्रदूषण या कंपनीच्या प्रक्रिया प्रोसेसमुळे होत आहे. त्यामुळे या सर्व परिसरातील नदीचे पाणी प्रदूषित झालेले आहे. परिसरातील शेती करपून गेलेली आहे. झाडांना कुठल्याही प्रकारची फळे लागत नाहीत. अशावेळेस या शेतकऱ्यांनी वारंवार अशा पध्दतीच्या तक्रारी प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे करुनही याबाबतीत कोणत्याही पध्दतीने शासनाने दखल घेतलेली नाही. आज या सर्व परिसरात हवेचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात आहे. हवेच्या प्रदूषणामुळे मुलांना श्वसनाचे आजार झालेले आहेत. अशातच या कंपनीच्या माध्यमातून या प्रकल्पाचा दुसरा टप्पा सुरु करण्याचे त्यांनी सुतोवाच केलेले आहे. त्याला त्या परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी प्रचंड प्रमाणात विरोध केला आहे. येणाऱ्या 3 मे रोजी या प्रकल्पाविरोधात मोठे आंदोलन सुरु होणार आहे. माननीय पर्यावरण मंत्र्यांनी या संदर्भात वेळीच दखल घ्यावी आणि या कंपनीच्या माध्यमातून सुरु होणारा दुसरा टप्पा रोखावा व योग्य त्या उपाययोजना केल्याशिवाय या प्रकल्पाला मंजुरी देऊ नये, अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो. धन्यवाद.

............

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, माझा पुढील औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, नगर जिल्ह्यातील शनी शिंगणापूर येथील शनीच्या चौथऱ्यावरील स्त्रियांच्या प्रवेशाचा प्रश्न गेल्या काही दिवसांपासून ऐरणीवर आलेला आहे. या संदर्भात विविध आंदोलनेही करण्यात आली तसेच माननीय उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता, माननीय उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने शनी शिंगणापूरच्या चौथऱ्यावर जाण्यापासून महिलांना रोखता येणार नाही, अशाप्रकारचा निर्णय दिला आहे. कायद्याने महिलांना सर्वत्र प्रवेशाची मुभा असणारा हा निर्णय खरे तर ऐतिहासिक आहे. समतेच्या तत्त्वाचा पुरस्कार करणारा आहे. अलीकडेच महिलांमध्ये आपल्या हक्क, अधिकारांविषयी जाणीव, जागृती वाढीस लागलेली आहे. त्याच बरोबर जुन्या रुढी व परंपरा झुगारुन देण्याकडे त्यांचा ओढा दिसून येत आहे. त्यामुळे काही रुढी, परंपरांमध्ये बदलत्या काळानुरुप बदल करणे गरजेचे आहे.

माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर शनी शिंगणापूर देवस्थान ट्रस्टकडून महिलांना प्रवेश देण्याबाबतचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. परंतु, राज्यातील काही देवस्थानांमध्ये उदाहरणार्थ नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तसेच, कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिरातही अशाप्रकारचा निर्णय होणे गरजेचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष (डॉ. सतीश पाटील):** सन्माननीय सदस्य आपण माझ्याकडे वेगळ्या विषयावरील औचित्याचा मुद्दा दिलेला आहे.

श्री. प्रताप सरनाईक : होय अध्यक्ष महोदय. परंतु, हा महत्त्वाचा ऐतिहासिक निर्णय असल्याने आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, शासनाने या विषयामध्ये गांभीर्याने लक्ष द्यावे. त्र्यंबकेश्वर व कोल्हापूरच्या महालक्ष्मी देवीच्या दर्शनास महिलांना प्रवेश देता येत नसेल, तेथील ट्रस्टींचा तसा निर्णय असेल तर ट्रस्टींना राज्य शासनाने जाणीव करुन दिली पाहिजे की, असा कायदा आहे. या कायद्याचा भंग करुन ते ट्रस्टी महिलांना मंदिरात प्रवेश देत नसतील तर त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे, अशाप्रकारचे निर्देश आपण राज्य सरकारला द्यावेत, अशी मी विनंती करतो.

..........



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी : अध्यक्ष महोदय, मुंबई-आगरा राष्ट्रीय महामार्ग पर अर्जुली टोलनाका है. एग्रीमेंट के हिसाब से उसका काम अधुरा है. पांच सालों से वहां टोल वसूल किया जा रहा है. वहां पर बेसिक सुविधाएं उपलब्ध नहीं है. इसके कारण आसपास के लोगों को और मुसाफिरों को परेशानी हो रही है. पडघा, अर्जुली, खरवली, तलवली और वहां के लोगों को जान का खतरा है. वहां पर एक्सीडेंट की संख्या बढ़ गई है. सर्विस रोड अभी तक नहीं बनाया गया. फ्लाईओव्हर का काम अधुरा है. आने जाने वालों के लिए भुयारी मार्ग नहीं बनाया गया है. अर्जुली टोल प्लाझा पर इलेक्ट्रॉनिक बोर्ड जो टोल की वसूली की जानकारी देता है वह बोर्ड अब तक नहीं लगाया गया है. वहां बिजली नहीं है. आधी लेन चलती है और आधी लेन बंद रहती है. इससे ट्राफिक बहुत बढ़ रहा है. लोगों को बहुत देर तक लाइन में खड़ा रहना पड़ता है. वहां पर वॉटर पार्क और वेअरहाऊसेस के लिए इल्लीगल क्रॉसिंग दे दी गई है जिससे एक्सीडेंट की संख्या बढ़ गई है. मेरा निवेदन है कि उस टोल नाके को बंद किया जाए और जब तक एग्रीमेंट के मुताबिक शर्ते पूरी नहीं हो...वहां पर टोल वसूली नहीं होनी चाहिए, धन्यवाद.

------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. वैभव नाईक : अध्यक्ष महोदय, माझा खालील सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये आता पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत आहे. माझ्या मतदारसंघातील मालवण तालुक्यामध्येसुध्दा पिण्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणावर टंचाई आहे. त्याच बरोबर मालवणच्या समुद्र किनारी असलेल्या तोंडोली, तळाशी, देवबाग या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर क्षारयुक्त पाणी येत आहे. त्यामुळे लोकांच्या जीवितास मोठी हानी पोहोचत आहे. यामुळे शासनाने या गावासाठी पिण्याच्या पाण्याची वेगळी व्यवस्था करावी. त्यांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

...........

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हरिभाऊ जावळे : अध्यक्ष महोदय, माझा खालील औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, जल आहे तर जीवन आहे. पाण्याचे महत्त्व आता आपल्या लक्षात येऊ लागले आहे. आजच्या औचित्याच्या मुद्याद्वारे माझी आपणामार्फत शासनाला सांगायचे आहे की, तापी नदीवर शेळगाव बॅरेज हा खूप मोठा प्रकल्प आहे. सन 1999 पासून हा प्रकल्प रखडलेला आहे. आज या प्रकल्पाचे 72 टक्के एवढे काम झालेले आहे. सन 2010 मध्ये केंद्र सरकारच्या जल आयोग पर्यावरण व वन विभागाने त्याला मान्यता दिलेली आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेतून या प्रकल्पासाठी 25 टक्के निधी उपलब्ध होणार असून उर्वरित निधी राज्य शासनाने द्यावयाचा आहे. सदर प्रकल्प पूर्ण झाल्यास डार्क झोनमधील 9128 हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. बुडित क्षेत्रात पुर्नभरण होऊन विहिरीतील पाण्याची पातळी वाढणार आहे. सदर प्रकल्पावर 1999 पासून 305 कोटी रुपये होऊन 72 टक्के काम पूर्ण झालेले आहे. अजून त्याची 699.70 कोटी रुपयांची सुप्रमा मान्य व्हायची राहिलेली आहे. सुप्रमा तत्काळ मान्य झाल्यास, या प्रकल्पात जवळजवळ साडेचार टीएमसी पाणी अडविता येईल. आज आमच्या भागात भीषण परिस्थिती निर्माण झालेली आहे. हतनुर धरणात आज जवळपास 55 टक्के गाळ तर फक्त 20 टक्के पाणी आहे. तापी नदीने आतापर्यंत आम्हाला सुजलाम, सुफलाम ठेवले व आतापर्यंत पाणी पुरवठा करण्याचे काम केलेले आहे. हतनूर धरणामध्ये गाळ वाढल्याने आम्हाला पाणी कमी मिळत आहे. या प्रकल्पावर रेल्वे, थर्मल पॉवर स्टेशन अवलंबून आहे, 2 फॅक्टऱ्या अवलंबून आहेत, 8 नगरपालिका, जळगाव एमआयडीसीचे पाणी अवंलबून आहे. तसेच 188 कि.मी. चा कालवा शेतीसाठी अवलंबून आहे. आज शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी न मिळाल्याने शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे के.टी.चे नुकसान होत आहे. याकरिता आपल्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, आपण माननीय पाटबंधारे मंत्र्यांना आदेश द्यावेत की, या शेळगाव बॅरेजची सुप्रमा तत्काळ मंजूर करावी. जेणेकरुन हा प्रकल्प लवकर उभा राहील. हा प्रकल्प डीपीएपी मध्ये येत आहे. माननीय श्री. एकनाथराव खडसे यांनी आम्हाला सांगितलेले आहे की, या प्रकल्पाला सुप्रमा मिळाली तर आम्ही रोखे उभे करु व त्या मधून हा वेगळा प्रकल्प उभा करु. त्यांची मदत आम्हाला नेहमीच मिळते. या संदर्भात आपण सुप्रमा तत्काळ मंजूर करण्याबाबत शासनाला आदेश द्यावेत.

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने नोंद घ्यावी.

.........



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश धानोरकर : अध्यक्ष महोदय, माझा पुढील औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, औचित्याच्या मुद्याद्वारे महत्त्वाच्या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी उभा आहे. सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती प्रकरणांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी राज्यभर संपूर्ण जिल्ह्यात करण्याकरिता नेमण्यात आलेल्या विशेष चौकशी पथकाने केंद्र शासनाच्या मेट्रिकोत्तर शिष्यवृत्ती वाटपात राज्यात गैरव्यवहार झाले किंवा कसे याबाबत चौकशी करताना आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक व त्यांचे कर्मचारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक/पोलीस उप निरीक्षक दर्जाचे अधिकारी व लेखा व वित्त विभागातील अधिकारी, कर्मचारी यांची नव्याने चौकशी पथके नेमून फक्त विदर्भातील आठ जिल्ह्यामध्येच चौकशी करणे, यात जाणूनबुजून संस्थाचालक, प्राचार्य, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांवर दडपण आणण्यासाठी पोलिसांचा मोठ्या प्रमाणावर भरणा करण्यात येणे,

V-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश धानोरकर.....

तसेच शिष्यवृत्ती विषयासंदर्भात कवडीचेही ज्ञान नसतांना पथकात कर्मचारी व अधिकारी यांचा भरणा करण्यात येणे, सदर पथक ज्ञान नसताना कशी चौकशी करु शकते, याबाबत संशयाचे वातावरण असणे, सदर पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी हे गुन्हा दाखल नसताना विद्यार्थी, कर्मचारी व संस्थाचालक यांच्या घरी चौकशीस वारंवार जात असल्याने त्यांच्या प्रतिष्ठेला धोका निर्माण होऊन मनःस्थितीवर विपरित परिणाम होणे, यातून आत्महत्त्यासारखी अनुचित घटना घडण्याचा संभव, तसेच पोलिसांकडून चौकशी करतेवेळी अधिकाराचा गैरवापर करुन पैसे उकळण्यासाठी विद्यार्थी, कर्मचारी व संस्थाचालक यांचा मानसिक व शरिरीक त्रास करण्यात येत असल्याने आदिवासी व सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या आश्रम शाळेचे संस्थाचालक, कर्मचारी व विद्यार्थी यांच्यात निर्माण झालेले असुरक्षिततेचे व असंतोषाचे वातावरण, माननीय सामाजिक न्याय मंत्री यांनी या प्रकरणी तातडीने लक्ष घालून सुरक्षात्मक कार्यवाही करावी, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांची औचित्याचे मुद्दे मांडलेले आहेत. ते सर्व वाचायलाच पाहीजे असे नाही. औचित्याचा मुद्दा थोडक्यात मांडावा.

श्रीमती स्नेहलता कोल्हे : अध्यक्ष महोदय, कोळगाव थडी, जि.अमदनगर येथे अवैध वाळू साठ्याचा पंचनामा करण्यासाठी गेलेल्या महसूल विभागाच्या पथकावर वाळू चोरांनी केलेला हल्ला याकडे मी सरकरचे औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधू इच्छिते.

अध्यक्ष महोदय, आमच्या कोपरगाव तालुक्यात कोळगाव थडी येथे अवैध वाळू साठ्याचा पंचनामा करण्यासाठी गेलेल्या महसूल विभागाच्या पथकावर वाळू चोरांनी काठ्यांनी हल्ला केल्यामुळे त्यात सुरेगावचे तलाठी श्री. ढोरमारे व अन्य काही जणांना गंभीर दुखापत झाली असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे. धाड घालण्यासाठी गेलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना तेथेच मारुन टाका म्हणजे नंतर कोणताही कर्मचारी पुन्हा येथे येणार नाही, अशी चेतावनी संबंधित वाळू चोरांनी जमलेल्या लोकांसमोर केल्यामुळे तेथील वातावरण अधिकच चिघळले. तेथील हल्ल्यात तलाठी श्री. ढोरमारे यांचा उजचा हात मोडला असून त्यांना वैद्यकीय उपचाराकरिता आर्थिक सहाय्य देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, तालुक्यातील 29 गावे गोदावरी नदीच्या काठावर असून केवळ 10 तलाठ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीत काम करताना तलाठी आणि मंडळ अधिकारी त्रस्त झालेले आहेत. या प्रकारामुळे तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी यांनी कामबंद आंदोलन केले असून जनहिताची अनेक कामे खोळंबली आहेत. सराईत वाळू चोरांना रोखण्याच्या दृष्टीने तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याबरोबर शासनाने पोलीस यंत्रणेच्या सहाय्याने स्वतंत्रपणे काम करण्याची गरज आहे. कारण तलाठी व मंडळ अधिकारी यांचा या कामामध्ये खूप वेळ जात असल्यामुळे जनतेला विविध शासकीय योजनेचा लाभ वेळेत देणे शक्य होत नाही. त्यामुळे लोकांचा त्यांच्यावर रोष येतो. ते दिवसरात्र वाळू चोरी रोखण्याचे एकमेव काम करीत असल्यामुळे सदरची परिस्थिती तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या हाताबाहेर गेलेली आहे. त्यामुळे मी सरकारचे लक्ष वेधू इच्छिते की, या कामात स्वतंत्र व्यवस्थेद्वारे लक्ष घालण्यात यावे. धन्यवाद.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी माझ्या नावाचा उल्लेख करुन देशाचा तिरंगा ध्वज चुकीच्या पद्धतीने हाताळल्या प्रकरणी सभागृहामध्ये चुकीची माहिती देणे

**मु.शी. :** सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी माझ्या नावाचा उल्लेख करुन देशाचा तिरंगा ध्वज चुकीच्या पद्धतीने हाताळल्या प्रकरणी सभागृहामध्ये चुकीची माहिती देणे या संबंधी सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांचे निवेदन

श्री.जितेंद्र आव्हाड ( मुंब्रा-कळवा ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

अध्यक्ष महोदय, दिनांक 5 एप्रिल 2016 रोजी विधानसभा सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी माझ्या नावाचा उल्लेख करुन देशाचा तिरंगा ध्वज चुकीच्या पद्धतीने हाताळल्या प्रकरणी सभागृहामध्ये चुकीची माहिती दिली. वास्तविक पहाता सदर प्रकरणी आपण स्वत: तातडीने हस्तक्षेप करुन निर्णय घ्याल, अशी अपेक्षा होती. परंतु पाच दिवस होऊन गेले. त्यांनी या ठिकाणी क्लिपचा उल्लेख केला होता. सदरची क्लिप मी देखील बघितली. परंतु त्या क्लिपमध्ये काहीही, कुठेही दिसतच नाही. सदर क्लिपची शहानिशा करुन आपण योग्य तो निर्णय घ्यावा व जोपर्यंत आपला निर्णय होत नाही, तोपर्यंत सभागृहाच्या कामकाजातून माझ्या नावाचा उल्लेख व माझ्या नावाने केलेली टिपणी काढून टाकावी, अशी मी या स्पष्टीकरणाद्वारे आपल्याला विनंती करतो.

**तालिका अध्यक्ष :** यासंदर्भातील निर्णय माननीय अध्यक्ष घेणार आहेत. यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. सुधाकर कोहळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडावा.

---*---



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

...(पुढे सुरु).......

डॉ. सुधाकर कोहळे : अध्यक्ष महोदय, मी औचित्याच्या मुद्याद्वारे महत्वाच्या मुद्याकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, शासकीय तंत्रनिकेतन व महाविद्यालय यातील तांत्रिक कर्मचारी जे देशात अभियंता निर्माण करण्याचे त्यांना उद्योगधंदे समुहात प्रत्यक्ष तांत्रिक कामाचे धडे देणे, त्यांना उत्कृष्ट अभियंता म्हणून विकास करणे, अशा प्रकारचे ज्ञान प्रसाराचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रगतीशील देशात व राज्यात आजही जातीवाचे पदनामाने संबोधणे, माननीय मंत्री, सचिव, संचालक व लोकप्रतिनिधी यांच्या समवेत दिनांक 15.12.2009 रोजी बैठक होऊन निर्णय होणे, त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक 31 डिसेंबर 2009 पूर्वी निर्गमित करण्याचे आदेश पारीत असतानाही शासन निर्णय सहा वर्षे लोटूनही निर्गमित न होणे, याबाबत माननीय मंत्री यांनी 9 डिसेंबर 2014 रोजी पासून बैठक घेण्याबाबत 9 स्मरणपत्र देवूनही बैठक न होणे, यामुळे कर्मचाऱ्यामध्ये विभागासोबतच शासनाबाबतही असंतोष निर्माण होणे, लालफीत शाहीत शासन निर्णय सहा वर्षे प्रलंबित होवून कर्मचाऱ्यात असंतोष निर्माण झाल्याने त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणे, याकडे शासनाचे दुर्लक्ष असल्याने यावर शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधतो.

---*---

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित झनक : अध्यक्ष महोदय, मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यामधील शेलु खडसे येथील सुमारे 500 शेतकऱ्यांनी सन 2013-2014 या खरीप व रब्बी पिकांचा पीक विमा अलाहाबाद बँकेच्या रिसोड शाखेत (जि.वाशिम) काढलेला असून वाशिम जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या अहवालानूसार जिल्ह्यात खरीप व रब्बीचा पीक विमा मंजूर झालेला आहे. अलाहाबाद बँकेची रिसोडी येथील शाखा वगळता जिल्ह्यातील इतर बँकांनी शेतकऱ्यांना मंजूर झालेली पीक विमा योजनेची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली आहे. परंतु या 500 शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये रिसोडच्या अलाहाबाद बँकेच्या शाखेने पीक विमा योजनेची रक्कम जमा केलेली नाही. शेतकऱ्यांनी प्रिमियम भरुनही रक्कम जमा झालेली नाही. या 500 शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा, अशी मी औचित्याच्या माध्यमातून विनंती करतो.

---*---

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. मेधा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधू इच्छिते.

अध्यक्ष महोदय, पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील कोथरुड भागात कमिन्स इंडिया लि. या कंपनीतून आलेल्या नाल्यामुळे डहाणुकर कॉलनी अ आणि ब नाल्यालगत असलेल्या सोसायट्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ऑईल मिश्रीत पाणी येत असल्यामुळे अथर्ववेद सोसायटीतील विहिरीचे पाणी दुषित झाले आहे तसेच ते नागरिकांना वापरण्यास योग्य नाही. तसेच कंपनीचे ड्रेनेज लाईन फुटल्यामुळे घाण पाणी नाल्यात मिसळल्याने त्या संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरत आहे. कमिन्स कपंनीचे अधिकारी नागरिकांना सहकार्य करीत नसून दुर्लक्ष करीत आहे. तसेच महानगरपालिकेचे अधिकारी देखील उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. तसेच दोन, तीन वर्षापूर्वी अचानक झालेल्या अतिवृष्टीमुळे पाण्याच्या लोंढ्यांने कंपनीची भिंत पडून सोसायटीमध्ये पाणी शिरल्यामुळे नागरिकांच्या वाहनाचे आणि इतर मालमत्तेचे नुकसान झाले आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळानेही याकडे दुर्लक्ष केल्याचे आढळून आले. म्हातोबा मंदीर सोसायटीच्या पाठीमागील नाल्यामध्ये तत्कालीन राजकीय दबावामुळे महानगरपालिकेचे अधिकारी आणि बांधकाम व्यावसायिक यांच्या चुकीमुळे नाला वळविण्यात आला आहे, तसेच बुजविण्यातही आला आहे. या सर्व चुकीच्या पद्धतीमुळे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. मंत्री पार्क आणि परिसरातील अनेक सोसायट्यांच्या नाल्यालगतच्या भिंती बुजविलेल्या नाल्यामुळे तुटल्या आहे, त्याच बरोबर या संपूर्ण परिस्थितीची जबाबदारी पुणे महानगरपालिका आणि नाला बुजविण्यासाठी कारणीभूत असलेल्या बांधकाम व्यावसायिकांवर, त्याचबरोबर त्यांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आहे. तरी मी शासनाला विनंती करते की, या सर्व बाबीकडे लक्ष देऊन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व संबंधितांना न्याय द्यावा.

---*---



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रमेश बुंदिले : अध्यक्ष महोदय, मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, माझ्या दर्यापूर मतदार संघातील अंजनगाव हे तालुक्याचे ठिकाण असून आजुबाजूच्या परिसराचा विचार केला असता रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. परंतु तेथे केवळ 30 बेडचे रुग्णालय आहे. रुग्णालयात दररोज 35 ते 40 रुग्ण येतात. बेड कमी असल्यामुळे त्यांना खाली झोपावे लागते. त्यामुळे तेथे 50 बेडचे रुग्णालय करण्यात यावे, याकरिता तीन अधिवेशनामध्ये प्रश्न मांडला होता. परंतु अजूनपर्यंत कार्यवाही झालेली नाही. तसेच अंजनगाव शहराचा विकास झपाट्याने होत असताना आजुबाजूच्या शहरामध्ये दोन, तीन वर्षापासून पिण्याच्या पाण्याची अडचण आहे. तेथे पाईप लाईन बसविण्यात यावी, अशी विनंती करण्यात आलेली आहे. अंदाजपत्रक तयार केलेले आहे. परंतु त्याकडे नगरपालिका लक्ष देत नाही. तातडीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी, अशी माझी विनंती आहे.

---*---

...8/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. संजय गोटे : अध्यक्ष महोदय, मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, अनुसूचित जाती जमातीच्या जात प्रमाणपत्राकरिता 1950 मधील रहिवाशी असल्याची मानीव अट शिथिल करण्याबाबत मी शासनाचे लक्ष वेधाणार आहे. राजूरा उप विभाग दिनांक 17 सप्टेंबर 1948 पर्यंत निजाम शाहीच्या राजवटीमध्ये होता. त्यानंतर मध्य प्रदेशमध्ये होता. त्यानंतर 1960 साली महाराष्ट्रात सामील झाला. निजाम राजवटीत तालुक्याचे मुख्यालय आदिलाबाद व त्यानंतर आसिफाबाद होते. त्यानंतर 1960 मध्ये हा तालुका महाराष्ट्रामध्ये समाविष्ट झाल्यावर तालुक्याचे रेकॉर्ड नांदेड जिल्ह्यामध्ये आले. या परिस्थितीत 1950 पर्यंतचा रेकॉर्ड सरकारकडे देखील उपलब्ध नाही. इकडे तिकडे जाण्यामध्ये या भागातील लोकांकडे 1950 पूर्वीचा रेकॉर्ड उपलब्ध नाही. सदरचा तालुक्यात नांदेड, उस्मानाबाद, लातूर जिल्ह्यातून आलेले बरेच नागरिक स्थलांतरीत आहेत. हा आदिवासी कोलाम समाज असून तो अशिक्षित आणि भटकणार समाज असल्यामुळे एका ठिकाणी वास्तव्य नसल्याने त्यांच्याकडे 1950 चे जातीचे रेकॉर्ड उपलब्ध नाही. जुने रेकॉर्ड उर्दु लिपीतील, तसेच 1950 व नोंदवह्या कोतवाल रजिस्टर आज उपलब्ध नसल्यामुळे जाती जमाती दाखला 1950 ची मानीव अट राजूरा उप विभागाकरिता शिथील करावी, याबाबत मी या औचित्याच्या मुद्याद्वारे सरकारचे लक्ष वेधतो. धन्यवाद.

...W/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धैर्यशील पाटील : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असून मी तो मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, सुमारे 65 वर्षापूर्वी कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांनी खालापूर, पनवेल, पेण, रोहा या तालुक्यामध्ये व ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यामध्ये एकूण 126 वसाहतीत स्वत:च्या पैशांनी स्वत:चे पुनर्वसन करुन घेतले आहे.

अध्यक्ष महोदय, सदरहू प्रकल्पग्रस्तांना सन 2013 मध्ये 18 नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शब्द देण्यात आला होता. तसेच, ज्या प्रकल्पग्रस्तांना जमिनींचे खाते वाटप झाले नाही त्यांना जमिनींचे वाटप करण्याचे आश्वासन दिले होते.

अध्यक्ष महोदय, कोयना धरणातून 2 हजार मे.वॅट वीज उत्पादन करण्यात येते. सन 1960 ते 1970 या काळामध्ये कोयना धरण तयार झाले असून त्यास महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी म्हटले जाते. परंतु या भाग्यलक्ष्मीच्या पायाशी ज्यांचे संसार गाडले गेले त्यांचे आजही पुनर्वसन झाले नाही. उक्त प्रकल्पामुळे सुमारे 65 वर्षापूर्वी अनेक विस्थापित असून त्यांच्या वसाहतीस अद्याप 18 नागरी सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. तसेच, आजपर्यंत सदरहू प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनींच्या मालकांना व खातेदारांना जमिनी देण्यात आल्या नाहीत, ही अत्यंत दुर्भाग्यपूर्ण गोष्ट आहे. याप्रकरणी सरकारने तातडीने दखल घ्यावी, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

-------------

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असून मी तो मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, अमरावती जिल्हयातील जिल्हा वार्षिक योजना सन 2015-16 च्या आराखड्यानुसार सर्वसाधारण योजना, विशेष घटक योजना, आदिवासी योजना व बाह्य क्षेत्रांतर्गत योजनेकरिता जवळपास 300 कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अंतिम अधिकार जिल्हा नियोजन समितीला आहेत. परंतु जिल्हा नियोजन समितीची मान्यता न घेता नियोजन विभागाच्या दिनांक 17 डिसेंबर, 2014 रोजीच्या शासन आदेशाचे उल्लंघन करुन व अधिकार क्षेत्राबाहेर जाऊन जिल्हाधिकारी, अमरावती यांनी कामांना मान्यता दिली व निधीचे वितरण केले आहे. सदरहू बाब अत्यंत गंभीर असून या अन्याय्य बाबी संदर्भात बहूमताने समिती सदस्यांनी लेखी कळवूनही त्याची दखल घेण्यात आली नाही. अमरावती जिल्हा नियोजन समितीच्या सन 2015-16 च्या आराखड्यातील कामांना जिल्हाधिकारी यांनी परस्पर मान्यता दिली आहे. उक्त प्रकरणी शासन निर्णयानुसार जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने नियोजन समितीच्या आराखड्यातील कामांना प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, अमरावती यांना शासनाने विशेष समज देऊन कायदेशीर काम करण्याची सूचना करावी, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

-------------

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिपीका चव्हाण : अध्यक्ष महोदय, माझा सार्वजनिक बाबीवर औचित्याचा मुद्दा असून मी तो मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, महात्मा ज्योतिबा फुले व त्यांच्या पत्नी सावित्रिबाई फुले हे देशातील सामाजिक व शैक्षणिक इतिहासातील एक आगळे वेगळे दांम्पत्य होते. सुमारे 150 वर्षापूर्वी स्त्री-पुरुष समता व सामाजिक न्यायाची चळवळ उभारण्यासाठी त्यांनी कडवी झुंज दिली. ज्ञान ही फार मोठी सत्ता असून स्त्री व दलीत वर्गाची उन्नती त्याशिवाय होऊ शकणार नाही, हे ओळखून त्यांनी शिक्षण प्रसाराच्या कार्यात स्वतःला आयुष्यभर वाहून घेतले होते. पुणे येथे मुलींची पहिली शाळा व संपूर्ण देशात अस्पृश्य समाजातील मुलींची शाळा आणि नेटीव्ह लायब्ररी सुरु करण्याचे श्रेय या दांम्पत्यास जाते. देशातील साक्षरता अभियानाची सुरुवात या दांम्पत्याने सन 1854-55 मध्ये केली होती.

अध्यक्ष महोदय, या दांम्पत्याने फसविल्या गेलेल्या ब्राम्हण विधवांच्या बाळंतपणासाठी व त्यांच्या मुलांच्या संगोपनासाठी सन 1863 साली त्यांनी स्वतःच्या घरामध्ये बालहत्या प्रतिबंधगृह काढले होते. या दांम्पत्याने स्वतःच्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करुन जाती निर्मूलनाच्या कार्यक्रमाला थेट हात घातला होता. तसेच, ते बाल विवाहाला विरोध करुन थांबले नाही तर विधवांचे पुनर्विवाह त्यांनी घडवून आणले. स्वतःला मुलबाळ झाले नाही म्हणून या दांम्पत्याने एका ब्राम्हण मुलाला दत्तक घेऊन त्यास वैद्यकीय शिक्षण दिले व त्याचा आंतरजातीय विवाह करुन दिला.

अध्यक्ष महोदय, फुले दांम्पत्याने देशातील सर्व शुद्रातिशुद्र वर्गासाठी सामाजिक आणि शैक्षणिक चळवळ उभा करण्याचे क्रांतीकारी व ऐतिहासिक काम केले आहे. शैक्षणिक कार्य करीत असताना समाजाकडून होणारा कडवा विरोध सहन करीत व शिव्या शाप शांतपणे ऐकत सावित्रीबाई आपले कार्य करीत होत्या. त्या शाळेत जात असताना व तेथून परत येत असताना काही समाजकंटक त्यांच्यावर मुद्दामहून शेण टाकीत असत. तरीही सावित्रीबाई आपल्या समाज कार्यात खंड पडू देत नसत.

अध्यक्ष महोदय, अशा या थोर विभूतींना त्यांच्या जयंती निमत्त "भारतरत्न" देण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे शिफारस करावी, अशी माझी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

-------------

....4



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष (डॉ.सतीश पाटील)** : सन्माननीय सदस्यांनी औचित्याचा मुद्दा मांडत असताना त्यातून औचित्य काय आहे, हे सांगणे आवश्यक आहे.

श्री.भारत भालके : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असून मी तो मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघातील व सोलापूर जिल्ह्यातील उजनी, कन्हेर, कोयना प्रकल्पग्रस्तांसाठीच्या नागरी सुविधांचा आराखडा मंजूरी करिता मागील दोन वर्षापासून प्रलंबित उक्त कामांना अद्याप प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. प्रकल्पग्रस्तांना द्यावयाच्या मुलभूत सुविधांमध्ये स्मशान भूमी, रोड, शाळा, ग्रामपंचायत कार्यालये, गटारे इत्यादी सुविधा अद्याप उपलब्ध करुन दिल्या नाही. तसेच, ज्या ठिकाणी प्रकल्पग्रस्तांना जमीन देण्यात आली आहे तेथील पाणंद रस्त्याच्या निधीच्या मागणीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. शासन निर्णयानुसार 350 लोकसंख्येच्या ग्रामपंचायत स्थापनेबाबत मागील अनेक वर्षापासून जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे प्रकल्पग्रस्तांचा प्रस्ताव प्रलंबित आहे.

अध्यक्ष महोदय, सोलापूर जिल्ह्यातील पुनर्वसन करावयाच्या 198 गावापैकी एकाही गावाच्या संदर्भात घोषणा करण्यात आली नाही. पुनर्वसन कार्यालयामध्ये अधिकारी व कर्मचारी यांचा अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने प्रकल्पग्रस्त लोकांची फार मोठी हेळसांड होत आहे. यासर्व बाबी लक्षात घेऊन प्रकल्पग्रस्तांच्या उक्त प्रस्तावास मान्यता देण्यासंदर्भात विलंब होत असल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र नाराजीची भावना निर्माण झाली आहे. उक्त प्रकल्प प्रकरणी जमिनी संपादित करुन 60 वर्षे झाली आहेत. सदरहू प्रकल्पग्रस्तांनी केलेल्या त्यागाचा विचार करुन उक्त कामांना शासनाने प्रशासकीय मंजूरी द्यावी व त्वरीत निधी उपलब्ध द्यावा, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

------------

**तालिका सभाध्यक्ष** : सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आज औचित्याचे मुद्दे मांडण्याचा शेवटचा दिवस असल्याने सर्वांना संधी देण्यात येत असून त्यांनी आपले औचित्याचे मुद्दे थोडक्यात मांडावेत.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असून मी तो मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या नायर, के.ई.एम., सायन या रुग्णालयामध्ये भौतिक उपचार व व्यवसाय उपचार अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना दिनांक 18 एप्रिल, 2007 पासून प्रथम वर्षामध्ये 5 हजार रुपये, द्वितीय वर्षामध्ये 5,500 रुपये व तृतीय वर्षामध्ये 6 हजार रुपये इतके अल्प विद्यावेतन देण्यात येते. महापालिकेचे रुग्णालय प्रशासन सदरहू प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांकडून 8 ते 10 तास काम करुन घेत असून सद्य:स्थितीत त्यांना देण्यात येणारे विद्यावेतन खूप कमी असल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे, असे निदर्शनास आले आहे.

अध्यक्ष महोदय, शासन निर्णय क्रमांक 1009247/शिक्षण-2, दिनांक 13 मे, 2015 अन्वये नागपूर येथील भौतिक उपचार व व्यवसाय उपचार अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना 7,000 रुपये बेसिक व त्यावर चालू दराने महागाई भत्ता असे मिळून 23 हजार रुपये प्रतिमहा सरासरी वेतन देण्यात येत आहे. केंद्र सरकारच्या झकेरीया समितीच्या सन 1963 च्या शिफारशीनुसार देशातील प्रत्येक महानगरपालिकेने आरोग्य विषय तरतुदीपैकी किमान 30 टक्के रक्कम खर्च करणे बंधनकारक आहे. त्यामुळेशासन निर्णय क्रमांक 1009247/शिक्षण-2, दिनांक 13 मे, 2015 मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने दिनांक 1 एप्रिल, 2015 पासून मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील भौतिक उपचार व व्यवसाय उपचार अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना वेतन द्यावे, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

------------

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.देवयानी फरांदे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असून मी तो मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2012 व सन 2016 या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्य एस.टी. कामगार संघटनेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कराराची मुदत संपली आहे. त्यानंतर माननीय परिवहन मंत्री यांनी दिनांक 1 एप्रिल, 2016 रोजी विधानपरिषदेमध्ये एस.टी.कामगार करारातील कलम 45, 46, 48, 49, 50, 62, 66, 79, 83, 90, 94, 98 हे मुद्दे वगळून मान्यता दिलेली आहे. मुदत संपल्यानंतर अशा पध्दतीने मुद्दे वगळणे हे कामगार व कामगार संघटनेवर अन्याय करणारे आहे. उक्त मुद्यांतील मुद्दा क्रमांक 83 हा गरोदर महिलांच्या संदर्भातील आहे. एस.टी. महामंडळामध्ये 7,800 महिला काम करीत असून त्यामधील 5 हजार महिला वाहकाचे काम करीत आहेत. महिलांना गरोदरपणाच्या कालावधीत वाहकाचे काम केले किंवा प्रवास केला तर मोठ्या प्रमाणात गर्भपात होण्याची शक्यता असते. त्यामुळे शासनाने उक्त करारातील वगळलेला मुद्दा अत्यंत गंभीर आहे. सन 2012 व 2016 चा करार संपल्यानंतर उक्त करारातील वगळलेल्या सर्व मुद्यांच्या संदर्भात परिवहन मंत्री महोदयांनी निवेदन करावे, अशी माझी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

---------------

यानंतर X-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हनुमंत डोळस : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. अध्यक्ष महोदय, माझ्या माळशिरस मतदार संघातील तरंगफळ या गावी राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत 44 लाख रुपयांची योजना मंजूर झाली होती. या योजनेतील जी कामे होती ती ई-टेंडरिंग पध्दतीने एका ठेकेदाराला दिले होते. या ठेकेदाराने त्यामधील जवळ जवळ 25 लाख रुपयांचे काम पूर्ण केले असून त्याबाबत संबंधित ठेकेदाराला 11 लाख रुपयांचे देयक मंजूर होऊन त्याला ते पैसे देण्यात आले आहेत. ठेकेदाराच्या उर्वरित रकमेच्या कामासाठी शासनाने शौचालयाची अट घातल्यामुळे अद्यापही मंजूर केलेले नाही. पिण्याच्या पाण्याचे असलेले दुर्भिक्ष्य विचारात घेता राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम अपूर्ण असल्यामुळे नागरिकांचे पाण्याअभावी अत्यंत हाल होत आहेत, ही बाब विचारात घेता अपूर्ण राहिलेले काम त्वरीत सुरू करुन पूर्ण करण्याच्या दृष्टीने कृपया संबंधिताना आदेश द्यावेत. शासनाने जी शौचालयाची अट घातलेली आहे ती अट सध्याची पाणी टंचाई परिस्थिती पाहून 2-3 महिने शिथिल करावी, जेणेकरुन काम पूर्ण होईल व नागरिकांचे ऐन उन्हाळ्यात हाल होणार नाहीत. या संदर्भात मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आज राज्यात अशाच प्रकारे अनेक ठिकाणी राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत जी कामे सुरू आहेत ती देखील देयक मंजूर न झाल्यामुळे तसेच शौचालयाची अट घातल्यामुळे बंद पडले आहेत. माझी आपणास विनंती आहे की, याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. राज्यात संपूर्ण दुष्काळग्रस्त परिस्थिती असताना अशा प्रकारच्या महत्वाच्या योजना बंद पडणे बरोबर नाही. त्यामुळे याबाबत लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

----------

2.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : पांढुर्णा (जि.वर्धा) व रायगड येथील शासकीय आश्रमशाळेसह राज्यातील अन्य आश्रमशाळा व वसतिगृहातील मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची सखोल चौकशी करणे याबाबत परिनिरीक्षण करुन महिला संयुक्त तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करणेस मुदतवाढ मिळणे.

**मु.शी.** : पांढुर्णा (जि.वर्धा) व रायगड येथील शासकीय आश्रमशाळेसह राज्यातील अन्य आश्रमशाळा व वसतिगृहातील मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची सखोल चौकशी करणे याबाबत परिनिरीक्षण करुन महिला संयुक्त तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करणे या विषयासंबंधी मुदतवाढ मिळणेबाबत महिला व बालविकास राज्यमंत्री यांचा प्रस्ताव

श्रीमती विद्या ठाकूर (महिला व बालविकास राज्यमंत्री): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम 183 (1) अन्वये पुढीलप्रमाणे प्रस्ताव मांडते.

"पांढुर्णा (जि.वर्धा) व रायगड येथील शासकीय आश्रमशाळेसह राज्यातील अन्य आश्रमशाळा व वसतिगृहातील मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची सखोल चौकशी करणे याबाबत परिनिरीक्षण करुन महिला संयुक्त तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्यासाठी म.वि.स. नियम 183 च्या (1) च्या परंतुकान्वये आगामी पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, मी राज्य शासनाचे एका महत्वाच्या विषयाकडे लक्ष वेधू इच्छितो. आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती मोठ्या उत्साहाने राज्यभर सादर करतो. त्या निमित्ताने विविध कार्यक्रम आपण आयोजित करतो. त्याचप्रमाणे समतेचे अग्रदूत महात्मा ज्योतिबा फुले यांची 28 नोव्हेंबरला 125 वी पुण्यतिथी आहे. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, आपण महात्मा फुले यांनी सामाजिक परिवर्तन आणि समतेमध्ये दिलेले योगदान व स्त्री शिक्षणामध्ये दिलेले योगदान लक्षात घेता हा पुण्यतिथीचा कार्यक्रम राज्यभर राज्य सरकारच्या वतीने साजरा केला जावा अशी सूचना आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, त्या संदर्भातील नियोजन आपण निश्चित करु. साधारणपणे आपण राज्यात जयंती साजरी करतो. पण महात्मा ज्योतिबा फुले यांच्यासारख्या मोठ्या व्यक्तींनी म्हणजे ज्यांनी खऱ्या अर्थाने सामाजिक सुधारणा केली आणि स्त्रीयांना शिक्षण उपलब्ध करुन दिले. त्यामुळे निश्चितच ही 125 वी पुण्यतिथी देखील योग्य आणि उचित प्रकारे ती साजरी व्हावी अशा प्रकारचे निदेश देण्यात येतील.

---------

4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION



**पृ.शी./मु.शी. :** औचित्याचे मुद्दे

(पुढे सुरु......

श्री. संजय केळकर : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. ठाणे येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात ऑडीओग्राम ही कर्णबधीर रुग्णांसाठी आवश्यक असणारी यंत्र मशीन उपलब्ध नसल्याने जिल्ह्यातील काना-कोपऱ्यातून येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होते. तथापि, कर्णबधीर तज्ज्ञ वांद्रे येथील रुग्णालयात तपासणीसाठी कर्णबधीर अपंग रुग्णांना पाठविण्याची शिफारस करतात. परिणामी गरीब, वृध्द व ग्रामीण भागातून आलेल्या रुग्णांना वांद्रे येथील रुग्णालयात ये-जा करताना अनेक समस्यांना तोड द्यावे लागते. आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो. म्हणून वांद्रे येथील रुग्णालयात देखील प्रतिक्षा यादी मोठी असल्यामुळे तपासणीसाठी 3 ते 6 महिने प्रतिक्षा करावी लागते. ठाणे जिल्हा रुग्णालयात ऑडीओग्राम मशीन उपलब्ध केल्यास जिल्ह्यातील ग्रामीण भागातून येणारे गोरगरीब, कर्णबधीर अपंग रुग्णांना दिलासा मिळेल आणि सदर मशीन उपलब्ध करण्याकरिता मी ही बाब आपल्या माध्यमातून औचित्याच्या मुद्याद्वारे मांडत आहे.

---------

5.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION



श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सातारा जिल्ह्यातील मार्ग क्रमांक 4 या माझगावच्या रस्त्यावरील उरमुडे नदीच्या पुलासंबंधी मुद्दा उपस्थित करीत आहे. नाबार्ड-20 या योजनेमध्ये हा प्रकल्प मंजूर करण्यात आला होता. त्याच्या आराखड्यास विलंब झ

ााला म्हणून हे काम नाकारण्यात आल्याचे सांगण्यात येते. या पुलामुळे लोकांची फार मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. त्यामुळे त्या नदीवर लवकरात लवकर पूल व्हावा अशी विनंती या ठिकाणी करतो.

----------

6.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION



श्री. चैनसुख संचेती : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. जीगाव प्रकल्पातील बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांना त्यांच्या मालमत्तेचा मोबदला देताना 10 टक्के रक्कम ही टीडीएस म्हणून जिल्हाधिकारी कापून घेत आहेत. ही रक्कम कापून घेतल्यामुळे प्रकल्पग्रस्तांमधून

तीव्र संताप व्यक्त होत आहे. म्हणून या औचित्याच्या माध्यमातून मी शासनास विनंती करतो की, ही 10 टक्के टीडीएसची रक्कम जिल्हाधिकारी यांनी कापून घेऊ नये. तसा कोणताही नियम नसल्यामुळे आपण त्यांना त्यानुसार निदेश द्यावेत.

-----------

7.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION



ॲड. संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फॉरमेशन आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय महसूल मंत्री उपस्थित आहेत. महाराष्ट्र राज्य तलाठी, पटवारी, मंडल अधिकारी समन्वय महासंघाने आपणास एक निवेदन दिले आहे. माननीय महसूल मंत्री

महोदयांनी माझ्या मतदार संघामध्ये भोर तालुक्यामध्ये संगणकीकृत सातबाराच्या संदर्भात उदघाटन केले आहे आणि त्या संगणकीकृत सातबाराच्या संदर्भात आणि फेरफारसंबंधी आपण माझ्या मतदार संघात उद्‌घाटन केले आहे. काही ट्रायल बेसवर महाराष्ट्रातील जे तालुके घेतले त्यामध्ये माझा भोर तालुका दुखील होता. तेव्हापासून संगणकीकृत सातबारे उपलब्ध होण्यास सुरूवात झाली आहे. आज त्या सातबारामध्ये इडिट ऑप्शन नसल्यामुळे सातबारावर पूर्वी सर्वरच्या आधारे जी माहिती भरली गेली आहे त्यामध्ये काही त्रुटी असल्यामुळे त्यासंबंधी दुसऱ्या तलाठ्याने जर काही माहिती भरली तर ती माहिती ॲक्सेप्ट होत नाही आणि नवीन सातबारा तयार होत नाही. या संघटनेने आपल्याला आंदोलनाची नोटीस दिली आहे. दुसरे महत्वाचे म्हणजे काल त्यांनी काळ्या फित लावून आंदोलन केले आणि आज भोर तालुक्याचे कामकाज बंद आहे. उद्याच्या 26 तारखेनंतर ते राज्यव्यापी आंदोलन करणार आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण यामध्ये स्वतः लक्ष घालून त्यामध्ये निर्णय करावा.

-----------

8.......



श्री. राहूल बोंद्रे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. अध्यक्ष महोदय, केंद्रीय बजेटमध्ये सोन्याचा व्यवसाय करणाऱ्या सराफा व्यवसायिकांवर करवाढ लादण्यात आली आहे. या विरोधात सराफा व्यवसायिकांनी बंद पुकारलेला आहे. एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीपासून हा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

बंद सुरू आहे. हा विषय या सभागृहात झाला आहे. पण तरी देखील तो बंद सुरुच आहे. त्यामुळे या व्यवसायावर अवलंबून असलेल्या कारागिरांच्या कुटुंबियांवर उपासमारीला सामोरे जावे लागत आहे. राज्य शासनाने केंद्र शासनाकडे ही करवाढ मागे घेण्यासंबंधी तातडीने पाठपुरावा करावा अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे आपणामार्फत शासनास विनंती करीत आहे.

--------

Y-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: मुंबई शहरात लोकसंख्येच्या प्रमाणावर पाणी वितरण करण्याची आवश्यकता

मु.शी.: मुंबई शहरात लोकसंख्येच्या प्रमाणावर पाणी वितरण करण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री योगेश सागर,अतुल भातखळकर,श्रीमती मनिषा चौधरी,वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.योगेश सागर ( चारकोप ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मुंबई शहरात पाण्याचे*** होत असलेले ***असमान वितरण, मुंबईच्या पश्चिम उपनगरात गोरेगाव ते दहिसर या परिसरात तळ मुंबई व पूर्व उपनगरे यांच्या तुलनेने*** जास्त असलेले ***लोकसंख्येचे प्रमाण, पाण्याचे वाटप लोकसंख्येच्या आधारावर करणे गरजेचे असून देखील मनपा प्रशासनाचे याकडे*** झालेले ***दुर्लक्ष, मुंबई शहरास एकूण ३७५० दशलक्ष लिटर*** पाणी ***कपातीनंतर ३२५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जात असणे, मुंबई शहराचे तळ मुंबई, पूर्व उपनगर व पश्चिम उपनगर असे मोठे तीन भाग असणे, महानगर पालिकेच्या म्हणण्यानुसार तळ मुंबईत एकूण ३१ लाख लोकसंख्या असणे, कपातीनंतर त्यांना दररोज ९६० ते ९७५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जात असणे, तसेच पूर्व उपनगरातील ३० लाख*** लोकसंख्येस ***कपातीनंतर ९२० ते ९३० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जात असणे,*** तर ***पश्चिम उपनगरात एकूण ५५ लाख लोकसंख्या असून त्यापैकी गोरेगाव ते दहिसर या परिसरात मनपाच्या म्हणण्यानुसार एकूण ३० लाख लोक राहत असणे, त्यांना कपातीनंतर ६२० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत असणे, पश्चिम उपनगरातील एच व के विभाग (पूर्व/पश्चिम) या चार विभागातील एकूण २४ लाख लोकसंख्येस ८२० ते ८३० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत असणे, तसेच गोरेगाव ते दहिसर पी व आर अशा ५ विभागांना जेथे ३० लाख लोकसंख्या आहे तेथे सध्या ६२० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत असणे, त्यामुळे गोरेगाव ते दहिसर परिसरातील*** नागरिकांवर ***अन्याय होत असणे, पाणी कमी प्रमाणात मिळत असल्याने ह्या परिसरातील*** नागरिकांमध्ये ***पाण्यासाठी*** भांडण ***होण्याचे प्रकार वाढत असणे, तसेच पाण्याची चोरी, टँकरधारक पाणी घेणे, मुंबई शहर व***

.....२

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***श्री. योगेश सागर.....***

***उपनगरातील पाण्याच्या मीटरमध्ये दोष असणे, बऱ्याच ठिकाणी पाणी मीटर नसणे, पाणी*** पुरवठा करणारी पाईपलाईन ***नादुरुस्त असल्यामुळे*** होत असलेली ***पाण्याची गळती, अशा अनेक*** कारणांमुळे ***पाणीकपातीच्या काळामध्ये पाण्याच्या पुरवठ्यावर होत*** असलेला ***परिणाम, म्हणून मुंबई शहरात लोकसंख्येच्या प्रमाणावर पाणी वितरण करण्याची अत्यंत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची आवश्यक ती उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."***

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

.........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, अतिशय महत्वाची लक्षवेधी सूचना याठिकाणी लागलेली आहे. समन्यायी पाणी वाटपाच्या संदर्भात सभागृहामध्ये सकाळपासून आता औचित्य सुरु होईपर्यंत चर्चा सुरु होती. मुंबई महानगरपालिकेमध्ये मी 3 वेळा नगरसेवक होतो. नगरसेवकाच्या कार्यकाळामध्ये सातत्याने यासंदर्भातील चर्चा महापालिकेच्या सभागृहामध्ये घडून येत होती. मागच्या वेळेला समोरच्या बाजूला बसत होतो. तेव्हाही या विषयाची चर्चा सभागृहामध्ये करत होतो. संपूर्ण मुंबई शहराला मुख्यमंत्री महोदयांकडून समन्यायी पाणी वाटपाच्या संदर्भात आशा आहे. मुंबई शहराची लोकसंख्या 85 हजार 417 आहे. जवळ जवळ 31 लाखाच्या लोकसंख्येला 950 दशलक्ष पाणी लागते आणि तेवढीच लोकसंख्या गोरेगाव ते दहिसर हा एक्सटेंडेड सबब आहे, विस्तारीत उपनगर आहे. त्याची लोकसंख्या आहे 30 लाख 89 लाख 532 पाणी मिळते. 31 लाखाच्या लोकसंख्येला 45 एमएलडी पाणी आणि 31 लाखाची लोकसंख्या असलेल्या सिटीला 950 एमएलडी पाणी दिले जाते. 342 दशलक्षचा जी तफावत आहे. प्रशासनाने नेहमी शासनाला चुकीची उत्तरे दिलेली आहेत की, त्याठिकाणी गळती आहे, जुन्या इमारती आहेत. झोपडपट्टीची संख्या जास्त आहे. या उत्तरामध्ये लिहिलेले आहे की, शहर विभागामध्ये 35 टक्के, पश्चिम उपनगरात 45 टक्के आणि पूर्व उपनगरात 95 टक्के आहे. लोकसंख्येच्या आधारावर जर 35 टक्के मोजली आणि उपनगराच्या लोकसंख्येच्या आधारावर 45 टक्के मोजली हा डिफरन्स किती मोठा होईल या विचार शासनाने आणि प्रशासनाने कधी केला नाही.

अध्यक्ष महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, ही फार कॉन्ट्रॅडिक्टरी माहिती आहे. माझ्याकडे मुंबई शहराच्या पाण्याच्या विषयावर एनसायक्लोपिडीया आहे आणि मी पाण्याच्या डिस्ट्रीब्युशन सिस्टीमवर, त्यामध्ये पाणी आणण्याच्या सिस्टीमपासून ते पाणी गळतीपर्यंत उद्या सकाळपर्यंत बोलू शकतो. यामध्ये सिस्टीमपासून 27 टक्के गळती होत आहे असे म्हणतात. यांच्याकडे कोणता सायंटिफिक आधार आहे की, वैज्ञानिक आधार आहे की, 27 टक्के गळती त्यांनी कोणत्या आधारावर मोजली. शहर विभागामध्ये जल वाहिनीचे जाळे खूप जुने आहे. उपनगरातील ज्या इमारतीमध्ये मी राहतो त्या इमारतीला 35 वर्षे झाली आणि ज्या इमारतीमध्ये माझा जन्म झाला ती सन 1938 ची इमारत आहे. म्हणून उपनगरात सुध्दा 80-90 वर्षे जुने

..........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.योगेश सागर.......

जमिनीमध्ये जलवाहिनीमध्ये टाकलेले पाण्याचे जाळे आहे. त्यामुळे हे विसंगत उत्तर आहे. माझी केवळ एवढी मागणी आहे की, मुंबई शहरामध्ये समन्यायी पाणी वाटप या सर्वांना झाले पाहिजे. ज्याठिकाणी धनदांडगे राहतात, जेथे मोठमोठे पंचतारांकित हॉटेल आहेत. शहरामध्ये प्रती दिवसाला, प्रत्येक माणसाला 360 लिटर मिळते आणि याठिकाणी 40 लिटर पाण्यासाठी धांदल सुरु आहे. मुंबई शहराला प्रती व्यक्ती, प्रति दिन 360 लिटर पाणी मिळते. म्हणून एका बाजूला 360 लिटर आणि दुसऱ्या बाजूला 40 लिटर ही मुंबई शहराची अवस्था आहे. म्हणून माझी माझी मागणी आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत जलतज्ञांची समिती करण्याची आवश्यकता आहे. ते जलतज्ज्ञ असले पाहिजे. महापालिकेचे रिटायर्ड अधिकारी किंवा इंजिनिअर नाही. महापालिकेचे कुठलेही अधिकारी नाही. जलतज्ञांची त्रीसदस्यीय समिती स्थापन करण्यात यावी. म्हणून त्रिसदस्यीय जलतज्ज्ञांची समिती करण्याची आवश्यकता आहे, ती करण्यात येईल काय? आणि दुसरा प्रश्न असा की, क्षेत्रीय पाणी पुरवठ्याचे मोजमाप करण्यासाठी महापालिकेमार्फत प्रवाह मापक बसविले आहेत. आता टेलीस्कोपीचा जमाना आलेला आहे. टेलीस्कोपीक मीटर बसवा आणि पाण्याचा थेंब न थेंब कुठे जातो आहे याचा हिशोब महापालिकेकडे असला पाहिजे. त्यामुळे वॉटर ऑडिटींग करणे आवश्यक आहे. झोनवाईज फ्लो मीटर बसविणार काय?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी अतिशय महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधलेले आहे. ही वस्तुस्थिती आहे की, पाणी पुरवठा असमान होतो आहे. याच्यामध्ये शहराला अधिक पाणीपुरवठा मिळतो आहे. यामध्ये केवळ मी एक सुधारणा करु इच्छितो की, ज्यावेळेस हा कट लावलेला आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे शहर विभागाला आता 300 लिटर नाही. शहर विभागास प्रति व्यक्ती आता 165 लिटर पाणी मिळते. पूर्व उपनगरामध्ये 135 मिळतो, पश्चिम उपनगरामध्ये 137 मिळतो आहे. त्यामुळे साहजिकच पूर्व आणि पश्चिम उपनगरामध्ये अधिकसा पाणी पुरवठा होतो आहे. हा शहर विभागामध्ये जेव्हा कट लावत नाही. तेव्हा 181 प्रती व्यक्ती, प्रती लिटर पाणी देत असतो. समान पाणी पुरवठा असला पाहिजे अशी जी आपण मागणी केली आहे ती अतिशय योग्य आहे. यानिमित्ताने आपण जे सुचविले आहे त्याप्रमाणे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

या क्षेत्रातील तज्ज्ञांची एक समिती नियुक्त करायला सांगण्यात येईल. यासंदर्भातील उपाययोजना काय आहेत. यासंदर्भातील कारवाई करण्याचे आदेश देण्यात येतील. यासंदर्भात मी आज महानगरपालिकेची बैठकही घेतली. साधारण दोन महिन्यामध्ये समान पाणीपुरवठा किंवा इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशन अशाप्रकारचा समन्यायी पाणी पुरवठा करण्याच्या संदर्भात दोन महिन्याच्या आत एक रोडमॅप तयार करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सदर विषय मुंबई शहरासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी समिती घोषित केल्याबद्दल धन्यवाद. मुंबईमध्ये साधारणतः गळतीचे प्रमाण टक्केवारीमध्ये सांगता येणे कठीण असले तरी अंदाजे 27 टक्के पाणी हिशोबात पाहिजे आहे. त्याची कारणे गळती, अनधिकृत जलजोडणी, पाणी चोरी, जल मापकामधील तफावत इत्यादी आहेत. मुंबई शहरामध्ये जवळ जवळ 3 हजार 750 दशलक्ष लिटर प्रतिदिनी पाणी सप्लाय करीत असू तर त्यातील 27 टक्के म्हणजे अंदाजित 85-86 एमएलडी एवढे पाणी अनकाऊंटेबल आहे. 27 टक्के पाण्याचा हिशोब लागत नाही. वॉटर लिकेजचे टेंडर मी आणि सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर किंवा ॲड.पराग अळवणी आम्ही नगरसेवक होतो. त्यावेळेस काढण्यात आले होते. पण अजून एक्झीक्युट झालेले नाही. या सदनासमोर आमची माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, आपण मुंबई महानगरपालिका प्रशासनाला 27 टक्के हे क्रिमिनल वेस्टेज आहे. या सदनातील सन्माननीय सदस्यांना त्यांच्याकडे एवढे पाणी मिळाले तर कदाचित महाराष्ट्रातील बऱ्याचशा ठिकाणची दुष्काळाची परिस्थिती संपून जाईल. पण 27 टक्के एमएलटी पाणी वाचविण्यासाठी एखादा ठोस कार्यक्रम एक महिन्यामध्ये मुंबई महापालिकेने करावा असे निर्देश शासन देणार काय? शेवटच्या पॅरामध्ये पथदर्शी प्रकल्प टी विभाग आणि एच पश्चिम विभागामध्ये करण्याबद्दलचा उल्लेख केलेला आहे. एच पश्चिम विभाग आमच्या मतदारसंघामध्ये 24.7, 24 तास 7 दिवस पाणी सप्लाय करण्याची एक स्कीम प्रायोगिक तत्त्वावर सुरु झाली आहे. माझी छोटीसी विनंती आहे ती एक्झीक्युट झालेली नाही. पण त्यासाठी पूर्ण एचओएस वॉर्डामध्ये 212 ठिकाणी वॉल्स लावावे लागणार, 20 ठिकाणी क्रॉस कनेक्शन करायला लागणार, 12 ठिकाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार.......

प्रेशर गेज करायला लागणार, 101 ठिकाणी इनव्हीजीबल लिकेजेस डिटेक्ट करायला लागणार, एका वॉर्डामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात रस्ते खोदायला लागणार आहेत. पाण्याच्या योजनेसाठी एवढे रस्ते खोदायला लागणार असल्यामुळे त्यासाठी विशेष निधी रस्त्यांसाठी महानगरपालिकेने द्यावा असे निर्देश प्रशासनाला सरकार करणार काय?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्यात रोडमॅप दोन महिन्यात तयार करु असे मी सांगितले. त्यामध्ये गळती हा महत्त्वाचा विषय आहेच. आज आपण स्मार्ट सिटी तयार निघालो होतो. त्या स्मार्ट सिटीत सर्वात महत्त्वाचे कंम्पोनंट काय आहे तर पाणीपुरवठ्याचे समन्यायी वाटप आणि त्यामध्ये पाण्याची अकाऊंटीबिलीटी म्हणजे पाण्याचा थेंब न थेब आपल्याला माहिती असला पाहिजे. आपल्याकडे ज्या काही स्मार्ट टेक्नॉलॉजी उपलब्ध आहेत त्यामध्ये पूर्ण पाण्याचे ट्रॅकिंग आपल्याला करता येते. तशा प्रकारची पाईप लाईन आपल्याला ले करता येते. याठिकाणी जो रोडमॅप तयार करण्याचा प्रयत्न करणार आहोत त्यामध्ये जो एलिमेंट करणार आहोत. याकरिता महानगपालिकेला दोन महिन्यांचा कालावधी देणार आहोत. 24.7 हा देखील त्यातलाच एक भाग आहे. 24.7 मध्ये अस्तित्त्वात असलेले जे पाणी असते त्या पाण्याचे योग्य वाटप करुन ते पाणी आपल्याला 24 तास पुरते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

Z-1............

श्री.देवेंद्र फडणवीस ....

नवीन पाईपलाईन टाकतो, अशा नवीन प्रकारच्या यंत्रणा उभारतो, हे सर्व वेस्टेज कमी करतो. म्हणून त्या संदर्भात कारवाई करत असताना त्याचा इंटीग्रल पार्टच हा आहे ज्या ठिकाणी खोदले जाते, तेथे रेस्टोरेशन करावेच लागते. याही टेंडरमध्ये ते असेलच, नसेल तर तशा सूचना दिल्या जातील.

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, सर्व प्रथम मी माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो. त्यांनी या गळती विषयीच्या प्रश्नाला फार सकारात्मक उत्तर दिले. आता माझा एकच प्रश्न आहे, मुंबई शहरामध्ये अशी अनेक ठिकाणे आहेत की, ज्या उंच ठिकाणी बिल्डींग किंवा चाळी आहेत, अशा अनेक ठिकाणी महानगरपालिका खोलगट भागापर्यंत पाणी आणते. त्या ठिकाणाहून पाणी लिफ्ट करुन आपापल्या घरापर्यंत नेण्याचे काम त्या ठिकाणच्या भागातील लोकांना करावे लागते. त्याचा वेगळा चार्ज आहे हा चार्ज सुध्दा त्या लोकांना भरावा लागतो. तो चार्ज महानगरपालिका भरत नाही. हा नागरीकांवर अन्याय आहे. अधिकृत इमारतीमध्ये ते वरच्या मजल्यावर राहतात हा काही त्यांचा दोष नाही. त्यामुळे त्या ठिकाणाच्या लोकांना सुध्दा कोणताही अतिरिक्त चार्ज न घेता तेथे महानगरपालिकेने पाणी पुरविले पाहिजे. अशा प्रकारचे निर्देश शासनाने द्यावेत अशी मी त्यांना आपल्या माध्यमातून विनंती करतो.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, ही बाब महानगरपालिकेला तपासून पाहण्यात सांगण्यात येईल. महानगरपालिकेने याच्यावर शक्यतो सकारात्मक कार्यवाही करावी, अशा प्रकारचे निदेश देण्यात येतील.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, माझा मतदार संघ हा मुंबईतील उत्तरेचा शेवटचा मतदार संघ आहे. मुंबई महानगरपालिकेला 3750 एम.एल.डी. पाणी मिळते. 25 टक्के जरी लिकेज पकडले तरी 900 एम.एल.डी. पाणी जाते. एकूण पुरवठा 2825 एम.एल.डी. आहे. प्रति माणसी महानगरपालिका 135 लिटर पाणी देते आणि झोपडपट्टीला 75 लिटर प्रति माणसी देते. म्हणजे सरासरी जरी आपण 100 लिटर पकडले तरी मुंबईची जो डिमांड आहे,

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मनिषा चौधरी.........

तो 1260 एम.एल.डी. आहे. मी सांगू इच्छिते की, जवळ जवळ 1000 एम.एल.डी. हे पाणी शिल्लक राहयला पाहिजे. मग हे पाणी जाते कुठे ? आमच्या दहिसर भागामध्ये शेवटचा माझा मतदार संघ आहे. तिकडे सॉसर एरिया आहे. हया सॉसर एरियामध्ये पाणी कपात ही 50 टक्यापेक्षा जास्त आहे. इकडे अधिकारी आलेले आहेत. त्यांच्याकडे वारंवार मिटींग घेतल्या आहेत. गोरेगांव ते दहिसरला आमची लोकसंख्या सरासरी 30 लाख आहे. आम्हाला फक्त 620 एम.एल.डी. पाणी मिळते. पूर्व पश्चिम उपनगरात 24 लाख लोकसंख्या आहे तिकडे 830 एम.एल.डी. पाणी मिळते, ही तफावत आहे. आमच्या भागाला दरडोई प्रमाणे जे पाणी मिळायला पाहिजे ते मिळत नाही. दहिसर ते गोरेगावच्या भागाला तुम्ही पाणीपुरवठा वाढून देणार का ? आमच्या भागामध्ये असलेल्या गावठाण आणि कोळीवाडे आहेत. तिथे 50 ते 60 वर्षा पूर्वीच्या जुन्या जलवाहिन्या आहेत. त्या जलवाहिन्या महानगरपालिका तातडीने बदलणार का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी यांनी प्रश्न विचारला आहे. त्यासंदर्भात मी आताच घोषणा केली की, समन्यायी पाण्याचे वाटप करण्याच्या दृष्टीने दोन महिन्यांमध्ये जो रोड मॅप तयार होईल, त्या रोड मॅपमध्ये जो प्रश्न उपस्थित केला आहे, तो प्रश्न ॲड्रेस केला जाईल. त्या माध्यमातून त्याही ठिकाणी योग्य जे पाणी आहे ते वाटप झाले पाहिजे, असा प्रयत्न होईल. जलवाहिन्यांच्या संदर्भात आपण सांगितले विशेषतः उपनगरे नाही तर मुंबईच्या भागामध्ये पाहिले तर ही आयलॅंड सिटी आहे. तेथे जुन्या पाण्याच्या वाहिन्या आहेत. त्या 100-100 वर्षे जुन्या आहेत. म्हणून ज्यावेळी अशा प्रकारचा रोड मॅप तयार होतो, त्यावेळी मुळामध्ये समन्यायी वाटप करायचे असेल आणि पाण्याचे लिकेजेस कमी करायचे असतील तर नवीन पध्दतीची पाईप लाईन टाकणे आवश्यक असते. त्या संदर्भात कार्यक्रम महानगरपालिकेने हातामध्ये घेतलेला आहे, तो अधिक वेगाने महानगरपालिकेने करावा, अशा सुचना देण्यात येतील.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित साटम : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी स्मार्ट सिटीचा उल्लेख केला. त्यामुळे Equitable distribution of water, लिकेजेस्ला प्लग करणे, हया सर्व गोष्टी केव्हा घडतील, जेव्हा पाऊस पडेल. वातावरणातील बदलांमुळे पावसाच्या लहरीपणाला बघता दरवर्षी इरॅटीक पाऊस होतो. मागच्या वर्षी पाऊस पडला नाही. कदाचित या वर्षी चांगला पडेल. पुढच्या वर्षी कदाचित पडणार नाही. त्यामुळे या इरॅटीक मानसुनवर मात करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला शासन डिसॅलिनेशनचा मार्ग स्वीकारण्याचे आदेश देणार का ? हा माझा माननीय मुख्यमंत्र्यांना स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, डिसॅलिनेशन करण्याच्या संदर्भात मागच्या काळामध्ये तशा प्रकारचा प्रयत्न केला होता. पण ते पाणी थोडे महाग पडते. तरी देखील आता ही वेळ आलेली आहे. आपल्याला याचा विचार करावा लागेल. तो केवळ मुंबई करिता नाही तर एमएमआर करिता करावा लागेल. एम.आय.डी.सी.ची धरणे आहेत, त्या धरणातून पाणी घेतो आहे, त्याच्यावरही स्ट्रेस वाढलेला आहे, कारण वस्ती वाढत आहे. म्हणून महानगरपालिका आणि एम.एम.आर.डी.ए. या दोघांनाही एकत्रितपणे त्या ठिकाणी बसून डिसॅलिनेशनचा एक पायलट प्रोजेक्ट करता येईल का, याचा निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री.अशोक पाटील : अध्यक्ष महोदय, आम्ही मुंबईतील बरेचशे आमदार झोपडपट्टीत राहणार आहेत. एक विरोधाभास म्हणून सांगतो. झोपडपट्टीमध्ये आम्हाला एक-एक, दोन-दोन दिवस पाणी मिळत नाही. उलट बाजूला टोलेजंग इमारती आहेत, त्या इमारतीमध्ये पाचव्या मजल्यावर गार्डन, 14 व्या मजल्यावर स्विमिंग पूल अशा प्रकारे पाणी वापरले जाते, यांच्यावर दोन महिन्यांमध्ये बंधन आणाल का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, दोन महिन्यांमध्ये बंधन आणणे शक्य नाही. परंतु ज्यावेळेला हा रोडमॅप तयार करायला सांगतो आहे, त्यावेळी पाण्याचा गैरवापर टाळला गेला पाहिजे आणि झोपडपट्टीत योग्य पाणी मिळाले पाहिजे अशा प्रकारच्या त्यांना निश्चितपणे सूचना देण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो आणि त्यांची क्षमाही मागतो. अधिका-यांनी त्यांना जी माहिती दिली 131 लिटर,137 लिटर ती चूकीची माहिती आहे. माझ्याकडे आकडेवारी आहे. मी सुध्दा वाणिज्य शाखेचा बी.कॉम.चा विद्यार्थी आहे. मी दाव्यानिशी सांगतो अगदी सरळ हिशोब आहे. तीन हजार एकशे दशलक्ष लिटर डिव्हायडेड बाय एकशे तीस लोक म्हणजे किती पाणी होते ? मी कॅलक्युलेटरवर सर्व आकडे काढून बोलत आहे. या प्रकरणाच्या खोलात मी जात नाही. माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त करतो, ते जलतज्ञांची समिती करणार आहेत. त्यांना टर्म्स ऑफ रेफरेन्स देणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे अधिकारी स्वत: अनुकूल असतील तसे उत्तर घेण्यासाठी तसेच प्रश्न त्यांना देतील त्याच्यावर ते चर्चा करतील निकष काढतील आणि आपल्याला सूचना पाठवतिल म्हणून टर्म्स ऑफ रेफरेन्स ठरविण्यासाठी जलप्रतिनिधीचा सहभाग आवश्यक आहे. हे त्याच्यामध्ये घेतले पाहिजे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त येणा-या एक महिन्याच्या आत किंवा पंधरा दिवसांच्या आत मुंबईच्या सर्व नगरसेवक व आमदारांच्या सोबत बसून टर्म्स ऑफ रेफरेन्सच्या संदर्भात त्याच्याकडून माहिती घेणार का ? माझा दुसरा प्रश्न फ्लो मीटरबाबतचा आहे. फ्लो मीटर बसविण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. प्रत्येक झोनमध्ये टेलिस्कोपीक मीटर बसविणार का ? जेवढी वीज वापरतो तेवढे त्याचे बिल भरतो. गाडीमध्ये जेवढे पेट्रोल टाकतो तेवढे किलो मीटर गाडी धावते. पाण्यासाठी अशी काही व्यवस्था नाही. म्हणून वापरेल तेवढे जल आकार याबाबत मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना सांगून पुढच्या टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये सक्तीने सामिल करण्याचे काम हे शासन करणार आहे का ?

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मी बी.कॉम. केलेले नाही. त्याच्यामुळे माझे गणित चुकीचे असू शकते. ज्या ज्या सूचना सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी दिल्या आहेत, त्याबाबत आयुक्तांना अशा सूचना देण्यात येतील की दोन्ही सभागृहात मुंबईशी संबंधीत जे सन्माननीय सदस्य आहेत, त्यांच्या ज्या काही सूचना असतील त्या लेखी स्वरुपात घ्याव्यात. टर्म्स ऑफ रेफरन्स करताना त्याचा देखील विचार त्यांनी करावा अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील. इतर दोन बाबी सांगितल्या त्या रोड मॅपचा भाग असणार आहे. त्यामुळे सायलोजमध्ये काम करण्याच्या ऐवजी एकत्रितपणे एकात्मिक काम करण्याचा प्रयत्न करु.

AA-1...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, मुंबई शहराचा उल्लेख स्मार्ट सिटी म्हणून मुख्यमंत्री महोदय करीत आहेत. मुंबई शहराकडे जागतिक दर्जाचे शहर म्हणून आपण बघत आहोत व येथील इन्फ्रास्ट्रक्चर वाढवत आहोत. मुंबई शहरात 24x7 पाणी देण्याचे महानगरपालिकेचे धोरण आहे. यापूर्वीचे सरकार व मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केल्याप्रमाणे महानगरपालिकेने अंमलबजावणी केलेली आहे. 24x7 अंतर्गत पूर्ण मुंबई शहराला पाण्ी देण्याबाबतचे धोरण कधीपर्यत पूर्ण होणार आहे, आज फक्त बांद्रा व मुलूंड येथे असे पाणी आपण देत आहोत. उर्वरित भागासाठी महानगरपालिकेने कोणती यंत्रणा उभारली आहे, हे काम कधीपर्यत पूर्ण होणार आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारला आहे. मला वाटते की, आता जो कंपोनंट घेण्यात आलेला आहे तो विशिष्ट भागापुरताच घेण्यात आलेला आहे, याचा मुंबईमध्ये विस्तार करण्यात आलेला नाही. आपण सूचना केली आहे त्याप्रमाणे त्यांना दोन महिन्यात रोडमॅप करण्यासाठी सांगत आहोत. त्यामध्ये याचा समावेश करण्यात येईल. 24x7 हे पॅन मुंबईमध्ये करण्यासाठी कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना मुंबई महानगरपालिकेला देण्यात येतील.

श्री.राम कदम : अध्यक्ष महोदय, मी मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. मुंबई शहरात पाण्याची भीषण समस्या असून माननीय मुख्यमंत्री त्यावर उत्तर देत आहेत. मी सदनात येथे बसलेलो असताना घाटकोपर विभागातील महिलांनी हंडा मोर्चा काढला आहे. मला मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, आपण मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय शहर मानतो. या मुंबई शहरातील घाटकोपर येथे पाणी येण्याची वेळ मध्यरात्री 12 वाजता आहे. शेजारच्या वार्डात पाणी येण्याची वेळ मध्यरात्री 1 वाजता आहे. त्याच्या आजूबाजूला पहाटे 2 वाजता, 3 वाजता व 4 वाजता पाणी येते. अशा पाण्याच्या वेळा आहेत. या भागातील लोक दुसऱ्यांच्या घरी जाऊन काम करतात. तसेच तेथे दुसऱ्यांच्या घरी जाऊन काम करणाऱ्या महिला आहेत. जेथे मध्यरात्री 2 ची पाणी येण्याची वेळ आहे तेथेही त्यावेळेस पाणी येत नाही. मला मान्य आहे की, पाणी कमी आहे. पण हे कमी पाणीसुध्दा वेळेवर दिले जात नाही. हे पाणी दिवसा दिले गेले पाहिजे. ही सातत्याने 6 वर्षांपासून मागणी असूनसुध्दा मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी यावर दुर्लक्ष केलेले आहे हा एक भाग आहे. दुसरा भाग असा आहे की, घाटकोपरमधील अनेक

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राम कदम.....

ठिकाणी लोकांना पाण्यासाठी 2-3 फुटाचा खड्डा खोदावा लागतो. याप्रमाणे लोक त्या खड्डयामध्ये जमा झालेले पाणी वाटीने भरुन घेतात इतकी भीषण अवस्था आहे. मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, या दोन्ही बाबतीत पहावे. मुंबई महानगरपालिकेने येथील प्रत्येक भागात पाणी देणे भाग होते. ते पाणी न दिल्यामुळे लोकांना अशा भीषण पध्दतीने सामना करावा लागतो. माननीय मुख्यमंत्री संबंधित अधिकाऱ्यांना वेळेवर व मुबलक पाणी मिळावे असे निर्देश देतील काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या परिस्थितीबाबत निश्चितपणे कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश देण्यात येतील. आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, मुळामध्ये मुंबई महानगरपालिका किंवा आपली इतर शहरे बघितली तर लक्षात येईल की, पाण्याचे ऑगमन्टेशन हा प्रॉब्लेम नसून डिस्ट्रीब्युशन हा प्रॉब्लेम आहे. आपण डिस्ट्रीब्युशनबाबत चांगला रोडमॅप तयार केला पाहिजे. मी केवळ उदाहरण म्हणून सांगतो की, नागपूर शहरात प्रती माणसी पाण्याची उपलब्धता किती आहे याचा आढावा घेतल्यावर लक्षात आले की, सिंगापूरपेक्षा जास्त पाणी नागपूर शहराला प्रती माणसी उपलब्ध होते. पण सिंगापूरमध्ये 24x7 पाणी उपलब्ध होते. नागपूरलाही 24x7 पाणी उपलब्ध होण्याकरिता योजना केली असून तेथे ज्यावेळी पहिला झोन झाला, त्या झोनमध्ये पाण्याचा सप्लाय न वाढविता, ॲडीशनल पाणी न घेता, तेथे 24x7 पाणी देता आले व त्या पाण्याचा एवढा फोर्स आहे की तिसऱ्या मजल्यापर्यत पाणी मोटारशिवाय चढू शकते. आज आपण ऑगमन्टेशनवर जेवढा जोर देतो तेवढा डिस्ट्रीब्युशनवर देत नाही. डिस्ट्रीब्युशनवर आपण इन्व्हेस्टमेंट करीत नाही. पाणी असूनही काही ठिकाणी रात्री पाणी द्यावे लागते, काही ठिकाण्ी नीट पाणी मिळत नाही. मला वाटते की, मुंबई सारख्या शहरात आपण जो रोडमॅप तयार करण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये डिस्ट्रीब्युशनचे नेटवर्क तयार करणे, स्मार्ट नेटवर्क तयार करणे या गोष्टीवर आपण भर दिला तर यावर कायमस्वरुपी सोल्युशन निघू शकेल. तशा प्रकारच्या सूचना महानगरपालिकेला देण्यात येतील.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश सुर्वे : अध्यक्ष महोदय, पाण्याची समस्या खूप भीषण आहे, मुंबईमध्ये वाहनांची संख्या मोठी आहे. दररोज एक चार चाकी वाहन धुण्यास किमान 15 लीटर पाणी लागते. दुचाकी वाहन धुण्यास किमान 7 लीटर पाणी लागते. प्रत्येक शहरामध्ये ही वाहने आठवडयातून एकदा किंवा तीन दिवसातून एकदा धुतली गेली तर आपले लाखो लीटर पाणी वाचू शकते. याबाबत माननीय मुख्यमंत्री काही निर्णय घेणार आहेत का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे मांडलेला मुद्दा अतिशय योग्य आहे. येथे लोकांना आंघोळीला पाणी नाही पण वाहनांना रोज आंघोळ घालतात हे योग्य नाही. त्यामुळे पिण्याच्या पाण्याने लोकांनी वाहनांना आंघोळ घालू नये असे आवाहन महानगरपालिकेने केलेले आहे. ते आवाहन पुन्हा करण्यात येईल व अशा गोष्टींकरिता किमान पाणी वापरण्याच्या सूचना देण्यात येतील.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** मुंबई उपनगरातील भांडूपगाव, कांजूरगाव व नाहूरगाव येथील 480 एकराहून अधिक जमीन शासनाने खोतांना भाडेपट्टयावर दिलेल्या असणे

**मु. शी. :** मुंबई उपनगरातील भांडूपगाव, कांजूरगाव व नाहूरगाव येथील 480 एकराहून अधिक जमीन शासनाने खोतांना भाडेपट्टयावर दिलेल्या असणे या विषयावर श्री.अशोक पाटील, श्री.अबु आजमी, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई उपनगरातील भांडूपगाव, कांजूरगाव व नाहूरगाव या गावातील ४८० एकरहून अधिक शासकीय जमिनीचा अपहार होऊन शासनाला मिळणाऱ्या महसूलाचा होत असलेला तोटा, सदर जमिनी शासनाने खोतांना भाडेपट्टयावर दिलेल्या असणे, सदर जमिनीचा ७/१२, प्रॉपर्टी कार्ड आणि इतर शासकीय दस्तऐवज यामध्ये मालक म्हणून शासनाचे नाव लावणे गरजेचे असतांनाही याबाबतची कोणतीही कार्यवाही शासनाने अद्याप न करणे, रेकार्ड ऑफ राइट्स मध्ये शासनाचे नाव लागल्यास शासनाकडे अब्जावधी रुपयांचा महसूल जमा होणे, शासनाने याबाबतचा व्यवहार रेडी रेकनरप्रमाणे जमिनीची मूळ किंमत बाजारभावाप्रमाणे लावून अधिक महसूल जमा होणे शक्य झाले असते, तसेच सदर जमीनी शासनाने भाडेपट्टा संपल्यानंतर तात्काळ ताब्यात घेतल्यास या जमिनीचा शासनाला विविध लोकोपयोगी सुविधा निर्माण करता येवू शकणे मुंबईतील झोपडपट्ट्यांची पुर्नविकास या जागेवर करता येवू शकत असतांना शासनाने सदर खोती जमिनीबाबत केलेले दुर्लक्ष, परिणामी सदर जमीनी शासनाच्या ताब्यातून जाण्याची निर्माण झालेली स्थिती, याप्रकरणी शासनाने तातडीने सक्षम यंत्रणा नेमून उपाययोजना करण्याची आवश्यकता, सदर जमीनी विनाविलंब खोतांकडून ताब्यात घेण्याची शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

.....५



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

....6

श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : अध्यक्ष महोदय, भांडूप, कांजूरमार्ग व नाहूर येथे 480 एकराहून अधिक जमीन खोती म्हणून घोषित झालेली आहे. याबाबतचा 150 वर्षाचे रेकॉर्ड मी नागपूर अधिवेशनात आपल्याकडे सादर केलेले होते. इंग्रजांच्या काळापासून महसूल जमा करणारी ही मंडळी कालांतराने मालक म्हणून दाखवायला लागली. त्यामुळे भांडूप परिसरात झोपडपट्टीचा विकास होताना अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. कारण या खोतांच्या रुपाने दीडशे वर्षात अनेक मालक तयार झालेले आहेत. थोडयाशा पैशासाठी कोणाला तरी राईटस दिले गेले. एसआरए किंवा डेव्हलपमेंटच्या माध्यमातून त्या जागा डेव्हलप करण्यासाठी घेतल्या आहेत. एका जागेचे, एका सीटीएस नंबरचे चार-चार मालक कोर्टात जाऊन ही कामे थांबवायला लागले. त्यामुळे भांडूप परिसरात झोपडपट्टी डेव्हलप होणे अतिशय त्रासदायक झालेले आहे. माझे प्रामुख्याने चार प्रश्न आहेत. भांडूप, नाहूर, कांजूर, हरियाली येथे असलेल्या खोती जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पुनर्विकासाची किती कामे सुरु आहेत, सदर कामे अपूर्ण राहण्याची कारणे कोणती, सदर कामे करणाऱ्या विकासकावर खोती मालकांनी कोणते आक्षेप घेतले आहेत व त्याची सद्यस्थिती काय आहे ? मौजे भांडूप, कांजूर, हरियाली व नाहूर येथील खोती जमिनीवर झोपडपट्टीचा पुनर्विकास मालक करीत नसतील तर अशा जमिनीवर झोपडपट्टी पुनर्विकासाचे काम प्राधिकरणाने हाती घेतले असेल अशा जमीनी शासनाने संपादीत करण्याबाबत आतापर्यंत कोणती कार्यवाही केलेली आहे ? याची सद्यस्थितीची माहिती मला देण्यात यावी ही विनंती.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, मुळ प्रश्नाला सोडून हे सर्व प्रश्न आहेत. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचा लक्षवेधी सूचनेशी दूरान्वये संबंध नाही. पण त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची मी उत्तरे देऊ शकतो. 480 एकर जमीन खोतांच्या नावे लावली आहे असा त्यांचा खरा आक्षेप आहे. पण ही वस्तुस्थिती नाही. मुंबई उपनगरामधील भांडूपगाव, कांजूरगाव व नाहूरगाव ता.कुर्ला, जि.मुंबई उपनगर मध्ये या गावची कोणतीही शासकीय जमीन खोतांना भाडेपट्टयाने दिल्याचे दिसून येत नाही. भांडूपमधील सर्व्हे नंबर 49 मधील 208 एकर 15 गुंठे या जमिनीवर प्रतापसिंह सुरजी वल्लभदास व इतर खोतांच्या नावे असल्याची नोंद आहे. तसेच कांजूर

.....7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे .....

येथील फेरफार क्रमांक 22 दिनांक 28.4.1961 पाहता भांडूपमधील खोत प्रतापसिंह सुरजी वल्लभदास व इतर यांचे नावे एकूण 21 सर्व्हे नंबर मधील 85 एकर 30 गुंठे या जमिनी दाखल झालेल्या आहेत. सर महोम्मद युसुफ खोत यांच्या नावे सर्व्हे क्रमांक 19 मधील 65 एकर 12 गुंठे 8 आणे या जमिनी दाखल आहेत. नाहूर येथील सर्व्हे क्रमांक 40 मधील 60 एकर 29 गुंठे 3 आणे या जमिनीवर गाव नं.7/12 ला कब्जेदार सदरी प्रतापसिंह सुरजी वल्लभदास व इतर यांची नावे आज रोजी दाखल आहेत. तथापि महसूल अभिलेख पाहता, त्यामध्ये सदर खातेदार यांनी जमीन खोत म्हणून धारण केल्याची नोंद आढळून येत नाही. या जमिनी मधल्या कालखंडात सरकार जमा केल्या होत्या.

यानंतर बीबी-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

त्या सरकारजमा केल्यानंतर उच्च न्यायालयात अपील दाखल केले गेले. उच्च न्यायालयाने त्या संदर्भात भांडूप येथील खोत जमिनींच्या संदर्भात फेरफार क्रमांक 403 दिनांक 15.10.1959 ला जिल्हाधिकारी उपनगर यांनी दिनांक 27.11.1953 या आदेशान्वये 49 सर्व्हे नंबरपैकी 29 सर्व्हे नंबर या एकंदरीत सर्व जमिनीसंदर्भात 25 गुंठे 8 आणे 49 सर्व्हेनंबरमधील व 29 सर्व्हेनंबरमधील 193 एकर मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या सूट क्रमांक 831/1954 मध्ये दिनांक 19.9.1963 रोजी कन्सेंट झाला. याबाबत कोर्टामध्ये समझोता झाला त्यानुसार जमिनी आहेत त्या खोतांच्या नावाला परत लावण्यात आलेल्या आहेत. सरकारचे असलेले वेसलॅण्डची नोंद हायकोर्टामध्ये कन्सेंट झाल्यामुळे रद्द करण्यात आलेली आहे.

श्री.अशोक पाटील : अध्यक्ष महोदय,मंत्री महोदयांनी असे म्हटले की, प्रश्नाचा काही संबंध नाही. आज या परिसरात झोपडपट्टीमध्ये एसआरएच्या माध्यमातून कोणताही विकास होत नाही. या खोतानी अधिकार नसतानाही परस्पर व्यवहार केल्यामुळे अनेक मालक तयार झाले. विकास केल्यानंतर तेथे स्टे आणला जात आहे. यामुळे 20 माळयांच्या इमारतींची कामे थांबलेली आहेत. नवीन सरकार आल्यानंतर घोषणा ऐकली की, मुंबईतील खोती नष्ट करण्यात येईल. कायद्याने खोती नष्ट झालेली असताना पुन्हा त्याचा वापर होत आहे. यामुळे विकास थांबलेला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अशोक पाटील सांगत आहेत, ते तपासून पाहण्यात येईल. काही जमिनी खोतांच्या नावाच्या आहेत. न्यायालयात समझोता झाल्यानुसार त्यांना देण्यात आलेल्या आहेत. समझोता कराराप्रमाणे उक्त कायद्याच्या तरतुदीनुसार सरकार जमा केलेल्या जमिनी पुन्हा खोतांच्या नावावर करण्यात आल्याचे दिसून येते. परंतु वरील पार्श्वभूमीवर संबंधित जमिनींवरील खोतांची नावे कमी करून पुन्हा शासनाकडे जमिनी येतील का? याबाबत कायदेशीर सल्ला घेऊन त्यातून काही कायदेशीर मार्ग निघत असेल तर हा विषय पुन्हा न्यायालयात दाखल करण्यात येईल. या जमिनी परतशासनाकडे कशा येतील, याबाबत शासन प्रयत्न करेल. एसआरए संदर्भात कार्यवाही करीत असताना आज या जमिनीशासनाच्या नाहीत. न्यायालयाच्या आदेशामुळे न्यायालयामध्ये ठरल्याप्रमाणे काही ठिकाणी या जमिनी खोतांच्या नावावर दिसत आहेत.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

याबाबतचा कोणताही निर्णय त्यांच्या सहमतीनेच घेतला गेला पाहिजे. शासनाच्या जमिनीवर झ ोपडपट्टया असतील तर एसआरए संदर्भात या जमिनींची शासन तपासणी करुन योग्य तो निर्णय घेईल.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माननीय महसूलमंत्री यांनी स्पष्ट उत्तर दिलेले आहे. या संदर्भात गृहनिर्माण मंत्री यांच्याकडेही ही लक्षवेधी सूचना गेली असती तर अधिक उत्तर स्पष्ट आले असते अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा असेल. हे खरे आहे की, कोर्टाच्या आदेशाप्रमाणे कन्सेंटम झाले, त्यामुळे ती जमीन परत खोताच्या नावावर झाली. मूळ प्रश्न लक्षवेधीच्या शेवटच्या पॅरामध्ये आहे. मुंबईतील एसआरए योजना या जागेवर राबविता येऊ शकत असताना ती संबंधित जमीन खोतांच्या नावावर गेल्यामुळे वर्षानुवर्षे तेथील झोपडपट्टी सॉल्सेट-शासन-कन्सेंट-खोत या भानगडीमध्ये अडकलेली आहे. त्या झोपडपट्टीतील लोकांना काय हवे आहे की, आमच्या घरांचा पुर्नविकास झाला पाहिजे. माननीय मंत्री महोदयांना माझी विंनती आहे की, आपण वरिष्ठ मंत्री आहात, याचे उत्तर देऊ शकता. आपण याचे द्यावे अशी अपेक्षा आहे. ही संबंधित जमीन या खोतांच्या नावावर असली तरी एसआरए पब्लिक पर्पज स्कीम आहे. खाजगी मालकीची जागा देखील एसआरएअंतर्गत संपादित करण्याचा अधिकार शासनाला आहे. या प्रकरणामध्ये तुमचे कन्सेंटम भलेही झाले असतील, तरीही एसआरए योजनेबाबत विचार करणे आवश्यक आहे. ती संबंधित जमीन खोताच्या नावावर असताना स्लम रिडेव्हलपमेंट ही पब्लिक पर्पज स्कीम आहे. एसआरए स्कीमकरिता जमीन ॲक्वायर करण्यासाठी व संबंधित नागरिकांना न्याय देण्याकरिता शासन योग्य निर्णय घेऊन एसआरएला निर्देश देईल का ?

श्री.एकनाथराव खडसे: अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना योग्य आहे. यासंदर्भात काही ठिकाणी शासनाने संपादन प्रोसिडींग सुरु केलेली आहे. या ठिकाणी ही अशी जमीन मोठया प्रमाणात आहे. या जमिनीच्या संदर्भामध्ये कन्सेंटमनुसार काही जमिनी खोतांना परत दिलेल्या आहेत. या संदर्भात जेथे सहमती आहे, त्या ठिकाणी आणि ज्या ठिकाणी नाही, त्याही ठिकाणी अशा स्वरुपाच्या संदर्भात ॲक्विझिशन प्रोसिडिंग सुरु केलेले आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

ज्या ठिकाणी अशा स्व्रुपाचे प्रोसिडींग सुरु आहे, त्या ठिकाणी एसआरए करण्यास शासन परवानगी देईल. अन्य ठिकाणी या संदर्भात संपादन प्रक्रिया सुरु करुन कायद्याच्या चौकटीत बसत असेल तर अशा स्वरुपाची एसआरए योजना राबवून नागरिकांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात निर्णय शासन घेईल.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: महावितरण व महापारेषण या शासकीय कंपन्यांना विविध योजनांतर्गत मंजूर प्रकल्पातील विद्युत पायाभूत सुविधासांठी शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत.

**मु.शी.**: महावितरण व महापारेषण या शासकीय कंपन्यांना विविध योजनांतर्गत मंजूर प्रकल्पातील विद्युत पायाभूत सुविधासांठी शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्यायासंबंधी माननीय ऊर्जामंत्री यांचे निवेदन

श्री.चंद्रशेखर बावनकुळे ( ऊर्जामंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो.

( प्रेस: येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: म्हाडाकडून अचानक वाढीव रकमेच्या होत असलेल्या मागणीमुळे सदनिकाधारक आर्थिक संकटात येणे.

**मु.शी.**: म्हाडाकडून अचानक वाढीव रकमेच्या होत असलेल्या मागणीमुळे सदनिकाधारक आर्थिक संकटात येणे.

यासंबंधी सर्वश्री राजेश क्षीरसागर, सत्यजित पाटील, शंभुराज देसाई,प्रकाश आबिटकर, राजाभाऊ वाजे, डॉ.संजय रायमुलकर, डॉ.बालाजी किणीकर, श्री.वैभव नाईक, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.राजेश क्षीरसागर ( कोल्हापूर उत्तर ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने (म्हाडा) मुंबईतील उच्च उत्पन्न गटाकरिता जाहीरात प्रसिद्ध करून सोडत काढण्यात येणे, संकेत क्र.२५७ मधील इमारत क्र.२३ डी या योजनेमध्ये "एम.पी./एम.एल.ए." प्रवर्गामधून लोकप्रतिनिधींसह अनेक व्यक्ती पात्र ठरलेल्या असणे, याच योजनेसह २३ ई या तयार इमारतीमधील गाळे म्हाडाकडून लाभार्थ्यांना वितरीत करण्यात येणे, सोडतीमध्ये पात्र झालेल्या सदनिकाधारकाकडून सदनिकेची अनामत रक्कम ३४,७५,०००/- एवढी भरणा करावयाची असणे, गृह कर्जाकरिता ना हरकत प्रमाणपत्र देखील देण्यात येणे, जाहिरातीमध्ये नमूद केल्यानुसार गाळ्यांच्या किमतीची पूर्ण रक्कम ५५ टक्के लाभार्थींनी म्हाडास दिलेली असणे, त्यानंतर पाच महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतर गाळ्यांचा ताबा मिळत नाही म्हणून लाभार्थ्यांनी संबंधिताकडे विचारणा केली असता सदनिकेची रक्कम ३४,७५,०००/- वरुन ४९,८३,८८६/- झाली असल्याचे कळविण्यात येणे, तब्बल १५,०८,०००/- लाखाने रक्कमेत वाढ झाल्यामुळे सदनिकाधारकांमध्ये निर्माण झालेली चिंता, सदनिकाधारकांनी आधीच गृहकर्ज काढून सदनिकेची रक्कम म्हाडाकडे अदा केली असून त्याकरिता येणारा मासिक हप्ता व्याजासह भरणा करणे सुरु असणे, असे असतांना अचानक या रक्कमेत झ ालेली १५ लाखांची वाढ करण्यामागे कोणतेही ठोस कारण म्हाडाकडून न मिळणे,

....६



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***श्री.राजेश क्षीरसागर.....***

सदर वाढीव रक्कमेची तरतूद सदनिकाधारकांकडून अचानकपणे होऊ न शकणे, म्हाडाकडून अचानक वाढीव रकमेच्या होत असलेल्या मागणीमुळे सदनिकाधारक आर्थिक संकटात येणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून वाढीव रकमेबाबत फेरविचार करुन सदरहू वाढीव रक्कम रद्द करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." श्री.रविंद्र वायकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

.....7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेश क्षिरसागर : अध्यक्ष महोदय, म्हाडाने एप्रिल,2011 मध्ये मुंबईतील उच्च उत्पन्न गटाकरिता सदनिकेची जाहिरात प्रसिध्द केली होती. मे,2011 मध्ये या सदनिकेकरिता लॉटरी पध्दतीने सोडत काढण्यात आली होती. या सोडतीमध्ये माझ्यासह राज्यातील अनेक सदनिकाधारक उच्च उत्पन्न गआमधून पात्र ठरली होती. या सदनिकेसाठी म्हाडाने इमारत बांधून तयार झाल्यानंतर त्याची 34,75,000 अशी किंमत ठरवून वर्तमानपत्रामधून जाहिरात दिली होती. सोडतीमध्ये पात्र ठरणा-या सदनिकाधारकांना दिनांक 8.6.2011 रोजी प्रथम सूचना पत्र प्राप्त झाले. दिनांक 9.11.2011 रोजी तात्पुरते देकार पत्र प्राप्त झाले. दिनांक 20.12.2011 रोजी सदनिकाधारकाकरिता गृहकर्जाकरिता एनओसी दिली स्वतःचे दागदागिने विकून जुनी घरे विकून जोडणी करुन पैशांची दिनांक 20.1.2012 रोजी सदनिकेची पूर्ण रक्कम अदा केली. पूर्ण रक्कम अदा केल्यानंतर या सदनिकेचा ताबा मिळविण्यासाठी आम्ही पाठपुरावा करीत होतो. तब्बल सहा महिन्यांनी या म्हाडाच्या अधिका-यांना साक्षात्कार झाला आणि सदनिकेची किंमत 49,83,883 इतकी म्हणजे 15 लाखाने ही किंमत वाढविण्यात आलेली आहे. काही वेळा अधिकारी चुकीच्या पध्दतीची उत्तरे देतात. आज देखील चुकीचे उत्तर दिलेले आहे. ती रक्कम भरल्यानंतर ताबा देण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. किमान 70-80 कुटुंबे यामुळे बाधित झालेले आहेत. विकासक आणि अधिका-यांनी या ठिकाणी संगनमत करुन मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. सोडतीच्या वाटपाप्रमाणे किंमत वाढू शकते, असे त्यामध्ये दिले होते. परंतु सदनिकेची किंमत 5-10 टक्के वाढली तर ठीक आहे. या सदनिकेची किंमत तब्बल 48 टक्क्यांनी वाढलेली आहे.

सीसी-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजेश क्षीरसागर.......

दर कसे वाढले, यासंदर्भात मी म्हाडाला पत्र दिले होते. म्हाडाने टीडीआर खरेदी केला असे उत्तर दिले होते. सन 2009 मध्ये टीडीआर घेऊन परवाना घेतल्यानंतर इमारत बांधलेली आहे. त्यामध्ये कन्सील वायरिंग, ॲटोमॅटिक डिव्हाईस, इम्प्रुव्ह स्पेसिफिकेशन दिल्याबाबतची माहिती आहे. यामध्ये किती मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते हा देखील एक प्रश्न निर्माण झालेला आहे. श्री. कुलकर्णी हे सदनिकाधारक असून, त्यांना नुकतेच 40 हजार रुपयांचे वेतन मिळण्यास सुरुवात झालेली होती. ते एचआयजी ग्रुपमध्ये गेल्यानंतर सदनिका मिळण्यासाठी त्यांनी अर्ज केलेला होता. श्री. कुलकर्णी यांना आज अत्यंत वाईट परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येत आहे. मंत्री महोदय, संवेदनशील आहेत. झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी समिती नेमून संबंधित रक्कम सदनिकाधारकांना निश्चित कालावधीत परत मिळवून दिली जाईल काय ? सदर भ्रष्टाचारामध्ये संबंधित अधिकारी आणि विकासकांच्या विरोधात कोणती कारवाई करणार ? भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत याकरिता शासनाचे कोणते धोरण असणार आहे ?

श्री. रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, मे, 2004 च्या सोडतीमध्ये संकेत क्रमांक 257, इमारत क्रमांक 23 व 23-ई, पवई येथील गाळ्यांची जाहीरात देण्यात आली होती. त्यानुसार 110 गाळ्यांची लॉटरी काढण्यात आली आणि त्यानंतर 102 गाळ्यांचे वितरण करण्यात आले होते. गाळ्यांची सर्व किंमत म्हाडाला दिलेली आहे. सन 2006 मध्ये बांधकाम सुरु होऊन ते सन 2011 मध्ये पूर्ण झाले होते. त्यावेळी लॉटरी काढली होती. त्यामध्ये एक अट होती. सदर अटीमध्ये बाजार भावात वाढ झाली तर व्हेरिएशन होऊ शकते, असे नमूद केले होते. बांधकाम साहित्यामध्ये सन 2006 ते सन 2011 मध्ये झालेली 34 लाख 75 हजार रुपयांची किंमत, ही 49 लाख 83 हजार 886 झाल्याने ती समाविष्ट केली होती. सन्माननीय सदस्यांनी चौकशी करण्याची मागणी केलेली असून, निश्चितपणे त्यांनी केलेल्या मागणीनुसार चौकशी करुन योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे.

.......2.....

श्री. राजेश क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, दर कसे वाढले, यासंदर्भात मी म्हाडाला पत्र दिले होते. म्हाडाने टीडीआर वाढलेला आहे असे उत्तर दिले होते. सन 2009 मध्ये टीडीआर घेऊन परवाना घेतल्यानंतर इमारत बांधलेली आहे. त्यामध्ये कन्सील वायरिंग, ॲटोमॅटिक डिव्हाईस, इम्प्रुव्ह स्पेसिफिकेशनमुळे दर वाढलेला होता. मंत्री महोदयांना जो प्रश्न विचारला होता, त्याचे उत्तर न देता त्यांनी बांधकाम साहित्यात झालेली दरवाढ, सुधारित गुणवत्ता बाबीमध्ये इम्प्रुव्ह स्पेसिफिकेशन्स ॲल्युमिनियम विंडोची किंमत 1 लाख 65 हजार झाल्याबाबत उत्तर दिलेले आहे. पूर्वी विंडो देणार नव्हते काय ? वाढीव कालावधील व्याज आम्ही का म्हणून भरायचे, आमचा दोष काय आहे ? अशा प्रकारे आमच्यावर अन्याय झालेला आहे. नफा देखील आमच्याकडून घेतलेला आहे. माझी दोन्ही मंत्री महोदयांना विनंती आहे. मंत्री महोदय संवेदनशील आहेत. लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. इम्प्रुव्ह स्पेसिफिकेशन्स ॲल्युमिनियम विंडोची वाढीव किंमत 1 लाख 65 तसेच वाढीव व्याज 73 हजार आणि वाढीव किंमतीवरील नफा अशा प्रकारे 5 लाख 50 हजार रुपये कमी केल्याची घोषणा मंत्री महोदय करतील काय ?

श्री. रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, बांधकाम साहित्यामध्ये वाढ झालेली असून ती खरी गोष्ट आहे. त्यामुळे 8 लाख 91 हजार 420 एवढी रक्कम ॲड झालेली आहे. पहिल्या प्रथम टेंडरमध्ये ॲल्युमिनियम विंडो घेण्यात आलेल्या नव्हत्या. त्यामुळे हे काम ॲडिशनल केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी वाढीव कालावधीतील व्याज आकारणीबाबत माहिती दिलेली आहे. 73 हजार 916 आणि वाढीव किंमतीमधील नफा 3 लाख 78 हजार 550 इतक आहे. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे, त्यानुसार उपरोक्त वाढीच्या संदर्भात जो अधिकचा खर्च झालेला असेल तर त्याबाबत काहीही करता येणार नाही. पण वाढीव कामाबाबात व्याज आकारणी आणि वाढीव किंमतीमधील नफा 73 हजार 916 रुपये आणि 3 लाख 78 हजार 550 असे मिळून 4 लाख 52 हजार 462 रुपयांबाबत नक्कीच निर्णय घेऊन तो माफ केला जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. सुजित मिणचेकर : अध्यक्ष महोदय, ज्यावेळी सदनिकेची जाहीरात येते, त्यावेळी स्पेसिफिकेशनसह जाहीरात प्रसिध्द होते. तद्नंतर ग्राहकांकडून अर्ज भरण्याची कार्यवाही केली जाते. इम्प्रुव्ह स्पेसिफिकेशन्स ॲल्युमिनियम विंडोचे पैस दिले नव्हते. असे असेल तर विंडाऐवजी दुसरी कोणती तरी दुसरी तरतूद केलेली असणार आहे. आताच नव्याने ॲल्युमिनियम विंडो दिल्या जात आहे. हा अतिरिक्त खर्च कशासाठी वाढविला, याचे उत्तर मंत्री महोदयांनी सदनाला देण्याची आवश्यकता आहे.

श्री. रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, ज्यावेळी स्पेसिफिकेशन होते, त्यावेळी ॲल्युमिनियम विंडो नव्हती. फक्त लोखंडी बार होते. ग्राहकांनी मागणी केल्यानंतर आर्किटेक्टने तसा प्लॅन तयार करुन ॲल्युमिनियम विंडो ॲड केली होती. याचाच खर्च लावलेला आहे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न वेगळा असला तरी तो म्हाडाशी संबंधित असून, तो अतिशय महत्वाचा आहे. सन 2008-2009 मध्ये आमदारांसाठी राजयोग सोसायटी स्थापन केली होती. माननीय परिवहन मंत्री श्री. दिवाकर रावते हे त्यावेळी काही काळासाठी सोसायटीचे अध्यक्ष होते. त्यावेळी जी रक्कम सांगितली होती, तेवढी रक्कम सर्वांनी भरलेली होती. आता आम्हाला नोटीसेसद्वारे त्यावेळी भरलेली रक्कम चुकीच्या पध्दतीने कमी दाखविली असल्यामुळे 1 लाख 60 हजार अधिकची रक्कम आणि त्यावर 1 लाख 97 हजार व्याज भरण्याबाबत सांगितले आहे. अशा प्रकारे म्हाडा चुकीच्या पध्दतीने सदनिकाधारकांना त्रास देत असेल तर मंत्री महोदयांनी जसा निर्णय सन्माननीय सदस्य श्री. राजेश क्षीरसागर यांच्या बाबतीत घेतला, तसाच राजयोग सोसायटीच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेतील काय ?

श्री. रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य आणि माजी मंत्री श्री. भास्कर जाधव यांनी योग्य प्रश्न विचारलेला आहे. यामध्ये चुका झालेल्या असतील तर त्या रेक्टिफाय केल्या जातील.

श्री. प्रकाश सुर्वे : अध्यक्ष महोदय, मी लहानाचा मोठा ज्या ठिकाणी झालेलो आहे, त्या ठिकाणच्या लोकांनी मला आमदार करुन विधानसभेत प्रश्न सोडविण्यासाठी पाठविलेले आहे. माझ्या मतदारसंघात अष्टविनायक गृहनिर्माण सोसायटी असून, ती गेल्या 30 वर्षापासून अस्तित्वात आहे.

....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश सुर्वे.......

1.2 एफएसआय असताना लेआऊट विकसित करण्यात आला. लोकांना घरे मिळतील अशा आशेमध्ये तेथील लोक होती. विकासक श्री. मंगेश सावंत याच्यावर भ्रष्टाचार, अपहरण, चिटिंग अशा प्रकारे एकूण 22 गुन्हे दाखल झालेले आहेत. विकासक श्री. मंगेश सावंत यांनी आमच्या लोकांना फसविलेले आहे. ही 20 वर्षापूर्वीची गोष्ट आहे. सन 2008 मध्ये नवीन कायदा संमत झाला होता. त्यावेळी 2.5 एफएसआय देण्याबाबत निर्णय झालेला होता. सदर एफएसआय अष्टविनायक गृहनिर्माण सोसायटीला मंजूर असताना विकासक श्री. मंगेश सावंत यांनी खोटी कागदपत्रे तयार करुन, पॉवर ऑफ ॲटर्नी बनविली होती. विकासक श्री. मंगेश सावंत यांनी सोयायटीमधील संबंधितांच्या स्वाक्षऱ्या स्वतःच केलेल्या होत्या. तसेच फेडरेशनच्या स्वाक्षऱ्या देखील त्यांनीच स्वतःच केलेल्या होत्या. तसेच त्यांनी रबर स्टॅम्पदेखील स्वहतःहून बनविले होते आणि ते म्हाडाकडे सबमिट केले होते. त्यानंतर म्हाडाने विकासक श्री. मंगेश सावंत यांना लेआऊट मंजूर केला होता.

DD-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश सुर्वे....

आम्ही कोर्टात गेलो. कोर्टाने आम्हाला आदेश दिला की, थर्ड पार्टी राईटस क्रियेट करु नयेत. कोर्टाने दुसरा आदेश दिला की, त्यांनी कोठल्याही परिस्थितीत हा ले-आऊट दुसरा कोणालाही देता कामा नये. आमचा ले-आऊट आम्हाला दिला पाहिजे. म्हाडाच्या मार्गदर्शक तत्वानुसार 70 टक्क्याच्या वर सभासदांच्या सह्या घेतल्या जाणार नाहीत तोपर्यंत विकासक त्या इमारतीचा विकास करू शकत नाही. कोर्टाचे आदेश, म्हाडाचे मार्गदर्शक तत्वे तसेच आर्किटेक्टचे अभिप्राय या सर्वांची पायमल्ली करुन सर्व नियम धाब्यावर बसवून म्हाडाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी पैशांचा अपहार केला आहे. ते लोक दोन, तीन दिवसापासून उपोषणाला बसलेले होते. सुप्रीम कोर्टाचे थर्ड पार्टी राईटस क्रियेट करु नयेत, असे आदेश असताना त्यांना पाच हजार रुपये दंड देखील करण्यात आला. तेथिल लोकांच्या जीविताचा हा प्रश्न आहे. माननीय हाय कोर्टाचे आदेश डावलून जैन विकासकाला तो ले-आऊट 150 कोटी रुपयांना विकला. आता परत दिवाण बिल्डरला विकून परवाच्या दिवशी त्याने बुकींग घेतली त्यांना 200 कोटी रुपयाला विकला. तो पैसे घेऊन गेला, परंतु त्याची कोर्ट केस आम्ही लढतो आहे. त्या लोकांकडून 100 रुपये गोळा करुन वकिलाची फी द्यावी लागते, अशाप्रकारे आम्ही ती केस लढतो आहे. पैसे ते घेऊन जाणार आणि केसेस आमच्या लोकांनी लढायच्या. ..(अडथळा)... मी नवीन आमदार आहे. आपण मला कृपया बोलू द्यावे....(अडथळा)... ठीक आहे. वेळ नसेल तर फक्त प्रश्न विचारतो. सदर मंगेश सावंत सायली डेव्हलपर्स यांनी बनावटरित्या तयार केलेली पॉवर ऑफ ॲटर्नीची तत्काळ चौकशी लावून आपण ती रद्द करणार काय? दुसरा प्रश्न बनावट पॉवर ऑफ ॲटर्नीच्या आधारे केलेला ट्रॅयपार्टी करारनामा रद्द करणार का? हाय कोर्टाचे आदेश आहेत. पाहिजे असेल तर मी वाचून दाखवितो. सदर 832 कुटुंबाना शासनाच्या धोरणाप्रमाणे तीन एफएसआयनुसार त्यांना हक्काचे घर मिळवून देणार का? सदर बनावट पॉवर ऑफ ॲटर्नी बनवून म्हाडाच्या अधिकाऱ्यांना फसवून संगनमताने 2.5, 3 एफएसआय पुनर्वसन राबविण्याकरिता भाग पाडले व बनावट पॉवर ऑफ ॲटर्नी खरी मानून न्यायालयात सादर केली. फेडरेशनचे खोटे रबर स्टॅम्प बनवून वापरले म्हणून सायली डेव्हलपर्सचे संचालक श्री.मंगेश सावंत, मनाली सावंत भारतीय दंड संहिता 1860 अन्वये, कलम

....2

ADB/ AKN/ MMP/ AKN/ MMP/ 14:50

श्री.प्रकाश सुर्वे....

420, 116, 167, 177,181, 182, 193, 197, 198, 200, 219, 465, 466, 468, 472, 473, 474, 475, 476 अन्वये त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणार आहात काय?

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष सन्माननीय सदस्य नवीन असले तरी व्यक्ती फार जुनी आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या लक्षवेधी सूचनेचा भाग नसला तरी या सभागृहाची परंपरा आणि सन्माननीय सदस्यांनी जी बातमी दिली, ती पूर्णपणे तपासून यासंबंधी मुख्यमंत्री महोदयांकडे या संपूर्ण विषयासंबंधी सर्वांची बैठक घेण्यात येईल आणि त्यानंतर त्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.प्रकाश सुर्वे : अध्यक्ष महाराज,..

**तालिका सभाध्यक्ष :** मंत्री महोदय, सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, किती दिवसात त्या लोकांना न्याय मिळणार आहे.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महाराज, मी सन्माननीय सदस्यांचा विषय आता ऐकून घेतला आहे. मी आजच मुख्यमंत्री महोदयांची या विषयाच्या अनुषंगाने वेळ मागणार आहे. लवकरात लवकर आठ दिवसात, दहा दिवसात मुख्यमंत्री महोदयांनी वेळ दिल्यानंतर ही बैठक लावण्यात येईल.

------

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**लक्षवेधी सूचना क्रमांक 7 संबंधी**

**तालिका सभाध्यक्ष :** मंत्री महोदयांना विधान परिषदेत जावयाचे असल्यामुळे आता आपण लक्षवेधी सूचना क्रमांक 7 चर्चेला घेऊ, त्यानंतर उर्वरित लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : राज्यातील बीड, येवला, मसवड, उस्मानाबाद, रत्नागिरी, अहमदपूर, संगमनेर आदि सात ठिकाणच्या बसस्थानकांची झालेली दुरवस्था

**मु. शी. :** राज्यातील बीड, येवला, मसवड, उस्मानाबाद, रत्नागिरी, अहमदपूर, संगमनेर आदि सात ठिकाणच्या बसस्थानकांची झालेली दुरवस्था यासंबंधी सर्वश्री राणाजगजिसिंह पाटील, जयदत्त क्षीरसागर, राहूल मोटे, राजेश टोपे, जयंत पाटील, छगन भुजबळ, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयदत्तर क्षीरसागर (बीड) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील बीड, येवला, मसवड, उस्मानाबाद, रत्नागिरी, अहमदपूर, संगमनेर आदि सात ठिकाणच्या बसस्थानकाच्या बीओटी तत्वावर केल्या जाणाऱ्या कामास प्रशासकीय मान्यता मिळलेली असणे, राज्य परिवहन महामंडळाशी कंत्राटदाराचे संपूर्ण करार पूर्ण केलेले असणे, केवळ शासनाच्या उदासिनतेमुळे विकासाचे चांगले प्रकल्प प्रलंबित राहणे, राज्यातील बसस्थानक नुतनीकरणाच्या कामास शासनाने स्थगिती देणे, पावसाळ्यात प्रवासी सुरक्षित रहावेत, त्यांना योग्य सुविधा मिळाव्यात यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून अद्यापपर्यंत कसल्याच उपाययोजना केलेल्या नसणे, निम्म्याहून अधिक बसगाड्या नादुरुस्त असणे, खराब वायपर, तुटलेल्या व लॉक झालेल्या खिडक्या, गळक्या बसगाड्यांमधून प्रवास करण्याची प्रवाशांवर आलेली वेळ, तिकिटात वाढ करुनही प्रवाशांना अपेक्षेप्रमाणे सोयीसुविधा न मिळणे, बसगाड्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणे, नादुरुस्त खिडक्यामुळे पावसाचे पाणी आत येणे, प्रवाशांना भिजत प्रवास करावा लागणे, ग्रामीण भागात जाणाऱ्या बसगाड्या नेहमीच कुठल्या ना कुठल्या समस्येत अडकणे, ग्रामीण भागातील प्रवाशांकडूनच एसटीला जादा उत्पन्न मिळत असतानाही सुविधा न देणे, बसगाड्या खराब होण्यास महामंडळच जबाबदार असणे, यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, या गंभीर बाबीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

..5



ADB/ AKN/ MMP/ AKN/ MMP/ 14:50

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर : अध्यक्ष महाराज, राज्यातील अनेक बसस्थानके ही 25 वर्षापूर्वीची जुनी झालेली आहेत. या ठिकाणचे बांधकाम अतिशय जीर्ण झालेले आहे, तेथे अस्वच्छता, दुर्गंधी पसरलेली आहे. प्रवाशांकरिता, वाहन चालकांकरिता कोठल्याही सोई सुविधा, विश्रामगृह, उपहारगृहाची सोय नाही. बीड, येवला, मसवड, उस्मानाबाद, रत्नागिरी, अहमदपूर आणि संगमनेर या सात ठिकाणच्या बस स्थानकांचा हा प्रश्न आहे. या बस स्थानकांचे विस्तारीकरण करणे, तेथे सर्व सुख सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून बीओटी तत्वावर टेंडर काढण्यात आले होते. सन 2013 साली ही प्रक्रिया सुरु झाली. प्रचलित कार्य पध्दतीप्रमाणे वर्क ऑर्डर दिली. त्यांनी पहिला प्रिमियम एस.टी. खात्याकडे भरलेला आहे. बीड बस स्थानक हे शहरातील मध्यवर्ती ठिकाण आहे. मंत्री महोदय श्री.रावते साहेब आपण तेथील संपर्क मंत्री आहात. बीड स्थानकातून दररोज पंधरा हजार प्रवासी प्रवास करतात. एसटी बसेसच्या दररोज 641 फेऱ्या होतात. सन 1960 मध्ये हे बस स्थानक बांधलेले असून तेथे केवळ 6 प्लेटफॉर्म आहेत. त्या बस स्थानकावर स्वच्छतागृह नाही, सर्व ठिकाणी खड्डे पडलेले आहेत तसेच परिसरात दुर्गंधी आहे. पिण्याच्या पाण्याची सोय नाही. या सर्व बाबींवर योग्य प्रकारे नियोजन व्हावे, यासाठी आम्ही पाठपुरावा करुन सदरचा प्रस्ताव बीओटी तत्वावर मंजूर करुन घेतला होता. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात दिले आहे की, काही तक्रारी आल्यामुळे तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे. ही तात्पुरती स्थगिती केव्हा उठविणार आहात? आपल्याला बीओटी तत्वावर डेव्हलप करायचे नसेल तर राज्य सरकार किंवा एस.टी महामंडळाने स्वत:चे 100 कोटी रुपये घालून तेथील बस स्थानक बांधावे. बीड, उस्मानाबाद या ठिकाणच्या प्रवाशांना सुरक्षा, सेवा पुरविण्यासाठी 100 कोटी रुपये खर्च करुन शासन त्या सात ठिकाणची बस स्थानकांची कामे करणार आहात काय?

श्री.दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, सदरच्या बस स्थानकाचा प्रस्ताव बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर घेण्यात आला होता. याची प्रक्रिया पूर्ण झाली नव्हती. सात प्रस्तावामध्ये आपण जो उल्लेख केलेला आहे तेथे अहमदपूर नसून ते रहेमदपूर आहे. ही आपली सुधारणा आहे. एस.टी. महामंडळाच्या वतीने या प्रस्तावाना स्थगिती देण्यात आली होती. याचा अभ्यास करुन बांधा, वापरा आणि हस्तांतरित करायचे की, महामंडळाने बांधायचे, यासंदर्भात निर्णय घेण्यारिता प्रक्रिया सुरु केली आहे.

यानंतर EE-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते ....

नंतर अध्यक्ष झाल्यानंतर या महामंडळाची संपूर्ण परिस्थिती मी पाहिली. एस.टी. महामंडळ हे आजही तोट्यात आहे व त्याही वेळेस तोट्यामध्ये होते. त्यामुळे हे सर्व बांधकाम करण्याकरिता एस.टी. महामंडळाकडे कोणताही निधी उपलब्ध नसल्यामुळे अशाप्रकारे निविदा मागवून हे करण्याचे ठरविले होते. एस.टी. महामंडळाला हे काम स्वत: करायचे म्हटल्यानंतर अशाप्रकारची काम यंत्रणाही नव्हती. आमच्याकडे फक्त एक उप महाव्यवस्थापक आहेत, त्यांच्यावर कोणीही नाही. त्यामुळे हे करणे अशक्य होते. मी आल्यानंतर प्रथमत: मार्गदर्शन करण्याकरिता वास्तुशास्त्रज्ञांच्या निविदा काढल्या. आता 'अ' व 'ब' कॅटेगरीतील 38 वास्तुशास्त्रज्ञ आपल्याला उपलब्ध झालेले आहेत.

सन्माननीय सदस्यांनी निधीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या अनुषंगाने मला हे सांगावयाचे आहे की, पूर्वी आपल्याकडे भांडवली खर्च हा वेगळा विषय नव्हता. आपल्यालाही हे माहीत आहे. महामंडळाला यावर्षी अर्थसंकल्पामध्ये या सरकारने प्रथमत:च भांडवली खर्चाकरिता दिले. त्यानंतर अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय असा झाला. मी आल्यानंतर आणि आपल्याही वेळेस म्हणजे माजी मंत्री व आता जे माननीय विरोधी पक्ष नेते आहेत, त्यांच्याही काळात प्रवासी कर रद्द करावा, अशी मागणी होत असायची. त्या संदर्भात पाठपुरावा करुन प्रवासी कर रद्द करण्याऐवजी कारण तो पारंपारिक आहे. लोक तो देत आहेत, लोकांची तक्रार नाही. फक्त युनीयन त्याबाबत सांगायच्या. त्या प्रवासी कराच्या बाबतीत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. त्यानुसार या प्रवासी करातील 10 टक्के एस.टी. महामंडळाला बिनव्याजी भांडवली खर्चाकरिता देण्यात येणार आहेत. आता आम्हाला या अर्थसंकल्पातून 125 कोटी रुपये मिळणार आहेत. त्यातील 96 कोटी रुपये काल आम्हाला मिळाले. प्रवासी कराचे 419 कोटी रुपये आमच्याकडे आता भांडवली खर्चाकरिता आहेत. भांडवली खर्च स्वत: करण्याची कुवत आल्यानंतर एस.टी. महामंडळाने बांधा, वापरा, हस्तांतरित करा यापेक्षा आपल्याकडे निधी असल्यानंतर स्वत: हे करण्याचा निर्णय घेतलेला आहे. फक्त एवढेच आहे की, या 6 प्रकल्पामध्ये येवला, उस्मानाबाद येथे नवीन करता येणार नाही कारण ते नुकतेच 20-25 वर्षांपूर्वी बांधलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव आपण हात वर करु नका. रत्नागिरीच्या संदर्भात अत्यंत सुंदर असे डिझाईन केलेले आहे. त्याच वास्तुशास्त्रज्ञांना आपण नियुक्त केलेले आहे.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते....

बीडचेही आपण यावेळेस घेणार आहोत. श्री. कमलेश मेस्त्री या आर्किटेक्टना आपण तेथे नियुक्त केलेले आहे. रत्नागिरी, म्हसवड, रहिमतपूर, बीड आपण घेणारच आहोत. संगमनेर हे असे एकमेव ठिकाण होते की, ज्याची पूर्ण प्रक्रिया झाली होती. त्याचे मुद्रांक शुल्क भरुन झालेले आहे. फक्त एक सही बाकी राहिलेली होती. त्यामुळे हे काम पूर्ण झाल्यामुळे या सहापैकी ते काम पूर्ण झालेले असल्याने ते एकमेव देण्याचा निर्णय करुन बाकी सर्व महामंडळाने करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. आपल्या माहितीकरिता सांगतो की, महामंडळाने आता राज्यात 34 ठिकाणच्या बसस्थानकांच्या बांधकामासंदर्भात निविदा प्रक्रिया सुरु केलेली आहे. ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात विनंती केली होती, त्या त्या भागातील निविदा प्रक्रिया सुरु होऊन गेलेल्या आहेत. जवळजवळ 32 कोटी रुपयांच्या भिंती नव्हत्या, त्याही बांधण्यास घेतलेल्या आहेत. अगोदर बसस्थानके उघड्यावर होती. 92 कामे या वर्षामध्ये करावयाची आहेत. येत्या 3 महिन्यांमध्ये आपल्या सर्वांच्या हस्ते त्याची उद्घाटने सुरु होतील. एवढ्या मोठ्या भांडवली खर्चातून हे काम स्वत: एस.टी. महामंडळ करीत आहे. त्याला सहकार्य करण्याकरिता आपल्या सूचना घेऊ. बीडच्या संदर्भातील नकाशामध्ये काही फेरफार असतील तर सन्माननीय सदस्य श्री. जयदत्त क्षीरसागर आपण त्यामध्ये आणखी सूचना कराव्या. त्याप्रमाणे बीड येथे उत्कृष्ट बसस्थानक करता येईल. ते मध्यवर्ती आहे, ते मी पाहिलेले आहे. आपल्यालाही ते माहीत आहे. ते आपल्या रेस्टहाऊसच्या समोरच आहे. आपण त्याचाही चांगला विकास करु.

श्री. भिमराव धोंडे : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी स्वत: माननीय परिवहन मंत्र्यांना 3-4 वेळा भेटलेलो आहे. त्यांच्याकडे मी लेखी पत्रही दिलेले आहे. आष्टी, पाटोदा, शिरुरचे बसस्टँड 30 वर्षांपूर्वी झालेले असून ते अत्यंत खराब झालेले आहे. आता आपण 30-40 कामे घेणार आहात, आपल्याला त्याकरिता निधी उपलब्ध झालेला आहे. त्यामध्ये आष्टी, पाटोदा, शिरुरच्या कामाचाही समावेश आपण करणार आहात का, तो करावा, ही विनंती आहे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य आपल्या सूचनेचा अवश्य विचार करण्यात येईल असे मी प्रत्यक्ष सांगितलेले आहे. त्याची नोंद घेतलेली आहे.

श्री. बच्चू कडू : अध्यक्ष महोदय, माननीय श्री. दिवाकर रावते यांनी अतिशय चांगले काम केलेले आहे, याबाबत वाद नाही. मंत्री महोदयांना एक विनंती आहे की, अपंग बांधवांकरिता अगोदर गाळे राखीव ठेवले जात होते. परंतु, नवीन मार्केट बांधताना अपंगाकरिता 3 टक्के आरक्षण ठेवले गेले नाही. अपंगांसाठीचे हे आरक्षण 3 टक्क्यांऐवजी 5 टक्के करावे, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण लक्षवेधी सूचनेच्या विषयाशी संबंधित प्रश्न विचारावेत.

श्री. बच्चू कडू : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न मानवतेच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे. नवीन बसस्थानक बांधताना आपण त्यांना किमान 3 टक्के गाळे राखीव ठेवावेत, त्यांना दुकाने द्यावीत जेणेकरुन त्यांना किमान रोजगार मिळेल व या अंध, अपंग बांधवांना एक नवीन संजीवनी मिळेल. आपण हे करणार काय ?

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बच्चू कडू यांनी एक अत्यंत महत्त्वाचा विषय मांडलेला आहे. ते मला या संदर्भात भेटलेही होते. अपंगांच्या संदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार नक्की केला जाईल. जे गाळे निर्माण होतील, त्यात अपंगांना योग्य ते स्थान देण्यासंदर्भात सकारात्मक असा विचार महामंडळाकडून नक्की केला जाईल.

श्री. जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, माननीय श्री. दिवाकर रावते यांनी या लक्षवेधी सूचनेला चांगले उत्तर दिलेले आहे. त्यांनी खूप चांगले निर्णय घेऊन ते जाहीरही केले आहेत. परंतु, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून बीओटी तत्त्वावर मंजूर केलेल्या 7 बसस्थानकांचा विषय मांडण्यात आला होता. त्यात माझ्या मतदारसंघातील म्हसवडचाही विषय होता. मंत्री महोदयांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण हे बीओटीवर बांधावे, महामंडळाने बांधावे याच्याशी आम्हाला फार देणेघेणे नाही, फक्त तेथील बसस्थानक बांधले पाहिजे. म्हसवडच्या बसस्थानकाची अगदी दूरवस्था झालेली आहे. आपण 134 कोटी रुपयांची तरतूदही केलेली आहे. माझा स्पेसिफिक

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयकुमार गोरे ....

प्रश्न आहे की, या 134 कोटी रुपयांच्या तरतुदीतून बीओटी तत्वावर ज्या बसस्थानकांच्या कामांना स्थगिती दिलेली आहे, त्यांचा प्राधान्याने विचार करुन म्हसवडच्या बसस्थानकाला मंजुरी देणार आहात काय, आपण या संदर्भात कोणती कारवाई करणार ?

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, म्हसवड बसस्थानकासाठी श्री. कमलेश मेस्त्री या वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती झालेली आहे. त्यांना आपणाला भेटायलाही सांगितलेले आहे. आपल्या सूचना स्वीकारुन त्याचा जो आराखडा ठरेल त्याप्रमाणे निविदा काढल्या जातील.

श्री. अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी आता बीओटी तत्त्वावर कोणतेही काम केले जाणार नाही असे सांगितलेले आहे. एस.टी.कडे असलेल्या निधीतून या सर्व गोष्टी उभ्या केल्या जातील, असेही सांगितलेले आहे. मला दोन गोष्टी सांगावयाच्या आहेत. सांगली येथे एस.टी.ची मोठ्या प्रमाणावर जागा आहे. तेथे मोठे बसस्थानक बांधण्याचे ठरलेले होते. त्याचे काम कधी सुरु करण्यात येईल ? कारण आता जे बसस्थानक आहे, ते फार अडचणीचे आहे. तेथे सर्व सुविधा करता येत नाहीत, अशी अवस्था आहे. तर सांगलीच्या बसस्थानकाचे काम कधी सुरु करण्यात येईल ?

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात विटा येथे चांगले बसस्थानक आहे. मी मंत्री महोदयांना विनंती केली होती की, त्याच्या पुढच्या बाजूला रस्यालाशॉपिंग सेंटर काढले तर, एस.टी.च्या उत्पन्नामध्ये भर पडेल. एस.टी.कडे पैसे आहेत. त्यामुळे तेथे शॉपिंग सेंटर केले तर, एस.टी.च्या उत्पन्नामध्ये वाढ होणार असल्याने याबाबत विचार करणार काय ?

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, या महाराष्ट्रातील 12 ठिकाणी आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे बसपोर्ट निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या संदर्भात नियोजन करायचे आहे आणि त्यांच्याकरिता ज्यांची नेमणूक करावयाची आहे, त्यांचा नेमणुकीचा प्रस्ताव 2-4 दिवसांत मंजूर होईल. अशाप्रकारचे बसपोर्ट आपल्याकडे निर्माण केले जाणार आहेत, त्यात सांगली आहे. त्याला

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते ...

वेळ लागेल परंतु ते योग्य पध्दतीने निश्चित स्वरुपात करण्यात येईल. शॉपिंग सेंटर वगैरे करण्यापेक्षा आमच्या बसस्थानकांची नीट व्यवस्था करुन वाहतुकीकरिता जास्तीत जास्त बस कशा उपलब्ध होतील, हा विषय आमच्याकरिता महत्त्वाचा असणार आहे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे.

श्री. अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, ....

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य आपले काय म्हणणे आहे ?

श्री. अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, तेथे बसस्थानकाला कोणतीही अडचण येणार नाही. उलट तेथे अतिक्रमण होत आहे, टपऱ्या लागत आहेत. त्यामुळे तुमचीच व्यवस्था असली तर, एस.टी.च्या उत्पन्नात भर पडणार आहे. बाकीच्या टपऱ्या लागल्यामुळे तेथे अवैध धंदे होत आहेत, त्यावरही बंधन राहील, या दृष्टीने त्याचा विचार करावा.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, या संदर्भात अवश्य विचार करु.

FF-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय एसटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अत्यंत सकारात्मक निर्णय घेत आहेत. वाहक आणि चालक यांच्यावर किरकोळ गुन्हे होते, त्या जवळपास 17 हजार कर्मचाऱ्यांना पुन्हा संधी देण्याचा त्यांनी विचार केलेला आहे. आता ते काही बसडेपो दुरुस्त करण्याचा निर्णय घेत आहेत. संगमनेर सोडून बाकी सगळ्या डेपोचे महामंडळातर्फे बांधकाम करणार आहेत. माझा प्रश्न आहे की, केवळ डेपोचेच बांधकाम करुन इमारती सुंदर करणार आहात की, काही कमर्शिअल आणि रेसिडेन्सीअल बांधकाम करणार आहात. रेसिडेन्सीअल बांधकाम करणार असाल तर आपण यातील काही घरे आपल्या एसटी कर्मचाऱ्यांकरिता राखीव ठेवणार आहात काय, असेल तर त्याचे वाटप कशा पद्धतीने करायचे याचे सुत्र ठरविण्यात यावे. मी परवाही चर्चेमध्ये सांगितले. घरे बांधणार असाल तर माझा आग्रह व विनंती रहाणार आहे की, अशा प्रकारची घरे एसटी कर्मचाऱ्यांकरिता राखीव ठेवणार आहात काय, असा माझा आपल्यामार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, कोणत्याही बसस्थानकावर घरे उपलब्धतेचा विषय असणार नाही. परंतु कर्मचारी आणि अधिकाऱ्यांकरिता आवश्यकता आहे, तेवढ्या पुरतेच बांधकाम करण्यात येणार आहे. ते नोकरीवर आहे तोपर्यंतच ती असेल. कर्मचाऱ्यांना घरे देणे, आणखी घरांचे बांधकाम करुन व्यवसाय करणे हा एसटीचा विषय येत नाही. वाहतूक करणे हेच आमचे काम आहे. त्यानुसार व्यवस्था केली जाईल.

**तालिका अध्यक्ष** : मुळात ही लक्षवेधी सूचना बीओटीवरील कामे थांबवून ती एसटी महामंडळाच्या वतीने करण्यासंदर्भातील आहे. एसटीची आजची अवस्था अतिशय बिकट आहे. एसटीची काचे फुटलेली असतात. त्यासंदर्भात काही प्रश्न आले पाहीजे.

श्री. अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र शासनाच्या वतीने बसस्थानके अद्यावत करण्याच्या दृष्टीने मंत्री महोदय पावले उचलित आहेत. यासंदर्भात माझी एकच सूचना रहाणार आहे. या बसस्थानकांचा अद्यावत विकास करीत असताना तेथे सुरक्षा व्यवस्था देखील उत्तम असली पाहीजे. आता बसस्थानकामध्ये येणाऱ्या प्रवाशांची तपासणी देखील करण्यात येत नाही. बॅगांचे स्कॅनिंग होत नाही. विमानतळावर बॅकांचे स्कॅनिंग होत असल्यामुळे कुठलाही निर्माण होणारा धोका त्यामुळे टाळता येऊ शकतो. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून अशा पद्धतीची स्कॅनिंग पद्धत करण्याबाबत किंवा अशा प्रकरे सुरक्षेचे निकष घालून देणार आहात काय, असा माझा आपल्यामार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. मी गेले सहा, सात महिन्यांपासून हे पहात आहे. आपल्याकडे संरक्षित भींतीच नव्हत्या. परंतु आता त्यांचे बांधकाम करण्यात येत आहे. तसेच आपण बस डेपोला दरवाजे करीत आहोत. तसेच माजी सैनिक असलेल्या 280 सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय झालेला आहे. बस डेपोवर सुरक्षा व्यवस्था अजिबात नाही. अगोदर सुरक्षा व्यवस्था कणखर करण्यात येत आहे. त्यामध्ये आपण सांगितलेली बाब देखील पुढे येईल.

श्रीमती संगिता ठोंबरे : अध्यक्ष महोदय, मी यापूर्वी देखील मंत्री महोदयांना बसस्थानकाबद्दल बोललेली आहे. माझ्या मतदार संघामध्ये अंबाजोगाई शहरातील बसस्थानक अजूनपर्यंत अद्यावत झालेले नाही. त्याबद्दल तत्काळ कार्यवाही करण्यात येणार आहे काय. तसेच केज शहरामध्ये गेल्या 15 वर्षापासून डेपोची जागा आरक्षीत आहे, परंतु त्यावर अजून कार्यवाही झालेली नाही. त्याबाबत सकारात्मक उत्तर मिळेल, अशी विनंती करते.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, मी अंबाजोगाईला गेलो असता सन्माननीय सदस्या श्रीमती संगिता ठोंबरे यांनी हा प्रश्न मांडला होता. एकंदरीत 768 बसस्थानके आहेत. यापैकी 200 बसस्थानकांचे काम करावे लागणार आहे. ही कामे तातडीने किंवा झटपट होणारी नाही. त्याकरिता थोडा कालावधी लागेल. दरवर्षी विभागाला अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध होणार असल्यामुळे सर्वच बसस्थानकांमध्ये अमुलाग्र बदल घडविण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्याकरिता वास्तुशास्त्रज्ञ नेमण्यात आलेले आहेत. प्रत्येक ठिकाणी मार्गदर्शक आहेत, नियोजन करणारे आहेत, नियंत्रण करणारे आहेत. मी माननीय मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांना विनंती केली होती की, आमच्याकडे सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. ती त्यांनी मान्य केलेली आहे. आम्ही योग्य यंत्रणा उभी करीत आहोत. त्या माध्यमातून ही सर्व कामे होईल. तसेच माननीय तालिका अध्यक्ष आपण देखील एसटी संदर्भात प्रश्न विचारण्याचे सदस्यांना सूचित केले होते. मी सांगू इच्छितो की, हाही विषय आम्ही हाती घेतलेला आहे. आमच्याकडे 25 ते 30 टक्के मेकॅनिकल्स आहेत. त्यांची पूर्ण भरती करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यांची भर्ती झाल्यानंतर दुरुस्तीसंदर्भातील ओढाताण कमी होईल.

...3/-



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते.....

याबाबत आपल्या सर्वांच्या सहकार्याने एका वर्षामध्ये किंवा सहा महिन्यामध्ये अमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येईल. हे करण्यात येईल. मी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो.

श्री. बसवराज पाटील : अध्यक्ष महोदय, राज्यातील बसस्थानके यापूर्वी बीओटी तत्वावर बांधण्यासाठी हाती घेतली होती. ते रद्द करुन खात्याला निधी उपलब्ध झाल्यामुळे किंवा महामंडळाकडे निधी उपलब्ध झाल्यामुळे ही सर्व बांधकामे महामंडळाकडून करणार आहोत, असे मंत्री महोदयांनी सांगितले. या योजनेमध्ये समाविष्ट असेलेली तालुक्याची ठिकाणे किंवा शहरे असतील, उदाहरण द्यायचे झाले तर औसा तालुका हाही पूर्वीच्या बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या योजनेमध्ये घेतले होते. या तालुक्याचा समावेश या बांधकामामध्ये करणार आहात काय, असा माझा आपल्यामार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय,  मी सांगितल्याप्रमाणे आपण आता 34 ठिकाणची बांधकामे करणार आहोत. त्यासंदर्भात निविदा काढणार आहोत. त्यापुढीलही निविदा काढण्यात येतील. आपण हे सर्व करणार आहोत. निधी उपलब्ध झालेला आहे. आपल्या सुचनांचा नक्की विचार करण्यात येईल.

श्री. भारत भालके : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी सूचना बीओटी तत्वासंदर्भातील आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** या विभागाला चांगले मंत्री महोदय मिळाले आहेत. ते अतिशय समर्पक उत्तरे देत आहेत.

श्री. रामदास कदम : अध्यक्ष महोदय, नियमाप्रमाणे लक्षवेधी सूचनेवर दोन किंवा तीनच प्रश्न विचारता येतात. ही चर्चा सुरु नाही. या लक्षवेधी सूचनेनंतर अजूनही लक्षवेधी सूचना आहेत. हा अतिशय महत्त्वाचा विषय असेल तर आपण त्यासंदर्भात वेगळ्या आयुधामार्फत चर्चा ठेवावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. भारत भालके : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी सूचना बीओटी तत्वासंदर्भातील आहे. पूर्वी बीओटी तत्वावर बसस्थानके बांधली गेली. आता देखील आपण बसस्थानके बांधण्याचा प्रयत्न करणार आहात. पंढरपूर सारख्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी बीओटी तत्वावर एक बसस्थानक बांधलेले आहे. तेथे शौचालय, टॉयलेट इतर सर्व व्यवस्था केली. परंतु लोक आज उघड्यावर जात आहेत. पंढरपूर येथे एका वारीला 10 लाख भाविक येतात. या तीर्थक्षेत्रातील बसस्थानक बीओटी तत्वावर

...4/-



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## ( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )

श्री. भारत भालके.....
बांधणारा ठेकेदार निघून गेला. बसस्थानकावर काँक्रिट किंवा डांबरीकरण केले नसल्यामुळे प्रचंड धूळ उडते व त्यामुळे प्रवासी बाहेर उभे रहातात. तसेच बसस्थानकावर खड्डे पडलेले आहेत. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे बीओटी तत्वानुसार बांधकाम करणारा व्यावसायिक निघून गेला असून त्याबाबत आपण उपाययोजना करणार आहात काय, असा माझा आपल्या मार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्त्वाचा प्रश्न विचारला असून मी त्यांना धन्यवाद देतो. बीओटीला आपण स्थगिती का दिली आणि त्यानुसार का करायचे नाही, याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याबद्दल धन्यवाद. हा विषय अतिशय गांभीर्याने घेतलेला आहे. येत्या महिन्यात किंवा दीड महिन्यामध्ये महाराष्ट्रातील सर्व शौचालये नवीन होणार नाही परंतु त्यामध्ये अमुलाग्र बदल घडलेला दिसेल. कारण जनतेकरिता ही व्यवस्था होणे अत्यंत आवश्यक आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये विविध बसस्थानके विकसित करण्याबाबत बीओटीचा प्रयोग यशस्वी झाला नाही, असे आपण म्हणत आहात. आपण त्याला स्थगिती दिली आहे. आपण एसटी महामंडळाकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर काही निविदा काढल्या होत्या. त्या ठिकाणी सल्लागाराची नेमणूक करावी, त्या निविदेच्या माध्यमातून परदेशातीलही काही कंपन्यांचे अर्ज आले होते. आपल्या राज्यातील मोठी शहरे, महानगरपालिका असलेली शहरे किंवा वाढत्या शहरांतील बसस्थानकांचा विकास करताना त्याबाबत काय धोरण असावे, याबाबतीत आपण काही निविदा काढल्या होत्या. त्यासंदर्भात महामंडळाने काय कार्यवाही केली, हा माझा पहिला प्रश्न आहे. महामंडळाच्या माध्यमातून आपण बांधकाम करायचे म्हणत आहात. परंतु पुर्वी महामंडळाने बांधलेल्या बसस्थानकांची दुरावस्था बीओटीपेक्षा वेगळी नाही. बसस्थानके बांधून चालणार नाही तर त्याबाबतीत काही विशेष उपाययोजना करण्यासंदर्भात आपण काही कार्यवाही करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी दोन प्रश्न विचारले. बस पोर्टकरिता सल्लागाराच्या संदर्भातील निविदा प्रक्रियेमध्ये आहे. मी मघाशी सांगितले

...5/-



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिवाकर रावते.....

की, त्यासंदर्भात दोन, तीन दिवसात प्रशासन निर्णय घेईल. त्याची प्रक्रिया सुरु असून ती पूर्ण होईल. सल्लागार आल्यानंतर 13 बसपोर्ट संदर्भातील त्याप्रमाणे जे नियोजन होईल, ते आपल्यासमोर येईल. ती प्रक्रिया सुरु आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते......

बसस्थानके ही केवळ बांधण्यात येणार नसून संपूर्ण राज्यातील बसस्थानके व कार्यालयांच्या साफसफाईच्या संदर्भातही नियोजन करण्याचा विचार करण्यात येत आहे. ज्याप्रमाणे मंत्रालय, विधिमंडळ, राष्ट्रपती भवन येथील स्वच्छता राखण्यात येते त्याप्रमाणे राज्यातील सर्व बसस्थानके व महामंडळाच्या कार्यालयांमध्ये स्वच्छता राखण्याकरिता राज्यस्तरावर निविदा प्रक्रिया राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.जयदत्त क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, बीडसह राज्यातील इतर बसस्थानकांच्या बांधकामासाठी भांडवली गुंतवणुकीद्वारे राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असून सदरहू बांधकामे लवकरात लवकर सुरु करण्यात येतील, असे आश्वासन मंत्री महोदयांनी सभागृहाला दिले आहे, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, महामंडळाच्या बस या सर्वसामान्य व्यक्तीसाठी वाहतुकीचे एकमेव साधन आहे. "गाव तेथे बस" असे महामंडळाचे धोरण आहे. परंतु जनतेला महामंडळाच्या बसमधून शेवटच्या टप्प्यापर्यंत प्रवास करणे अडचणीचे व अवघड झालेले आहे. महामंडळाच्या बस वेळेवर स्थानकातून सुटत नाहीत, त्यांच्याकडून वेळापत्रक पाळण्यात येत नाही. अनेक बसेसचे टायर्स घासलेले असल्याने ते चांगल्या स्थितीत नाहीत, अनेक बसच्या खिडक्या लॉक झालेल्या आहेत, अनेक बस पावसाळ्यात गळतात व त्यांच्या खिडक्यातून बसमध्ये पाणी येते. याकरिता प्रतिबंधात्मक दुरुस्ती व दररोजची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. मंत्री महोदय परिवहन खात्याचा चेहरामोहरा बदलत आहेत. त्यामुळे प्रवशांना सुरक्षित वाटावे व त्यांचा प्रवास सुखाने होण्याकरिता मी उल्लेख केलेल्या उक्त बाबींकडे मंत्री महोदय लक्ष देतील काय ?

श्री.दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी बसमधून प्रवाशांचा प्रवास त्यांच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत व्यवस्थित होण्यासंदर्भातील मुद्दा मांडला असून त्यांचे म्हणणे बरोबर आहे. याकरिता महाराष्ट्राच्या जनतेचीही जबाबदारी आहे की त्यांनी बसचा वापर अधिकाधिक करावा. सदनामध्ये बेकायदेशीर वाहतुकीसंदर्भात चर्चा होत असताना बेकायदेशीर वाहतुकीमुळे कोणाला काय मिळते याबाबतही चर्चा झाली. सदनाच्या माध्यमातून जनतेने

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महामंडळाच्या बसचा जास्तीत जास्त वापर करावा, अशी मी विनंती करतो. महामंडळाच्या माध्यमातून बसच्या संदर्भातील सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असून बसच्या बांधणीमध्ये अमुलाग्र बदल करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. याप्रकरणी परिवहन विभाग काम करीत असून लवकरच राज्यात वेगळ्या पध्दतीच्या बस धावताना दिसतील. शासनाकडून नागरिकांना बसची सुविधा चांगल्या प्रकारे देण्याकरिता अटोकाट प्रयत्न करण्यात येईल व त्याकरिता आपणा सर्वांकडून सहकार्य मिळावे, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

---------------

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

GSS/ AKN/ MMP/ 15:20

**पृ.शी.** : पुणे शिरुर रस्त्या दरम्यानची वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता उड्डाणपूल बांधणे बाबत.

**मु.शी.** : पुणे शिरुर रस्त्या दरम्यानची वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता उड्डाणपूल बांधणे संबंधी श्री.बाबुराव पाचर्णे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे-नगर रस्त्यादरम्यान वाघोली, कोरेगाव भिमा, शिक्रापूर येथे वारंवार होत असलेली वाहतूक कोंडी, या रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सकाळी व संध्याकाळी अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्याबाबतचा जिल्हा पोलिस अधिक्षक पुणे, (ग्रामीण) यांनी घेतलेले निर्णय, प्रवाशांसह रांजणगांव गणपती, पंचतारांकित एम.आय.डी.सी. मधील कामगारांना वाहतूक कोंडीची समस्या भेडसावणे, अधिक्षक, अभियंता, सार्वजनिक बांधकाम, पुणे यांनी पुणे-शिरुर रस्त्यादरम्यान वाघोली, कोरेगाव भिमा व शिक्रापूर याठिकाणी उड्डाणपूल बांधण्याचे अंदाजपत्रक तयार करुन शासनाकडे सादर करणे, सदर वाहतूक कोंडी सोडविण्यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.चंद्रकांत पाटील (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

....4

12-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) GG-4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाबुराव पाचर्णे : अध्यक्ष महोदय, पुणे-नगर हा राज्य महामार्ग असून त्यावरुन मराठवाडा व विदर्भामध्ये जाण्याकरिता वाहतूक होते. तसेच, या रस्त्यावर नगर, सुपा, रांजणगाव येथील एमआयडीसी असून तेथील अवजड वाहनांची वाहतूकही या रस्त्यावरुन होते. शिरुर, शिक्रापूर व वाघोली या ठिकाणी मोठ्या प्रमाणात शिक्षण संस्था सुरु असून या भागातील राज्य महामार्गाच्या रस्त्यावरील वाहतुकीचा ताण वाढलेला आहे. त्यामुळे या महामार्गावरील वाघोली, कोरेगाव, भिमा, शिक्रापूर येथे मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असते.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी कृपया प्रश्न विचारावा, भाषण करु नये.

श्री.बाबुराव पाचर्णे : अध्यक्ष महोदय, कोरेगाव, वाघोली, भीमा व शिक्रापूर येथील उड्डाण पुलांचे 533.25 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार करुन शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, त्यास मंजूरी देण्यात येईल काय, पुणे जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावानुसार वाघोली ते शिक्रापूर या रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या लेन वाढविण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल काय, पुणे-शिरुर-नगर-औरंगाबाद या महामार्गाचे रुपांतर राष्ट्रीय महामार्गात करण्यात येईल काय ? सदरहू रस्ता पूर्वी बोओटी तत्वावर तयार केला असून त्यावरील टोल शासनाने बंद केला त्याबद्दल मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. सदरहू रस्त्याच्या साईड पट्टयातून एल ॲण्ड टी कंपनीने केबल टाकली असून ती रस्त्यापासून 13 मिटर पेक्षा अधिक अंतरावरुन टाकणे गरजेचे होते. त्यासंदर्भात मी प्रश्न उपस्थित केला होता त्यास शासनाने "नाही" असे चुकीचे उत्तर दिले आहे. सदर ठिकाणच्या साईड पट्ट्या केबल टाकण्याच्या कामामुळे खराब झालेल्या आहेत त्या संबंधित कंपनीकडून पूर्ववत करुन घेण्यात येतील काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी चार प्रश्न विचारलेले आहेत. त्यांच्या पहिल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, 2200 कोटी रुपयांचा सलग 26 कि.मी.च्या उड्डाण पुलाचा प्रस्ताव इन्फ्राकडे पाठविण्यात आला होता व तो त्यांनी नाकारला आहे. हा प्रस्ताव त्यांनी नाकारताना सांगितले की, सलग 26 कि.मी. लांबीचा उड्डाण पुल न बांधता तीन उड्डाण पुल बांधण्यात यावे. त्यानुसार 533.25 लाख रुपयांचे अंदाजपत्रक तयार झाले असल्याचे सन्माननीय

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील.......

सदस्यांनी सांगितले असून ते शासनास प्राप्त होईल. त्यावेळी सदरहू उड्डाण पुलाच्या कामाचा एवढा मोठा खर्च कोणत्या बजेटमधून घेता येईल, याबाबत विचार करण्यात येईल. सदरहू तीन उड्डाण पुलांचे काम केल्याशिवाय सदरहू रस्त्यासंदर्भातील प्रश्न संपणार नाहीत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, त्यासंदर्भात वाघोली ते शिक्रापूर या दोन्ही बाजूला तीन मिटरची साईडपट्टीचा विषय 15 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक आल्याबरोबर लगेच आम्ही पूर्ण करतो.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सदरहू रस्ता नॅशनल हायवेकडे शिफ्ट करण्यासंदर्भात प्रश्न विचारला होता. केंद्र शासनाने राज्यातील 5 हजार कि.मी.चे नॅशनल हायवे 22 हजार कि.मी. करण्याचे ठरविले असल्याने सदरहू रस्ता नॅशनल हायवेकडे नक्की देऊ.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी साईड पट्ट्यातून केबल टाकण्याचे कामाबाबत प्रश्न विचारला होता. त्याबाबत सांगू इच्छितो की, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात येईल. केबल टाकण्याच्या कामाची परवानगी देताना खोदकामानंतर तो भाग व्यवस्थित करुन देणे गृहीत असते. सदरहू प्रकरणी चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---------------

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : सांगली जिल्हा परिषदेत खरेदी व्यवहारामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**मु.शी.** : सांगली जिल्हा परिषदेत खरेदी व्यवहारामध्ये झालेल्या गैरव्यवहारासंबंधी श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. शिवाजीराव नाईक (शिराळा) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांगली जिल्हा परिषदेने शिलाई मशीन, लेडीज सायकल व स्प्रे पंपाच्या खरेदीत मोठया प्रमाणावर गैरव्यवहार केला असल्याची बाब निदर्शनास येणे, वाळवा पंचायत समितीने शिलाई मशिन रूपये ३,८५५/- प्रति नग यादराने खरेदी केली असताना जिल्हा परिषदेने मात्र सदर मशीनची खरेदी रूपये ५,८५०/- प्रतिनग दराने ७०५ मशिन्स खरेदी केल्या असणे, लेडीज सायकलचा खरेदी दर रूपये ३,०९६/- प्रतिनग असताना जिल्हा परिषदेने मात्र रूपये ३,९९०/- प्रतिनग दराने १७५ सायकलची केलेली खरेदी, निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी असलेल्या निविदाधारकांनी स्प्रे पंपाचा पुरवठा रूपये २,८०३/- प्रतिनग व काहींनी रूपये २,९५०/- प्रतिनग या दराने केल्याचा पुरवठा आदेश जोडले असताना जिल्हा परिषदेने त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून स्प्रे पंपाची खरेदी रूपये ४,५२९/- प्रतिनग या दराने १३२४ स्प्रे पंप खरेदी करणे, या संबंधित अटी व शर्ती जिल्हा परिषदेने आयत्यावेळी बदलून पात्र निविदाधारकांना अपात्र ठरविण्यात येणे, अशाप्रकारे जिल्हा परिषदेने शिलाई मशिन खरेदीमध्ये १४.१० लाख रूपये तसेच, सायकल खरेदीमध्ये अंदाजे रूपये १.७५ लाख व स्प्रे पंप खरेदीमध्ये अंदाजे रूपये २०.२४ लाख असे एकंदरित तीन बाबींमध्ये मिळून एकूण ३६.०९ लाख एवढा गैरव्यवहार केला असल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, या गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे (ग्रामविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

...8

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव नाईक : अध्यक्ष महोदय, माननीय ग्रामविकास मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की त्यांना लक्षवेधीच्या निवेदनामध्ये दुरुस्ती सुचवावयाची आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, मी वितरीत केल्याप्रमाणे असे म्हटले आहे.

श्री.शिवाजीराव नाईक : अध्यक्ष महोदय, मी उपस्थित केलेल्या लक्षवेधीच्या उत्तराच्या निवेदनामध्ये व वस्तुस्थितीमध्ये मोठी विसंगती आहे.

अध्यक्ष महोदय, सदरहू लक्षवेधीच्या उत्तरासंदर्भात मंत्री महोदयांना ज्या अधिकाऱ्यांनी तारखा दिलेल्या आहेत त्या विसंगत दिल्या असून त्यांनी अनियमितता दडवण्याचा प्रयत्न केला आहे. सांगली जिल्ह्यामध्ये शिलाई मशीन, लेडीज सायकल, स्प्रेपंप व हात पंप खरेदीमध्ये जवळपास 1 कोटी 88 लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. या अनुषंगाने यापूर्वी आम्ही मंत्री महोदयांना पत्र दिले होते व त्यासंदर्भात चौकशी संबंधीचे त्यांनी आदेश दिलेले आहेत. परंतु लक्षवेधीच्या माध्यमातून दिलेल्या उत्तराच्या प्रकरणी विसंगत तारखा देऊन अधिकारी सर्वांना फसविण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासंदर्भातील अत्यंत चांगल्या माहितीचा मी उल्लेख करणार आहे.

अध्यक्ष महोदय, सांगली जिल्हा परिषदेने 5,805 रुपये या दराने 705 शिलाई मशीन खरेदी केल्या असून त्याची वर्क ऑर्डर त्यांनी दिनांक 26 डिसेंबर, 2015 रोजी दिली आहे. परंतु त्यापूर्वी सांगली जिल्ह्यातील वाळवा पंचायत समितीने याच पध्दतीच्या मशिन्स दिनांक 7 नोव्हेंबर, 2015 रोजी 3,855 रुपयाने खरेदी केल्या असून खरेदी आहेत. एकाच जिल्हा परिषदेतील दोन ठिकाणच्या संस्थांनी खरेदी केलेल्या मशीन्सच्या किंमतीमध्ये जवळपास दोन हजार रुपयांचा फरक असून हा फार मोठा फरक आहे.

यानंतर HH-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शिवाजीराव नाईक........

हवे तेच ठेकेदार पाहिजेत. हे करीत असताना टेंडर कॉल केल्यानंतर पहिली निविदा प्रसिध्द केली ती दिनांक 23.10.2015 ला आणि त्याची अंतिम तारीख होती 26.11.2015 आणि ती संपल्यानंतर तीन दिवसानंतर 6.9.2015 ला आणि 6.11.2015 ला त्यांनी त्यामध्ये शुध्दीपत्रक जाहीर केले आणि त्यामध्ये सांगितले की, 1 कोटी रुपयांपेक्षा जास्त टर्नओव्हर असेल तर आपण टेंडरसाठी पात्र आहात, अन्यथा नाही, आणि त्यांना पाहिजे त्याच एजन्सी तेथे ठेवण्यात आल्या आणि बाकीच्यांना वगळण्यात आले आहे. हे हेतूपुरस्सरपणे केले. कारण यामध्ये टेंडरची अंतिम तारीख जाहीर झाली नसताना हे का जाहीर केले यासंबंधी मी मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे. यामध्ये ज्या 3 एजन्सी मागे राहिल्या आहेत त्यांनी एकाच कॉम्प्यूटरवरुन हे सर्व फिडिंग केले आहे. त्यातले दोन पती-पत्नी आहेत आणि हा तिसरा साथीदार आहे. म्हणजे या संपूर्ण प्रकरणामध्ये जवळपास 14 लाख 10 हजार रुपयांचा घोटाळा झालेला आहे. उत्तराच्या निवेदनात दिलेले आहे की, वाळवा पंचायत समितीने आम्ही ऑर्डर दिल्यानंतर ती खरेदी केलेली आहे. त्यासंबंधी माझ्याकडे तारखा आहेत की, वाळवा पंचायत समितीने दिनांक 7.11.2015 रोजी मशीन्स खरेदी केल्या आणि जिल्हा परिषदेने 26.11.2015 ला खरेदी केल्या आहेत. मंत्री महोदय याच उत्तरामध्ये पुन्हा सांगतात की,.....

**अध्यक्ष :** आपण दोन तीन प्रश्न विचारले आहेत. सविस्तर बोलण्यापेक्षा हे खरे आहे काय अशा स्वरुपात प्रश्न विचारावेत.

श्री. शिवाजीराव नाईक : अध्यक्ष महोदय, यामध्ये उत्तरात विसंगती आहे. या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने 9 मार्चला या मशीन्स घेण्याबाबतचा आदेश केलेला आहे. म्हणजे 9 मार्चपर्यंत आपल्याला लक्षात आले नाही काय की, आपण 2 हजार रुपयांनी आपण हे अधिक घेत आहोत. स्प्रे पंपाच्या बाबतीतही अशीच विसंगती केली आहे. पहिल्यांदा टेंडर काढले आणि टेंडरची मुदत संपल्यानंतर त्यांनी त्या ठिकाणी शुध्दीपत्रक काढले आहे. त्या स्प्रे पंपामध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. त्यामध्ये 22 लाख 37 हजार रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असून त्याची संपूर्ण माहिती यापूर्वी आम्ही दिलेली आहे. लेडीज सायकलमध्ये सुध्दा शासनाचा दरकरार आहे 3 हजार 96 रुपये. असे असताना यांनी खरेदी केल्या 3990 रुपयांना.

2.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शिवाजीराव नाईक........
शासनच म्हणते की, जुना स्टॉकमधील माल घेऊ नका आणि उत्तरात मंत्री महोदय म्हणतात की, वाळवा पंचायत समितीकडे खरेदी करण्यात आलेल्या मशीन्स त्या ठेकेदाराकडे जुना स्टॉक असल्यामुळे कमी दर दिला आहे. म्हणजे एका बाजूला सरकार म्हणते जुना माल घेऊ नका आणि दुसऱ्या बाजूने त्यांनी घेतलेल्या मालाला मान्यता देतात ही विसंगती आहे.

**अध्यक्ष :** आपण प्रश्न विचारावा.

श्री. शिवाजीराव नाईक : अध्यक्ष महोदय, यामध्ये प्रश्न एकच आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. सांगली जिल्हा परिषदेला गेले 4-5 महिने मुख्य कार्यकारी अधिकारी नाही. आता जो अधिकारी आहे तो हे घालमेल करतो आहे. म्हणून अशा इन्चार्ज असलेल्या अधिकाऱ्यांना आणि कॅफो यांना निलंबित करुन या प्रकरणाची चौकशी होणार आहे काय, या प्रकरणी जर ते दोषी आढळले तर त्यांच्याकडून रिकव्हरी होणार काय, हे दोन प्रश्न आणि तिसरा मुद्दा असा की, स्प्रे पंपाच्या खरेदीसंबंधीची कार्यपध्दती एका पंचायत समितीला सोपविली आहे. कोणत्या कायद्यानुसार आपण हे केले. त्या बीडीओला काय अधिकार आहे. म्हणून जत पंचायत समितीने दीड कोटी रुपयांची केलेली खरेदी ही विसंगत आहे. यासंबंधी मी मागच्या 18 तारखेला जो प्रश्न विचारला होता आणि त्याला जे उत्तर दिले आहे की, अशी चौकशी चालू आहे काय तर होय, त्यामध्ये दोषी आढळले आहेत काय तर होय, आम्ही त्यांच्यावर कार्यवाही करीत आहोत. म्हणजे एका बाजूने दोषी आहेत हे मान्य केले. मग माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, या अधिकाऱ्यांना बाजूला करुन सस्पेन्ड करुन ही चौकशी होणार आहे काय आणि त्यांच्याकडून घालेल्या घालमेलची रिकव्हरी होणार आहे काय,

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव नाईक यांनी माझ्याकडे लेखी तक्रारही दिली होती. सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी समिती सुध्दा गठीत केलेली आहे. प्रथमदर्शनी जे समोर आले आहे ते उत्तरामध्ये मांडलेले आहे. पण सन्माननीय सदस्यांनी 16 मार्च रोजी माझ्याकडे तक्रार दिलेली आहे व 5 एप्रिल रोजी उपायुक्त विकास, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे आणि सहायक आयुक्त, चौकशी यांची एक समिती गठीत करण्यात आली आहे आणि यासंबंधी 15 दिवसाच्या आत चौकशीचा अहवाल देण्यात

3......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे........

यावा असे आदेश दिले आहेत. 26 एप्रिलला 15 दिवस पूर्ण होत आहेत, तेव्हा या चौकशीचे डिटेल्स येणार आहेत. यामध्ये अधिकाऱ्यांनी आपल्याला चुकीची माहिती दिली असेल तर साहजिक त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांचा मुख्य प्रश्न असा आहे की, चौकशीअंती यावर कार्यवाही होईल काय, तर चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर 100 टक्के कार्यवाही होईल. जिल्हा परिषदेने जी खरेदी केली. त्या जिल्हा परिषदेच्या खरेदीमध्ये सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, कुठे तरी काही खास कंत्राटदारांना बसविण्यासाठी निविदेच्या अटी बनविण्यात आल्या आहेत. पण मी सन्माननीय सदस्य आणि सभागृहाला सांगू इच्छिते की, स्प्रे पंप, शिलाई मशीन्स, सायकली या सर्वांची खरेदी आहे. यामध्ये जे लोयेस्ट रेट आले आणि सुरुवातीला जे टेंडर निघाले ते टेंडर निघाल्यानंतर त्यांचे जे रेट आले, त्याबद्दल धामणकर आणि श्रीनाथ स्टोअर्स, अहमदनगर यांनी तक्रार केली होती. तक्रार दिल्यानंतर 6.2.2011 ला निविदा पुन्हा काढण्यात आल्या. निविदा काढल्यानंतर त्याचे शुध्दीपत्रक काढण्यात आले होते. त्यामध्ये हे खरे आहे की, त्यात असे लिहिले होते की, 1 कोटी रुपये उलाढाल असण्याचे प्रमाणपत्र असावे या त्या टेंडरमधील अटी आहेत. या अटीमध्ये बसणाऱ्या लोकांना निविदा देण्यात आल्या आहेत असे आमच्याकडे प्राप्त झालेल्या रिपोर्टमध्ये दिसत आहे. यामध्ये 3 जण निविदाधारक आहेत. ऑर्नव सप्लायर्स हे मशीन्सच्या संदर्भात, परिक्षित ॲग्रो, मिरज, पार्श्व एनर्जी, सांगली या वेगवेगळ्या निविदा धारकांमध्ये सर्वात कमी 5890 ही किंमत देण्यात आली आणि त्याला ती मशीन देण्यात आली. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेने ही मशीन 5800 रुपयांना खरेदी केली आहे. पण पंचायत समिती वाळवा यांनी मात्र ही मशीन 2900 रुपयांना खरेदी केली आहे. 2900 नाही तर 3850 रुपयांचा खरेदी केली आहे. मग यामध्ये एवढा फरक का, असा सवाल विचारल्यानंतर सांगू इच्छिते की, यामध्ये दोन वेगवेगळे ब्रॅन्ड आहेत. यासंबंधी जे अहवाल माझ याकडे प्राप्त आहेत त्यामध्ये सेक मशीन जी आहे ती ब्रॅन्डेड मशीन आहे. सिंगल ट्रेलर ब्रॅन्ड. हा इंटरनॅशनल ब्रॅन्ड आहे आणि दुसरी ही लोकल मेरीटची मशीन आहे आणि त्याच्यामध्ये दोन्हीचे मेरीट व दर्जामध्ये फरक आहे. किती दिवस ते टिकून राहतील यामध्ये देखील फरक आहे. त्यामुळे त्याचा जो भाव आहे तो योग्य असल्याचे दिलेले आहे. शिलाई मशीन्सच्या संदर्भात एमआरपी

4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे........

किंमत नसल्याबद्दल त्यांनी कुठलेही अभिप्राय दिलेले नाहीत आणि बाजारभावाप्रमाणे वस्तुंची किंमत ही खरेदी समितीने निश्चित केलेली आहे आणि त्याबाबत त्यांनी जनरल बॉडीमध्ये त्याचा निर्णय घेतला आहे. पण तरीही मी यामध्ये कोणत्याही निर्णयाप्रत पोहोचू शकत नाही. कारण 26 तारखेला याचा जेव्हा मला अहवाल प्राप्त होईल त्यानंतर यामध्ये आपल्याला कोठेही चुकीचे आढळल्यास त्यांच्यावर कार्यवाही करु आणि आपल्याला वाटत असेल तर यामध्ये संबंधित अधिकारी हस्तक्षेप करणार नाहीत याची नक्की आम्ही दखल घेऊ.

श्री. शिवाजीराव नाईक : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, शुध्दीपत्रक देऊन फेरटेंडर काढले. टेंडरची अंतिम मुदत होती 6.11.2015 आणि शुध्दीपत्रक काढले 9.11.2015 ला. टेंडरची मुदत होती 17.11.2015. म्हणजे या ठिकाणी टेंडर काढल्यानंतर जी दीर्घ मुदत द्यायला पाहिजे ती दिलेली नाही. ज्या अटी घातल्या त्यामधून त्यांना हहवगळायला हवे होते. दुसरे म्हणजे ज्या दोन मशीन्सची तपासणी केली त्यात वाळवा पंचायत समिती येथील मशीन्ससंबंधी वालचंद इंजिनिअरींग कंपनीने त्या उत्कृष्ट आहेत, चांगल्या आहेत असा अभिप्राय दिला असताना यांनी जाणूनबुजून दुसऱ्या शासकीय यंत्रणेकडून किंवा मिरजेच्या कॉलेजमधून ती आपल्याला पाहिजे तशी करुन घेतली आणि विसंगती केली. वॉलचंद इंजिनिअरींगने केलेला रिपोर्ट चुकीचा आहे, असे मंत्री महोदयांना म्हणावयाचे आहे काय, आणि म्हणून जे फेरटेंडर काढले त्याला मुदत दिली नव्हती. दुसरे म्हणजे जे स्प्रे पंप आहेत ते चायनीज मेड आहेत हे पूर्णपणे तपासल्यानंतर सभागृहामध्ये उघड झाले आहे. अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे आणि म्हणून ज्यांनी आपली चांगली मशीन दिली ती चायनीज मेड आहे हे सिध्द झाल्यानंतरसुध्दा त्यांनी पुन्हा त्यांनाच वर्कऑर्डर दिली. या संदर्भात सुध्दा आपण त्यांच्यावर ठोस कार्यवाही करण्यासाठी वाटचाल करणार आहात काय, आणि

II-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव नाईक.........

संबंधित अधिकाऱ्यांना त्या जागेवरुन बाजूला केल्याखेरीज या संपूर्ण प्रकाराची चौकशी योग्य होणार नाही. म्हणून आपण त्यांना पहिल्यांदा त्या जागेवरुन निलंबित करणे अथवा त्यांना बदलणे कॅफो आणि सीओ यासंदर्भात आपण कारवाई करणार आहात काय? ज्यांची आपण अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे त्यांच्याकडून योग्य अशी चौकशी होणार नाही.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, निविदेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, दिनाक 30 जुलै, 2015 रोजी निविदा प्रसिध्द झाली. तक्रार प्राप्त झाल्यानंतर दुसरी निविदा नोव्हेंबरमध्ये प्रसिध्द झाली आणि त्यानंतर त्याचे शुध्दीपत्रक काढण्यात आले. आता आयुक्त लेवलची समिती नेमण्यात आलेली आहे. ही समिती निपक्ष:पातीपणे चौकशी करेल आणि त्याचा अहवाल सादर करेल यासाठी वाट बघणे महत्वाचे आहे. चौकशी योग्य होणार नाही असे म्हणणे चुकीचे ठरेल. त्यांचा अहवाल 15 दिवसांनी म्हणजे दिनांक 26 एप्रिल, 2016 रोजी प्राप्त होणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांचा त्यात मुळीच हस्तक्षेप राहणार नाही. सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारला त्यात त्यांनी सांगितले की, चायनामेड आहे. माझ्याकडे अहवाल आहे त्यावरुन असे दिसते की, एक सिंगल ब्रँड आणि एक लोकल ब्रँडचे आहे. त्यामुळे चौकशी अंती हा सर्व प्रकार आपल्यासमोर येणार आहे. तेव्हा जर कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर नक्की कारवाई करण्यात येणार आहे. यामध्ये लोकल अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप होणार नाही याची हमी मी सन्माननीय सदस्यांना देते.

--------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: शासनाने कायम दुष्काळप्रवण असलेल्या बागलाण तालुक्यातील नद्यांवर भूमिगत काँक्रीट बंधारे बांधण्याची आवश्यकता

**मु.शी.**: शासनाने कायम दुष्काळप्रवण असलेल्या बागलाण तालुक्यातील नद्यांवर भूमिगत काँक्रीट बंधारे बांधण्याची आवश्यकता यासंबंधी श्रीमती दीपिका चव्हाण, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती दीपिका चव्हाण ( बागलाण ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

*"**बागलाण*** (जि.नाशिक) तालुक्यामधील ***आरम, मोसम, हत्ती व कान्हेरी या नद्या शासनाने अधिसूचित केलेल्या असणे, सततच्या दुष्काळासारख्या संकटावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी या नद्यांवर भूमिगत काँक्रीट बंधारे बांधणेबाबत लोकप्रतिनिधींनीच्या माध्यमांतून*** शासनाकडे ***मागणी*** केली असणे, ***बागलाण तालुक्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता भू-गर्भातील पाणी पातळी खालावलेली असणे, त्यामुळे सिंचनाबरोबरच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुध्दा गंभीर होणे, वरील नद्यांवर भूमिगत काँक्रीट बंधाऱ्यामुळे भूजल पातळीत वाढ होऊन सटाणा, मुजवाड, सोमपूर, आसखेडा, द्याने, उत्राणे, अंबासन, औंदाणे, तरसाळी, चौधाने, वटार, बंधाणे, विंचूरे, वनोजी, केरसाने, विरंगाव या गावांमध्ये अप्रत्यक्ष सिंचन होणार असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न*** सुटण्यास होणारी ***मदत, त्यामुळे अधिसूचित नदीच्या सिंचनावर, अस्तित्वातील बंधाऱ्यांच्या पाणी वापरावर तसेच सिंचन प्रणालीवर कुठलाही परिणाम होण्याची शक्यता नसणे, यामुळे शासनाच्या धोरणाचे कुठेही उल्लंघन भूमिगत बंधाऱ्यामुळे होणार नसणे,*** तथापि, शासनाचे याकडे झालेले दुर्लक्ष, ***त्यामुळे शासनाने कायम दुष्काळप्रवण असलेल्या बागलाण तालुक्यातील आरम, मोसम, हत्ती, कान्हेरी या नदीवर भूमिगत काँक्रीट बंधारे बांधण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."***

.......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे ( जलसंधारण मंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : आता लक्षवेधीला दोन तास गेलेले आहेत. ज्यांची लक्षवेधी सूचना असेल त्यांनीच प्रश्न विचारावेत. आज अंतिम आठवडा प्रस्ताव आहे तसेच आणखीही कामकाज आहे.

श्रीमती दीपिका चव्हाण : अध्यक्ष महोदय, बागलाण हा दुष्काळी तालुका आहे. माझ्या मतदारसंघामध्ये असलेल्या आरम, मोसम, हत्ती व कान्हेरी या नद्या ..........

**अध्यक्ष** : तुमच्या प्रश्नाला उत्तर दिले नाही तर वेगळ्या मार्गाने प्रश्न उपस्थित करु शकता. आता आपण पुढे आलेलो आहोत. सर्वांना बोलायला दिले पाहिजे असे नाही. ज्यांचे नाव आहे त्यांना बोलायला देत आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील आता आपण पुढे गेलेलो आहोत. तुम्ही खाली बसा. ज्यांचा प्रश्न आहे त्यांना दोन प्रश्न विचारायला दिलेत. प्रश्न विचारण्याचा सर्वांचा अधिकार नाही. अशी बळजबरी करता यायची नाही. कृपया आपण खाली बसा.

श्रीमती दीपिका चव्हाण : अध्यक्ष महोदय, बागलाण हा दुष्काळी तालुका आहे. माझ्या मतदारसंघामध्ये असलेल्या आरम, मोसम, हत्ती व कान्हेरी या नद्या शासनाने अधिसूचित केलेल्या आहेत. त्यामुळे या नद्यांवर सिमेंट बंधारे बांधता येत नाहीत. या सर्व नदी पात्रांमध्ये पक्क्या खडकांची पातळी सुमारे 7 ते 8 मीटर खोल असल्याने सिमेंट बंधाऱ्याची किंमत अवास्तव येते. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अनेक गावांचा पाणीपुरवठा योजना विहिरी या नदीकाठी आहेत. नदीचे पाणी कमी झाल्यावर या विहिरी कोरड्या पडतात. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. भूमीगत कॉंक्रीटी बंधाऱ्यामुळे पाणी जमिनीत दिर्घकाळ टिकून राहणार आहे. म्हणून पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरींजवळ शासन अधिसूचित असलेल्या नदीजवळ सिमेंट बंधारे किंवा भूमीगत कॉंक्रीटीकरणास शासन परवानगी देणार काय? भौगोलिक परिस्थितीमुळे भूमीगत बंधारे बांधण्यासाठी काळी माती माझ्या मतदारसंघामध्ये उपलब्ध होत नाही. त्यामुळे सिमेंट कॉंक्रीटचे भूमीगत बंधारे बांधण्यासाठी व पाण्याची पातळी टिकविण्यासाठी शासन आरम, मोसम, हत्ती व कान्हेरी या नद्यांवर भूमीगत कॉंक्रीट बंधारे बांधण्यासाठी माननीय जिल्हाधिकारी, नाशिक यांनी नदी पुनरुज्जीवन अंतर्गत पाठविलेला प्रस्तावाला शासन मान्यता देणार आहे काय?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती दिपीका चव्हाण यांनी जो प्रश्न सभागृहामध्ये विचारला आहे त्यात आरम व मोसम नद्यांमध्ये भूमीगत बंधाऱ्यांसदर्भातील त्यांची

.........5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे.........

मागणी आहे. भूमीगत बंधाऱ्यांबाबत आपल्याकडे कुठलेही स्पष्ट असे संकल्प चित्र नाही. भूमीगत बंधाऱ्यांचे मापदंड सुध्दा निश्चित नाहीत. सन्माननीय सदस्यांची मागणी ही योग्य आहे. अधिसूचित नद्यांमध्ये शासनाच्या परवानगीशिवाय आपण कुठलेही काम करु शकत नाही. जलसंपदा विभागाच्या माध्यमातून या प्रस्तावाला चालना देता येईल. यामध्ये गरज आहे ती भूमीगत बंधाऱ्यांचे संकल्प चित्र तयार करणे, त्यांचे मापदंड निश्चित करणे, त्यानंतर याबाबतीतील निर्णय घेता येईल. सन्माननीय सदस्यांनी केलेली मागणी न्याय असली तरी अधिसूचित नदी असल्यामुळे जलसंपदा विभागाच्या परवानगीशिवाय काहीही करु शकत नाही. सदर प्रस्ताव तापी महामंडळाकडे दिलेला आहे. एक्झीकेटीव्ह इंजिनिअरकडून एसीकडे हा प्रस्ताव आलेला आहे. त्याची सेंट्रल डिझाईन ऑरगानायझेशनच्या माध्यमातून मापदंड निश्चित करुन याबाबतचा सकारात्मक निर्णय घेऊ शकू.

श्रीमती दीपिका चव्हाण : अध्यक्ष महोदय, सिमेंट नाला बंधारे तांत्रिकदृष्ट्या निकषात न बसण्याची कारणे काय आहेत. भूमीगत बंधाऱ्याच्या कामासाठी मापदंड निर्धारीत न करण्याची कारणे काय आहेत. भूमीगत बंधाऱ्यांची कामे करण्यासाठी शासनाकडून धोरणात्मक निर्णय किती दिवसात घेण्यात येईल?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, जलसंधारणाच्या कामातून होत असणाऱ्या सिमेंट बंधाऱ्यांचा निर्णय घेता येतो. सिमेंट बंधारे हे प्रत्येक जमिनीच्या स्ट्राटामध्ये सुटेबल असतात असे नाही. काही ठिकाणी एक मीटर, दोन मीटर, तीन मीटर खोदत गेलो तरी काही ठिकाणी काळी माती लागते काही ठिकाणी आपल्याला मुरुम लागत नाही. भूमीगत बंधाऱ्याच्या संदर्भातील निर्णय आतापर्यंत कधी झालाच नाही. त्यांसदर्भातील संकल्पचित्र, मापदंड आपल्याकडे तयार नाही. लवकरच जलसंपदा विभागासोबत बैठक घेऊन मापदंड तयार करण्यासंदर्भातील निर्णय घेऊ आणि मग भूमीगत बंधाऱ्यांच्या संदर्भातील निर्णय शासन घेऊ शकेल.

------------

.........6

**पृ.शी.**: सोलापूर जिल्हयातून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाकडे धोरण नसणे.

**मु.शी.**: सोलापूर जिल्हयातून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाकडे धोरण नसणे यासंबंधी
कु.प्रणिती शिंदे,सर्वश्री भारत भालके,बसवराज पाटील, सिध्दाराम म्हेत्रे,वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती प्रणिती शिंदे ( सोलापूर शहर ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"राज्यातील भिमा नदीच्या टाकळी जेव्हरगी, गाणगापूर येथील पाण्याच्या नमुन्यांची तपासणी केंद्रीय मंडळाने केली असता प्रदुषणाचा स्तर मोठया प्रमाणात वाढला असल्याचे निदर्शनास येणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, एमआयडीसी, साखर कारखाने यांच्याद्वारे दुषित पाणी नाले, ओढे, नद्यांमध्ये सोडण्यात*** आल्यामुळे ***नदीचे प्रदुषण वाढणे, सांडपाणी प्रक्रिया केल्याचा दावा महानगरपालिका करीत असून प्रत्यक्षात एक तृतीयांश पाण्यावर प्रक्रीया होत नसणे, पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील औद्योगिक वसाहतीतील*** सांडपाणी, ***शेतीत मोठया प्रमाणावर वापरण्यात येणारी रसायने, किटकनाशके या विविध कारणाने भिमा खोऱ्यातील नद्यांचे प्रदुषण वाढत असून नदीकाठच्या गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाल्याने उजनी धरणातील अनेक जलचर नामशेष होण्याच्या मार्गावर असणे, भिमा नदी व उजनी धरणाच्या पाण्यावर सोलापूर जिल्हयातील ८० टक्के पाणीपुरवठा योजना अवलंबून असणे,*** औज बंधाऱ्यात साखर करखान्यांनी मळी मिश्रीत पाणी सोडल्याने त्याचे गंभीर परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होणे, तथापि, कारखान्यांविरूध्द कोणतीही कारवाई न होणे. ***पंढरपुरात दरवर्षी आषाढी, कार्तिकी एकादशी निमित्त लाखो वारकरी येत असून सांडपाणी मैला वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाल्याने नदीचे आरोग्य बिघडले असणे, सोलापूर जिल्हयातून होणारे प्रदुषण रोखण्यासाठी शासनाकडे कोणतेच धोरण नसणे, त्यामुळे*** नागरिकांमध्ये

...........7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***श्रीमती प्रणिती शिंदे.....***

***पसरलेला असंतोष, याबाबात तातडीने चौकशी करुन भिमा नदी व उजनी धरणातील प्रदुषण रोखण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."***

श्री.रामदास कदम ( पर्यावरण मंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती प्रणिती शिंदे : अध्यक्ष महोदय, मी पहिल्यांदा मंत्री महोदयांचे आभार मानते. भीमा नदी व तिच्या उपनद्यांच्या पर्यायाने उजनी धरणाचे प्रदूषण होत आहे हे आपण मान्य केले आहे. दुसरी गोष्ट म्हणजे माननीय अर्थमंत्र्यांनी ज्यावेळी अर्थसंकल्प मांडला त्यावेळी चंद्रभागेसाठी 20 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पामध्ये केली होती. याचा अर्थ असाच म्हणावा लागेल की, भीमा नदी ही प्रदूषित आहे. थोड्या प्रमाणात आहे का मोठ्या प्रमाणात प्रदूषित आहे हा वेगळा प्रश्न आहे. भीमा नदीचे पाणी संपूर्ण सोलापूर जिल्हा पितो. जवळ जवळ 30 लाख लोक भीमा नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, एमआयडीसी कुर्कूम आजूबाजूला असलेले साखर कारखाने हे सांडपाणी प्रक्रिया केल्याशिवाय भीमा नदीत सोडत आहेत. तीच भीमा नदी आम्हाला उजनीकडे येऊन पाणी देत आहे. स्वर्गीय अटल बिहारी वाचपेयींचे शब्द होते की, इस देश की हर नदी हमारे लिये गंगा है. इस देश के कंकर, कंकर हमारे लिये शंकर है.

JJ-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती प्रणिती शिंदे......
गंगेच्या धर्तीवर भिमा शुध्दीकरण प्राधिकरण स्थापन करणार आहात का ? हा माझा पहिला प्रश्न आहे.

श्री.रामदास कदम : अध्यक्ष महोदय, अतिशय चांगला प्रश्न विचारलेला आहे. ही गोष्ट मला मान्य आहे की, मागच्या अनेक वर्षापासून हे प्रदुषण आहे. हे प्रदुषण कालचे नाही. हा प्रश्न भिमेचा नाही तर चंद्रभागेचा देखील आहे. पंढरपूर येथे कार्तिकेला, एकादशीला लाखो भाविक तेथे येतात. हा प्रश्न अगोदरच सुटायला पाहिजे होता. मला ही गोष्ट मान्य आहे. आज पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे सर्व पाणी प्रोसेस होत नाही. पिंपरी चिंचवड येथे 67 एम.एल.डी. पाणी विना प्रक्रिया सोडले जाते. विशेषत: भिमा नदीमध्ये पुणे जिल्हयामधील 259 एम.एल.डी. घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया होते. 251 एम.एल.डी. पाण्यावर प्रक्रिया होत नाही ते असेच सोडले जाते. हे मला मान्य आहे. पुणे जिल्हयातील औद्योगिक वसाहतीत 177 मोठे, 375 मध्यम 2200 लघु उद्योग आहेत. काही अंशी याच्यामध्ये चांगली प्रोसेस केली जाते. परंतु पुणे नगरपालिकेमधून जवळजवळ 177 एम.एल.डी. पाणी विना प्रक्रिया सोडले जाते.

अध्यक्ष महोदय, टप्पा टप्प्याने पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या आयुक्तांना बोलावून मिटींग घेतली होती. त्यांना नोटीसा दिल्या आहेत. पुण्याच्या आयुक्तांवर गुन्हा दाखल केला आहे. जे आतापर्यंत कधीच शक्य झाले नव्हते ते केले आहे. मी अधिक माहिती देतो, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 27 महानगरपालिकांचे सर्वात जास्त पाण्याचे प्रदुषण 86 टक्के होते आहे. कुठल्याही महानगरपालिकेने सांडपाणी प्रोसेस करुन सोडायला पाहिजे ते सोडले गेले नव्हते. म्हणून आपण हया आयुक्तांवर गुन्हा दाखल केला आणि सर्वांना नोटीसा दिल्या आहेत. कुठल्याही परिस्थितीमध्ये तुमच्या बजेटचा 25 टक्के निधी सांडपाणी आणि कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी ठेवलाच पाहिजे. असा निर्णय घेतला व निर्देश दिले आहेत. मला सांगायला आनंद होते की, सगळया नोटीसांमुळे आणि केलेल्या कार्यवाहीमुळे आता पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी तशा प्रकारचे नियोजन केले आहे. दुसरी गोष्ट पुणे, पिंपरी चिंचवडच्या महानगरपालिकेने सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी जपान सरकार सोबत जॉईंट प्रकल्प घेतलेला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम..........

990 कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. त्यापैकी 5 कोटी रुपये केंद्र सरकारने नुकतेच दिलेले आहेत. तशा प्रकारचे नियोजन त्यांनी केलेले आहे. भविष्यामध्ये एका वर्षाच्या आतमध्ये हे पुर्णपणे थांबेल, पुणे महानगरपालिकेने यासाठी 25 टक्के निधी ठेवलेला आहे. त्यांनी सुध्दा यासाठी काही महिन्यांचा कालावधी मागून घेतलेला आहे. अशा पध्दतीने भविष्यामध्ये कुठल्याही परिस्थितीमध्ये बिना प्रोसेस पाणी भिमा नदीमध्ये जाता कामा नये. आपण लेखी प्रश्नात विचारले त्याबाबत सांगतो ही तिनही शहरे कर्नाटक राज्यात आहेत. ती आपल्या राज्यात नाहीत. त्या सीमा रेषेवरील पाण्याचे नमूने नेहमी घेतले जातात आणि ते प्रत्येक महिन्यात तपासले जातात. त्याची आकडेवारी माझ्याकडे आहे. आपल्या पासून काही लपवून ठेवायचे नाही.

श्रीमती प्रणिती शिंदे : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न फक्त पंढरपूर इतका मर्यादित नाही. पूर्ण सोलापूर जिल्हयासाठी हा प्रश्न आहे. सध्याला उजनी मायनस 33 वर आले आहे. परवा एक सचिव माननीय श्री. गिरीष महाजन यांच्या कॅबिनमध्ये रेकॉर्डवर म्हणाले की, हयाच्या खाली गेलो तर पूर्ण सोलापूर शहर आणि गावातील एक एक माणूस मरेल. सोलापूरचे माजी जिल्हाधिकारी रेकॉर्डवर गेले की, काही गावातील मुले मतिमंद म्हणून जन्माला आली आहेत. आता डायरेक्ट इफेक्ट दिसून येत नाही. ते लॉंगटर्म दिसून येतात. तिसरी गोष्ट म्हणजे केंद्रीय पोल्युशन बोर्डाचा अहवाल माझ्याकडे आहे. त्यामध्ये असे लिहिले आहे की, भीमेचे पाणी पिण्यायोग्य नाही. भीमा ही सर्वात प्रदुषित नदी आहे. आता आपण सांगितले की, महानगरपालिकेने गुन्हा केला आहे. परंतु सरकारचे येथे दायित्व आहे, सरकार या ठिकाणी काय करणार आहे ? सध्याला उजनी मायनस 33 वर आहे. तातडीने सरकारने याबाबत काही तरी करावे. आता निधीची तरतूद फक्त चंद्रभागेसाठी केली आहे. महानगरपालिकासोडून साखर कारखाने आहेत, एमआयडीसी कुरकुंभ आहे, मळी मिश्रित पाणी देखील सोडले जाते, त्यामध्ये ई-कोलाईटचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. आपण लिहिले आहे की, सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याची आवश्यक आहे, हे सरकार कधी करणार आहे ? याबाबत लवकरात लवकर मशिनरी कधी स्थापन करणार आहे ?

....3/-

श्री.रामदास कदम : अध्यक्ष महोदय, मी आताच सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे किती पाणी प्रोसेस होत होते, किती होत नव्हते, त्यासाठी दोन्ही महानगरपालिकांनी 25 टक्के निधी राखून ठेवलेला आहे. आता निधीची तशी आवश्यकता भासणार नाही. पुण्यापासून उजणी पर्यंत गेलो तर मध्ये 300 कि.मी. चे अंतर आहे. ते अंतर जवळचे नाही. पुण्यामध्ये पाहिले तर पाणी प्रदुषित असल्याचे आढळते. शेवटच्या टोकाला म्हणजे 300 कि.मी. लांबीवर तर पाणी पिण्यासाठी योग्य नाही असे आढळत नाही. म्हणून तशा प्रकारचे नियोजन केलेले आहे. पाण्याचे प्रदुषण मी नाकारले नाही. आम्ही जसा हा विषय गंभीरतेने घेतला आहे, तसा मागच्या शासनाने जर हा विषय गंभीरतेने घेतला असता तर ही वेळ आली नसती. निश्चितपणे आपल्याला सांगेन की चंद्रभागेसाठी या सरकारने 22 टक्के निधी राखून ठेवलेला आहे. चंद्रभागा प्रदुषित होऊ देणार नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांवर गुन्हा दाखल केला आहे. त्यांना 990 कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. 5 कोटी केंद्र शासनाने दिलेले आहेत. प्रोसेस व्हायला काही अवधी दिला पाहिजे.

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, या प्रश्नाची चर्चा सभागृहामध्ये अनेक वेळा झालेली आहे. याबाबतीतील आश्वासने गेल्या 10 वर्षामध्ये या सभागृहाने ऐकलेली आहेत. मंत्री महोदयांना मी धन्यवाद देणार आहे. पहिल्यांदाच पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांवर गुन्हा दाखल केला. फक्त गुन्हा दाखल करुन प्रदुषण थांबत नाही. याच्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, कुरकुंभची एमआयडीसी, साखर कारखाने यांचे सांडपाणी भिमा नदीत सोडले जाते, त्याच्या बाबतीत कालबध्द कार्यक्रम शासन तयार करणार आहे का ? किती दिवसात सोलापूर जिल्हा आणि शहराला प्रदुषण मुक्त पाणी प्यायला मिळेल, याबाबत कालबध्द कार्यक्रम आणि ठराविक मुदतीमध्ये उपाय योजना शासन करणार आहे का, याबाबत मंत्री महोदय उत्तर देतील का ?

श्री.रामदास कदम : अध्यक्ष महोदय, होय, पाण्याच्या प्रदुषणाच्या बाबतच्या समस्या अनेक वर्षापासूनच्या आहेत. हे शासन बदलल्यानंतर मोठया प्रमाणात प्रयत्न करुन निधीची उपलब्धता करुन दिलेली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.देशमुख यांना सांगेन की, एक महिन्याच्या आत पुण्यामधील सर्व लोकप्रतिनिधींना घेऊन तेथे बैठक घेऊ तसेच पिंपरी चिंचवडमधील सर्व लोकप्रतिनिधींना घेऊन तेथे एक बैठक घेऊ.

KK-1..........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम.....

तशा प्रकारे बैठकीचे आयोजन व नियोजन करणे व हे काम करणे ही महानगरपालिकेच्या आयुक्तांची जबाबदारी आहे. त्यांना आपण सक्त ताकीद देऊ. आपण त्यांच्यावर गुन्हा दाखल केलेला आहे. मी स्वत: तेथे येईल, तेथे आपण बैठका घेऊ व याबाबत योग्य ते निर्देश संबंधित आयुक्तांना देण्यात येतील.

**अध्यक्ष** : संबंधित आमदारांची बैठक घेऊन त्यातून काय मार्ग काढता येईल, याबाबत मंत्री महोदयांनी सांगितले आहे.

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी हा प्रश्न सहा महिने एक वर्षाच्या आत सोडविण्यासाठी स्वत: निर्णय घेतला पाहिजे. मिटींगमध्ये चर्चा होईल, त्यांचे प्रश्न ते मांडतील. त्यातून काय निष्पन्न होणार आहे, सभागृहाला उत्तर पाहिजे की, किती दिवसात हे होणार आहे ?

श्री.रामदास कदम : अध्यक्ष महोदय, पुणे महानगरपालिकेच्या बाबतीत सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याबाबत जायका प्रकल्पांतर्गत कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. त्यांनी तशी पाच वर्षाची मुदत मागितलेली आहे. पण 5 वर्षे जास्त होतात. म्हणून मी सांगितले की, आपण सर्व जण एकत्र बसू. आपलाही सल्ला घेऊ. पाच वर्षाऐवजी कमीत कमी वर्षामध्ये ठोस कार्यक्रम करण्याकरिता शासन निश्चितपणे विचार करील.

श्री.भारत भालके : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये वारंवार पुणे महानगरपालिकेचा उल्लेख केलेला आहे. 177 एमएलडी जास्तीचे सांडपाणी नदीमध्ये जात आहे हे देखील मान्य केलेले आहे. परंतु पुणे महानगरपालिकेशिवाय अन्य महानगरपालिकाही आहेत. सिना निरा प्रकल्प व कुरकुंभ एमआयडीसी आहे. या सर्वांचे किती एमएलडी पाणी उजनी धरणामध्ये येते याचाही येथे खुलासा व्हावा. येथे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा अहवाल आला आहे की हे पाणी पिण्यास अयोग्य आहे. पण नगरपालिका व मोठया पाणीपुरवठा योजनांच्या ठिकाणी क्लोरीन किंवा आरओ सिस्टीम बसवून तेथे पाणी स्वच्छ करुन दिले जाते. पण नदीकाठच्या अनेक ग्रामपंचायती आहेत की, त्यांना आरओ सिस्टीम नाही. त्यांना पाणी स्वच्छ करण्यासाठी कोणताही निधी नाही. अशा ठिकाणी तुम्ही आरओ सिस्टीम देणार आहात का ?

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भारत भालके .....

दुसरी महत्वाची बाजू आहे की, नमामि चंद्रभागा अभियान योजना लागू करुन शासनाने 20 कोटी रुपये सन 2022 पर्यत दिले आहेत. म्हणजे वर्षाला साधारणपणे तुम्ही 3 कोटी रुपये खर्च करणार आहात. आमचे म्हणणे आहे की, उजनी धरणाच्या उगमापासून महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत या नदीला कायमची प्रदुषणमुक्त करण्यासाठी जास्तीत जास्त निधी देणार आहात काय ?

श्री.रामदास कदम : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सविस्तर उत्तर मागितले आहे. म्हणून मी सविस्तर उत्तर देत आहे. उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये प्रामुख्याने भिमा नदी व तिच्या उपनद्यांचे पाणी जाते. इंद्रायणी, पवना, मुळा-मुठा, मिना, कुकडी, घोड या नद्यांचा उगम पुणे जिल्हयामध्ये वेगवेगळया ठिकाणांहून होतो. तेथील सर्व पाणी उजनी धरणाकडे जाते. पुणे शहरात एकूण पाणी 744 एमएलडी आहे. पुणे महानगरपालिकेने सांडपाणी प्रकिया करणारी सयंत्रणा 10 ठिकाणी बसविलेली आहे. 567 एमएलडी पाण्यावर प्रोसेस केली जाते. 177 एमएलडी सांडपाणी हे विनाप्रक्रिया नदीमध्ये सोडले जाते. पुणे जिल्हयात 13 नगरपरिषदा व 3 कँटोनमेंट बोर्ड आहेत. त्यातून 1110 एमएलडी घरगुती सांडपाणी निर्माण होत असून त्यातील 859 एमएलडी घरघुती पाण्यावर प्रोसेस होते. त्यामधील 251 एमएलडी सांडपाण्यावर प्रोसेस होत नाही.

अध्यक्ष महोदय, सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारणीसाठी पुणे महानगरपालिका व जपान सरकार यांच्या वतीने जायका प्रकल्प राबविण्याचा निर्णय झालेला आहे. अंदाजे 990 कोटी रुपये याकरिता मंजूर आहेत. याकरिता 5 कोटी रुपये केंद्र शासनाने दिलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, पुणे जिल्हयामध्ये एकूण 9 एमआयडीसी असून त्यात 177 मोठे, 375 मध्यम व 2200 लहान लघुउद्योग असून कोणत्याही उद्योगाने प्रक्रिया केल्याशिवाय पाणी बाहेर सोडले जात नाही. याकरिता वेळोवेळी त्यांच्याकडील पाणी तपासण्याकरिता नमुने घेत असतो. एखाद्या उद्योगाने अशा प्रकारचे पाणी सोडले तर त्याची बँक गॅरंटी जप्त करणे, त्याच्यावर गुन्हा दाखल करणे अशा अनेक प्रोसेस आपण केलेल्या आहेत.

......3

श्री.रामदास कदम ....

अध्यक्ष महोदय, पुणे महानगपालिका हद्दीतून सद्यस्थितीत जवळजवळ 744 एमएलडी एवढया घरगुती स्वस्पाच्या सांडपाण्याची निर्मिती होते. त्यावर प्रक्रिया करण्यासाठी पुणे मनपाने वेगवेगळया 10 ठिकाणी एकूण 567 एमएलडी क्षमता असेली सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारली आहे. प्रक्रियाकृत सांडपाणी मुळा व मुळा-मुठा नदीमध्ये वेगवेगळया ठिकाणी सोडले जाते. तसेच उर्वरित 177 एमएलडी घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा नसल्यामुळे यावर अजूनही प्रोसेस केली जात नाही. पुणे शहरात निर्माण होणाऱ्या मैलापाण्यावर सध्या अस्तित्वात असलेल्या शुध्दीकरण केंद्राव्यतिरिक्त 177 दशलक्ष लिटर्स क्षमतेचे मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे आवश्यक आहे. तशा प्रकारच्या सूचना संबंधित महानगरपालिकेला दिलेल्या आहेत. कोणत्याही परिस्थितीत एक महिन्याच्या आत पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांसोबत पुन्हा मिटींग घेण्यात येईल. संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्तांना बोलावून त्यांच्याकडून कालबध्द कार्यक्रम घेण्यात येईल. आवश्यकता असल्यास पुढील अधिवेशनात सभागृहात आपण आवश्यक ती माहिती देऊ. महानगरपालिका परिसरातील सांडपाणी, घरगुती सांडपाण्यावर शक्यतो लवकरात लवकर आराखडा तयार करुन निश्चितपणे कालबध्द कार्यक्रम हाती घेऊन तशा प्रकारच्या उपायोजना शासनाकडून केल्या जातील.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

....4

**पृ.शी.** : सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण (प्रतिबंध, बंदी व निवारण) विधेयक 2016

L.A. BILL NO. XXIII OF 2016.

(A BILL TO PROVIDE FOR THE PROHIBITION OF SOCIAL BOYCOTT OF A PERSON OR GROUP OF PERSONS INCLUDING THEIR FAMILY MEMBERS, AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

प्रा.राम शिंदे (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 23 एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह तसेच त्यांच्या कुटूंबातील सदस्य यांच्यावरील सामाजिक बहिष्कारावर बंदी आणण्याकरिता प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**अध्यक्ष** :अनुमती देण्यात आली आहे.

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 23 मांडतो.

**अध्यक्ष** : विधेयक मांडण्यात आले आहे.

.

----

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**भिवंडी येथील इमारतीला आग लागून 150 लोक अडकल्याबाबत**

श्री.रुपेश म्हात्रे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अबु आझमी यांनी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून विषय मांडला असला तरी हा माझ्या भिवंडी मतदारसंघातील विषय आहे. माझ्या भिवंडी मतदारसंघात आज सकाळी 7 वाजता 4 मजली इमारतीला आग लागली. तेथे खाली कारखाना आहे व वर 66 रहिवाशी सदनिका आहेत. तेथे 150 लोक अडकून पडले होते. भिवंडीमध्ये अद्यावत अशी अग्निशामक यंत्रणा नसल्यामुळे 150 लोकांना आपला जीव मुठीत घेऊन इमारतीच्या गच्चीवर जाऊन थांबावे लागले. माझी या घटनेच्या माध्यमातून मागणी आहे की, संबंधित मंत्री किंवा माननीय मुख्यमंत्री यांनी लक्ष देऊन या घटनेमध्ये जखमी झालेल्या लोकांना जास्तीत जास्त मदत देण्याबाबत कारवाई करावी. त्याचप्रमाणे अद्यावत अग्निशामक यंत्रणा भिवंडी शहरात असावी. कारण भिवंडीमध्ये इमारती व कारखाने वाढत आहेत. भिवंडीच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये वेअर हाऊस मोठया प्रमाणावर वाढत आहेत. तेथे आग लागण्याच्या घटना मोठया प्रमाणावर वाढत आहेत. तरी याबाबत शासनाने लक्ष द्यावे.

**अध्यक्ष** : शासनाने लक्ष द्यावे.

यानंतर LL-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत.**

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून एक गंभीर मुद्दा सभागृहाच्या निदर्शनास आणत आहे. नांदेड येथील पोलीस भरती प्रकरणामध्ये 5 लाख रुपये घेतल्याचा प्रकार उघडकीस आलेला आहे. संबंधित आरोपीचे नाव श्री.मनोज बाफना आहे. या संदर्भातील आरोपीला पकडल्यानंतर त्याच्याविरुध्द वजीराबाद पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर आरोपीची बायपास सर्जरी झालेली असल्याने त्यांना रक्तस्त्रावाचा त्रास झाला म्हणून ताबडतोब त्यांना सोडून देण्यात आले. श्री.मनोज बाफना हे आरोपी कोण आहेत ? पोलीस भरती प्रक्रियेमध्ये अनेक तरुण येत असतात, अशा प्रकारे त्यांच्याकडून भरतीकरिता पैसे घेतले जाणे योग्य नाही. पोलीस कॉन्स्टेबलने त्यांना पैसे घेतांना रंगेहाथ पकडलेले आहे. श्री.मनोज बाफना हे प्रमुख राजकीय पक्षाच्या नेत्यांचे मेहुणे आहेत. श्री.पोखरना, भाजप पक्षाच्या महापौरांचे ते मेहुणे आहेत. एका आरोपीला कोणाच्या सूचनेवरुन सोडण्यात आले ? याप्रमाणे अजून किती लोकांकडून फसवणूक करुन पैसे घेतले मी काही पक्षीय राजकारण करीत नाही. याबाबत ताबडतोब कारवाई झाली पाहिजे, यांना का सोडण्यात आले ? आम्हाला समजले पाहिजे किती लोकांकडून पैसे घेतले ?कोणाच्या दबावाखाली पोलीस यंत्रणा काम करीत आहे ?

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** सार्वजनिक विद्यापीठ विधेयक

L.A. BILL NO. XVI OF 2016.

(A BILL TO PROVIDE FOR ACADEMIC AUTONOMY AND EXCELLENCE, ADEQUATE REPRESENTATION THROUGH DEMOCRACTIC PROCESS, TRANSFORMATION, STRENGTHENING AND REGULATING HIGHER EDUCATION AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे ( शिक्षणमंत्री ): अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 16 विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रियेद्‌वारे पर्याप्त प्रतिनिधीत्त्व, उच्च शिक्षणाची अभिवृध्दी, त्याचे बळकटीकरण व विनियमन याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्‌नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा,2016 नागपूरच्या अधिवेशनामध्ये हे विधेयक चर्चेला घेतले जाणार होते. नागपूरच्या अधिवेशनामध्ये हे विधेयक चर्चेला मांडले होते. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार यांनी सांगितले की, मधील काळात यावर सविस्तर चर्चा करणे आवश्यक आहे. मधील काळात माननीय विरोधी पक्ष नेते, विविध पक्षांचे नेते, इतर काही सन्माननीय सदस्यांना सोबत घेऊन याबाबत बैठका झाल्या. त्यामध्ये यावर विचार झाला. यामध्ये सुचविलेल्या सुधारणा स्वीकारुन हे विधेयक आता सभागृहात चर्चेला आणले जात आहे.

अध्यक्ष महोदय, 1994 पर्यंत प्रत्येक विद्यापीठाचा कायदा वेगवेगळा होता. 1994 मध्ये सर्व विद्यापीठांना महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 1994 विधिमंडळामध्ये संमत केला. कारण असे होते की, कायदा बनत असताना तत्कालीन उच्च शिक्षण मंत्री महोदयांनी केलेले भाषण मी वाचले. पूर्वीच्या वेगवेगळया विद्यापीठांच्या कायद्यामुळे काय काय अडचणी होत होत्या, त्याच्यामध्ये विद्यापीठातील काही अधिकारी जसे की, कुलसचिव, संचालक, विद्यापीठ व विकास मंडळ, वित्त व लेखा अधिकारी,परीक्षा नियंत्रक यांच्या नेमणूका कायमस्वरुपी होत्या.

......3

श्री.विनोद तावडे....

तेथे ते कायमस्वरुपी कार्यरत होते. याचे विपरित परिणाम अनुभवास आल्यामुळे 1994 च्या कायद्यांतर्गत त्यामध्ये दुरूस्त्या केल्या. वेगवेगळे मुद्दे त्या त्या ठिकाणच्या अनुभवाच्या आधारे तत्कालीन मंत्री महोदयांनी मांडले होते. 1994 पासून आज 2016 पर्यंत जवळ जवळ 22 वर्षे झालेली आहेत. या काळामध्ये आपण त्या कायद्याचा अनुभव घेतला. त्या कायद्याचे फायदे व गैरफायदे हेही आपल्या अनुभवास आले. त्याचबरोबर गेल्या 20-22 वर्षामध्ये शिक्षण व उच्च शिक्षणाबाबतचे जगातील परिमाण बदलत गेले. त्यामुळे या कायद्यान्वये निवडणूक पध्दतीचा व्यापक पध्दतीने अंगिकार केल्यामुळे शैक्षणिक कामकाज, अभ्यास मंडळे, विविध विद्या शाखा, विद्या परिषद या सारख्या महत्त्वाच्या प्राधिकरणात जे उद्दिष्ट त्यांचे असले पाहिजे, त्याच्यावर काम न होता 1994 च्या कायद्यानुसार इतर बाबतीत काम होत होते. काही व्यक्ती आणि आपण सर्व जण विद्यापीठामध्ये सक्रीय आहोत. काही विद्यापीठामध्ये एक-एक नावे अशी आहेत, संपूर्ण विद्यापीठ हलविणारे चालविणारे एक-दोन व्यक्ती प्रत्येक विद्यापीठात आहेत. अशी नावे आता घेता येतील. असे व्यक्तीकेंद्रित किंवा काही समुह संघटना केंद्रित काम व्हायला लागले. विद्यापीठात ॲकॅडॅमिक काम व्हायला पाहिजे ते करण्याची संधी कुलगुरुंना कमी राहिल्यामुळे कुलगुरु या सर्वांच्या हातातील बाहुले म्हणून काम करीत आहे, अशा प्रकारची भावना अनेक वेळा अनेक सन्माननीय सदस्यांनी सभागृहात मांडली होती. या सर्व गोष्टी लक्षात घेता गेल्या 2 दशकांमध्ये अंतर्गत बदल, खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण शिक्षणातील बदलते मोजमाप व आव्हाने, सामान्य दीनदलित व गरीबापर्यंत शिक्षण परिणामकारकरित्या पोहोचविण्यामध्ये 1994 चा कायदा कमी पडत असल्याचे लक्षात घेता मागील शासनाच्या काळामध्ये सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील, सन्माननीय सदस्य श्री. राजेश टोपे, सन्मानीय सदस्य श्री.डी.पी सावंत हे देखील या खात्याचे राज्यमंत्री होते. त्या काळामध्ये काही समित्या या संदर्भात नेमल्या गेल्या. डॉ.काकोडकर, डॉ.ताकोले, डॉ.निगवेकर या तीनही समित्यांनी उच्च शिक्षणासंदर्भात काही शिफारशी केल्या. या तीनही समित्यांनी परस्परपूरक काम केल्यानंतर त्यातून ज्या शिफारशी केल्या त्या संदर्भात डॉ.कुमूद बन्सल समितीने या सर्वांचा सार एकत्र केला.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

हे करुन त्यात काही गोष्टी मांडल्या गेल्या. डॉ.निगवेकर समितीच्या शिफारशीचा धोरणात्मक आधार म्हणून नवीन विद्यापीठ कायदा मांडला गेला व त्याचा मसूदा बनविला गेला. तो मसूदा त्यावेळी चर्चेला आला. त्यावर स्वाभविकपणे चर्चा झाली. या सगळया निगवेकर समितीच्या मांडणीमुळे पूर्ण अधिकार कुलगुरुंच्या हातात जात आहेत, निवडणुका कमी होत आहेत,असे दिसून आले. आधीच्या सरकारने निगवेकर समितीच्या शिफारशीच्या माध्यमातून कायदा मांडण्याचा व आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यानुसार 80 टकके नेमणूका 20 टक्के निवडणुका येथपर्यंत आधीच्या कायद्यात आधीच्या सरकारने सुचविले होते. कधी कधी काय होते की, एखाद्या गोष्टीत जर एखादी चूक लक्षात आली, तर त्याप्रमाणे त्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. निगवेकर समितीने सुचविले होते ज्यावर आपण सर्वांनी चर्चा केली होती. निगवेकर समितीने जे सुचविले त्याच्या आधारे जो कायदा तयार केला गेला होता. त्याच्यावरुन मी सांगतो सर्व फाईल्स मीच पाहतो. सन्माननीय सदस्य श्री.डी.पी सावंत यांची तत्कालीन राज्यमंत्री म्हणून सही कशावर आहे ? सन्माननीय सदस्य श्री.राजेश टोपे तत्कालीन मंत्री म्हणून त्यांची सही कशावर आहे हे सर्व मला माहिती आहे. मी जे बोलतो ते परफेक्ट व योग्य बोलत आहे. परफेक्ट योग्य ते शिक्षणामध्ये राजकारण न आणणारा मी शिक्षण मंत्री आहे. शिक्षण हे राजकारणाच्या पलिकडे असले पाहिजे, असे मानणारा मी मंत्री आहे. नवीन कायदा करीत असताना आधीचा कायदा हा वेगवेगळया घटकांशी केंद्रित होता. पण ज्या विद्यार्थ्यांशी हा कायदा केंद्रित असला पाहिजे त्या विद्यार्थ्यावर या कायद्यांतर्गत दुर्लक्ष केले गेले होते. या वेळी हा कायदा करीत असताना शासन विद्यार्थी केंद्रित कायदा करीत आहे. विद्यार्थी केंद्रित कायदा करीत असताना विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या निर्णय प्रक्रियेत आणले जात आहे.

एमएम-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे........

म्हणजे स्टुडंट कौन्सीलच्या निवडणुकीतून अनेक ठिकाणी नेत तयार झालेले आहेत. मारामारी होत असल्यामुळे निवडणुका बंद करायच्या, तर मारामारी ग्रामपंचायत, महानगरपालिका आणि विधानभेत देखील होत असून, त्या बंद केल्या जात नाही. मारामारी किंवा हिंसा कशी थांबविता येईल आणि कॉलेज कॅम्पसच्या माध्यमातून चांगले नेतृत्व कसे तयार होईल या दृष्टीकोनातून विचार केला जात आहे. आता तांत्रिकदृष्ट्या अनेक बदल झालेले आहेत. आता एसएसएम आणि ई-मेलद्वारे मतदान घेणे शक्य असल्यामुळे विद्यापीठातील युआरला मतदान करण्यासाठी विद्यार्थ्यांना जमवावे लागत होते, आता त्याची गरज पडणार नाही.

अध्यक्ष महोदय, लिंगडोह समितीने निवडणुका घेतल्या पाहिजेत, असे सुचविलेले आहे. ते आपल्याला बंधनकारक आहे. एवढी वर्षे त्याची अंमलबजावणी झालेली नाही. ते आता कायद्यात आणले जात आहे. अभ्यास मंडळामध्ये विद्यार्थ्यांनी काय शिकले पाहिजे, हे ठरविणाऱ्या बॉडीमध्ये आदल्या वर्षी जो फस्टक्लास फस्ट पास झालेला आहे त्या विषयातील विद्यार्थी हा अभ्यास मंडळाचा सदस्य असेल हे महत्वाचे असणार आहे. आजचा विद्यार्थी जबाबदार आहे. अशा विद्यार्थ्यांना मला काय शिकविले पाहिजे आणि काय नाही हे चांगल्या प्रकारे कळत आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय पंततप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी एक छोटासा निर्णय घेतलेला होता. आपण कोणतीही झेरॉक्स कॉपी काढल्यानंतर ती एसईओंकडून अटेस्ट करुन आणत होतो. त्या काळात इंग्रजांचा सर्वांवर अविश्वास होता. आपल्या देशातील माणूस झेरॉक्स कॉपी काढल्यानंतर तो सेल्फ अटेस्टेशन करु शकतो. अशा प्रकारे आपल्या देशातील माणसांवर विश्वास ठेवण्यासाठी सेल्फ अटेस्टेशन करण्याबाबतचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. तरूणांवर विश्वास ठेवला पाहिजे. त्यांना काय शिकले पाहिजे हे चांगल्या प्रकारे कळते. अभ्यास मंडळामध्ये अनुभवी व्यक्तींसमवेत असे विद्यार्थी बसणार आहेत.

अध्यक्ष महोदय, सेक्शन 42 (ई) मध्ये अधिसभेच्या विद्यार्थी परिषद अध्यक्ष, सचिवांचे प्रतिनिधीत्व सुचविले आहे. विद्यार्थी कल्याण मंडळात देखील सुचविले आहे. विद्यापीठाच्या

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे........

प्रश्नासाठी व्यवस्थापन परिषदेमध्ये त्याला वेळोवेळी बोलविले जाईल. मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये विद्यार्थ्यांचे मेजर प्रश्न असतील, त्यावेळी ठराविक अंतराने विद्यार्थी परिषदेतील निवडणुकीत अध्यक्षाला बोलावून विद्यार्थ्यांची बाजू मांडायला लावणे, चर्चेत सहभाग घेणे, विद्यापीठाच्या सर्वोच्च बॉडीवर विद्यार्थ्यांना प्रतिनिधीत्व देण्यासाठी जो कायदा केला जाणार आहे, त्यास विद्यार्थी वर्गाकडून निश्चितच स्वागत होणार आहे. निवडणुकीच्या माध्यमातून निवडून येणाऱ्या बॉडीला अधिकार दिले तर चांगले विद्यार्थी निवडणुकीत सहभाग होणार आहेत. नुसते शोभेपुरते किंवा नावापुरते ठेवले तर अशा वेळी विद्यार्थी सहभागी होत नाही. पण ज्याला खऱ्याअर्थाने बदल करावयाचा आहे, असे विद्यार्थी देखील यामध्ये सहभागी होऊ शकतील.

अध्यक्ष महोदय, विद्यापीठाच्या कायद्यात एक महत्वाची सुधारणा केली जाणार आहे. आजपर्यंत आपल्या देशातील विद्यार्थ्याला साचेबंद मानले होते. आर्टसचा विद्यार्थ्याने ठराविक विषय घ्यायचे, कॉमर्सच्या विद्यार्थ्याने ठराविक विषय घ्यायचे, सायन्सच्या विद्यार्थ्याने ठराविक विषय घ्यायचे, पण आता युजीसीने यावर्षी चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टिमचा मुद्दा आणलेला आहे. आर्टसच्या विद्यार्थ्याला इंग्रजी विषय घ्यावयाचे असेल आणि त्याचवेळी त्याला केमिस्ट्री, अकाऊंटचा विषय घ्यायचा असेल तर अशा विद्यार्थ्याला ते विषय घेता आले पाहिजे. Student should be allowed to shop around. विद्यार्थी हा काही साचा नाही. तो मल्टी टास्कींग आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या क्वॉलिटीज आहेत. त्याला जे शिकायचे आहे, त्याबाबत त्याला क्रेडीट घेता आले पाहिजे, यासंदर्भातील व्यवस्था केली जात आहे. त्यामुळे कोअर कम्पोनंट, अप्लाईड कम्पोनंट, ऑडिट कम्पोनंट असे वर्गिकरण केले जात आहे. गेल्या 20 वर्षातील विद्यापीठाचे उपक्रम, त्यातील सिस्टिम, बोर्ड ऑफ स्टडीजच्या निवडणुकांचा जवळून अभ्यास केलेला आहे. अभ्यास मंडळ आणि विद्याशाखेत प्रचलित कायद्यानुसार नॉमिनेशन्स आहेत. अशा नॉमिनेशन्सच्या मतांचे महत्व हे अभ्यास मंडळ आणि विद्याशाखेच्या अधीष्ठाताच्या निवडणुकीत असल्यामुळे परस्पर लागेबांधे असलेले नामनिर्देशन केले जात होते. या ठिकाणाहून सुरुवात होत होती. वर्षानुवर्षे

..3.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे........

ठराविक लोक 20 वर्षापासून विद्यापीठ चालवित आहेत. या बाबीस छेद देण्याची आवश्यकता आहे. मग अशा वेळी 5 वर्षात अभ्यासक्रम बदलायचा, परीक्षा पध्दतीमध्ये सुधारणा अशा शैक्षणिक कामामध्ये नामनिर्देशन सदस्यांचा सक्रिय सहभाग असल्यामुळे तो खूपच तोकडा असायचा असा आपल्या सर्वांचा अनुभव आहे. शैक्षणिक कामामध्ये वेगळ्या नामनिर्देशन पध्दतीचा विचार सदर विधेयकात केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, तत्कालीन अध्यक्ष श्री. दिलीप वळसे-पाटील यांचे शिक्षणावरील भाषण वाचलेले आहे. त्यामध्ये त्यांनी स्टेक होल्डरशी संबंधित विषय उपस्थित केला होता. तो आम्ही या विधेयकात आणलेला आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम काय असला पाहिजे हे त्या भागातील विद्यापीठाच्या परिसरातील स्टेक होल्डर, उद्योग, शेती, बोर्ड ऑफ स्टडीज, तज्ज्ञ, शैक्षणिक संस्थेतील प्राध्यापकामधील काही सदस्य हे अॅकडमी कौन्सील अभ्यास मंडळात नामनिर्देशित सदस्य असले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, 1994 च्या कायद्यात सामाजिक आरक्षण अतिशय तोकडे होते. विद्यापीठ कायदा 1994 अन्वये 61 सिनेट निवडून देण्याच्या जागेपैकी 9 जागांवर आरक्षण म्हणजे 15 टक्के होते. तर भारतीय जनता पार्टी-शिवसेनेचे सरकार या कायद्यात सिनेट निवडून देण्यासाठी 37 पैकी, 14 जागांवर म्हणजे 38 टक्के आरक्षण आणले जात आहे, याची सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी नोंद घ्यावी. तसेच सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड गेल्या 14 वर्षात का बोलेले नाही, याची मला माहिती नाही. व्यवस्थापन परिषदेतील विद्यापीठ कायदा 1994 हा तत्कालीन सरकारच्या काळात आलेला होता. याची सन्माननीय सदस्य श्री. डी. पी. सावंत यांनी नोंद घेण्याची गरज आहे. निवडून द्यायच्या 12 पैकी केवळ एकाच जागेवर आरक्षण होते, ते 8.33 टक्के होते. आज भारतीय जनता पार्टी-शिवसेनेचे सरकार प्रस्तावित कायद्यामध्ये व्यवस्थापन परिषदेच्या निवडणुकीत निवडुन देण्यासाठी 9 जागांपैकी 3 जागा म्हणजे 33.3 टक्के आरक्षण देणार आहे. विद्यापरिषदेमध्ये देखील प्राध्यापक, प्राचार्य, शिक्षकांच्या जागांमध्ये सामाजिक



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे........

आरक्षणाची तरतूद केलेली आहे. विद्यार्थी परिषदेतील निवडणुकीत महिला तसेच आरक्षित घटकांसाठी वेगळ्या प्रतिनिधीची तरतूद प्रस्तावित कायद्यात केलेली आहे. ही आतापर्यंत नव्हती. समाजातील तळागाळातील दीन-दलित, दुबळ्या माणसाचा विद्यापीठाच्या या सर्व मंडळांवर निर्णय घेणाऱ्या बॉडीवर प्रतिनिधत्व देण्यासंदर्भातील कायदा सर्वानुमते पारित केला तर पुरोगामी महाराष्ट्रात शाहू, फुले, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र असे शब्द जे बोलेले जातात, त्या शब्दाला अर्थ राहिल. सदर आरक्षण ज्या ठिकाणी आहे, अशा ठिकाणी सर्व घटकांचा विचार केलेला आहे. राज्यामध्ये विद्यापीठ कायद्यातील हा एक मोठा बदल स्वागतार्ह मानला जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, डॉ. निग्वेकर समितीने शिफारस केल्यानुसार युवकांना पारंपारिक अभ्यासक्रमासोबत कौशल्य प्राप्त करण्यासाठी विविध अभ्यासक्रम देण्याची व्यवस्था प्रस्तावित केली होती. म्हणून खाजगी कौशल्य ज्ञान देऊ शकणाऱ्या संस्था, उद्योग या संकल्पनेचा स्वीकार नवीन कायद्यामध्ये केलला आहे आणि "Recognition of Private Skill Provider" अशी ॲक्टमध्ये वेगळी व्यवस्था करीत आहोत. राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर कौशल्य धोरणानुसार राज्यातील युवकांना कौशल्य आधारित प्रमाणपत्र, प्रगत पदविका मिळण्यासाठी प्रस्तावित कायद्यानुसार मदत होणार आहे. आपण विदेशातील कम्युनिटी कॉलेजमध्ये ऐकत असतो. आपल्या देशात का नाही, असा आपल्याला नेहमी प्रश्न पडत असतो. त्यातून त्याला ताबडतोब रोजगार मिळेल असे का नाही या प्रश्नाला उत्तर शोधण्यासाठी मार्ग काढलेला आहे आणि तशा प्रकारची कायद्यात व्यवस्था केलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

NN-1.......

श्री.विनोद तावडे......

नवीन कायद्यामध्ये एक महत्वाची गोष्ट अशी आहे की, प्रचलित शिक्षण व्यवस्थेमध्ये युवकांना पदवी आणि पदव्यूत्तर शिक्षणाद्वारे रोजगार मिळविण्यासाठी सक्षम करण्याचा उद्देश आपण ठेवला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक व सामाजिक क्षेत्रात नवे बदल होत आहेत. त्यासाठी मूलभूत ज्ञान त्याचबरोबर कौशल्य विकास आवश्यक आहे. वै्श्विक आर्थिक विकास व स्पर्धात्मक वातावरण यासाठी ज्ञान संपादन करणे, त्यासाठी उपाययोजना करणे, त्याद्वारे उद्योजकता वाढविणे याला जे महत्व मिळते ते लक्षात घेऊन नवीन विद्यापीठ कायदा स्तरावर Board of Innovation, Incubation and Enterprise, Board of National and International Linkages आणि Excellence with Relevance आपण करणार आहोत. नुसते हार्डवर्ड मधील तत्वज्ञान शिकून उपयोग नाही, त्यातून आपल्यासाठी काय उपयोग होऊ शकतो, याचा विचार करुन Board of National and International Linkages ची व्यवस्था विद्यापीठ कायद्यात केली आहे. त्यामुळे आपण केवळ डबक्यात न राहता आपल्याला आसपासच्या चांगल्या नवीन गोष्टी उपयोगात आणता येतील, त्याचा स्वीकार करण्याची स्वतंत्र रचना यामध्ये केली आहे. या मंडळाद्वारे औपचारिक शिक्षण, उपाययोजना, उद्योजगता, उद्यमशिलता वाढविण्याचे विशेष प्रयत्न या कायद्याच्या माध्यमातून आपण करु शकतो. यासाठी Director, Innovation, Incubation and Linkages या अधिकारी पदाची विद्यापीठनिहाय निर्मिती केली जाणार आहे. यातून खऱ्या अर्थाने आपल्या विद्यापीठातून जगात शिक्षणासाठी जाणाऱ्या मुलांसाठी रिलेव्हन्स खऱ्या अर्थाने बदलू शकतो. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उद्योग क्षेत्रासाठी आवश्यक असलेले कौशल्य विकास, भौतिक संपदा, वित्तीय व्यवस्थापन या सर्व बाबींचा विचार यामध्ये केलेला आहे. गेल्या दीड वर्षामध्ये विद्यापीठाच्या स्वायत्ततेच्या विषयामध्ये नेहमी हे सरकार आग्रही राहिलेले आहे. मी नेहमीच म्हटलेले आहे की, राजाभाई टॉवरने मंत्रालयासमोर झुकण्याचे कारण नाही. प्रस्तावित कायद्यामध्ये स्वायत्त महाविद्यालय Empowered Atonomous Colleges, प्रदत्त स्वायत्त संस्था Empowered Atonomous Cluster Institutions, खाजगी कौशल्य विकास प्रदान करणारी संस्था Recognation of Private skilled Provider अधिकार प्रदत्त स्वायत्त कौशल्य विकास महाविद्यालय Recognise autonomous skill development colleges. तसेच समूह

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे......

विद्यापीठ Cluster University याचा सुध्दा यामध्ये विचार केलेला आहे. यावेळी रूसामध्ये आपण मुंबईतील चार महाविद्यालयांचा स्वतंत्र विचार करीत आहोत. यासाठी किमान पात्रतेच्या अटी ठरविण्यात आलेल्या असून उच्च दर्जाच्या महाविद्यालयांना स्वायत्तता देणे, संयुक्त पदवीचे अधिकार प्रदान करण्याची तरतूद केलेली आहे. शिक्षणामधील या ॲटानॉमीचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी आपण आपल्या भाषणात आवर्जून केला होता. त्यातील बरेच मुद्दे आम्ही आणत आहोत. त्या सर्वांचे आपण स्वागत कराल, अशी मला खात्री आहे. ते माहिती तंत्रज्ञानयुक्त उच्च शिक्ष्ण असले पाहिजे, अशी काळाजी गरज आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. चव्हाण साहेब डॉ.अनिल काकोडकर समितीने ए-3 सोसायटी म्हणजे Any one, Any Time, Any where असा त्याचा उल्लेख केला होता. माहिती तंत्रज्ञान सुध्दा विकसित असून समाजाच्या सर्व क्षेत्रात यामुळे आमूलाग्र बदल घडत आहेत. डिजीटल इंडिया, डिजीटल महाराष्ट्र, या सर्व गोष्टी आपण करीत आहोत. राज्य शासनाचा उच्च शिक्षण विषयक दृष्टीकोन आपल्याला बदलावा लागणार आहे म्हणून ए-3 Any one, Any Time, Any where अशी उच्च शिक्षणाची व्यवस्था आपल्याला करावयाची आहे. Board of Information Technology हे स्वतंत्र मंडळ विद्याप्ीठ स्तरावर आपण निर्माण करणार आहोत की जे आजपर्यंत नव्हते. या मंडळाद्वारे अध्ययन, अध्यापन, रिसर्च, माहिती तंत्रज्ञान या सर्वांचा उपयोग करुन घेण्यासाठी याचा विचार या माध्यमातून त्या त्या विद्यापीठाला करता येऊ शकतो. विविध विषयाचे ज्ञान आणि संशोधनपर माहिती संकलित करुन राष्ट्रीय संशोधन माहिती आयोग सर्व विद्यार्थ्यांना संशोधनाकरिता उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था या ॲक्टमधून होऊ शकते. माहितीवर आधारित अध्यापन, कौशल्य वाढविण्यासाठी शिक्षकांना सातत्याने प्रशिक्षण देणे, महाविद्यालय आणि विद्यापीठ यातील सक्षम माहिती तंत्रज्ञान जाळे निर्माण करणे, आभासी वर्ग निर्माण करणे, ऑन लाईन अभ्यासक्रम उपलब्ध करणे, अशा बऱ्याच गोष्टी आपण करु शकू. Faculty of Inter-disciplinary studies मघाशी मी म्हटल्यापमाणे तसे साचेबंद न राहता बहुज्ञान व आंतर विद्या शाखांचा दृष्टीकोन या कायद्यामध्ये आंतरभूत केलेला आहे त्यामुळे बदलत्या परिस्थितीत आंतर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे......

विद्या शाखा, अध्ययन, अध्यापन, संशोधन ही काळाची गरज झालेली आहे. म्हणून नवीन विद्यापीठ कायदा स्वतंत्र विद्या श्‍ाखा निर्माण करुन त्याद्वारे बहुज्ञान व आंतर उच्च शिक्षण व्यवस्था निर्माण केली जाणार आहे. याचबरोर "Life Long Learning and Extension" कोणत्याही व्यक्तींची उच्च शिक्षण आणि संशोधन विषयक आकांक्षांना वयाचे बंधन असता कामा नये. यासाठी निरंतर शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. या दृष्टीकोनातून आपण एक स्वतंत्र मंडळ नवीन कायद्यात प्रस्तावित करीत आहोत. त्यामध्ये प्रौढ व ज्येष्ठ नागरिकांसाठी कौशल्य विकास, बाकी गोष्टी आपण पुरविणार आहोत. शिक्षण क्षेत्रात सन 1994 च्या कायद्यानुसार विद्यापीठाच्या अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, विद्या शाखा अभ्यास मंडळ, परीक्षा मंडळ, वित्त व लेखा सेवा, अशा सर्व प्राधिकरणासाठी निवडणुक पध्दतीचा जास्तीत जास्त वापर केला जाता होता. त्यामुळे ठराविक व्यक्ती समूह ठराविक संस्था, समूह ठराविक संघटना समूह यांचे अवाजवी हस्तक्षेप होऊन त्यातून या निवडणुका होत असत. पर्यायाने शैक्षणिक उद्दीष्ट हे नेहमी दुय्यम रहायचे. एका मागून एक निवडणुक कशा जिंकायची. ती जिंकून आपले राज्य विद्यापीठात कसे असले पाहिजे, यावर खरा सर्वांचा भर रहायचा. त्यामुळे सर्वप्रथम प्राधिकरणाच्या माध्यमातून होणारे निर्णय विशेषत: शैक्षणिक निर्णय हे अपेक्षित दर्जाचे नाहीत असे सर्व शिक्षण तज्ज्ञ वेळोवेळी लिहून याच गोष्टींवर त्यांचे म्हणणे असायचे. विद्यापीठात चालणाऱ्या या राजकारणामुळे शिक्षणावर लक्ष रहात नाही. निवडणुक पध्दतीने अशैक्षणिक घटक विद्यापीठ व्यवस्थेत महत्वाचे ठरून अनाठायी हस्तक्षेप होतो असे मी म्हणत नाही तर डॉ.काकोडकर तसेच डॉक्टर निगवेकर समितीच्या शिफारसींमध्ये असा उल्लेख आहे. उच्च शिक्षण निवडणुकीतील पध्दतीला मर्यादा घालण्याची तरतूद प्रस्तावित नवीन कायद्यात आहे. यावर ठराविक लोक ठराविक लोकांना भेटून यातून हे होणार, तमूक होणार अशी भीती निर्माण करुन हे सर्व कुलगुरुंच्या हातात, सरकारच्या हातात जाणार असे भासविले जाते. यामध्ये ज्यांचा अधिकार कमी होणार आहे ते सर्वांना भेटून एकच मेल सर्वांना केला आणि त्यावर विचार करायला लागतात. परंतु त्यात किती तथ्य आहे,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

याचा आपण विचार केला पाहिजे. उच्च शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांचा विचार आपण केलेला आहे.

...4/-



श्री.विनोद तावडे......

अध्यक्ष महाराज, विद्या शाखेचे डीन, अभ्यास मंडळाचे अध्यापन, प्रमुख पदांच्या निवडणुका टाळण्यासाठी कायद्यात तरतूद केली आहे. शैक्षणिक माणूस आपण निवडुकीच्या माध्यमातून निवडला तर ते सर्व महाविद्यालयात फिरुन मते गोळा करतात. याचा अर्थ तो आपल्या महाविद्यालयात नसतो. लहाणपणाची गोष्ट आपण ऐकत असतो. चार छोटी छोटी राज्ये असतात. त्यांना चक्रवर्ती राजा घोषित करावयाचा असतो. तुम्ही जितकी मते आणाल तेवढी मते तुम्हाला मिळतील त्यामुळे प्रत्येकला असे वाटले की, आपल्या गावातील मते आपल्याला मिळतील म्हणून गावाबाहेर जातो, त्यामुळे त्याचे गावात लक्ष रहात नाही. त्याला तेथिल मते पडत नाही. त्याप्रमाणे मते गोळा करायची लागण्यास कॉलेजमधील शिकविण्याचा वेळ सोडून बाहेर मते गोळा करुन आणणे, यासाठी शैक्षणिक क्षेत्रात माणसे चांगली आली पाहिजेत म्हणून त्यासाठी सर्च कमिटी आहे. त्यामध्ये माननीय कलपती काही जण नेमणार आहेत. काही ठिकाणी मॅनेजमेंट कौन्सिल नेमणार आहे. कुलगुरुंच्या एकट्याच्या हातात नाही. जसे कुलगुरु सर्च कमिटीच्या माध्यमातून निवडले जातात तसे यामध्ये कोणाही व्यक्तीची मनमानी चालणार नाही, याची काळजी घेतलेजी आहे. परंतु शैक्षणिक गोष्टीला यामध्ये आवर्जून प्राधान्य दिलेले आहे.

यानंतर OO-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे ....

विविध अधिकार कुलपती आणि कुलगुरुंना नामनिर्देशित पध्दतीने विविध क्षेत्रातील व संबंधित क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञ व्यक्ती नेमणूक करण्याची तरतूद नवीन कायद्यात आहे. सिनेटच्या असतील, मॅनेजमेंट कौन्सिल असतील, ॲकेडेमिक कौन्सिल असतील, या सर्वामध्ये आपण या सर्व नेमणुका करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, सेक्शन 86 प्राधिकरण माहेडची घोषणा झाली. गेली 2-3 वर्षे ती बैठक झाली नाही. हे सरकार आल्यानंतर पहिल्यांदाच त्याच्या दोन बैठका झाल्या. या माहेडच्या माध्यमातून कारण सातत्याने आपण सभागृहामध्ये पाहतो की, नगरविकास खात्यातील डी.पी. प्लान दर 10 वर्षांनी त्या त्या शहरातील वाढलेली लोकसंख्येची घनता पाहता आरक्षणे कोणती ठेवायची, कोणती बदलायची, कोणती वाढवायची याचा विचार केला जातो. हा डी.पी. प्लान आपण एका शहराचा करतो. त्या शहरातील भूखंडांचा करतो, परंतु जे शिक्षण सातत्याने बदलत आहे त्या शिक्षणाचा डी.पी. प्लान नाही. 5 वर्षांपूर्वी जगात शिक्षणाच्या विषयात जो थॉट प्रोसेस होता, हा शिक्षणाचा जो डी.पी.प्लान आहे तो या माहेडमध्ये चर्चिला जाईल.

मला आश्चर्य वाटते की, जगाने सन 1980 मध्ये ज्ञानरचनावाद स्वीकारला. आपल्या महाराष्ट्रात तो सन 2008 मध्ये स्वीकारला. सन 1980 ते 2008 म्हणजे 28 वर्षे ज्या बॅच बाहेर पडल्या, त्या विद्यार्थ्यांच्या बॅचला जगामध्ये जी लेटेस्ट शिक्षण पध्दती आणली होती, त्याचा लाभ मिळाला नाही कारण आपल्याकडे शिक्षणाचा डी.पी. प्लान बनविणारी समिती नाही ते माहेड करेल. जगामध्ये काय बदल चालले आहेत. जगात जे बदल चालले आहेत, त्यातील चांगले घेऊन आपल्या मुलांना आपण चांगले काय देऊ शकतो, याचा विचार आणि ही मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली असेल आणि त्याची कार्यकारी समिती माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली असेल. अशा माहेडचा आपण या कायद्यात पूर्णपणे विचार केलेला आहे. याकरिता मी मघाशी असे म्हटले की, शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्तेला आपण प्राधान्य दिले आहे.

विविध प्राधिकरणावर नामनिर्देशनाच्या महाविद्यालयाच्यां स्वायतत्तेपर्यंत शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्तेस केंद्रस्थानी ठेवून कायद्यात विविध संरचना सुचविण्यात आलेल्या आहेत. जेव्हा सन्माननीय

...2/-

श्री. विनोद तावडे ....

सदस्य बोलतील तेव्हा त्याच्या उत्तरात बोलताना मी या सर्वांचा सविस्तरपणे उल्लेख करेन. परंतु, प्रत्येक महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर अंतर्गत गुणवत्ता हमी मंडळ इंटरनल क्वालिटी ॲशुरन्स कमिटी स्थापन करण्याची तरतूद केली आहे. केवळ नॅक येत-जाते इतके न करता इंटरनल क्वालिटी ॲशुरन्सचा आपण विचार केला पाहिजे. या कायद्याने अशी मंडळ स्थापन करण्याची सक्ती सर्व संस्थावर होणार आहे. जेणेकरुन त्या त्या कॉलेजमधील शैक्षणिक गुणवत्ता एक्सेलन्सचा विचार केला जाईल. महाविद्यालयाचे संलग्नीकरण सातत्यासाठी सुध्दा अशा मुल्यांकन आणि पुर्नमुल्यांकनाची गरज आहे, हे देखील त्यातील तितकेच तथ्य आहे. अभ्यासक्रम आणि परीक्षणाच्या बाबतीतील एक शास्त्रीय नियोजन करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक विद्यार्थी हुशार सी.ए., सी.एस., कॉस्ट अकाऊंटस हा अभ्यासक्रम देखील पूर्ण करीत असतात. परंतु, महाविद्यालयातील युवकांना प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या विद्यापीठ अभ्यासक्रमाचे व परीक्षांचे वेळापत्रक आगाऊ समजणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे त्याचे नियोजन केले पाहिजे आणि यासाठी विद्यापीठ अधिकाऱ्यांवर व प्राधिकरणावर नवीन कायद्यानुसार असे ॲकेडेमिक कॅलेंडर वर्ष सुरु होण्याच्या आधी घोषित केले पाहिजे आणि ते सर्वांनी तंतोतंत पाळले पाहिजे. कारण केवळ कॉलेज आणि परीक्षा एवढेच नाही तर त्याला बाकीच्या गोष्टीही करावयाच्या असतात. त्याचे ते टाईमटेबल सेट झाले की, ते कळत असते. ऐनवेळी कधी वाटले आणि घोषित झाले असे न करता याचे बंधन आपण याच्यामध्ये करीत आहोत.

शिक्षकांच्या गुणवत्तेच्या विषयामध्ये नियुक्ती प्रक्रियेमध्ये गुणवत्तेला प्राधान्य देण्याच्या दृष्टीने कायद्यामध्ये आपण तरतूद केली आहे. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणुका, वेतनश्रेण्या, कार्यभार, शिस्तपालन परिषदेचे कामकाज याबाबीचे राज्यस्तरावर समान धोरण ठरविण्याची तरतूद नवीन कायद्यात आहे. कारण या आधी प्रत्येक विद्यापीठात आपापला कायदा होता. आपण राज्यामध्ये या विषयामध्ये पूर्ण समानता आणत आहोत. महाविद्यालय आणि विद्यापीठामध्ये शिक्षकांना परीक्षांचे काम या विषयाबाबत आपण कायद्यात व्यवस्था करीत आहोत. राज्यस्तरावर आपण या सर्व विषयावर समान नियम त्यातील आणत आहोत.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे ....

सर्वात महत्त्वाचे आहे की, परिणामकारक तक्रार निवारण व्यवस्था. विद्यार्थ्यांच्या विविध स्वरुपाच्या तक्रारींचे निवारण करण्याची विशेष रचना प्रस्तावित केली आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या पातळीवर आतापर्यंत विद्यार्थ्यांच्या तक्रारी कधी गेल्या आणि त्याचा नीट विचार केला असे व्हायचेच नाही. त्यामुळे आपण सेक्शन 71 (11) मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन प्रमाणे या सर्वांमध्ये एक वेगळी व्यवस्था उभी करीत आहोत. ज्यामुळे विद्यार्थ्यांना आपली दु:खे, आपले प्रश्न, आपल्या समस्या मांडण्याची व्यवस्था, ऐकण्याची ॲक्टप्रमाणे अधिकृत व्यवस्था आहे. ज्याचे त्यांना स्वाभाविकपणे उत्तर मिळाले पाहिजे.

विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया आणि शुल्क निर्धारण प्रक्रिया यामध्ये अनेकवेळा तक्रारी आपल्या सर्वांकडे प्राप्त होतात. जसे की, यात गैरकारभार झाला, नफाखोरी होते, अमूक होते, तमूक होते तर त्याला आळा घालण्यासाठी आपण विद्यापीठ स्तरावर शुल्क निश्चिती समिती नियुक्त केलेली आहे. अनेकवेळा नॉनग्रँटचे कोर्सेस घ्यायचे आणि त्यातून वारेमाप फी घ्यायची आणि त्या माध्यमातून अनेकवेळा तक्रारी करण्यात येतात की, इतकी फी लागते काय ? तर आता त्याचीही शुल्क नियंत्रण समिती यामध्ये असेल.

यामध्ये 2-4 महत्त्वाच्या गोष्टी आहेत, त्याचा आपण सर्वांनी मिळून अवश्य विचार केला पाहिजे की, अनेकवेळा शिक्षणसंस्थांमध्ये वाद निर्माण होतात. हे वाद निर्माण झाले तर, त्या ठिकाणच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यामध्ये अडचणी येतात. संस्थामध्ये झालेल्या वादाचा निर्णय चॅरिटी कमिशनर घ्यायचा असतील ते घेतील. परंतु, तोपर्यंत त्या महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचे वेतन व बाकीच्या गोष्टीसाठी ज्या गोष्टीची पूर्तता जे सर्टिफाय करणे आहे, त्याची काही व्यवस्था आपण या कायद्यात आवर्जून केलेली आहे.

यामध्ये अजून एका महत्त्वाच्या बदलाचा आम्ही विचार करीत आहोत की, जेणेकरुन चांगल्या संस्था अधिक पध्दतीने येणे. यामध्ये शैक्षणिक संस्था स्थापण्यासाठी जसे आपण चॅरिटी कमिशनर ॲक्टखाली रजिस्टर करतो. त्याच बरोबर प्रस्तावित कायद्यात कंपनी कायद्यातील कलम 8 अंतर्गत नॉन प्रॉफिटमेकिंग कंपनी जी असते, अशा माध्यमातून अनेक सामाजिक कामे चांगल्या संस्था करीत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे ....

असतात. त्यांनाही आपण यात संधी देत आहोत जेणेकरुन आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांना प्रामुख्याने टीका करायची तर कोणी म्हणेल की, तुम्ही आता उद्योगांना आणत आहात. तर उद्योगांना आणत नाही तर, उद्योगांना स्वतःचा सीएसआर खर्च करावयाचा आहे. अनेक उद्योजक आज गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेशमध्ये गेले आहेत याचे कारण त्यांना तेथे ही सोय उपलब्ध आहे. ते म्हणतात की, आमचा सीएसआर आहे तो आम्ही तुम्हाला कोणाला देण्यापेक्षा आम्ही एक कॉलेज चालवितो, त्या कॉलेजच्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण देऊ शकतो. ज्यामध्ये सीएसआर असल्याने फी व बाकी सर्व गोष्टी या बऱ्यापैकी शासन आणि या स्तराच्या असू शकतात. तर अशा संस्थांना संधी मिळण्याची व्यवस्था आपण यामध्ये केलेली आहे.

या सर्वामध्ये नेहमीच विद्यापीठाच्या अकाऊंटसच्याबाबतीत खूप चर्चा त्या त्या सिनेटमध्ये होत असते. नंतर आपण येथे सादर केलेले अहवाल कधी वाचतो की नाही हे मला माहीत नाही. परंतु, हे अहवाल नीट वाचले तर अनेक विद्यापीठांची ॲफिलिएशन फी वसूल केलेली नाही. अनेक विद्यापीठामध्ये परीक्षा फीच्या माध्यमातून वारेमाप पैसे जमा होतात. विद्यापीठांकडे 300-300 कोटी रुपयांचे फिक्स डिपॉझिट आहे. या कायद्यामुळे अकाऊंट्सची मर्केंटाईल पध्दत ज्याला डबल एंट्री म्हणतात ही अनुसरणे आपण विद्यापीठांना बंधनकारक करीत आहोत. अजून त्यातील बऱ्याच गोष्टी आपण आणत आहोत की, जेणेकरुन विद्यापीठाच्या अकाऊंटिंगमध्ये पारदर्शकता येईल. विद्यापीठाच्या येणे आणि देण्यामध्ये सुस्पष्टता येईल. नेहमीच विद्यापीठाचे बजेट हे डेफिसीटचे असते परंतु, डिपॉझिट मात्र भरपूर दिसत असते अशा बऱ्याच गोष्टी यामध्ये आहेत. 31 जुलै पर्यंत विद्यापीठांचे ऑडिट करणे बंधनकारक आहे. त्यानंतर एक महिन्याच्या कंम्प्लायन्स पूर्ण करणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सर्वांचे ऑडिट आपण करतो जसे आपल्या लोकलेखा समिती समोर गोष्टी येत असतात. ते ऑडिट होणे शेवटी विद्यापीठामध्ये येणारा पैसा समाजाचा आहे त्यामुळे त्याचे ऑडिट होणे अशी व्यवस्था आपण यामध्ये केलेली आहे. खऱ्या अर्थाने या विद्यापीठ कायद्याच्याविषयात सर्व समित्या झाल्या. कुमुद बन्सल समितीने अहवाल दिला. त्यानंतर



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे ....

मी स्वत: सर्व विद्यापीठांमध्ये जाऊन विद्यापीठात जे जे स्टेकहोल्डर्स आहेत, त्या सर्वांच्या बैठका घेऊन त्यांचे म्हणणे ऐकले. या विषयाबाबत आम्ही स्वत: 30-40 मिटिंग्ज केल्या. नंतर माननीय विरोधी पक्ष नेते व इतरांबरोबर 2-3 वेळा चर्चा केली. खऱ्या अर्थाने पुढच्या 20-25 वर्षांसाठी महाराष्ट्रातील तरूणांना उच्च शिक्षणाची चांगली संधी देण्याचे काम विद्यापीठ करतील असा कायदा आपण आणलेला आहे. माझा आग्रह आहे की, या बिलावर चर्चा करून यात काही चांगल्या सूचना असतील तर मी असे म्हटले आहे की, शिक्षण हे नेहमीच राजकारणाच्या पलीकडे असले पाहिजे.

PP-1/-...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्षा प्रा. देवयानी फरांदे)**

श्री. विनोद तावडे.....

त्यामुळे आम्ही चांगल्या सूचनांचा नक्कीच स्वीकार करु. हे बील नागपूरच्या अधिवेशनामध्ये मंजूर झाले असते तर आता सर्व बॉडीज्वर जी माणसे नाही, ती आपल्याला घेता आली असती. कारण आता हे बील विधानसभेमध्ये पारीत झाल्यावर विधानपरिषदेमध्ये पारीत होऊन माननीय राष्ट्रपतींकडे जाणे व पुन्हा इकडे येणे व त्यानंतर ॲकॅडमीक कॉन्सील, बोर्ड ऑफ स्टडीज, मॅनेजमेंट कॉन्सील इत्यादी बाबी होण्यास यास वेळ लागेल. त्यामुळे आपण हे अगोदर केले तर त्याचा उपयोग होईल. अन्यथा कुलगुरु आणि अन्य चार, पाच जण मिळून ते चालवितात अशा तऱ्हेची भावना अन्यत्र व्यक्त केली जाते. त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की, या बिलावर सविस्तर व राजकारणाच्या पलिकडे जाऊन चर्चा करावी. आपण आपल्या राज्यातील तरुणांना चांगले उच्च शिक्षण देणारी विद्यापीठे या कायद्याच्या माध्यमातून देऊ शकतो, असा मी विश्वास व्यक्त करतो. हाच विश्वास आपण सर्वजण व्यक्त कराल, अशी अपेक्षा करुन माझे बोलणे थांबवितो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभाध्यक्षा :** विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, हसन मुश्रीफ, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. बाळासाहेब पाटील, दिपक चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव आहे, त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक 16 "विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधित्व, उच्च शिक्षणाची अभिवृद्धी, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक" विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 35 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त 6 महिन्याच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...2/-



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्षा** : आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर प्रथम विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) : अध्यक्ष महोदया, असा प्रस्ताव मांडताना फार भाषण करण्याची पद्धत नाही. परंतु मी मंत्री महोदयांचे काही बाबींकडे लक्ष वेधून घेण्यासाठी थोडक्यात काही बाबींचा उल्लेख करणार आहे. सुरुवातीला मी धन्यवाद देईल की, आपण या विधेयकाच्या माध्यमातून शिक्षणाचा नवीन कायदा सभागृहासमोर मांडलेला आहे. 1994 चा कायदा याच सभागृहाने मंजूर केला होता. मी काही मेरीटमध्ये जाणार नाही. दोन, तीन मिनिटांमध्येच माझे बोलणे संपविणार आहे.

अध्यक्ष महोदय, सदरहू कायदा 1992 साली सभागृहात मांडला होता व 1994 साली मंजूर झाला होता. आज मांडलेल्या या विधेयकामध्ये 151 कलमे आहेत. या कलमावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे व गरजेचे आहे. जग बदलत असल्याचा आपण उल्लेख केला. जग बदलत असताना शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये सुधारणा करीत असताना ज्या देशाकडे सर्वात जास्त यंग पॉप्युलेशन आहे, त्या देशातील शिक्षणाचा दुरगामी परिणाम करणारा हा कायदा या सभागृहाने मंजूर करीत असताना आपण त्याचा उल्लेख केला. आमचे स्टेक होल्डर्स आहेत. ज्यामध्ये विद्यार्थी आहेत, शिक्षक आहेत, संस्थाचालक आहेत, शिक्षणतंज्ज्ञ आहेत. विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये कायदे पारीत होतात. या कायदेमंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांची मते या कायद्यावर व्यवस्थित आली पाहीजे. त्याचा सर्वदूर आणि सर्वंकष परिणाम लॉंग लास्टींग होत असतो. 1994 चा कायदा सन्माननीय धारकर साहेबांनी आणला. 2000 मध्ये मी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री असताना त्यामध्ये काही सुधारणा केल्या. 2002 मध्ये आपण आणखी काही सुधारणा केल्या आणि आज आपण हा कायदा येथे आणलेला आहे. आपल्याला फ्लॉलेस लेस लेशन करायचे असेल. कुठल्याही त्रृटीवाचून, कुठल्याही दोषावाचून कायदा करायचा असेल तर माझी आपल्याला विनंती आहे की, आपण काही सुधारणा आणल्या. परंतु काही रिडंडन्ट झालेल्या प्रोव्हिजन्स आहेत, त्या आपण डिलीट करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मी जो प्रस्ताव मांडलेला आहे. आज या कायद्यावर चर्चा घेण्याऐवजी येत्या सहा महिन्यामध्ये या विधानसभेला सादर करण्यासाठी विधानसभा आणि विधानपरिषदेच्या 35 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे हे लेजीसलेशन रेफर करावे, अशी मी विनंती करतो. मी दोन बाबी सांगून थांबणार आहे. आपण काही ठिकाणी एक्सप्रेश प्रोव्हीजन्स केलेल्या आहेत. त्या एक्सप्रेस प्रोव्हीजन बदलायच्या म्हटले तर पुन्हा सभागृहापुढे आणून पुन्हा ही सर्व

...4/-

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

प्रोसेस करावी लागते. त्याठिकाणी काही एनेब्लींग प्रोव्हिजन्स करणे शक्य आहे. त्या केल्या तर बाय ऑर्डर, बाय ऑदर मेथड त्यामध्ये टाईम टू सुधारणा करता येऊ शकते. माझी आपल्याला विनंती आहे. आपण विद्यापीठांच्या ॲटॉनॉमिंचा जसा विचार केला तसा संस्थांच्या ॲटॉनॉमिचा विचार केला पाहीजे. त्यांना देखील पुढे जाता आले पाहीजे. बऱ्याच वेळा असे घडते. संस्थेला खूप काही करायचे असते परंतु विद्यापीठातील स्टॅट्युटमुळे आणि सर्व पद्धतीमुळे संस्थेला आपल्या वेगाने प्रवास करता येत नाही. त्यामुळे विद्यापीठांच्या व शिक्षण संस्थाच्या ॲटॉनॉमिचा विचार व्हायला पाहीजे. आता शासकीय शिक्षण संस्था किंवा केवळ एडेड शिक्षण संस्था राहीलेल्या नाही. अन एडेड शिक्षण संस्था, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संस्था, रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटमध्ये असणाऱ्या संस्था. आपण प्रायव्हेट युनिव्हर्सिटीचा, फायनान्सीअल युनिव्हर्सिटीचा कायदा काही दिवसापूर्वी मंजूर केला. संस्थांच्या रेग्युलेशनचा व फीच्या रेग्युलेशनचा कायदा मंजूर केला. आपण जेवढे जास्त कायदे करु, जेवढे जास्त रेग्युलेशन करु, तेवढ्या या सर्व संस्थांना काम करीत असताना मर्यादा येणार आहेत. मी या विधेयकासंदर्भात मांडलेला प्रस्ताव आपण स्विकारावा व हे विधेयक सयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे. अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आता आपण कायदा कराल. परंतु त्याचे रुल्स करण्याकरिता आणखी सहा महिने जातील. आता थोडासा वेळ मिळणार आहे. विभागाच्या माध्यमातून रुल्स करण्यास आतापासून सुरुवात केली, तर ज्यावेळेला सयुक्त समितीकडून हे बील पुन्हा सभागृहापुढे येईल. त्यावेळेला हे बील रुल्ससह आले तर आपल्याला जसे सोयीचे आहे, ते बघायला पाहीजे. तसेच या पूर्वीच्या काळात एक प्रयत्न झाला होता. परंतु तो यशस्वी झाला नाही. आज अनेक विद्यापीठाचे स्टॅटुट्स वेगवेगळे आहेत. त्यामुळे मॉडेल स्टॅटुट्स तयार करण्याची गरज आहे. मॉडेल स्टॅटुट्स करुन सर्व विद्यापीठांना सर्क्युलेट केले आणि ते स्विकारण्याचे बंधन त्यांच्यावर घातले पाहीजे. शेवटी आपण शासनाचा मोठा पैसा देत असतो. टॅक्स पेअरचा मनी असतो. विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न असतो. यासर्व बाबीचा विचार करायला संधी मिळणार आहे. त्यामुळे हे विधेयक आज चर्चा करुन मंजूर करण्याचा आग्रह धरण्याऐवजी माझी मंत्री महोदयांना नम्र विनंती आहे की, हे विधेयक 35 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे आणि ते माझी विनंती मान्य करतील असा मला विश्वास आहे.

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदया, सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील आणि इतर सन्माननीय सदस्यांच्या यासंदर्भात काही भावना असतील. हे खरे आहे की, शिक्षणाच्या संबंधित विद्यापीठाचे विधेयक बहुमताच्या जोरावर रेटून नेणे ही राज्य सरकारची मानसिकता नाही. महसूल विभागाचे किंवा नगरविकास विभागाचे एखादे साधारण बील पास झाल्यास किंवा दोन, चार भूखंडांचे पुढे-मागे झाल्यास एखाद्यावेळेस चालू शकेल.

.....QQ/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे.....

याप्रकरणी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची बॅच हे त्याचे भवितव्य असते त्यामुळे याप्रकरणी विचार करण्यास आमची हरकत नाही. सदरहू प्रकरणी दोन्ही सभागृहातील मिळून सन्माननीय सदस्यांच्या संयुक्त समितीमधील 35 सन्माननीय सदस्यांची संख्या मला अधिक वाटते. सदरहू संख्या विधानसभेतील दोन व विधानपरिषदेतील एक सन्माननीय सदस्य याप्रमाणे 21 सन्माननीय सदस्यांची संयुक्त समिती असावी व ती गठीत करण्यासंदर्भात गट नेत्यांच्या बैठकीमध्ये ठरवू. याप्रकरणी आवश्यक असलेल्या नियमांच्या संदर्भातील कामास आम्ही सुरुवात केली आहे. किमान स्टॅट्यूटचे कॉमन मुद्दे काय असले पाहिजे व विद्यापीठांना कोणती स्वायत्तता असावी यासंदर्भात विचार सुरु आहे. आपण दोन्ही सभागृहाच्या 21 सन्माननीय सदस्यांची संयुक्त समिती गठीत करु या. या समितीच्या कामकाजासाठी माहे मे मध्ये 4-5 बैठका घेऊन पुढील अधिवेशनामध्ये सदरहू विधेयक आणणे आवश्यक आहे. कारण अगोदरच आरोप होत आहे की, कुलगुरु व इतर चार जण मिळून विद्यापीठ चालवत आहेत, असे होऊ नये. समितीच्या सदस्यांनी सदरहू बैठकीस वेळ देणारे सदस्य नियुक्त करावेत, असे असेल तर हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यास हरकत नाही.

**तालिका सभाध्यक्षा (प्रा.देवयानी फरांदे)** : ठीक आहे. आता मी विधेयक दोन्ही सभागृहांच्या 21 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त 6 महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मतास टाकते.

प्रस्ताव मतास टाकून एकमताने संमत झाला.

---------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.**: हॉटेल, उपहारगृहे आणि मद्यपान कक्ष व महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत विधेयक.

L.C. BILL NO. III OF 2016.

(A BILL TO PROVIDE FOR PROHIBITION OF OBSCENE DANCE IN HOTELS, RESTAURENTS BAR ROOMS AND OTHER ESTABLISHMENTS AND TO IMPROVE THE CONDITIONS OF WORK, PROTECT THE DIGNITY AND SAFETY OF WOMEN IN SUCH PLACES WITH A VIEW TO PREVENT THEIR EXPLOITATION.)

श्री.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदया, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे, सन 2016 चे वि.प.वि.क्रमांक 3 - हॉटेल, उपहारगृह आणि मद्यपान कक्ष (बार रुम) आणि इतर आस्थापना येथे करण्यात येणाऱ्या अश्लील नृत्यावर प्रतिबंध करण्याच्या संबंधात आणि अशा ठिकाणी काम करणाऱ्या महिलांच्या शोषणास प्रतिबंध करण्याच्या त्यांची प्रतिष्ठा व सुरक्षितता यास संरक्षण देण्याच्या हेतूने आणि त्यांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करणे, याकरिता तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**तालिका सभाध्यक्षा** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राम शिंदे : अध्यक्ष महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.प.वि. क्रमांक 3 हॉटेल, उपहारगृह आणि मद्यपान कक्ष (बार रुम) आणि इतर आस्थापना येथे करण्यात येणाऱ्या अश्लील नृत्यावर प्रतिबंध करण्याच्या संबंधात आणि अशा ठिकाणी काम करणाऱ्या महिलांच्या शोषणास प्रतिबंध करण्याच्या त्यांची प्रतिष्ठा व सुरक्षितता यास संरक्षण देण्याच्या हेतूने आणि त्यांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करणे, याकरिता तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्षा** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 16, (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राम शिंदे : अध्यक्ष महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.प.वि. क्रमांक. 3 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्षा** : सन 2016 चे वि.प.वि. क्रमांक 3 संमत झाले आहे.

---------

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : महानगरपालिका व नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) विधेयक

**मु. शी.** : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 70 विधापरिषदेने पारित केलेल्या सुधारणांना सहमती देण्याबद्दल विनंती करणारा विधानपरिषदेचा संदेश व तत्संबंधीचा प्रस्ताव.

**तालिका सभाध्यक्षा :** विधानपरिषदेकडून एक संदेश आलेला आहे. उप सचिव तो संदेश वाचून दाखवतील.

**<u>संदेश</u>**

उप सचिव : कळविण्यात येत आहे की, विधानसभेने दिनांक 15 मार्च, 2016 रोजी भरलेल्या आपल्या सभेत पारित केलेले सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 70 महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) विधेयक, विधानपरिषदेच्या दिनांक 30 मार्च, 2016 ला भरलेल्या सभेत पुढील सुधारणांसह पारित करण्यात आले आहे. त्या सुधारणांना विधानसभेने सहमती द्यावी, अशी विधानपरिषदेची विनंती आहे.

सन्माननीय सदस्यांना सर्व सुधारणांची यादी स्वतंत्रपणे वितरीत करण्यात आली आहे.

डॉ.रणजित पाटील ( नगर विकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदया, मी आपल्या अनमुतीने विधानसभेने पारित केलेले सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 70, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांत आणखी सुधाारणा (चौथी सुधारणा) विधेयक, यात विधानपरिषदेने सुचविलेल्या सुधारणा विचारात घ्याव्यात, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 70 यात विधानपरिषदेने सुचविलेल्या सुधारणा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या आहेत त्या मान्य करण्यात याव्यात, अशी सभागृहाला विनंती करतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...5



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील :अध्यक्ष महोदया, विधानसभेने संमत केलेले वि.स.वि. क्रमांक 70, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांत आणखी सुधाारणा (चौथी सुधारणा) विधेयक, यात विधानपरिषदेने सुचविलेल्या सुधारणांना सहमती द्यावी, असा मी आपल्या अनमुतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------------

RR-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मुंबई महाराष्ट्र महानगरपालिका व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. LVIII OF 2015.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, विधानसभेने संमत केलेले सन 2015 चे विधानसभा विधेयक क्रमांक 58, मुंबई महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक 2015 भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 197 खंड 1 व महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम 141 (1) अन्वये पुन्हा संमत करावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**<u>सभागृहापुढील कामकाजाबाबत</u>**

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे आता आपण अंतिम आठवडा सुरु करण्याची आवश्यकता आहे. आता 5 वाजले आहेत आणि त्या प्रस्तावावर आपण केव्हा चर्चा करणार आहोत ? दोन नगरविकास विभागाची विधेयके आपण मंजूर केली आहेत. त्यामुळे अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला फार उशीर होणार आहे. आता आपण डान्स बारसंबंधीचे विधेयक एकमताने संमत केले आहे.

**तालिका सभाध्यक्षा** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील साहेब आता फक्त एक विधेयक राहिले आहे. तेवढे घेऊन आपण त्यानंतर अंतिम आठवड्यास सुरूवात करु या.

--------

3.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायती (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XXI OF 2016.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHYATS SAMITIS ACT, 1961.)

श्रीमती पंकजा मुंडे (ग्रामविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 21, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभाध्यक्षा** : आता सन्माननीय सदस्यांनी भाषणास सुरुवात करावी.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव (गुहागर) : अध्यक्ष महोदय, मी या विधेयकाला विरोध करीत नाही. परंतु मी लक्ष वेधू इच्छितो की, आपण साधारणपणे उमेदवारी अर्ज भरताना निवडून आल्यानंतर त्या सदस्याने 6 महिन्याच्या आत वैधता प्रमाणपत्र द्यावे अशा प्रकारचा कायदा अनेक वेळा या सभागृहात संमत केलेला आहे. काही काही वेळेला ते फॉर्म भरतानाच त्याने प्रमाणपत्र द्यावे असा सुध्दा आपण कायदा केला होता. पण आता आपण एक नवीन सुधारणा अशी केली आहे की, पंचायत समितीचा सभापती किंवा अध्यक्षाला सुध्दा अजूनपर्यंत अशा पध्दतीची तरतूद नव्हती. त्याला जर अध्यक्ष किंवा सभापती व्हावयाचे असेल तर त्याने उमेदवारी अर्ज भरतानाचा वैधता प्रमाणपत्र सादर करावयाचे होते. आता आपण त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, त्याने उमेदवारी अर्ज भरताना वैधता प्रमाणपत्र नसले तरी चालेल. तो सभापती होऊ शकतो तो अध्यक्ष होऊ शकतो, फक्त सदस्य नाही. 6 महिन्याच्या आत त्याने असे प्रमाणपत्र दिले नाही तर तो निष्कासित होऊ शकतो. आता अशी प्रवृत्ती वाढेल की, एकदा मला सभापती व्हायचे आहे, एकदा मला अध्यक्ष व्हायचे आहे. माझे वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही तरी हरकत नाही. 6 महिन्यांकरिता माझा तेथे क्लेम लागला आहे. आपण तपासून बघा. पूर्वी अध्यक्षाला आणि सभापतीला ही मूभा नव्हती. त्यामुळे ही भिती निर्माण होण्याची शक्यता आहे असे मला वाटते.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिपक चव्हाण (फलटण) : अध्यक्ष महोदया, यामध्ये आपण निवडणूक फॉर्म भरल्यापासून 6 महिन्याच्या आत आपण वैधता प्रमाणपत्र दिले पाहिजे. पण यामध्ये अशी तरतूद असली पाहिजे की, जर 6 महिन्याच्या आत हे वैधता प्रमाणपत्र दिले नाही तर त्या संबंधित अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार आहोत. कारण आमच्या जिल्ह्यामध्ये ऑगस्टमध्ये निवडणुका झ ााल्या, पण त्या संबंधातील जात वैधता प्रमाणपत्रे अद्यापी मिळाली नाहीत.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलडाणा) : अध्यक्ष महोदया, या विधेयकाच्या अनुषंगाने मला एक सूचना करावीशी वाटते की, बऱ्याच वेळा सभापती किंवा अध्यक्ष निवडून येत असताना तो प्रवर्ग आरक्षित नसतो. त्यावेळी तो उमेदवार खुल्या प्रवर्गातून निवडून येतो आणि अशा वेळी त्याच्याजवळ जात वैधता प्रमाणपत्र नसते. त्यामुळे सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य जरी खुल्या प्रवर्गातून आला तरी आरक्षण हे वेगळ्या वर्गाचे आहे आणि त्यासाठी तो इलिजिबल आहे. अशा वेळी त्याला ते पद धारण करण्यासाठी कायद्यामध्ये तरतूद असावी, ही या विधेयकाच्या अनुषंगाने सूचना करीत आहे.

---------

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदया, सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, एखादा आरक्षणातील व्यक्ती खुल्या प्रवर्गातून उभा असल्यानंतर जेव्हा जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या सभापती किंवा अध्यक्षाच्या निवडणुका येतात तेव्हा त्याला 6 महिन्याची मुदत मिळते म्हणजे त्याच्यावर अन्याय होऊ नये. यासाठी जिल्हा परिषदेचे सभापती आणि अध्यक्षांसाठी वेगळा निर्णय आहे. आपल्या सूचनेच्या संदर्भात सांगू इच्छिते की, मागच्या आठवड्यात ग्रामपंचायतीच्या बाबतीत यासारखेच विधेयक आले होते आणि त्यावेळी अशीच चर्चा झाली की, अधिकाऱ्यांनी जर विहित वेळेत वैधता प्रमाणपत्र दिले नाही तर त्यांच्यावर कार्यवाही करण्याच्या संदर्भात सक्त आदेश देण्यात येतील. आपण अर्ज केल्यानंतर 6 महिन्याची मुदत असली तरी 4 महिन्यात अधिकाऱ्यांनी त्यासंबंधी हो किंवा नाही असा निर्णय द्यावा, अशा प्रकारच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात येतील. कारण त्यामुळे नंतर उद्‌भवणारे बरेच कन्फुजन आपल्याला टाळता येतील. यासंबंधी ग्रामपंचायतीचे विधेयक आले होते त्यावेळी ही चर्चा झालेली आहे. आताही आपल्या सर्वांच्या सूचनांचा विचार करुन 12 अ नुसार पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्य, 46 (6 अ) नुसार जिल्हा परिषद अध्यक्ष, 67 (7 अ) अन्वये पंचायत समिती सभापती या पदांसाठी आपल्याला ही 6 महिन्यांची मुदतवाढ देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे निवडणूक लढण्यासंबंधी आरक्षणातील विविध लोकांवर अन्याय होणार नाही या उद्देशाने हे सभागृहासमोर आणलेले हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे. आपण त्यांना 17.12.2017 पर्यंत यामध्य मुदतवाढ देत आहोत. कारण येणाऱ्या वर्षामध्ये जवळपास 42 जिल्हा परिषद अध्यक्षांच्या आणि 67 पंचायत समिती सभापती आणि 2016-17 मध्ये जवळपास 27 जिल्हा परिषदांच्या निवडणुका आणि आपल्या 310 पंचायत समितीच्या निवडणुका आहेत. त्यामुळे हा निर्णय घेणे अतिशय आवश्यक आहे म्हणून मी सभागृहाला विनंती करते की, हे विधेयक आपण सर्वांनी एकमताने संमत करावे.

..8..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (विरोधी पक्ष नेता) : अध्यक्ष महोदया, या विधेयकासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी केलेली सूचना महत्वाची आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये आपण सभापती वा अध्यक्ष पदाचे जे अर्ज भरतो त्यावेळी त्यास जात वैधता प्रमाणपत्राची अट बंधनकारक केली पाहिजे. नाही तर खुल्या प्रवर्गातील किंवा अन्य प्रवर्गातील व्यक्ती अर्ज भरायला लागली आणि 4-5 महिन्यामध्ये ते प्रमाणपत्र अवैध ठरविले गेले तर त्यामुळे यामधून पुन्हा गोंधळ निर्माण होईल. निवडणूक लढविण्यास मुदतवाढ देणे आणि 2017 पर्यंत ती वाढविणे हे आपण दिलेलेच आहे. परंतु ज्या वेळी पदाधिकाऱ्याची निवड होते त्यावेळी मात्र ते गरजेचे आहे. त्यामुळे त्यामध्ये सूट देऊ नये ही आमची विनंती आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदया, मघाशी सन्माननीय सदस्यांनी जे सूचविले त्याचप्रकारे अन्याय होण्याची शक्यता आहे. उदाहरणादाखल समजा एखादा व्यक्ती ओबीसी आहे आणि ओपन कॅटॅगरीमधून निवडून आला आणि अध्यक्ष पद हे ओबीसीकरिता राखीव आहे तर त्या दिवशी त्याच्याजवळ व्हॅलिडीटी नाही म्हणून तो अध्यक्ष होऊ शकणार नाही.

SS-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस........

त्याला लगेच व्हॅलीडीटी मिळणार नाही किंवा शेड्युल ट्राईब किंवा एखादा मधला व्यक्ती ओपन कॅटेगिरीमधून निवडून आला. त्याला जर आता अध्यक्ष व्हायचे असेल तर त्याला तातडीने व्हॅलीडिटी मिळणार नाही. त्याच्यावर तोच अन्याय होईल. म्हणून मघाशी जो मुद्दा पॉईंट आऊट करण्यात आला तो व्हॅलीड आहे. आपण जे सांगत आहात असे नाही तर यापूर्वी अशा काही केसेस झाल्या आहेत की, ज्यामध्ये महापौर झाले. परंतु व्हॅलिडीटी मिळाली नाही म्हणून त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने पदावरुन काढले. आपण मागच्या वेळेस कायदा काय केला. सहा महिन्यांचा कालावधी मागच्या वेळेसही दिला. पण त्या कायद्यामध्ये आपण तरतूद अशी केली आहे की, "as if he was not there" म्हणजे एखादा व्यक्ती महापौर झाला आणि महापौर झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत त्याला व्हॅलिडीटी मिळाली नाही तर केवळ त्याचे पद जाईल असे नाही तर तो कधीच महापौर राहणार नाही. म्हणजे त्याची नोंदही होणार नाही. अशी मागच्या वेळेस अमेटमेंट केली होती आणि ती अमेटमेंट आजही चालू आहे. त्यामुळे त्यात आणि यात काही फरक नाही आहे. मला असे वाटते की, जोपर्यंत व्हॅलिडीटीची प्रक्रिया फास्ट होत नाही तोपर्यंत त्याच प्रवर्गातील व्यक्तीवर अन्याय होण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे त्याला अध्यक्ष होता येणार नाही किंवा एखाद्या पदावर जाता येणार नाही. म्हणून सन्माननीय मंत्र्यांनी जी अमेटमेंट याठिकाणी आणलेली आहे ती आपण सर्वांनी मान्य करावी.

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, थोडेस क्लेरिफिकेशन सरकारकडून याठिकाणी आवश्यक आहे. जिल्हा परिषद किंवा कोणताही सदस्य होत असताना पूर्वीच्या ज्या अटी-शर्ती होत्या त्या अबाधित ठेवून जे प्रसंग आपण व्यक्त केले. तसे प्रसंग आल्यास अशाप्रकारची सुविधा देण्यात येते हा माझा पहिला मुद्दा आहे आणि दुसरा मुद्दा असा की, एलईडीटीच्या संदर्भात सवलत मिळण्याचे कारण असे की व्हॅलिडीटी ऑफिसमध्ये कोणीही माणूस सुमोटो जाऊन त्याठिकाणी प्रपोजल दिले तर स्विकारले जात नाही. त्याठिकाणचा मोठा रेटा आहे. अशा बाबतीत आरक्षण जर कुठे असेल आणि त्यासाठी शासन वेगळी तरतूद करीत असेल तर त्याचेही प्राधान्य ठेवावे. अध्यक्ष, सभापती किंवा नगराध्यक्षाची निवडणूक आहे तर त्या निवडणूकीच्या आधी संबंधित व्यक्ती जर व्हॅलिडीटी अर्ज घेऊन गेला तर तो स्विकारण्याची

.........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हर्षवर्धन सपकाळ .......

कुठेतरी तरतूद असावी ती नाही. सदस्य होत असताना जो जुना नियम होता तोच नियम ठेवून हा नवीन नियम स्पेसिफिक याच कारणासाठी करण्यात येत आहे काय?

........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, हे सुधारणा विधेयक आहे. यामध्ये आपण फक्त एक्सटेंशन देत आहोत. जात वैधता प्रमाणपत्र किंवा कास्ट व्हॅलिडिटीच्या संदर्भातील काय निर्णय असावेत हा पूर्णपणे समाजकल्याण विभागाचा विषय आहे. निवडणूकांपुरता कास्ट व्हॅलिडिटी 6 महिन्यात देण्यासंदर्भातील हा निर्णय आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. त्या या विधेयकामुळे कार्पोरेट झालेल्या आहेत. त्यामुळे कृपया या विधेयकाला मंजूरी देण्यात यावी.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित), विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि क्रमांक 21 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : सन 2016 चे वि.स.वि क्रमांक 21 एकमताने संमत झाले आहे.

---------

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : योग व निसर्गोपचार विधेयक.

L.A. BILL NO. XXII OF 2016.

(A BILL TO PROVIDE FOR THE DEVELOPMENT OF YOGA AND NATUROPATHY BY REGULATEING THE TEACHING AND PRACTICE THEREOF AND TO DEAL WITH CERTAIN OTHER MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.विनोद तावडे (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 22 महाराष्ट्र योग व निसर्गोपचार यांच्या अध्यापनाचे आणि त्यांच्या व्यवसायाचे विनियमन करुन त्याद्वारे त्यांचा विकास करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक इतर विवक्षित बाबींच्या संबंधात तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 54 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि क्रमांक 22 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : सन 2016 चे वि.स.वि क्रमांक 22 संमत झाले आहे.

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***पृ.शी. :*** राज्यात जून ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत शासनाने व्यापाऱ्यांना साठेबाजी करण्यास दिलेली खुली मुभा, जीवनावश्यक वस्तुंच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्यासंबंधी केंद्र शासनाकडून आलेल्या सूचनांची दखल न घेणे, डॉक्टरांची रोडावणारी विश्वासार्हता, विविध घटक एकत्र येऊन वैद्यकीय व्यवसायाची तयार झालेली साखळी, तसेच राज्यात अवयवदानाचे अत्यल्प प्रमाण या सर्व बाबींवर उपाययोजना करण्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष

***मु.शी. :*** राज्यात जून ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत शासनाने व्यापाऱ्यांना साठेबाजी करण्यास दिलेली खुली मुभा, जीवनावश्यक वस्तुंच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्यासंबंधी केंद्र शासनाकडून आलेल्या सूचनांची दखल न घेणे, डॉक्टरांची रोडावणारी विश्वासार्हता, विविध घटक एकत्र येऊन वैद्यकीय व्यवसायाची तयार झालेली साखळी, ***तसेच राज्यात अवयवदानाचे अत्यल्प प्रमाण या सर्व बाबींवर उपाययोजना करण्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष या विषयावर*** सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, जितेंद्र आव्हाड, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, सुनील केदार, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, डी. पी. सावंत, बबनराव शिंदे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. अस्लम शेख, वसंतराव चव्हाण, नितेश राणे, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, भारत भालके, मो. आरिफ नसीम खान, शेख आसिफ शेख रशीद, राणाजगजितसिंह पाटील, अमित देशमुख, अमिन पटेल, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री संग्राम थोपटे, जयकुमार गोरे, काशिराम पावरा, डी.एस. अहिरे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्रीमती अमिता चव्हाण, निर्मला गावित, श्री. बसवराज पाटील, ॲड के.सी. पाडवी, सर्वश्री कुणाल पाटील, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, रणजित कांबळे, भाऊसाहेब कांबळे, सिध्दाराम म्हेत्रे, बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ( विरोधी पक्ष नेते ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम 292 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

......6



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील....

"राज्यात जून ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत शासनाने व्यापाऱ्यांना साठेबाजी करण्यास दिलेली खुली मुभा, जीवनावश्यक वस्तुंच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्यासंबंधी केंद्र शासनाकडून आलेल्या सुचनांची दखल न घेणे, जप्त केलेल्या डाळीच्या साठयाची विल्हेवाट लावण्यास जाणीवपूर्वक केलेली दिरंगाई, एकात्मिक बालविकास योजनेतील लाभार्थ्यांना द्यावयाच्या पूरक पोषण आहार पुरवठयाची निविदा प्रक्रिया ठेकेदाराच्या लाभासाठी बदलण्यात येणे, मा.सर्वोच्च न्यायालयाने सदर ठेकेदाराला एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील लाभार्थ्यांना द्यावयाच्या पूरक पोषण आहार (THR) पुरविण्यास घातलेले निर्बंध, नियम व निकष डावलून राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने कोटयवधी रूपयांच्या महागडया औषधांची मनमानीपणे व अनावश्यक केलेली खरेदी, मुदत संपलेली औषधे व इंजेक्शनस् खरेदी करण्यात आल्यामुळे झालेले कोटयवधी रूपयांचे नुकसान, राज्यातील आरोग्य सेवा सर्वसामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर जाणे, रोग निदान चाचण्यांची यादी, रूग्णालयातील खर्च, पॅथॉलॉजी लॅब, रेडीओलॉजी, औषधांची खरेदी विक्री करणारे व्यापारी, औषधांच्या वाढीव किंमती, वेगवेगळे फॉर्म्युले, रूग्ण व डॉक्टर यांचे व्यावसायिक नाते,स्त्री-भ्रूण हत्येचे वाढते प्रमाण, डॉक्टरांची रोडावणारी विश्वासार्हता, अनावश्यक तपासणी करण्याचे वाढते प्रमाण, त्याचा रूग्णावर पडणारा आर्थिक बोजा, विविध घटक एकत्र येऊन वैद्यकीय व्यवसायाची तयार झालेली साखळी, राज्यातील शासकीय सार्वजनिक आरोग्य सेवा पोखरलेली असणे, ग्रामीण रूग्णालयात विशेषज्ञांचा असलेला तुटवडा, सुमारे ५० टक्के रिक्त जागा, बदल्या, नियुक्त्यामधील बेसुमार भ्रष्टाचार, औषधे व उपकरणे खरेदीतील गैरव्यवहार, शासनाच्या अनास्थेमुळे आरोग्य सेवासाठी मंजूर झालेल्या अंदाजपत्रकीय तरतूदींपैकी अर्धाच निधी वापरला जाणे, रूग्णांच्या तक्रारी निवारण करण्यासाठी कायद्यात बदल करण्याची आवश्यकता, राज्यातील जिल्हा व ग्रामीण रूग्णालयांची दयनीय अवस्था व मोडकळीस आलेल्या कामगार रूग्णालयांमुळे औद्योगिक कामगारासह ग्रामीण जनतेचे आरोग्य धोक्यात येणे, डेंग्युमुळे राज्यात सर्वाधिक मृत्यु होऊनही शासनाने त्याची दखल न घेणे, क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाकडे शासनाचे पूर्णतः दुर्लक्ष, १७९ लोकांच्या मृत्युनंतरही स्वाईन फ्ल्यू बाबत उपाययोजना न करणे, बनावट पॅथॉलॉजीमधून रोगाचे होणारे चुकीचे निदान, किडनीच्या तस्करीचे वाढते प्रमाण, आपत्कालीन वैद्यकीय मदत केवळ कागदावरच असून शासकीय अनास्थेमुळे मनोरूग्णालये बिकट अवस्थेत असणे, जनजागृती होत नसल्याने राज्यात अवयवदानाचे अत्यल्प प्रमाण इ. सर्व बाबीवर उपाययोजना करण्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

अध्यक्ष महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने मी प्रथमतः शासकीय विभागाच्या अनागोंदी कारभारासंबंधात प्रसार माध्यमांनी विशेषकरुन आरोग्य खात्याच्या ढिसाळ कारभाराबाबत लोकमतने प्रथमतः या विषयाबद्दल जाहीरपणे जी काही त्या खात्याच्या अंदाधुंदी कारभाराबाबत जी भूमिका मांडली त्यांचे मी प्रथमतः अभिनंदन करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .....

माननीय आरोग्य मंत्री आज येथे उपस्थित नाहीत. आरोग्य मंत्र्यांना बोलावून घ्यावे. माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. माननीय आरोग्य मंत्र्यांच्याबाबतीत गेल्या आठवडयामध्ये उल्लेख केला. माझे भाषण चालू असताना त्यांनी अनेक वेळा उठून आपल्या कारभाराची, खात्याच्या कामाची सफाई देण्याचा प्रयत्न केला. हैद्राबाद मार्गे उस्मानाबादला येतात म्हणून उल्लेख झाला. ते त्यांनी फार मनाला लावून घेतले. शिव वडापावच्या ऐवजी त्यांच्या नावाने वडापाव सुरु करावा अशा प्रकारची सूचना केली. त्याचा त्रास त्यांना झाला. आरोग्य खात्यामध्ये त्यांनी जे प्रताप करुन ठेवलेले आहेत. त्याचा जर येथे उल्लेख झाला तर इतिहासामध्ये त्याची निश्चितपणे नोंद होईल. इतिहासामध्ये खेदाने म्हणावे लागेल, श्री.सावंत साहेबांचे आठवावे रुप आणि आरोग्य खात्याचा आठवावा प्रताप याची इतिहासामध्ये नोंद होईल अशा पध्दतीने कारभार सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, ते सभागृहामध्ये व्हाया हैद्राबाद येतात असे म्हटले तर ते त्यांना आवडले नाही. ते म्हणणे आम्हाला परवडेल. परंतु व्हाया मिझोराम, व्हाया कोचिंग, व्हाया सिलाँग, ज्यापध्दतीने औषधांची खरेदी झालेली आहे. या खरेदीचा विचार केला तर आपण केलेला कार्यकतृत्वाचा जो कारभार आहे. तो संपूर्ण देशामध्ये पसरवलेला आहे. तुमचा कारभार महाराष्ट्राच्या जनतेला कळालाच आहे. आता महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून अटकेपार झेंडा लावलेला आहे. राज्याच्या जनतेला हे समजलेले आहे. हा औषध खरेदीच्या बाबतीत जो घोटाळा झालेला आहे. त्याबाबतीत मी माननीय आरोग्य मंत्र्यांच्या प्रस्तावावर बोलत असताना ते दु:खी झाले होते. ते मी व्यक्तीगत घेतले. त्यांच्याबद्दल फार बोलायचे नाही. कारण ते मध्ये मध्ये उठून पुन्हा त्यांच्यावर झालेल्या आरोपांबद्दल खुलासा करत असतात. परंतु ठरविल्यानंतरही आरोग्याचे तीन तेरा वाजलेले आहेत. त्याबाबतीत त्यांच्या खात्याने एवढे उद्योग करुन ठेवलेले आहेत की, त्यांच्या स्तुतीचे पोवाडे गायल्याशिवाय आम्हाला राहवत नाही. या आरोग्य खात्याच्या झालेल्या भ्रष्टाचारा बद्दल मी आज बोललो नाही तर विरोधी पक्ष नेता म्हणून मी माझ्या कतृत्वामध्ये कसूर केलेली आहे असे होईल. शिव वडापाव, दिपक वडापाव अशा पध्दतीने मागच्या आठवडयात उल्लेख केला होता.

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील.......

हे त्यांच्या मनाला फार लागले. शिव वडापाव नाव बदलुन उध्दव वडापाव असे नाव द्या असे म्हटले होते. आता त्या वडापावचे नाव बदलणे शक्य नाही. कारण तुमची विश्वासार्हता एवढी कमी झालेली आहे. आता दिपक वडापाव नाव देऊनही ते वडापाव विकले जाणार नाही. अशा प्रकारची भीती वाटायला लागलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे, तेव्हा आमचे सन्माननीय सदस्य श्री.शंभूराज देसाई यांचा विचार करावा. ते भयंकर आतुरलेले आहेत. ही माझी 100 टक्के शिफारस लेखी देतो. मला काही अडचण नाही. औषध खरेदीचे प्रकरण जेव्हा पुढे आले त्यावेळी मंत्री महोदयांनी अतिशय जाहीरपणे सांगितले की, हा मला बदनाम करण्याचा डाव आहे. माझ्या खुर्चीवर कोणीतरी डोळा ठेवून हे आरोप केले आहे. अशा प्रकारचे भाषण केले. मंत्री महोदय फार बोलत नाहीत. त्यांनी एकदा सांगून टाकावे की, षडयंत्रामागे त्यांच्या पाठीमागे विदर्भाचा गट आहे का, खानदेशाचा गट आहे का, त्यांच्या पाठीमागे कोकणाचा गट आहे का की, मित्रांचा गट आहे का ?

अध्यक्ष महोदय, आम्हाला या प्रस्तावाच्या निमित्ताने अशी अपेक्षा आहे की, त्यांनी जे मौनीभावाचे रुप धारण केलेले आहे त्यांनी ते सोडून दु:ख, वेदना एकदा मोकळेपणाने सांगितल्या पाहिजेत. वर्तमानपत्रामध्ये वाचले की, आपल्या सहकाऱ्यांना घेऊन नाराजी व्यक्त करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलेले आहेत. काय तिथे चर्चा केली, काय तुमच्या वेदना आहेत, त्या मोकळेपणाने बोलून टाका. भात्यामधील बाण बाहेर काढा आणि चालवा. अशा तऱ्हेचे धाडस माननीय श्री.सावंत साहेबांनी दाखविले पाहिजे. आमचे माननीय श्री.प्रभु साहेब बसलेले आहेत. ते दिवसभर बसून असतात, कोण काय करते, प्रत्येक गोष्टीवर त्यांचे लक्ष असते, संध्याकाळी रिपोर्टींग झाले पाहिजे अशी जबाबदारी तुमच्यावर आहे. औषध खरेदीमध्ये गैरव्यवहार केलेले आहेत. महिला बाल विकास असेल, आदिवासी विकास विभाग असेल, शिक्षण विभाग असेल, या सर्व खात्यांचे रेकॉर्ड ब्रेकचे काम या खात्याने केलेले आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील........

एकूण 297 कोटींचा गैरव्यवहार या ठिकाणी झालेला आहे. स्थगन प्रस्तावाच्या निमित्ताने हा प्रश्न मी गेल्या आठवडयात मांडला. माननीय मंत्र्यांनी घाई गर्दीने यावर निवेदन करताना दोन कनिष्ठ अधिका-यांना निलंबित करण्याची घोषणा करुन टाकली. आपण त्याच्यामध्ये किती इनोसंट आहोत, मी किती अनभिज्ञ आहे असे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. औषध खरेदी करताना साधारण गणित आहे. त्या जिल्हयातून मागणीपत्र मागवून घेणे, आलेल्या मागणी पत्रकाप्रमाणे खरेदीची प्रक्रिया सुरु करणे. आरोग्य खात्याने एक नवीन चमत्कार घडवून आणलेला आहे.

अध्यक्ष महोदय, पहिल्यांदा खरेदी केलेली आहे. मग मागणीपत्र बोलाविलेले आहे. त्या औषधाच्या बाबत विशेष करुन, त्याची एक्सपायरी डेट काय आहे ? ती साठवणूकीकरिता काही व्यवस्था आहे का ? याबाबतीत त्या खात्याने कार्यवाही केलेली नाही. अशा प्रकारची वस्तुस्थिती मान्य केली पाहिजे. तुम्हाला एवढी घाई का होती, मागणी पत्रक न येता, मंत्र्यांमध्ये अशी अंर्तभूत शक्ती असली पाहिजे की, आपल्याकडे एवढी मागणी येणार आहे, त्याचे ॲन्टीसिपेशन बाबत त्यांच्यात एक आत्मविश्वास जागृत झालेला आहे. कोणत्या ठेकेदाराला कृपा दृष्टी करण्यासाठी त्यांनी हे केले, ते माहित नाही. त्यांच्यावर कोणाचा दबाव होता का ? पुन्हा उल्लेख केला तर तुम्ही म्हणणार विषया बाहेर गेला आहात. एकदा आम्हाला कळू द्या की, एवढी नियमबाहय खरेदी, इतका नियमबाहय कारभार करायला निघाला आहात, हा कोणाच्या दबावाखाली करता आहात ? एकदा आम्हाला समजले पाहिजे. जनतेच्या बाबतीत आरोग्य क्षेत्राची एवढी काळजी करता, काही ठिकाणी आपल्याला 300 पट औषधांची खरेदी करावी लागली. मीरा भाईंदर महानगरपालिकेत वर्षाला 200 आयोडिनच्या बाटल्यांचा वापर होतो. त्यांनी किती बाटल्या मागितल्या होत्या. 60 बाटल्यांची मागणी केली होती. त्यांना किती बाटल्या पाठविल्या ? आयोडिन सोल्युशनच्या 70 हजार बाटल्या पाठविल्या. परमिट रुममध्येही त्याची विक्री होऊ शकत नाही. 60 बॉटलची मागणी महानगरपालिकेने केली असताना 70 हजार बॉटलची मागणी कशी झाली. दिनांक 29 मे 2015 रोजीच्या पत्रानुसार मुंबई मंडळाचे उपसंचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या आयुक्त तसे लेखी कळवितात की, आम्हाला एवढया बाटल्यांचा पुरवठा करा.

UU-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील ....

अध्यक्ष महोदय, माझी अशी कल्पना आहे की, मिरा भाईंदरची जेवढी एकूण लोकसंख्या आहे, त्या सर्व लोकांचे ऑपरेशन केले तरीही या 70 हजार बाटल्या लागणार नाहीत. 70 हजार बाटल्या पाठविताना मंत्री महोदयांनी कोणता दृष्टीकोन समोर ठेवला आहे. तेथे 70 हजार आयोडीनच्या बाटल्यांचा ट्रक महानगरपालिकेच्या आवारात उभा आहे. 70 हजार बाटल्या परत करीत असल्याचे उपसंचालक यांना कळविले आहे. या महापालिकेने कळविले आहे की, आम्हाला बाटल्या नको आहेत. या 70 हजार बाटल्यांचे आम्ही काय करायचे. त्यांना केवळ 60 बाटल्या हव्या होत्या. परंतु एवढया बाटल्या पिताही येत नाही. त्यातून कोणी काही पार्टी केली समजू शकतो. काही अन्य ठिकाणी गेल्या ते समजू शकतो, काही बाटल्या सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांच्या मतदारसंघात पाठविणार का, मी म्हणणार नाही की, मातोश्रीवर जाऊ द्या. निदान या सर्व विषयाची व्याप्ती आपण पाहिली तर एवढा उपद्व्याप आरोग्य मंत्री महोदयांनी का केला आहे हे आम्हाला समजले नाही.

अध्यक्ष महोदय, ठाणे महानगरपालिकेचीही तीच परिस्थिती आहे. ठाणे महानगरपालिकेमध्ये सोडीयल हायप्लोक्लोराईड सोल्युशन आणि सेंट्रीमाईड सोल्युशनची 311 अशा संख्येची मागणी असताना त्यांना 4470 व 1245 इतक्या संख्येने वाढवून माल पाठविण्यात आला. मागणीपेक्षा या औषधांचा अतिरिक्त व प्रचंड पुरवठा करण्याचा त्यांचा काय हेतू होता हे माहिती नाही. त्यांचा हेतू आम्हाला एकदा समजला पाहिजे. या निर्जंतुकीकरणाच्या औषधाच्या बाबतीत मी शोध घेत आहे. या शासनातील मंत्र्यांनी शपथ घेतल्यापासून महिला व बालकल्याण, आदिवासी विकास, शिक्षण विभाग असेल, यातील आदिवासी विकास मंत्र्यांनी आदिवासी मुलांचे स्वेटरसुध्दा सोडलेले नाहीत. या सर्व खात्यामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी माननीय आरोग्य मंत्री यांनी एवढी मोठी खरेदी केली आहे काय ? असा आम्हाला प्रश्न पडतो. ठाणे मंडळाचा साठा अतिरिक्त झाल्याने 14 हजार अतिरिक्त आयोडीन सोल्युशनच्या बॉटलचा साठा मिरा भाईंदरकडे पाठविला आहे. दिनांक 25 मे 2015 रोजी पुन्हा त्यांना 14 हजार बॉटल पाठविल्या आहेत. आम्हाला हे कोडे सुटलेले नाही की, अंडे आधी की कोंबडी आधी. खरे तर मागणी केल्यानंतर आपण पुरवठा करतो. पण येथे मागणी अगोदरच पुरवठा झालेला आहे. आयुक्तांनी मे 2015 मध्ये राज्याच्या

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील ....

सिव्हील सर्जनला पत्र पाठविले आहे की, आम्हाला येथे औषध पुरवठा करावयाचा आहे. त्यामध्ये ते लिहितात की, राष्ट्रीय नागरी अभियानांतर्गत महानगरपालिका, नगरपालिका व कटक मंडळे यांच्याकरिता औषधांचा पुरवठा झालेला असून संदर्भीय पत्राने सहसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी पुरवठा झालेल्या औषधापैकी 22 औधषांचे पुनर्वितरण सर्व जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना करण्याचे सूचित केलेले आहे. तरी आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार ई-औषध मार्फत ऑनलाईन मागणी या कार्यालयास सादर करुन औषधाचा साठा तत्काळ प्राप्त करण्याची कार्यवाही करावी. या महाशयांनी रि-डिस्ट्रीब्युशनच्या निविदा काढल्या. यांनी त्याकरिता कोणते निकष लावले. म्हणजे उदाहरणार्थ अगोदर लातूरला औषध पुरवठा करायचा. लातूरला फार पुरवठा झाला म्हणून त्याचे पुनर्वितरण नाशिकला हा माल पाठवून करण्याबाबत सांगायचे. शासनाचा कारभार कोणत्या पध्दतीने चाललेला आहे हे आम्हाला समजत नाही. आरोग्याचा मोठा बाजार मांडला आहे. मंत्री महोदयांनी याबाबत उत्तर द्यावे. आपण ऑनलाईन मागणी केल्यानंतरही तुम्हाला त्याचे पुनर्वितरण का करावे लागते, म्हणून मी प्रश्न विचारला आहे की, कोंबडी आधी की अंडे आधी ? याचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा. तुम्ही तुमचे कोंबडे आता कितीही झाकून ठेवले तरी दिवस उगवल्यावर ते ओरडणारच आहे. त्यामुळे आमची मंत्री महोदयांकडून एवढीच अपेक्षा आहे की, तुम्ही आता कोंबडे झाकण्याचा प्रयत्न करु नका. एकदा लोकांसमोर त्याची स्पष्टता येऊ द्या. तुम्ही आता आयोडीन सोल्युशनच्या 60 हजार बाटल्यांचे काय करणार आहात, तसेच एवढया मोठया प्रमाणावर खरेदी केलेल्या औषधांचे तुम्ही काय करणार आहात ? आपण शेकडो पटीने महानगरपालिका व जिल्हा शक्य चिकित्सकांकडे पुरवठा केलेला आहे. यामध्ये 1 जानेवारी 2016 चे पत्रानुसार संचालक, आरोग्य सेवा हे त्यांच्या सहसंचालकांना असे लिहितात की, पुनर्वितरण करण्यात आलेल्या औषधांची कालबाहय मुदत ही पुढील 10 ते 16 महिने असल्याने सदर औषधांचे वितरण तत्काळ होणे आवश्यक आहे. म्हणजे याचा अर्थ काय काढायचा ? म्हणजे औषधांची गरज नसताना साठा पाठवायचा. 300 पट अधिक माल पुरावयाचा. परत सांगायचे की याची मुदत फक्त 16 महिने आहे, 12 महिने आहे. अशा

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .....

पध्दतीने पुन्हा निर्देश दिले जातात. उपसंचालनालयाचे निर्देशानुसार सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दिनांक 11 जानेवारी, 2016 च्या पत्राने असे कळवितात. मला येथे आश्चर्य वाटते की, आपण हे पाहिल्यानंतर सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या बाबतीत मला एकच गाणे आठवते, "लहरी राजा प्रजा आंधळी, अधांतरी दरबार, उध्दवा अजब तुझे सरकार." अशी अवस्था सार्वजनिक आरोग्य खात्याची झालेली आहे. औषधाची मुदत संपल्याचे पत्र उपसंचालक देतात व औषधाचे लवकर वितरण करावे असेही निर्देश देतात. औषधांचा अतिरिक्त साठा प्राप्त झाल्यावर तो खपविण्याकरिता अधिकाऱ्यांना अनिवार्य केले जाते. तुम्ही ती औषधे खपवा, प्या, फेकून द्या, लोकांच्या घशात ओता अशा पध्दतीचे फर्मान मंत्री महोदयांनी काढलेले दिसत आहे. म्हणून आपण औषधांची अवास्तव खरेदी केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, महिला आरोग्य अधिकारी, शाहूनगर, उस्मानाबाद यांनी दिनांक 10 मार्च 2016 रोजी पत्रामध्ये स्पष्टपणे सांगितले की, सद्यस्थितीत औषधे साठविण्यासाठी भाडे तत्वावर कोणतेही गोदाम उपलब्ध नाही. संपूर्ण पत्रव्यवहाराचे सर्पोटींग डाक्युमेंट आहेत, असे मी मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो. ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास मी तयार आहे. इस्लामपूरचे मुख्याधिकारी यांनी दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजी उपसंचालकांना अशाच बाबतीत पत्र पाठविले आहे की, इस्लामपूर नगरपरिषदेस एक शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर असून दवाखाना चालू करण्याच्या कामी पूर्ण कार्यवाही झालेली आहे. दवाखाना चालू करण्याच्या कामी वैद्यकीय अधिकाऱ्याची नितांत गरज असून हे पद रिक्त असल्याने दवाखाना सुरु करणे अवघड झालेले आहे. आपल्याकडील उपलब्ध औषधे व साहित्य इकडे आणून त्याचा उपयोग करता येत नसल्याने सदरचा औषध साठा आम्ही प्राप्त करुन घेऊ शकत नाही. ज्यावेळी आमचा दवाखाना चालू होईल त्यावेळी आम्ही आपणास औषध साठयाची मागणी करु. तोपर्यत सदरची औषधे इतर संस्थांना वाटप करण्यास हरकत नाही. परळी वैजनाथच्या मुख्याधिकाऱ्यांनी असेच पत्र लिहिले आहे ते देखील मी आपणास वाचून दाखवितो. औषधे ठेवण्यास गोडावून उपलब्ध करुन देण्यात यावेत म्हणून त्यांनी संचालक, नागरी पुरवठा व शिधा वाटप यांना पत्र दिले. आता गोदाम शिल्लक नाहीत मग आता या औषधांचे काय करायचे ? अक्कलखाती घेतलेल्या औषधाचा साठा साठविण्याकरिता आता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील ....

शासकीय गोदामेसुध्दा मंत्री महोदयांनी गुंडाळून टाकली आहेत अशी वस्तुस्थिती आहे. कोल्हापूरच्या बाबतीत आणखी भयानक परिस्थिती आहे. कोल्हापूरचे मुख्याधिकारी यांची पॅरासिटामलच्या 60 एमएलच्या 6125 बाटल्यांची मागणी असताना त्यांना 20 हजार बाटल्यांचा अतिरिक्त पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच डायकोमायसीन याची केवळ 4210 इतकी गरज असताना 48220 एवढी गोळयांची पाकीटे देण्यात आली. मी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना सांगू इच्छितो की, पॅरासिटामलच्या अनावश्यक औषध पुरवठयामुळे आता आम्हाला ताप आलेला आहे व ताप झालेला आहे अशी परिस्थिती आहे. आता ताप आला, अंग दुखते, डोके दुखते. यानंतर तुमचे काय काय दुखायला लागणार आहे हे आम्हाला माहिती नाही. या औषधाच्या साठयाकरिता गोदाम भाडयाने घेतलेले आहेत. खरे तर अवाजवी औषधांचा साठा आपण खर्च केलेला आहे.

यानंतर V V-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

आणि दुसरी जर माहिती काढली तर औषधे साठवणुकीकरिता गोडावून भाडयाने घेण्यासाठी खर्च केला तो किती झाला, याची माहिती सभागृहाला कळू द्यावी. कोल्हापूर मंडळाला सोडियम हायड्रोक्लोराईड सोल्यूशनच्या केवळ दहा बाटल्यांची गरज असताना त्या ठिकाणी 4000 बाटल्यांचा पुरवठा करण्यात आला. तसेच, तेथे सिप्रोफ्लॉक्सिनच्या केवळ दहा पाकिटांची गरज असताना 88 पाकिटे पुरविण्यात आली. पॅरासिटॉमॉल सिरपच्या केवळ 3075 बाटल्यांची गरज असताना तेथे 20,000 बाटल्यांचा पुरवठा करण्यात आला होता. माननीय मंत्रीमहोदय आपण ज्या उस्मानाबाद जिल्हयांचे पालकमंत्री आहात, त्या उस्मानाबाद जिल्हयाला हा अतिरिक्त औषध पुरवठा झाला असता तर हरकत नव्हती. कोल्हापूर जिल्हयाचे आरोग्य इतके खराब झाले, याची आम्हाला कल्पना नव्हती. याबाबत आता आम्हाला माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांना विचारावे लागेल. कोल्हापूरचे आरोग्य इतके धोक्यात आले का ? कोल्हापूर येथे 20,000 पॅरासिटॉमॉलचे सिरप पाहिजे का ? तसेच, तेथे सिप्रोफ्लॉक्सिनच्या एवढया गोळया का पाहिजे? हे काम ज्यापध्दतीने ज्या कोणी अधिका-याने केलेले आहे, ते आपल्या सूचनेवरुन केलेले आहे का ? आपला दबाव होता का ? याबाबत एकदा आम्हाला व सभागृहाला याबाबत माहिती कळू द्यावी. जिल्हा शल्यचिकित्सक आणि वैद्यकीय अधिकारी हे या अधिका-यांनी पाठविलेल्या औषधांच्या पुरवठयाबाबत ते नकार देत आहेत. दिनांक 10 ऑगस्ट,2015 रोजी याबाबत लेखी आदेश काढून तो अतिरिक्त औषध साठा घेण्यास नकार दिला. याबाबत संबंधित आयुक्तांनी पत्र पाठवून कळविलेले आहे. सदर औषधांचा वापर करण्यास नवी मुंबई, उल्हासनगर, वसई, विरार, भिवंडी येथील अधिका-यांनी देखील स्पष्ट नकार दिलेला आहे. या सर्व अधिका-यांनी व शल्य चिकित्सकांना आयुक्तांनी कळविले होते की, सदर औषधांचा वापर वेळेत न झाल्यास त्याची पोटेन्सिटी कमी होण्याची शक्यता आहे. तसेच त्या औषधांची तुटफूट होण्याची शक्यता आहे. करोडो रुपयांच्या औषधांची खरेदी करुन त्याचा अपव्यय झालेला आहे, आरोग्य खात्यातील शल्यचिकित्सक, आरोग्य अधिकारी असतील ते कोणत्या दबावाखाली होते ? म्हणून मागणी नसलेल्या औषधांची यादी उप संचालकांनी 20.10.2015 च्या पत्रासोबत स्वतः दिलेली आहे. उप संचालकांचे दिनांक 27 मे,2000 रोजीचे पत्र मी वाचून दाखवितो. ...2

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

संबंधित राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत येणा-या महापालिका व नगरपालिका यांनी सदर साठा अवास्तव मागणीनुसार नसल्यामुळे ताब्यात घेण्यास नाकारलेले आहे. नगरपालिका व महानगरपालिका यांनीही सदर अतिरिक्त औषध साठा ताब्यात घेण्यास नाकारल्याने तो कालबाहय होईल, अशी भिती व्यक्त केलेली आहे. तुमच्या खात्याच्या पत्रव्यवहारामध्ये या पत्रांचा उल्लेख केलेला आहे. मोघम आरोप करण्यापेक्षा संपूर्ण कागदपत्रांची उपलब्धतता माझ्याकडे आहे म्हणून मी बोलत आहे. याबाबत आयुक्तांनी उप संचालकांना वेळोवेळी कळविलेले आहे. आयुक्त कोण आहे तो सभागृहाला पाहू द्यावा. असा कोण महान आयुक्त होऊन गेलेला आहे ? हे पाहणे गरजेचे आहे. या सर्व प्रकरणामध्ये विभागातील अडचणी समजून न घेता कळविले की, अतिरिक्त औषध साठा ठेवण्याकरिता जागा नाही. महापालिका औषध साठे स्वीकारण्यास नकार देत आहे. याबाबत 23.7.2015 रोजी आयुक्तांनी एक पत्र लिहिलेले आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, तातडीच्या स्वरुपात जागा भाडे तत्वावर घेण्याकरिता कळवून देखील अद्यापर्यंत कोणीही कार्यवाही केलेली नाही. याबाबत तत्काळ कार्यवाही करण्यासाठी प्रत्यक्ष उपायुक्त यांनी दम दिलेला आहे. या बाबतीत आज औषधाच्या अवास्तव खरेदीबाबत जी काही कार्यवाही व्हायला पाहिजे, ती झालेली नाही. माननीय आरोग्यमंत्री जबरदस्तीने औषधपुरवठा करण्याचे धोरण का अवलंबिले गेले ? याबाबत आम्हाला माहिती नाही. आयुक्तांच्या फतव्यावरुन उप संचालकांनी आपली नोकरी जाईल, आपण निलंबित होऊ या भितीने भिवंडी व ठाणे येथे भाडयाने गोडावून पाहायला सुरुवात केली. 3500 स्क्वे.फु.जागेचे आणि 54,04000 रुपये भाडयाचे गोडावून पाहिले. औषधांची ही बोगस व अनावश्यक खरेदी ठेवण्याकरिता या 3500 चौ.फु.च्या गोडावूनला 54,04000 लाख रुपये भाडे दिले गेले. आयुक्तांनीही त्याला मान्यता दिली. एवढे पाप लपविण्याकरिता भाडयापोटी 54,04000 रुपये भरण्यात आलेले आहेत. यामध्ये आयुक्तांनी काय म्हटले की, सदर औषध साठा एकत्रित ठेवण्यासाठी व शहरांना पुरविण्याकरिता यावर्षी तात्पुरती व्यवस्था म्हणून गोडावून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमाप्रमाणे मासिक भाडे तत्त्वावर घेण्यास हरकत नाही. याकरिता निधी राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाअंतर्गत पुरविण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) V V-3
JN/ AKN/ MMP/ 17:50

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

आज 35000 स्क्वे.फु.करिता 54,000,00 भाडे द्यायला शासन तयार आहे. हा अतिरिक्त औषध साठा ठेवण्याकरिता आयुक्तांच्या सूचनेवरुन किंवा आणखी कोणाच्या सुचनेवरुन जी कार्यवाही केलेली आहे,ती योग्य नाही.

अध्यक्ष महोदय या संपूर्ण खरेदीमध्ये मागणीपत्रक नाही. मागणीपत्रकाच्या प्रमाणात ही खरेदी व्हायला पाहिजे होती. त्याचा कुठेही उल्लेख नाही. या संपूर्ण मनमानी कारभाराबाबत मला माहिती नाही असे स्टेटमेंट आपण वर्तमानपत्रात दिलेले आहे. राज्यामध्ये माननीय मंत्र्यांच्या संमतीशिवाय एवढ धाडस कुणी करेल का ?

डॉ.दिपक सावंत ( खाली बसून ): अध्यक्ष महोदय, हे सर्व माझ्या काळातील नाही. याबाबत मी उत्तरात सांगेल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्षम महोदय, आम्ही ऐकायला तयार आहोत. आम्हाला सर्व माहिती विचारण्यात यावी. आमचे खुले किताब आहे, 25 वर्षापासून मी या सभागृहात काम करीत आहे. आम्ही काही अंगाला लावून घेतले नाही. आम्हाला कोणाला हप्ते द्यावे लागत नाहीत. आम्हाला कोणाकडे पोच करावी लागत नाही. मला कशाला बोल लावत आहात ? सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील तुम्हाला अजून अंदाज नाही. मी जर बोललो तर ते तुम्हाला आवडणार नाही. सार्वजनिक जीवनात वावरताना उजळ माथ्याने वावरले पाहिजे. येथून कोणालाही काही घेऊन जायचे नाही आणि कोणी आपण येथे काही घेऊन आलेलो नाही. आम्हाला काही नालासफाई करायची नाही आणि गाळही घेऊन जायचा नाही. 2015-2016 मध्ये आपलीच सत्ता आहे. उप संचालकांनी पत्रात काय म्हटले की, सदर औषध घेऊन जाण्याकरिता मोठी वाहने व जबाबदार अधिकारी पाठवून औषधे हस्तगत करुन घ्यावीत. तुमचे अधिकारीही तुमच्या पक्षाचीच भाषा वापरायला लागलेले आहेत. खरे म्हणजे आपल्या खात्याच्या अधिका-यांनी सेनेच्या शाखेत संवाद कसा होतो, तशी भाषा वापरलेली आहे. सदर औषध घेऊन जाण्याकरिता मोठे वाहन व जबाबदार अधिकारी यांना तत्काळ पाठवून औषधे हस्तगत करुन घ्यावीत, असे म्हटलेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

औषधे हस्तगत करुन घेणे म्हणजे काय आपण आतापर्यंत कधीच अशा प्रकारे औषधे हस्तगत केलेली नाहीत. माननीय मंत्री महोदय आपण काही केले नाही तर अस्वस्थ होऊ नका. मला कळत नाही. हे तर अवघड आहे.

डॉ.दिपक सावंत : आपल्याविषयी पूर्ण आदर राखून बोलत आहे. आपल्या काळात हे अधिकारी होते. हे अधिकारी आमच्या काळातील नाहीत. हे अधिकारी आपल्या पूर्वीच्या लोकांच्या काळातील आहेत. याच्या नंतरच्या काळातही ते अधिकारी असतील. आपण बदली होतो. तुम्ही आणि मी येथे परमनंट नाहीत. अधिकारी परमनंट आहेत. एवढेच लक्षात घेतले पाहिजे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आमची अपेक्षा एवढीच आहे की, औषधे हस्तगत करावी, हे मला योग्य वाटले नाही. म्हणून मी हे आपल्या निदर्शनास आणलेले आहे. सूचना केलेली आहे. या सर्व प्रकाराची चर्चा व्हायला लागली. आयुक्त दमदाटी करीत होते. अधिका-यांवर दडपण आणत होते. ज्यावेळी लक्षात आले की, औषध कोणीही स्वीकारत नाहीत. महापालिका व नगरपालिका त्याकरिता नकार देत आहेत, त्यावेळी त्यांनी पत्र लिहिलेले आहे. दिनांक10.6.2015 रोजीच्या पत्रामध्ये अचानक तडजोडीची भाषा आयुक्त करायला लागलेले आहेत. त्यांनी पत्रात असे म्हटले आहे की, मागणी करण्यात आलेला खर्च अवास्तव असल्यामुळे तडजोड करुन व त्यावर तोडगा काढून लवकरात लवकर मार्ग शोधण्यात यावा. औषधांची सक्ती करणारे आयुक्त आता या पत्रातून तडजोडीची भाषा करीत आहेत. मी काही माननीय मंत्री यांच्यावर याबाबतचे आरोप करीत नाही. तुमचा यात संदर्भही नाही. ज्या पध्दतीने हे सर्व चालले आहे. शेवटी मंत्री म्हणून कुठेतरी आपलयाला याची जबाबदारी घ्यावी लागेल. या खात्याचे मंत्री म्हणून या जबाबदारीपासून आपल्याला दूर पळता येणार नाही. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या आयुक्तांनी यात म्हटलेले आहे की,

डब्ल्यूडब्ल्यू-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष (प्रा. देवयानी फरांदे)** : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, दिनांक 5 ऑगस्ट, 2015 रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान, आयुक्तांचे एक पत्र आहे. सदर पत्रात अतिरिक्त औषधसाठ्यांची विल्हेवाट लावण्यासाठी कशी घाई केलेली आहे, त्याची माहिती दिलेली आहे. सदर पत्रात औषध साठ्यांचे पुनर्वितरण करण्याची मागणी केलेली आहे. सदर औषधसाठा आपल्या अंगलट येणार आहे. यास आरोग्य यंत्रणा आणि संबंधित आयुक्त जबाबदार असणार आहे. सदर पत्रात विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना औषधसाठ्यांचे पुनर्वितरण करण्याबाबत फर्मान काढले होते. आरोग्य विभागाचा कारभार किती पारदर्शी आहे हे उपसंचालकांनी संचालकांना दिलेल्या पत्रातील माहितीनुसार समजून येणार आहे. उपसंचालकांनी संचालकांना जे पत्र लिहले आहे ते मी वाचून दाखविणार आहे. वरिष्ठ कार्यालयाकडून व संबंधित पुरवठाधारकांकडून वारंवार होणाऱ्या दबावामुळे तसेच वृत्तपत्रातील छापून आलेल्या बातमीनुसार व सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनामुळे विनाकारण लोकप्रतिनिधींकडून प्रश्न निर्माण होऊ नये आणि विभागाची विनाकारण होणारी बदनामी टाळण्यासाठी या कार्यालयात पुरेशी जागा उपलब्ध नसताना, या कार्यालयाने उपरोक्त औषधसाठा प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथील जुन्या कर्मचारी वसाहतीत उपलब्ध असलेल्या जागेत साठवून ठेवण्यात आलेला आहे. उपरोक्त औषधसाठा साठवून ठेवण्याची जागा ही औषधे साठवून ठेवण्याकरिता योग्य नाही. सदर जागेत उपरोक्त औषध साठ्यासाठी तापमान 30 डीग्री सेल्सिअसच्या आत राखणे हे सुविधा अभावी शक्य नाही. अशी आरोग्य विभागाने कबुली दिलेली आहे. यामध्ये काय घोटाळा झालेला आहे, याबाबत आरोग्य विभागाने कबुली दिलेली आहे. मी जे बोलत आहे, त्यासंदर्भातील सर्व पत्रव्यवहार आरोग्य मंत्र्यांना देण्यास तयार आहे. आरोग्य विभागातील संचालक, उपसंचालक, आयुक्त हे फक्त कागदीघोडे नाचविण्याचे काम करीत आहेत. हे कागदीघोडे तुमच्या प्रतापाचे पोवाडे चौफेर उधळू लागले आहेत. हे आरोग्य विभागाने सांगितलेले आहे. मी वेगवेगळ्या जिल्ह्याच्यासंदर्भातील माहिती देऊ शकतो. आरोग्य विभागाशी संबंधित असणारी अनेक उदाहरणे मी देऊ शकतो.

.......2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.........

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभागाने व्हेंटिलेटर मशिन खरेदीकरण्यासाठी अनेक नियम पायदळी तुडविलेले आहेत. सन 2009 मध्ये व्हेंटिलेटर खरेदीच्या संदर्भात मोठे प्रकरण गाजले होते. त्यावेळी सर्व नियम धाब्यावर बसविण्यात आले होते. याचा अर्थ आरोग्य विभागाची प्रकृती किती चिंताजनक आहे, हे त्यावरुन कळून येत आहे. मंत्री महोदयांवर आरोप होणार आहे. माननीय मुख्यमंत्री नंतर आपल्याला क्लिनचीट देतील. मुख्यमंत्री महोदयांनी क्लिनचीटच्या संदर्भात एक खिडकी योजना सुरु केलेली आहे. मंत्री महोदयांनी एक खिडकी योजनेत मला क्लिनचीट मिळणेबाबत अर्ज करण्याची गरज आहे. मुख्यमंत्री महोदय लगेचच क्लिनचीट देतील. भ्रष्टाचाराचा जो महापूर आहे, त्यातून उद्‌भवलेले प्रश्नांची उत्तरे राज्यातील जनतेला द्यावी लागणार आहेत. या संपूर्ण प्रकरणाची मंत्री महोदयांनी नैतिक जबाबदारी स्वीकारुन राजीनामा देण्याची आवश्यकता आहे, अशी माझी मागणी आहे. आयुक्त, संचालक, अधिकारी आणि उपसंचालक हे काय करतात यापेक्षा मंत्री महोदयांचे आरोग्य विभागावर कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. मंत्री महोदयांना आरोग्य विभागावर नियंत्रण ठेवता येत नाही किंवा मंत्री महोदयांवर कोणाचा तरी रिमोट कंट्रोल असला पाहिजे किंवा त्यांच्याकडे असलेला रिमोट कंट्रोल चालत नसावा असे दिसून येत आहे. औषध खरेदीमध्ये योग्य त्या सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. आमचे सरकार असताना चुका झालेल्या असतील तर त्या आमच्या पदरात टाकाव्यात. पण आपल्या कार्यकाळात औषध खरेदीमध्ये घोटाळा झालेला असून, त्यास कोणते अधिकारी जबाबदार आहेत, या सर्वांची जबाबदारी मंत्री महोदयांनी स्वीकारली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत टेक होम रेशन दिले जाते. माननीय सर्वोच्च न्यायालयाने सन 2013 मध्ये जिल्हास्तरीय निविदा काढण्याबाबत सूचना केलेली होती. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निवड करण्यात आली. कमिटी नेमली होती. जिल्हाधिकारी यांनी सन 2013 मध्ये जिल्हास्तरीय निविदा काढण्याबाबत आदेश दिले होते. टीएचआरचे काम बचत गटांना देण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. बचत गटांना ॲटोमॅटिक मशिन

.......3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.........

बसविण्याबाबत सूचना केली होती. त्यानंतर बचत गटांनी कर्ज काढून ॲटोमॅटिक मशिन बसविले होते. निविदा 3 वर्षासाठी असताना शासनाने फक्त 1 वर्षासाठीच निविदा असेल असा निर्णय घेतला होता. मध्यंतरी माननीय सर्वोच्च न्यायालयाने काही निदेश दिले होते. सदर योजनेचे विकेंद्रीकरण करण्याबाबत सूचना केली होती. महिला व बालविकास मंत्र्यांनी त्याचा गैर अर्थ काढून योजनेचे केंद्रीकरण केले होते. अशा प्रकारे माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला केराची टोपी दाखविण्याचे काम महिला व बालविकास मंत्र्यांनी केलेले आहे. नियमावलीची चिरफाड करीत अटी व शर्ती सचिवांनी सुचविल्या होत्या. राज्याचे वित्त सचिव श्री. श्रीवास्तव यांनी केलेल्या सूचना देखील मंत्र्यांनी पाळलेल्या नाहीत. महालक्ष्मी गृहउद्योग नांदेड, महाराष्ट्र सहकारी महिला उद्योग संस्था धुळे, व्यंकटेश्वर महिला उद्योग संस्था उदगिर अशा तीन संस्थांना कामे कशी मिळतील या दृष्टीकोनातून निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

अध्यक्ष महोदय, लहान बालकांच्या जीवाशी खेळण्याचे काम आरोग्य विभागाकडून केले जात आहे. त्याला आपण टीएचआर म्हणतो. शासनाने त्या योजनेला दुर्देवाने डॉ.ए.पी.जे.अब्दुज कलामांचे नाव दिलेले आहे. याची तरी जाण राखण्याचे काम शासनाने करायला हवे होते. लॅब लावा, 15 टक्के सोलवंसी भरा असे बचत गटांना सांगितले जात आहे. अशा प्रकारे जाचक अटी टाकून बचत गटांना काम न देण्याचा प्रकार सुरु आहे. 15 टक्के संबंधित कंत्राटदाराला सोलवंसी देण्याय परवडणार नाही. 25 लाख रुपये लॅबसाठी खर्च करणे हे कोणालाही शक्य होणार नाही. अशा पध्दतीने टीएचआरची निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. राज्य शासनाने अशी निविदा प्रक्रिया तत्काळ रद्द करण्याची आवश्यकता आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची खरी आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहात बोगस डॉक्टरांच्या संदर्भात अनेक वेळा चर्चा झालेल्या आहेत. स्थानिक पातळीवर बोगस डॉक्टरांवर कारवाई होणे अपेक्षित असताना तशी होताना दिसून येत नाही. मी माझ्या मतदारसंघातील एका बोगस डॉक्टरांचे उदाहरण देणार आहे. माझ्या

........4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.........
मतदारसंघात संगमनेर तालुक्यात मनोली नावाचे एक गाव आहे. त्या ठिकाणी एक बोगस डॉक्टर असून तो प्रिसक्रिप्शनवर औषधे लिहून देतो. मी यासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी यांना फोन करुन फ्लाईग स्कॉड पाठवून कारवाई करण्याबाबत मागणी केली होती. त्यांनी मला तालुका अधिकारी यांच्याकडे बोट दाखविले. पंचायत समितीमधील तालुका आरोग्य अधिकारी देखील त्यास सामिल आहे. संबंधित बोगस डॉक्टराची राजरोसपणे प्रक्टिस सुरु आहे. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी पथक पाठवून तेथील नर्सेस वगैरे कर्मचाऱ्यांकडून जबाब नोंदवून घेतला होता. सदर जबाबामध्ये बोगस डॉक्टर नाही, असे नमूद केलेले आहे. शेवटी आम्ही संबंधित बोगस डॉक्टरांनी लोकांना प्रिसक्रिप्शनवर जी औषधे लिहून दिली होती, ती प्रिसक्रिप्शन आम्ही जमविली होती. अशा प्रकारे चौकशीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर संबंधित बोगस डॉक्टर त्या ठिकाणाहून पळून गेला होता. पण अशा वेळी आरोग्य यंत्रणा कोणते काम करीत होती असा माझा प्रश्न आहे. आरोग्य विभागातील जिल्हा आरोग्य अधिकारी काय करीत होते, असा माझा प्रश्न आहे. आज गावोगावी मुन्नाभाई तयार झालेले आहेत. अशा सर्व मुन्नाभाईंचा शोध घेण्याची गरज आहे. बोगस डॉक्टरांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. अनिल बोंडे यांना सांगू इच्छितो की, तुम्ही त्या क्षेत्रात काम करीत आहात. ग्रामीण भागात काय चालले आहे, ते आपल्याला माहीत आहे. शासनाने बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यासाठी जिल्हानिहाय समित्या गठित केलेल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

सन्माननीय आरोग्य मंत्र्यांना मुन्नाभाईंची संख्या रोखता आली नाही. माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री हातवारे करुन बोलत असतात. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, डेन्टल कौन्सिलचे प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी वैद्यकीय शिक्षण खात्याची आहे. डॉक्टरांनी आपल्या दवाखान्याच्या बाहेर अमूक मेडिकल कौन्सिलची मान्यता आहे, असा मोठा बोर्ड लावला पाहिजे, परंतु बऱ्याच ठिकाणी असे बोर्ड पहायला मिळत नाही. मुंबईमध्ये रिक्षाचा रंग काळा पिवळा असला तर तिला परमिट आहे असे गृहित धरले जाते, तसे या डॉक्टर मंडळीचे चालले आहे. डॉक्टरांची नोंदणी दर्शविणारे प्रमाणपत्र दवाखान्याच्या बाहेर लावणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महाराज, राज्याचे आरोग्य खाते बिघडलेले आहे. बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट या राज्यात वाढलेला आहे.

अध्यक्ष महाराज, मला महिला व बालकल्याण खात्याची कीव येते. प्रत्येक वेळेस आरोपीच्या पिंजऱ्यात मंत्री महोदयांना उभे केले जाते. त्यामध्ये त्यांचा किती दोष आहे, काय संबंध आहे, हे मला माहीत नाही. ही गोष्ट खरी आहे की, त्यांना कौटुंबिक वारसा लाभलेला आहे. त्यांच्याबद्दल मला मनापासून आदर आहे, परंतु बोलताना मनाला वेदना होतात. मंत्री महोदयांनी या आरोपातून बाहेर आले पाहिजे आणि आपली स्वत:ची प्रतिमा जनतेसमोर चांगल्या पध्दतीने मांडली पाहिजे, अशी अपेक्षा आहे. भ्रष्टाचाराचे आरोप कोणत्याच मंत्री महोदयांना हे शोभणारे नाही. माननीय आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत आपल्या खात्याचे तीन तेरा वाजलेले आहेत. आपण सक्षम मंत्री आहात, परंतु आपला राजीनामा मागण्याची वेळ आलेली आहे, याचे मला दु:ख होत आहे. आपण राज्यातील जनतेला यासंबंधी उत्तर दिले पाहिजे, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण पुरे करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

--------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) : अध्यक्ष महाराज, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मी विशेषतः ग्रामीण भागातील आरोग्याच्या संदर्भात काही सूचना करणार आहे. ग्रामीण भागातील आरोग्याची सुरुवात उप केंद्रापासून होते. त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय आणि मग जिल्हा रुग्णालय असा हा क्रम आहे. आज जिल्हा रुग्णालयावर जास्त भार वाढलेला आहे. याचे कारण असे की, ग्रामीण रुग्णालय आणि उप जिल्हा रुग्णालय हे सक्षमरित्या आजही आपण चालवू शकत नाही. ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालयामध्ये ....

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदया, सभागृहात सन्माननीय विरोधी पक्षनेते तसेच गटनेते उपस्थित आहेत. आज सकाळपासून सभागृहाचे कामकाज चालले आहे. आज सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवर अर्धा-तास चर्चा 11 आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांना अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलावयाचे आहे. या प्रस्तावाचे उत्तरही आज घ्यायचे असेल तर आज घ्यावे अन्यथा उद्या घेता येईल. आजच्या कामकाजपत्रिकेवरील अर्धा-तास चर्चा संपल्या तर बरे होईल. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याबाबत कृपया मार्गदर्शन करावे. कालही सभागृहाचे कामकाज रात्री 10.30 पर्यंत चालले....(अडथळा)... आपण अधिवेशन वाढवा असे म्हटले असते तर आम्ही मान्य केले असते.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महाराज, आम्ही कामकाज सल्लागार कमिटीमध्ये मागणी केली होती की, हे अधिवेशन 29 एप्रिल पर्यंत वाढवा, ही आमची मागणी रेकॉर्डवर आहे, परंतु सरकार यासाठी फारसे तयार नव्हते. त्यानंतर आम्ही 22 एप्रिल पर्यंत वाढवा अशी मागणी केली, परंतु आपण आमची विनंती मान्य केली नाही. सन्माननीय संसदीय कार्य मंत्री राज्याच्या व्यापक हिताच्या दृष्टीने काही प्रयत्न करता आला तर तो करायला हरकत नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये आपण सर्वांनी मिळून ठरविलेले आहे. सरकारी पक्षाची सूचना होती की, आपण हे कामकाज 13 एप्रिलपर्यंत संपवावे. आमची तयारी आहे बसण्याची आपण मे पर्यंत सांगा आमची तयारी आहे, त्यासाठी आमची काही अडचण नाही.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महाराज, सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी एक गंभीर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

आरोप केलेला आहे. सभागृहाची परंपरा असते की, कामकाज सल्लागार समितीमध्ये जी चर्चा होते ती सभागृहात केली जात नाही. आपण स्पष्टपणे चर्चा तर केलीच केली, काही वाक्य आपण सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या तोंडी घातलेले आहेत. आपण परवानगी दिली आणि परंपरा मोडायची झाली तर सर्व चर्चा सभागृहात करुया. कामकाज सल्लगार समितीचे इतिवृत्त सभागृहासमोर ठेवा. एक चुकीचा संदेश जातो आहे की, आम्ही मान्य केले म्हणून तुम्ही अधिवेशन लवकर बंद करण्याचे ठरविले, हे अगदी चुकीचे आहे. आम्ही वेळोवेळी सभागृहात विनंती केलेली आहे की, राज्यात प्रचंड दुष्काळ पडलेला आहे त्यामुळे आपण अधिवेशन पुढे वाढवा. मंत्री महोदय विरोधी पक्षनेत्यांनी मान्य केले म्हणून आम्ही अधिवेशन थांबविले. यात दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. कामकाज सल्लागार समिती मध्ये झालेली चर्चा ही सभागृहात करावयाची काय, तसे असेल बैठकीचे इतिवृत्त आपण सादर करावे, मग आम्ही सांगतो. आपण जो शब्दप्रयोग केलेला आहे तो कृपया मागे घ्यावा. आपण अजूनही खुल्या मनाने विचार करावा. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, किमान एक आठवडा दिनांक 30 एप्रिल पर्यत अधिवेशन वाढवा. याचे खापर आपण सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांवर, आमच्यावर फोडत आहात.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदया, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्न उपस्थित केला म्हणून मी हे सांगितले आहे. पुढील कामकाज नीट आणि वेळेत चालावे म्हणून आपल्या संमतीने घ्यावे म्हणून प्रश्न उपस्थित केला आहे. सन्माननीय माजी मुख्यमंत्र्यांनी मला मार्गदर्शन केले तर मी निश्चितपणे घेईन कारण की ते ज्येष्ठ आहेत. आपण माझी वाक्य काढून बघा. आज चर्चा किती वेळ करायची, आज आणि उद्या कशी संपवायची असा विषय झाला तेव्हा यांनी सांगितले की, कामकाज सल्लागार समितीमध्ये आपण हा निर्णय घेतला पाहिजे. कामकाजा सल्लागार समितीमध्ये आपल्याही काळात आणि आमच्या काळात आपण एकमताने निर्णय घेतो आणि त्याची तारीख 13 एप्रिल ठरली. मी फक्त याचाच उच्चार केला. आपण कृपया काढून बघावे, मी माफी मागेन, मला काही अडचण नाही. माझ्या हातून चुक झाली तर खुल्या दिलाने दिलगिरी व्यक्त करतो आणि आताही करीन. आज आणि उद्या दोन दिवस अधिवेशन आहे. सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवर 11 अर्धा-तास चर्चा आहेत. अंतिम आठवडा प्रस्तावावर मंत्री महोदयांकडून उत्तर घ्यावयचे आहे. आपली चर्चा किती वेळ करायची, यासंबंधी सन्माननीय गटनेत्यांनी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट...

गटनेत्यांनी आणि सभागृहाच्या अनुमतीने निर्णय करावा. आपण एकदम अधिवेशन वाढवा असे म्हटले. हे मी त्यांना सांगू शकत नाही की, अधिवेशन वाढविण्याची मागणी कामकाज सल्लागार समितीमध्ये करायची की, सभागृहात करायची. पण आपले त्यांना सारखे मार्गदर्शन असल्यामुळे मी काही करीत नाही.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महाराज, सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी यासंबंधी सुरुवातीला जे वक्तव्य केले ते त्यांनी मागे घेतले असते तरी चालले असते. कामकाज सल्लागार समितीमध्ये आम्ही मागणी केली होती की, अधिवेशन एप्रिल अखेरपर्यंत वाढवा.

यानंतर YY-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश बापट : कामकाज सल्लागार समितीमध्ये आपण एकमताने निर्णय घेतो. त्यातील हा निर्णय होता की, उद्याला अधिवेशन संपवायचे. मी त्याचाच उच्चार केला की, आज आणि उद्याचाच दिवस राहिलेला आहे. त्यामुळे उरलेले कामकाज कसे करायचे याचा निर्णय सभागृहाने घ्यावा.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदया, कामकाज सल्लागार समितीच्या निर्णयाबाबत बोलावयाचे ठरले तर हा निर्णय बहुमताने घेतलेला आहे. तो एकताने घेतलेला नाही. आमचा त्याला विरोध होता. सभागृहाचे कामकाज जास्तवेळ चालले पाहिजे. ते 22 एप्रिल पर्यंत चालवा, 29 एप्रिल पर्यंत चालवा. आमचा अजूनही सभागृहाचे कामकाज वाढविण्याबाबत आग्रह आहे. शेवटी हा निर्णय बहुमताने झालेला आहे. सभागृहात आता ही चर्चा करावयाची नव्हती. परंतु, तुम्ही विनाकारण हे खापर आमच्या डोक्यावर फोडू नका. आमची तयारी आहे अजून बसण्याची. आम्हाला कोठे सुट्टीवर जायचे नाही, कोठेही जायचे नाही. आमची विनंती एवढीच आहे की, अगोदरच आपले सर्वांचे आरोग्य बिघडलेले आहे, आपण वातावरण आणखी दूषित करण्यापेक्षा अपेक्षा एवढीच आहे की, आता आपण ही चर्चा फार वाढवू नका. आपण निर्णय बहुमताने केलेला आहे.

श्री. गिरीश बापट : विधानसभेचे कामकाज सुरु असताना मान्यता घेऊन आपले व सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे मार्गदर्शन मी मागत होतो की, आज आणि उद्या आपण कसे कामकाज करायचे ? आपण त्यावर भाष्य केले आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे भाष्य ऐकून आपण सभागृहाचा निर्णय घेऊ, एवढेच मी आपल्याला म्हटले आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपण काही मार्गदर्शन करणार असल्यास करावे, म्हणजे मग आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या वेळा ठरविता येतील.

**तालिका सभाध्यक्षा (प्रा. देवयानी फरांदे)** : मंत्री महोदय ही चर्चा आपण येथेच थांबवूया आणि आपण अर्धा तास चर्चेच्या संदर्भातील निर्णय करुया.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदया, खरा प्रश्न सभागृहात हा आहे की, बसून बोलणे योग्य नाही. दुसऱ्या कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी बसून बोलले तर आपण समजू शकतो. मी मागच्या आठवड्यामध्येही हा मुद्दा मांडला होता की, माननीय संसदीय कार्य मंत्रीच बसून मार्गदर्शन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील ...

या सभागृहाची सर्वात मोठी समस्या होऊ लागली आहे. अजून झालेली नाही पण होण्याची शक्यता करतात ही आहे. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी जो मुद्दा मांडला त्याबाबत मला हे सांगावयाचे आहे की, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी 29 एप्रिल पर्यंत सभागृहाचे कामकाज करुया अनेक बिले राहिलेली आहेत असा प्रस्ताव कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत मांडला होता. मी त्याबाबत सभागृहात बोलणे बरोबर नाही. परंतु, आता विषय निघालेला आहे तर न्याय झाला पाहिजे. त्यांच्याकडून 29 एप्रिल ही तारीख सुचविण्यात आली. सत्तारुढ पक्षाने आपण सर्वच बिले संपवू, फार वेळ घालविण्याची आवश्यकता नाही आणि लवकर संपेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कॉम्प्रमाईज म्हणून मी 22 तारीख सुचविली तरी, शेवटी मेजॉरिटीने निर्णय होत असतात. त्यामुळे शेवटी निर्णय झाला. निर्णय मेजॉरिटीने होताना आम्ही नाही म्हटले तरी, एकमताने असे अलीकडे वरुन जाहीर होतेच. त्यामुळे माझी सूचना अशी होती की, आपण सभागृहाचे कामकाज थोडेसे वाढवू. वेळ कमी आहे. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांचा मघाशी जो उद्देश होता की, आज 11 अर्धा तास चर्चा कामकाजपत्रिकेवर दर्शविलेल्या आहेत. त्यांनी मनात आणले तर पुढच्या आठवड्यामध्ये आपल्याला सोमवार ते शुक्रवार बसून कामकाज करता येईल व सर्व सन्माननीय सदस्यांच्या अर्धा तास चर्चा, लक्षवेधी सूचना, प्रश्न या सर्वांना न्याय मिळेल. परंतु, आजच्या कामकाजापुरते बोलायचे असेल तर, ही चर्चा आणखी थोडा वेळ सुरु ठेवावी. साडेसात वाजता अर्धा तास चर्चा घ्याव्यात. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी इतके विषय मांडलेले आहेत की, मंत्री महोदयांना आज रात्रभर अभ्यास करणे आवश्यक आहे. तो अभ्यास केल्याशिवाय त्यांना उत्तर देणे ...

काही सन्माननीय सदस्य : विधानपरिषद सभागृहात मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे.

श्री. जयंत पाटील : उत्तर झालेले असल्यास तेच पटलावर ठेवावे. आम्ही आमचे भाषण करुन घेतो. त्यांचे उत्तर पटलावर स्वीकारण्यास आम्ही तयार आहोत.

श्री. गिरीश बापट : आपण ही चर्चा अजून अर्धा-पाऊण तास सुरु ठेवू. त्यानंतर अर्धा तास चर्चा घेऊ.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदया, अंतिम आठवडा हा महत्त्वाचा प्रस्ताव आहे. त्यावर चर्चा होऊ द्यावी. यातील एक विषय मांडलेला आहे. मला दुसरा विषय मांडावयाचा आहे. तो आपल्या संबंधीचा असल्याने आपण तो ऐकण्यास थांबावे. चर्चा झाल्यानंतर मग आपण समर्पक उत्तर द्याल, याची मला खात्री आहे.

श्री. गिरीश बापट : विषय काय आहे या मुद्यात मी गेलेलो नाही. आपल्याला काय मांडावयाचे ते आम्हाला माहीत आहे. मी फक्त वेळेच्या गणिताकरिता उभा राहिलो, विषयाकरिता नाही.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : मंत्री महोदय आपण विरोधी पक्षाच्या मान्यतेने तारीख ठरली असे जे म्हटले आहे ते वाक्य काढून टाकावे. निर्णय बहुमतानेच होतो. कोण काय बोलले हे यावर आपण चर्चा करीत नाही.

**तालिका सभाध्यक्षा :** या चर्चेमध्ये आपली 15 ते 20 मिनिटे गेलेली आहेत. माझी सभागृहाला विनंती आहे की, आपण आधी ही चर्चा सुरु करुया व नंतर अर्धा तास चर्चेच्या बाबतीत ठरवूया. आता सन्माननीय सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे : अध्यक्ष महोदया, ग्रामीण रुग्णालय आणि उप जिल्हा रुग्णालयांचे बळकटीकरण करणे हे जिल्हा रुग्णालयावरील लोड कमी करण्याकरिता अतिशय आवश्यक आहे. परंतु, त्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, या ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टर असले पाहिजेत. एका तालुक्याच्या मध्यभागी साधारणपणे ग्रामीण रुग्णालय किंवा उप जिल्हा रुग्णालय असते. तेथे किमान एक फिजीशिअन, एक सर्जन, एक स्त्री रोग तज्ज्ञ व एक सुमणी तज्ज्ञ असला पाहिजे. कारण सर्वात महत्त्वाचा जो प्रश्न निर्माण होतो की, एखादी महिला प्रसुतीकरिता आल्यानंतर तिची प्रसुती अडलेली असल्यास तिचे सिझेरियन करावयाचे असेल तर धारणी सारख्या ठिकाणाहून साधारणतः 150 कि.मी. अंतरावर अमरावतीला तिला पाठवावे लागते किंवा वरुड सारख्या ठिकाणाहून 100 कि.मी. अंतरावर पाठवावे लागते. डॉक्टर मंडळी व ब्लड बँकेची सुविधा तेथे असली तर, निश्चितपणे चांगले उपचार तालुका लेव्हलवर देता येऊ शकतात. याकरिता माझी विनंती आहे की, या ग्रामीण रुग्णालय व उप जिल्हा रुग्णालयांचे बळकटीकरण करणे हे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

अध्यक्ष महोदया, अमरावती विभाग हा आरोग्याच्या बाबतीत निश्चितपणे मागासलेला आहे. कारण अनुशेष तर आहेच परंतु, अनुशेषाशिवाय गुणात्मकरित्या तो मागासलेला आहे. कारण अमरावती विभागामध्ये अजूनही कॅन्सरसाठी चांगले रुग्णालय नाही. त्यामुळे अमरावती मधील कॅन्सर पेशंटला नागपूरला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हॉस्पिटलमध्ये नंबर लावावा लागतो किंवा मेडिकल कॉलेजला नंबर लावावा लागतो किंवा मुंबईला टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये यावे लागते. टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये इतकी प्रलंबित लिस्ट असते की, कधी कधी तो मृत्यूला कवटाळतो किंवा एखाद्या वैद्यूजवळ जातो. अमरावती विभागातील 5 जिल्ह्यांमध्ये अजूनही दुर्दैवाने कॅन्सरचे रुग्णालय नाही.

अध्यक्ष महोदया, अमरावतीला सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु झाले. आज तेथे प्लास्टिक सर्जरी व युरॉलॉजी डिपार्टमेंट आहे. युरॉलॉजी डिपार्टमेंट सुरु झाल्यानंतर तेथे खूप चांगले डॉक्टर्स मिळाले. त्या युरॉलॉजी डिपार्टमेंटमध्ये प्रोस्टेटचे ऑपरेशन, किडनीचे ऑपरेशन या सर्व गोष्टी होऊ लागल्या. त्यामुळे नागपूरला पेशंट पाठवायला लागायचे ते बंद झाले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे ......

याकरिता माझी आरोग्य मंत्री महोदयांना विनंती आहे की, अमरावतीच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कॅन्सरचा विभाग आपण सुरु करणार काय, तेथे रेडिओ थेरेपी डिपार्टमेंट सुरु करणार काय, तेथे केमोथेरेपीच्या फॅसिलिटीज देणार काय ?

अध्यक्ष महोदया, एखाद्या गरीब पेशंटला हार्टअटॅक आल्यानंतर त्याची अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी करावयाची असेल किंवा स्टेंट टाकावयाचा असेल किंवा कार्डियाक सर्जरी करावयाची असेल तर, मुंबई किंवा नागपूर शिवाय आम्हाला पर्याय नाही. एवढे मोठे डिव्हीजन असतानाही अमरावतीच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये एक कार्डियालॉजी डिपार्टमेंट असू नये ? कार्डियालॉजी व न्युरॉलॉजी डिपार्टमेंट ही महत्त्वाची गरज आहे. कारण एखादा अपघात झाल्यानंतर त्या पेशंटला वाचवायचे असले तरी, त्याला नागपूरला ॲम्ब्युलन्स मधून पाठवावे लागते. त्यामुळे कॉर्डियालॉजी व न्युरॉलॉजी डिपार्टमेंट अमरावतीच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये होणे अतिशय आवश्यक आहे. कारण ही जी टर्शरी केअर आहे म्हणजे आपण रेफरल सेंटर जे म्हणतो, तसे एक रेफरल सेंटर डिव्हिजनला डेव्हलप झाले तर, ग्रामीण भागातील रुग्णांना अतिशय चांगल्या तऱ्हेने दिलासा मिळणार आहे.

अध्यक्ष महोदया, पोस्ट ग्रॅज्युएट्स मिळत नाहीत. पोस्ट ग्रॅज्युएट्स मिळविण्यासाठी जी प्रक्रिया करायची आहे ती हेल्थ डिपार्टमेंट अतिशय चांगल्या तऱ्हेने करु शकते. फिजिशिअनचे कोर्सेस, ॲनॅस्थेशिआचे कोर्सेस, गायनॉकॉलॉजीचे कोर्सेस, पेड्रिआट्रिस्टचे कोर्सेस असतील त्याचे कॉलेज ऑफ फिजिशिअन अँड सर्जनच्या माध्यमातून रजिस्ट्रेशन करुन जे जे पोस्ट ग्रॅज्युएट टिचर्स किंवा पोस्ट ग्रॅज्युएट लोक गव्हर्नमेंट हॉस्पिटलमध्ये काम करीत आहेत, त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे सीपीएसचे कोर्सेस सुरु करता येऊ शकतात. सीपीएसचा ॲनेस्थेसिस्ट झालेल्या मुलाला जरी आपण रेकग्नाईज्ड केले व उप जिल्हा रुग्णालयावर किंवा ग्रामीण रुग्णालयावर पाठविले तर, तो आनंदाने तेथे जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे.....

आज अशी परिस्थिती आहे की, साधे ऑपरेशन करायचे असले तरी सुमणी शास्त्रज्ज्ञाशिवाय ऑपरेशन करता येत नाही. अगोदरच्या काळामध्ये चालत होते. डॉक्टर साहेबांनाही माहीत आहे की, डायजेफामचे इंजेक्शन दिले, फोर्टवीनचे इंजेक्शन दिले तर अगदी एमटीपी सारख्या बाबी करता यायच्या. परंतु आज जीवनाचे मुल्य अतिशय वाढलेले आहे. त्यामुळे सुमणी शास्त्रज्ज्ञ असणे अतिशय आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक पॅथॉलॉजिंचा सुळसुळाट झालेला आहे, असे या प्रस्तावामध्ये मांडलेले आहे. डीएमएलटी झालेला मुलगा दोन वर्षे शिकतो किंवा एक वर्ष शिकतो. टेक्नीशिअन असतो. त्यानंतर तो पॅथॉलॉजी लॅबॉरेटरी टाकतो. वैद्यक शास्त्रामध्ये वाईट गोष्टी घडत आहेत. त्यामध्ये कट प्रॅक्टीसची गोष्ट अतिशय मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे डीएमएलटी असलेल्या पॅथॉलॉजिस्ट एखाद्या डॉक्टरला कट देत असेल तर ते पेशंट त्या डॉक्टर नसलेल्या डीएमएलटीकडे जातात. त्यामुळे माझी विनंती आहे की, पॅथॉलॉजी सुद्धा किंवा ब्लड बँक सर्व्हिसेसमध्ये सुद्धा सीपीएसचे कोर्सेस चांगल्या तऱ्हेने करता येऊ शकतात. कारण जो एमबीबीएस आणि सीपीएसचा पॅथॉलॉजीस्ट आहे, त्याच्याकडे ह्या सुविधा निर्माण केल्या जाऊ शकतात.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना खरोखर आरोग्य सेवेचा लाभ मिळवून द्यायचा असेल तर आपली सरकारी यंत्रणा सक्षम करणे आवश्यक आहे. परंतु अनेक वेळा सरकारी यंत्रणेसोबतच खाजगी यंत्रणेमध्ये या रुग्णांना कसे सामावून घेता येईल, हे पहाणे अतिशय आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजना ही अतिशय महत्त्वाची आहे. यामध्ये 972 प्रोसिजर दिल्या होत्या. त्यामध्ये अपघाताच्या केसेस असतील. परंतु त्यामध्ये अधिक सुधारणा करणे गरजेचे आहे. त्यामध्ये अधिक आजार समाविष्ट केलेले नाही. अनेक आजारांचे पॅकेज अतिशय कमी असल्यामुळे खाजगी रुग्णालये अशा केसेस रिजेक्ट करतात. यामध्ये पुन्हा एकवेळा अभ्यास करावा. या योजनेचे बळकटीकरण करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, पूर्वी आरएसबीवायची योजना होती. या योजनेमध्ये 30 हजारापर्यंतचे उपचार होत होते. साधा ताप किंवा डायरिया असला तरी त्या पेशंटला उपचार करणे शक्य होत



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे.....

होते. ही केंद्र सरकारची योजना होती. आरएसबीवाय योजना आणि राजीव गांधी जीवनदायी योजना एकत्र केल्यास अनेक आजारांवर व अनेक पेशंटवर उपचार करता येईल.

अध्यक्ष महोदय, विविध विभागाच्या मार्फत अनेक योजना राबविल्या जातात. त्यामध्ये बांधकाम कामगारांसाठी आरोग्य विमा योजना व घरेलू कामगारांसाठी आरोग्य विमा योजना आहे. परंतु या सर्वांचे एक कॉम्प्रेन्सीव्ह पॅकेज आरोग्य खात्यामार्फत करण्यात आले तर खाजगी रुग्णालयांच्या सेवा चांगल्या तऱ्हेने उपलब्ध करता येतील. कॅन्सर सारखे आजार किंवा मधुमेह या आजाराचे पेशंट वाढत आहे. मागील काही वर्षामध्ये मधुमेहाचे प्रमाण 5 टक्के होते, परंतु आता हे प्रमाण 10 टक्क्यापर्यंत गेलेले आहे. जगात भारतामध्ये सर्वात जास्त मधुमेहाचे रुग्ण आहेत. या आजारामुळे रुग्णाचा प्रत्येक अवयव निकामी होऊ शकतो. केंद्र सरकारने एक चांगली योजना म्हणजेच नॉन कम्युनिकेबल डिसिजेससाठी योजना आणलेली आहे. परंतु सद्याच्या काळामध्ये ही योजना थंड बस्त्यात पडलेली आहे. माझी आरोग्य मंत्री महोदयांना विनंती आहे. नॉन कम्युनिकेबल डिसिजेससाठी जो डॉक्टरवर्ग आहे. किंवा मधुमेहाचे आणि ब्लड प्रेशरचे जे पेशंट असतात त्यांना दोन दिवसांचे औषध देऊन चालत नाही. असे पेशंट एकवेळा डॉक्टरकडे आल्यावर त्याला किमान 15 दिवसांचे किंवा 1 महिन्याचे औषध द्यावे लागते. आपण तशी डिस्ट्रीब्युशन सिस्टीम करु शकलो तर चांगले होणार आहे. ग्रामीण भागातील मधुमेहाच्या पेशंट जास्त धोक्याला प्रवृत्त होतात. कारण मधुमेहामुळे किडनीचा आजार होतो. किडनी फेल्युअर झाल्यावर पेशंटला ट्रान्सप्लँटसाठी किंवा डायलेसीससाठी पूर्ण आयुष्य गमवावे लागते. मधुमेह हे अंधत्वाचे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे हे अंधत्व टाळायचे असेल तर मधुमेह नियंत्रणामध्ये असला पाहीजे. म्हणून नॉन कमिनीकेबल डिसिजेसचा पॅटर्न अतिशय मजबुतीने ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हारुग्णालयामध्ये राबविणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, आरोग्य खात्यामध्ये काही महामंडळे निर्माण झालेली आहे. मी मंत्री महोदयांना विनंती करतो. हा औषध घोटाळा म्हटला जातो, हा निश्चितपणे महामंडळाच्या मार्फत निर्माण झालेला आहे. याचे कारण म्हणजे नॅशनल रुरल हेल्थ मीशन किंवा अधिकारी मनमानीपणाने कारभार करतात. अधिकारी वर्गावर अंकूश येणे आवश्यक आहे. जेथे मागणी आहे,

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे.....

तेथेच पुरवठा केला गेला पाहीजे. आजकाल तर मोबाईल ॲपवर देखील मागणी नोंदविता येऊ शकते. ज्या रुग्णालयाची एखाद्या आजारासंबंधी मागणी असेल तर त्या औषधाचा पुरवठा मग ती जेनेरिक औषधे असो किंवा जेनेरिक किमतीमध्ये असलेल्या औषधे असो हा पुरवठा सहा ते आठ तासात जिल्हा स्तरावरुन केला जाऊ शकतो. औषधांच्या पुरवठ्यामध्ये अनियमितता होण्याचा हा पहिला प्रकार नाही. अनेक वेळा सर्वात जास्त अनियिमितता होत असेल तर ती औषधाच्या बाबतीत असून अनेक काळापासून झालेली आहे. यापूर्वी देखील अनेक अधिकारी ससपेंड झाले आहेत. अनेक जण जेलमध्ये सडत आहेत. अनेक डॉक्टर्स ससपेंड झाले आहेत, बडतर्फ झालेले आहेत. परंतु मोठे रॅकेट असल्यामुळे त्यावर नियंत्रण मिळविता येत नाही. मोठे रॅकेट असते तेव्हा अधिकारीवर्ग प्रलोभनाला बळी पडतात. मला माहीत आहे व माझी खात्री आहे की, मंत्री महोदयांनी स्वतःला वैद्यकीय सेवेमध्ये वाहून घेतलेले आहे. त्यामुळे आपण हे रॅकेट मोडून काढण्यासाठी अतिशय ताकदीने प्रयत्न करावेत.

अध्यक्ष महोदय, मी एक विषय मांडू इच्छितो. अमरावती, यवतमाळ किंवा वर्धा जिल्हा किंवा मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची परिस्थिती आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. अशा परिस्थितीमध्ये आपण सर्व उपाययोजना करीत आहोत. सभागृहामध्ये माननीय जलसंपदा मंत्री उपस्थित आहेत. जलसंपदा मंत्री धरणे बांधतील. माननीय जलसंधारण मंत्री जलयुक्त शिवार योजनेची कामे करतील. माननीय कृषी व मदत, पुनर्वसन मंत्री मदत करतील. परंतु त्यापेक्षासुद्धा यवतमाळ जिल्ह्यामध्ये आरोग्य खात्याच्या सहायाने अतिशय महत्त्वाचे अभियान राबविले गेले. या सदनाला या अभियानाची माहिति आहे. आपण त्याला अतिशय सुंदर अभियान म्हणू शकतो. ते अभियान म्हणजे "बळीराजा चेतना अभियान" हे आहे...(अडथळा)...त्यामध्ये पालक मंत्री महोदयांचे योगदान अतिशय चांगले आहे. दिनांक 24 जुलै 2015 रोजी शेतकऱ्याaच्या आत्महत्त्या रोखण्यासाठी विशेष मदतीचा कार्यक्रम राबविण्यात आला. हा एका विभागाचा कार्यक्रम नव्हता. या अभियानाच्या माध्यमातून सर्व विभागाचा कार्यक्रम राबविण्यात आला. ज्या ज्या भागामध्ये दुष्काळ आहे किंवा ज्या ज्या भागामध्ये शेतकरी संकटात आहे, शेतमजून संकटात आहे, जेथे डिसट्रेस फार्मर आहे. त्या ठिकाणी हा कार्यक्रम राबविणे अतिशय आवश्यक आहे. कारण त्या

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. अनिल बोंडे.....

शेतकऱ्याला मानसिक आधार देणे अतिशय आवश्यक आहे. त्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाचा अतिशय महत्त्वाचा रोल होता. या दोन्ही जिल्ह्यामध्ये एका मनोविकास तज्ज्ञाची कंत्राटी पद्धतीवर नेमणूक केली. ग्रामीण रुग्णालयामध्ये सुद्धा मानसोपचार तज्ज्ञाची कंत्राटी पद्धतीवर नेमणूक करण्यात आली आणि त्यांनी पूर्ण गावातील लोक स्क्रीन आऊट केले. ज्या प्रमाणे आपण कॅन्सरसाठी स्क्रीन आऊट करतो, त्याच प्रमाणे आत्महत्येसाठी सुद्धा स्क्रीन आऊट करणे अतिशय आवश्यक आहे. तो माणूस डिप्रेशनमध्ये असल्यावर त्याच्यामध्ये डिप्रेशनचे साईन सिमटम्स दिसायला लागतात. परंतु आपल्याला ते ओळखायला येत नाही. परंतु त्या मानसोपचार तज्ज्ञांनी कुटुंब प्रमुख आणि कुटुंबातील इतर लोकांचे स्क्रिनींग करुन समुपदेशन करण्याचे काम केले.

...3A/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.अनिल बोंडे....

गाव पातळीवरील समित्यांच्या माध्यमातून या लोकांना शोधण्यात आले आणि या बळीराजा चेतना अभियानाला सुंदर यश प्राप्त झाले. आत्महत्येच्या संदर्भात 26 जुलै, 2015 रोजी शासन निर्णय निर्गमित झाला व पुढील तीन महिन्यामध्ये आत्महत्येचे प्रमाण कमी झाले. जानेवारी, 2015 मध्ये यवतमाळ जिल्ह्यात एकूण 30 आत्महत्या झाल्या होत्या व जानेवारी, 2016 मध्ये 20 आत्महत्या झाल्या आहेत. फेब्रुवारी, 2015 मध्ये 38 आत्महत्या होत्या तर फेब्रुवारी, 2016 मध्ये 14 आत्महत्या झाल्या. याचा अर्थ 50 टक्के आत्महत्यांचे प्रमाण कमी झाले. मार्च, 2015 मध्ये 28 आत्महत्या होत्या तर मार्च 2016 मध्ये 14 आत्महत्या झाल्या. समुपदेशन झाले व प्रत्येक ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालयामध्ये मानसोपचार तज्ज्ञ, सोशल वर्कर व इतर विभागांची संपूर्ण टीम असेल तर आत्महत्येचे प्रमाण कमी होऊ शकते. सदरहू योजनेमध्ये इतर विभागांचाही समावेश करण्यात आला आहे. पॉझिटिव्ह विचार निर्माण करणारे लोक आरोग्य विभागाच्या माध्यमातून नेमून बळीराजा चेतना सारखे अभियान संपूर्ण महाराष्ट्रात राबविले गेले पाहिजे. सदर अभियान सकारात्मकदृष्ट्या राबविण्यात आले आहे. हेल्थची डेफिनेशन आहे की, फिजिकल, मेंटल ॲन्ड स्पिरिच्युअल हेल्थ वेल बिईंग यास आपण हेल्थ म्हणतो. या तीन गोष्टी सांभाळल्या गेल्या तर मला वाटते महाराष्ट्र आरोग्यदायी होईल. माननीय आरोग्य मंत्री महोदयांनी त्यांचे काम सातत्याने व धडाडीने सुरु ठेवावे, अशी मी त्यांना शुभ कामना देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : अध्यक्ष महोदया, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदया, मागील वर्ष ते दीड वर्ष कालावधीमध्ये राज्यातील व देशातील लोकांना महागाईने त्रस्त करुन सोडले आहे. अशा परिस्थितीत ज्यांच्यावर जीवनावश्यक वस्तू वेळेवर पोहोचविण्याची जबाबदारी आहे ते शांतपणे बसले आहेत, हा विरोधाभास मला आपल्या नजरेस आणून द्यावयाचा आहे.

अध्यक्ष महोदया, देशातील आमचे सरकार गेले त्याला अनेक कारणे असतील परंतु त्यातील त्यावेळची देशातील महागाई हे एक महत्वाचे कारण होते. यावर्षी व मागच्या वर्षी सामान्य माणसाला वाटले की मनासारखे सरकार आले आहे, आता महागाई कमी होईल. परंतु महागाई कमी झालीच नाही ती सतत वाढत असल्याचा अनुभव देशातील जनतेला येत आहे.

अध्यक्ष महोदया, महागाईच्या संदर्भातील काही उदाहरणे मी आपणस देणार आहे. माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये तुरडाळ 73 रुपये किलो होती, ती माहे फेब्रुवारी, 2016 मध्ये 160 ते 200 रुपये किलो झाली असून तिच्या दरात 200 टक्के वाढ झाली, उडीद दाळ 71 रुपये किलो होती ती 120 रुपये झाल्याने तिच्या दरामध्ये 80 टक्के वाढ झाली, चनाडाळ 50 रुपयावरुन 90 रुपये किलो झाली त्याच्या दरामध्ये 90 टक्के वाढ झाली, मसूर डाळीच्या दरामध्ये 45 टक्के वाढ झाली, मुगडाळ 70 रुपये किलो वरुन 110 रुपये किलो झाली व त्यामध्ये 58 टक्के वाढ झाली, कांदा 20 रुपये किलो होता तो आता 60 रुपये किलो असून त्याच्या दरामध्ये 250 टक्के वाढ झाली. हे सर्व दर फेब्रुवारी, 2016 मधील आहेत. महागाईवर इतके उत्तम नियंत्रण असल्याने सरकारने फार आशेवर राहू नये. कांदा वाढला पाहिजे त्यास चांगला दर मिळाला पाहिजे. त्याकरिता आम्ही चांगल्या दराने कांदा द्या, असे सांगत असताना सरकारने कांद्याची निर्यात बंद केली. कांद्याचा व कांद्याच्या शेतकऱ्याचा गळा घोटण्याचे काम या सरकारने केले. कांद्याला चांगला दर मिळत होता त्यावेळी सरकार काही करु शकले नाही. सर्वच अन्नधान्याच्या दरामध्ये 200 ते 250 वाढ झालेली आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदया, राज्यात व देशामध्ये महागाई एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे की, सरकारच्या मित्र पक्षातील सदनामध्ये आता कोणीच...... आहेत. तुम्ही आमचेच आहात, तुम्ही असले काय नी नसले काय एकच आहे. तुम्ही खरे शिवसैनिक, हे खरे शिवसैनिक आहेत काय ? हे आमच्याकडून तिकडे गेलेले आहेत. आपणही ..... मी कोणाचे नाव घेतले नाही फक्त हात केला. माझे त्यांच्याकडे लक्षच नव्हते, ते कसे उभे राहिले मला समजले नाही, त्यांचे कोणी नाव घेतले नाही. खरं बोलल्यावर माणसाला जास्त राग येतो.

अध्यक्ष महोदया, कै.बाळासाहेब देसाई हे काँग्रेसचे फार मोठे नेते होते. आम्ही सर्व काँग्रेस पक्षाचे जुने कार्यकर्ते आहोत. त्यामुळे आपल्याला आपले मूळ विसरता येणार नाही, शंभूराजे. तिकडचे वारे होते म्हणून तुम्ही इकडून उभे राहिलात. इकडचे वारे आल्यानंतर तुम्ही इकडून उभे राहणार, याची आम्हा सर्वांना खात्री आहे.

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदया, आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे भाषण करताना माझे नाव घेऊन बोलले आहेत. त्यामुळे मला त्यासंदर्भात सदनामध्ये बोलले पाहिजे.

अध्यक्ष महोदया, सन्माननीय सदस्यांनी आमचे आजोबा स्व.बाळासाहेब देसाई यांचा उल्लेख भाषणामध्ये केला. त्यांचे वडील स्व.राजाराम बापू पाटील यांचे व देसाई घराण्याचे मित्र म्हणून पिढ्या न पिढ्याचे संबंध आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील व आमची मैत्री कायम आहे. त्यांनी त्यांच्या भाषणात उल्लेख केला की, "जिकडचे वारे होते त्या बाजूने तुम्ही उभे राहिलात." मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, सन 1997 साली आपल्या एका महान राष्ट्रीय नेत्याने जो त्रास दिला होता, त्यांचे नाव मी घेण्यास आपण भाग पाडू नये. त्यामुळे नाईलाजास्तव मला हा निर्णय घ्यावा लागला व अशा प्रकारची अनेक मंडळी आहेत. जे सन्माननीय विरोधी पक्ष नेते आपल्या बाजूने बसतात ते देखील आमच्या पक्षात होते व त्यांना माननीय शिवसेना प्रमुखांनीच पहिल्यांदा मंत्री पद दिले होते. त्यामुळे आपण त्यासंदर्भातील उल्लेख करु नये, आपली व माझी मैत्री कायम आहे, ती कालही होती, आजही आहे व उद्याही राहील. परंतु कदाचित उद्या तुमच्याकडून मी उभा राहणार आहे किंवा कदाचित उद्या तुम्ही देखील आमच्याकडे याल याची देखील शक्यता नाकारता येत नाही.

....4



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदया, सभागृहाने याची नोंद घ्यावी की, सन्माननीय सदस्य असे कधीच म्हणाले नाहीत की, मी राष्ट्रवादी किंवा काँग्रेसमधून कधीही उभा राहणार नाही किंवा त्याबाबतची घोषणा त्यांनी केली नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य कधीही जाणार नाहीत, याची आम्ही काळजी घेऊ.

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** गिरणी कामगारांना सदनिका उपलब्ध करुन देणे

**मु.शी.:**गिरणी कामगारांना सदनिका उपलब्ध करुन देणे संबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

अध्यक्ष महोदय, मुंबईतील बंद गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगारांसाठी सदनिका उपलब्ध करुन देण्यासंदर्भात माननीय गृहनिमा्रण मंत्री तसेच गिरणी कामगार कृती संघटनेचे पदाधिकारी श्री.दत्ता इस्वलकर, श्रीमती जयश्री खाडीलकर, सर्वश्री प्रवीण घाग, गोविंद मोहिते, जयप्रकाश भिलारे, हेमंत गोसावी, निवृत्ती देसाई, नंदू पारकर यांचे समवेत बैठक झाली. या विषयासंदर्भात माजी मंत्री माननीय श्री.दत्ताजी राणे यांनी देखील वेळोवेळी निवेदने देऊन पाठपुरावा केला होता.

अध्यक्ष महोदय, त्यानुषंगाने सदर बैठकीत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले. मुंबईतील बंद गिरण्यांच्या जागेवर विकास नियंत्रण नियावली 58 (1 बी) अंतर्गत सदनिका बांधण्यात येत आहेत. टप्पा 2 अंतर्गत खालील 6 गिरण्यांच्या जागेवर सदनिकांचे काम सुरु असून सदर सदनिकांचा ताबा लवकरच गिरणी कामगारांना देण्यात येईल. सदर सदनिका 225 चौरस फूट चटई क्षेत्रफळाच्या आहेत. या सदनिकांसाठी लवकरच सोडत काढण्यात येईल. गिरणी कामगारांच्या संघटनांशी चर्चा करुन या सदनिकांची विक्री किंमत रुपये 9.50 लक्ष (साडेनऊ लक्ष) इतकी निश्चित करण्यात आली आहे. गिरणीचा व सदनिकांचा तपशील पुढील प्रमाणे आहे. सेंच्युरी मिल येथे 1,430 सदनिका, प्रकाश कॉटन मिल येथे 562 सदनिका, भारत मिल येथे 188 सदनिका, रुबी मिल येथे 47 सदनिका, ज्युबिली मिल येथे 157 सदनिका, वेस्टर्न इंडिया मिल येथे 250 सदनिका अशा एकूण 2,634 सदनिका देण्याचा निर्णय झाला आहे. तसेच, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत उपलब्ध असलेल्या मुंबई बाहेरील 2,418 सदनिकादेखील गिरणी कामगारांना वितरीत करण्याचा सदर बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. सदरहू सदनिकांची किंमत सहा लक्ष रुपये निश्चित करण्यात आली आहे. दोन सदनिका एकत्रित करुन 320 चौ.फुटांची सदनिका या ठिकाणी देण्यात येईल.

...5





UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, एकंदरीत बंद गिरण्यांच्या जागांवरील 2,634 सदनिका तसेच, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत उपलब्ध असलेल्या 2,418 अशा एकूण 5,052 सदनिका गिरणी कामगारांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

-----------

यानंतर 3B......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदया, माननीय मुख्यमंत्र्यांनी जवळपास दीड वर्षानंतर हा या ठिकाणी निर्णय घेतला आहे. त्यांचे मी अभिनंदन करतो. बराच उशिर झाला आहे. त्यामुळे खूप एजिटेशन गिरणी कामगारांनी केले होते. अजूनही काही निर्णय घ्यावयाचे आहेत, त्यामध्ये गिरण्यांच्या जमिनी दिलेल्या नाहीत त्यांच्यावर आपण काय कार्यवाही करणार आहोत. एमएमआरडीएमधील जे रेंटल हाऊसिंगची घरे आहेत त्यापैकी जो स्टॉक उपलब्ध होईल तो जास्तीत जास्त स्टॉक उपलब्ध करुन दिला पाहिजे. कारण एकूण दीड लाख अर्ज आलेले असून आता आपण फक्त 10 ते 15 हजार घरांचा प्रश्न सोडवित आहोत. त्यामुळे जास्तीत जास्त घरे देऊन प्रश्न सोडविता येईल काय, हा एक पहिला प्रश्न आहे आणि दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या गिरणी कामगारांना मुंबई शहर किंवा उपनगरामध्ये रहायचे नसेल आणि जर आपापल्या गावामध्ये रहायचे असेल तर त्यांना देखील मोफत जमीन उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव आणला होता, त्यामध्ये काही प्रगती झालेली आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदया, सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी जो प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. आपण सांगितले त्याप्रमाणे ज्यांनी जागा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल. प्रचलित नियमानुसार आपल्याला जर जागा रिझुम करता येत असेल तर तोही प्रयत्न आपण या निमित्ताने करु. एमएमआरडीएकडे ज्या अधिकच्या सदनिका आहेत. म्हणजे आता आपल्याकडे ज्या तयार आहेत त्यांचे वितरण आता आपण करीत आहोत. अधिकच्या आणखी 11 हजार सदनिका आपल्याला मिळणार आहेत. त्यांचा ताबा प्राप्त झाल्यानंतर त्याही आपण गिरणी कामगारांनाच उपलब्ध करुन देणार आहोत. आपली अपेक्षा आहे की, काही लोकांना त्यांच्या मूळ गावी राहण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातून मागणी यावी, पण मूळामध्ये ती मागणी येत नाही. शासनाची तयारी आहे आणि अशा प्रकारे प्रस्ताव आले तर त्या ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधान्याने निदेश देण्यात येतील.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदया, मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. कारण बरीच वर्षे प्रलंबित राहिलेला हा गिरणी कामगारांचा प्रश्न आपण मार्गी लावला आहे. आपण दर

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे......

निश्चित करुन माफक दरामध्ये घरे उपलब्ध करुन दिल्याबद्दल आपले या ठिकाणी खरोखर आपले अभिनंदन केले पाहिजे म्हणून मी आपले अभिनंदन करतो. फक्त जिल्ह्याच्या स्तरावर जर मागणी आली तर शासकीय जागा कोठे कोठे आहे ते जर कळले तर आम्ही त्यानुसार सूचना करु.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदया, आम्ही जागा उपलब्ध करुन देऊ.

श्री. सुनिल शिंदे : अध्यक्ष महोदया, या ठिकाणी मी गिरणी कामगाराचा मुलगा म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. गिरणी कामगारांना या घरांची प्रतिक्षा आहे म्हणून या प्रक्रियेला आणखी वेग आला पाहिजे. खरे म्हणजे गिरणी कामगारांची मागणी अशी आहे की, आम्हाला ज्या किंमतीत ही घरे मिळतात, ती किंमत आम्हाला परवडणारी नाहीत. आदरणीय मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, याही पेक्षा स्वस्तात घर देण्यासाठी आपण प्रयत्न करावेत. आज गिरणी कामगारांसाठी आपण सकारात्मक दृष्टीकोनातून जात आहात त्याच दृष्टीकोनातून माननीय मुख्यमंत्री आणि माननीय गृहनिर्माण मंत्री महोदयांनी पोलिस बांधवांना सुध्दा सहकारी तत्वावर घरे बांधण्यासाठी जमीन स्वस्तात उपलब्ध करुन देतील याची मला खात्री आहे. त्याबद्दल पुन्हा एकदा मी माननीय मुख्यमंत्री साहेबांचे अभिनंदन करतो.

श्री. कालिदास कोळंबकर : अध्यक्ष महोदया, सन 1982 चा गिरणी कामगारांचा संप झाल्यानंतर मुंबईतील अडीच लाख गिरणी कामगार उध्वस्त झाले आहेत. त्यानंतर त्यांना जी घरे द्यावयाची होती त्यापैकी काही घरे सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब मुख्यमंत्री असताना दिली आहेत. काही घरे तयार असून सुध्दा देता येत नव्हती. ती आता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस साहेबांनी ही घरे दिल्याबद्दल मी त्यांना मनापासून आणि अंत:करणापासून धन्यवाद देतो. काही गिरण्यांच्या विकासाच्या बाबतीत डीसी रुलच्या बाबतीत आपण काही सुधारणा करणार असाल तर ज्यावेळी रिहाबचे आणि सेलचे काम होते तर ती दोन्ही कामे एकत्र झाली पाहिजेत यासाठी डीसी रुलच्या नियमामध्ये सुधारणा करावी. इनसेंटीव्हच्या बाबतीत मी आता आपल्याला पत्र दिले आहे. आपण गिरणी कामगारांना फंजिबल एफएसआय मंजूर करुन दिला आहे. मी फक्त

3......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कालिदास कोळंबकर.....

विषय घेऊन आलो होतो फक्त स्प्रींग मिलच्या कामगारांचा होता. पण आपण मुंबई शहरातील एकूण 5 हजार गिरणी कामगारांना फंजिबल एफएसआय दिल्याबद्दल सुध्दा मी आपले मनापासून आभार मानतो.

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदया, माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. सुनिल शिंदे यांनी जो विषय मांडला आहे. त्यासंबंधी या घरांची संपूर्ण किंमत धरुन 12.50 लाख रुपये होत होती. पूर्वीच्या काळामध्ये ती 7.50 लाख रुपयात दिली होती. त्यावेळच्या आणि आताच्या परिस्थितीत फरक आहे. तरी जोपर्यंत कृती समिती यांच्याशी बसून समान भावावर ते जोपर्यंत तयार होत नाहीत तोपर्यंत आपण ते करणार नाही. म्हणून सातत्याने गेली 15 दिवस त्यांच्याशी रोज 2 तास बसून शेवटी 12.50 लाखावरुन हा विषय आता 9.50 लाख रुपयांवर आणला आहे. त्यांनी मनापासून त्याचे स्वागत केले आणि तयारी दाखविली आहे. त्यामुळे इतर सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार आपणही या चांगल्या निर्णयाचे स्वागत करावे. आता हा जो क्रम सुरु झाला आहे, त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएमधील घरांची देखील 6 लाख रुपयांमध्ये 320 चौ.फू.चटईक्षेत्र असलेली घरे देण्याची घोषणा केली आहे. त्यामध्ये एकूण 11 हजार घरे असून त्यापैकी 2500 आता तयार आहेत. ती 2500 आणि ही 2600 घरे असे मिळून सुमारे 5000 घरे आहेत. आता तुलनात्मक विचार न करता हा संवेदनशील मुद्दा आहे त्यामुळे यासंबंधी एक प्रोसेस आता सुरु झाली आहे आणि या प्रोसेसमधून अनेक वर्षे प्रलंबित असलेला प्रश्न आपण मार्गी लावण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि ते काम आपण पूर्ण करणार आहोत.

**तालिका सभाध्यक्षा :** आता आपण अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु करण्यात येणार असून सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी आपले विचार मांडावेत.

श्री. प्रकाश महेता : सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी विचारणा केल्याप्रमाणे सांगू इच्छितो की, मुंबईतील घरांसाठी 9.50 लाख रुपये आणि एमएमआर रिजनमधील एमएमआरडीएची घरे 6 लाख रुपयांमध्ये आणि इतर म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे

4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता.....

म्हणाले त्यानुसार मुंबईमध्ये सुध्दा अशी अनेक घरे पडलेली आहेत की, जी इतर लोकांच्या उपयोगामध्ये येत नाहीत अशी घरे सुध्दा सिमांकित आणि चिन्हांकित करुन ती घरे सुध्दा गिरणी कामगारांना आणि पोलिसांना देण्यासंबंधीचे धोरण स्वीकारले असून त्याची तयारी आपल्यासमोर काही दिवसात ठेवण्यात येईल.

--------

5.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION



***पृ.शी. :*** राज्यात जून ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत शासनाने व्यापाऱ्यांना साठेबाजी करण्यास दिलेली खुली मुभा, जीवनावश्यक वस्तुंच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्यासंबंधी केंद्र

शासनाकडून आलेल्या सूचनांची दखल न घेणे, डॉक्टरांची रोडावणारी विश्वासार्हता, विविध घटक एकत्र येऊन वैद्यकीय व्यवसायाची तयार झालेली साखळी, ***तसेच राज्यात अवयवदानाचे अत्यल्प प्रमाण या सर्व बाबींवर उपाययोजना करण्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष***

***मु.शी. :***राज्यात जून ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत शासनाने व्यापाऱ्यांना साठेबाजी करण्यास दिलेली खुली मुभा, जीवनावश्यक वस्तुंच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्यासंबंधी केंद्र शासनाकडून आलेल्या सूचनांची दखल न घेणे, डॉक्टरांची रोडावणारी विश्वासार्हता, विविध घटक एकत्र येऊन वैद्यकीय व्यवसायाची तयार झालेली साखळी, ***तसेच राज्यात अवयवदानाचे अत्यल्प प्रमाण या सर्व बाबींवर उपाययोजना करण्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष या विषयावर*** सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, जितेंद्र आव्हाड, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, सुनील केदार, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, डी. पी. सावंत, बबनराव शिंदे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. अस्लम शेख, वसंतराव चव्हाण, नितेश राणे, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, भारत भालके, मो. आरिफ नसीम खान, शेख आसिफ शेख रशीद, राणाजगजितसिंह पाटील, अमित देशमुख, अमिन पटेल, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री संग्राम थोपटे, जयकुमार गोरे, काशिराम पावरा, डी.एस. अहिरे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्रीमती अमिता चव्हाण, निर्मला गावित, श्री. बसवराज पाटील, ॲड के.सी. पाडवी, सर्वश्री कुणाल पाटील, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, रणजित कांबळे, भाऊसाहेब कांबळे, सिध्दाराम म्हेत्रे, बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरू.....

**तालिका सभाध्यक्षा :** आता आपण अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु करण्यात येणार असून सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी आपले विचार मांडावेत.

6......



श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदया, महागाई फार मोठ्या प्रमाणात गगनाला भिडली आहे. अन्न व नागरी पुरवठा खात्याची जबाबदारी असणारे मंत्री श्री. गिरीश बापट साहेब येथे बसलेले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

असल्यामुळे मी त्यांच्या निदर्शनास मुद्दाम आणतो की, महाराष्ट्रातील संपूर्ण जनतेला या सर्व बाबी मर्यादित खर्चामध्ये मिळाव्यात यासाठी विशेष प्रयत्न करायला पाहिजेत. असे प्रयत्न करताना आपण कोठे दिसत नाहीत. म्हणून या सर्व वस्तूंच्या दरामध्ये फार मोठा फरक पडला आहे. महागाई गगनाला भिडली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्या विषयाला हात घातलेला आहे. तो म्हणजे आपल्या राष्ट्रीय नागरी अभियानांतर्गत 297 कोटी रुपयांची औषधे सार्वजनिक आरोग्य विभागाने खरेदी केली आहेत. त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले, त्याचा तपशील सांगण्याचा मी थोडासा प्रयत्न करणार आहे. महानगरपालिका, नगरपालिका यांच्याकडून कोणत्या औषधांची मागणी आहे, कोणत्या महानगरपालिकेला किती साठा आवश्यक आहे, असा एक एक्सरसाईज करण्याची आवश्यकता असते.

अध्यक्ष महोदया, सन्माननीय मंत्री डॉक्टर दिपक सावंत साहेब यांच्याकडून आम्हाला फार मोठ्या आशा आहेत. ते विधान परिषदेमध्ये असताना त्यांचे बरेच काम आम्ही जवळून बघितले आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी अनेकदा विधान परिषदेमध्ये अनेक भाषणे केलेली आहेत. म्हणजे विरोधात असल्यावर भाषण करताना आणि सत्तेत आल्यावर त्याच खात्याचे काम करताना माझी पहिली विनंती मंत्रिमंडळातील सर्व मान्यवरांना आहे की, आपण विरोधी पक्षात बसताना ज्या ज्या विषयावर भाषण करताना टीका केली त्या विषयाचा दुरुस्ती करण्याचा प्रयत्न आपण प्राधान्याने मंत्रिमंडळामध्ये करावा. आपण ते कराल, कारण आपले हे कर्तव्य आहे. आपण हे कराल अशा अपेक्षेने हे बोलतो आहे, मी हे दुसऱ्या कोणाला बोलत नाही. पण आपल्याकडून फार मोठी आशा आहे.

CCC-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.........

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, एक खिडकीला क्लीनचीट देण्याची व्यवस्था तुमच्या मंत्रिमंडळात आहे. पण ती फक्त भारतीय जनता पक्षाच्या मंत्र्यांना आहे. तुम्हाला ते क्लीनचीट देणार नाहीत. तुम्हाला आवश्यकता नाही हे मला माहिती आहे. पण तुमच्या पक्षाकडे असलेल्या खात्याने, काल माननीय मुख्यमंत्र्यांनी याठिकाणी बसून मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत म्हणजे नाले सफाई करताना काय काय होते यासंबंधी गोष्टी सांगितल्या. आपणाला ऐकून घेतल्याशिवाय दुसरे काही राहिलेले नाही. माननीय मंत्री श्री.गिरीश बापट किती एखाद्याच्या मागे लागायचे.

अध्यक्ष महोदय, मला संरक्षण द्या, मी मूळ मुद्यावरच आहे. काल सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री यांनी सागितले की, महानगरपालिकेच्या कोणत्याही चुकांना पांघरुन घालण्याची इच्छा आता आपली नाही. औषधाचाही विषय आहे, पण आपण त्यांच्याकडे पाठविलेल्या औषधांचा विषय आहे. आपल्याला क्लीनचीट देण्यासाठी मंत्रिमंडळात आपल्या वर कोणी नाही. आपली स्वच्छता, पारदर्शकता तुम्हालाच सिध्द करावी लागणार आहे. आपल्या खात्यावर होणाऱ्या आरोपांच्यावर जरी औषध खरेदीच्या फाईलवर स्पष्टीकरण दिले. ते स्पष्टीकरण खरे मानले तर आपला त्याच्याशी काही संबंध नाही. दोन अधिकाऱ्यांना काय तर निलंबित केले. म्हणजे आरोपात तथ्य आहे. प्रथमदर्शनी काही गोष्टी आढळल्यातर याची चौकशी झाली पाहिजे. पण एखाद्या अधिकाऱ्याला निलंबित करतो. आपण उत्तरामध्ये बोला. आमचे काही काढू नका, कारण ऐकून ऐकून आम्ही दमलो.

डॉ.दिपक सावंत : अध्यक्ष महोदय, आपल्या काळामध्ये आम्ही मागणी करुन थकायचो की, चौकशी करायची असेल तर आधी निलंबन करा. आता आम्ही आधी निलंबन केलेले आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, याची नोंद घेण्यात यावी की हे जे आरोप चाललेले आहेत यात तथ्य आहे. जर तथ्य नसते तर एखाद्या निष्पाप अधिकाऱ्याचे निलंबन करण्याची आवश्यकता नव्हती. पण आपण सोयीने निलंबन केलेले आहे. आणखी कोणी राहिले असेल तर त्याचाही शोध झाला पाहिजे. आपण या दोघांची चौकशी न करता डायरेक्ट निलंबन कसे काय केले. त्याच्यावर कोणी आहे का, खाली कोणी आहे का, यात सामील कोणी आहे, ज्याअर्थी आपण निलंबन कले त्याअर्थी इट इज व्हेरी क्लीअर की काहीतरी गडबड आहे. माननीय मंत्री महोदय

.......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

आपण आता काही बोलू नका, उत्तरामध्ये बोला. कारण आपल्याला बोलण्याची भरपूर संधी आहे. त्यामुळे मला सभागृहाच्या निदर्शनाला आणून द्यावयाचे आहे की, फार मोठ्या प्रमाणात अवैध प्रकारची औषधी खरेदी करण्याची सवय आणि पध्दत ही या वर्ष, दीड वर्षामध्ये लागली आहे की काय हे तपासण्याची गरज आहे. आता तुम्ही तुमच्या उत्तरात सांगाल की, 15 वर्षापासून हेच आहे. 15 वर्षामध्ये या खात्यामध्ये असे कोणतेही भ्रष्टाचाराचे काम झालेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश शेट्टी त्या खात्याचे मंत्री होते. सन्माननीय सदस्य श्री.शंभूराजे देसाई आपण शेवटपर्यंत जाऊ नका कारण तुमच्या पक्षाच्या इब्रतीचा प्रश्न आहे. माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांच्या चेहऱ्यावरील हास्य हे तुमच्या दोघांमधील मैत्री जाहीर करणारे आहे.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, मला आज अशी अपेक्षा होती की, अभ्यासपूर्ण भाषण करणारे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे विषयाच्या संदर्भात काही सांगतील. त्यांना हे चांगल्या पध्दतीने माहिती आहे की, हे आरोप कशा पध्दतीने केलेत. म्हणून मूळ विषय सोडून काँग्रेस आणि राष्ट्रवादीमध्ये जसे मतभेद आहेत तसे इकडे काही होऊ शकते काय एवढाच प्रयत्न ते त्यांच्या भाषणातून करीत आहेत. म्हणून त्यांना हसू येत आहे की, मी काय करायला पाहिजे आणि काय करीत आहे आणि ते हसू ते लपवू शकत नाहीत. आपण भडकविण्याचा कितीही प्रयत्न केलात तरी त्याचा काडीचा उपयोग होणार नाही. आम्हाला जी अपेक्षा आहे त्याचाही भंग होईल की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचे हास्यपूर्ण, अभ्यासपूर्ण भाषण ऐकण्याऐजी एक करमणूक होईल या पलीकडे काही होणार नाही असे मला वाटते.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मला हसू का आले, मी ज्यावेळी बोलायला लागलो. त्यावेळी त्यांना बरे वाटायला लागले. माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांच्या चेहऱ्यावर आपोआप हास्य येत नाही. माननीय मंत्र्यांना हसू येणे हे फार मोठे अवघड काम आहे. त्यामुळे असा खरेदीचा कोणताही एक्सरसाईज पार न पाडता आपल्या सोयीच्या पुरवठादारांना कसे आश्वासित करता येईल याच्या निविदा विभागाने काढल्या. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिकांनी आरोग्य विभागाने पुरवठा केलेली औषधे स्विकारायला नकार दिला. यापेक्षा वेगळी औषधे हवीत असा पत्रव्यवहार देखील रेकॉर्डला आला. दोन प्रकारची इंजेक्शन्स आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

फार महागडी इंजेक्शन्स आहेत. ही इंजेक्शन्स आपल्या राष्ट्रीय धोरणाच्या अन्वये सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये ॲन्टीबॉयोटिक्स म्हणून वापरली जातात आणि तेथेच ठेवली जातात. नेहमी वापरायच्या ॲन्टीबायोटिक्सवर रेझिस्टन्स आल्यानंतर अंतिम टप्प्यातील उपचारासाठी ही इंजेक्शन्स वापरली जातात.

अध्यक्ष महोदय, अगदी प्राथमिक स्वरुपात दवाखान्यासाठी खरेदी करायची जी औषधे आहेत ती इजेक्शन मोरोपेनम आणि इजेक्शन व्हेन्कोमायसीन सारखी महागडी औषधे सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल ऐवजी साध्या हॉस्पीटलमध्ये ठेवायला सुरुवात केली. म्हणजे एखाद्याचा ॲन्टीबायोटिक्स रेजिस्टेशन डेव्हलप झाला तर त्याच्यावर उपाय म्हणून हायर ॲन्टीबायोटिक्स देण्याची व्यवस्था सुपर स्पेशालिटीमध्ये ठेवायला पाहिजे होती. पण आपण तसे केले नाही असे निदर्शनाला आलेले आहे. आपल्यापैकी अनेकांना मधुमेहाचा आजार असेल तर अत्यंत उच्चशिक्षीत डॉक्टरांकडून उपचार घेण्यासाठी जातो. मधुमेह झाल्यानंतर आपला अर्धा धीर खचतो. बहुतेक लोकांना या आजाराच्या उपचारासाठी डॉक्टर मेटफॉरमीन नावाचे औषध देतात. या औषधाच्या गोळीची किंमत 50 पैसे ते एक रुपयाच्या दरम्यान असते. 100 रुपये दिले की, 200 गोळ्या बाजारात मिळतात. या क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत चर्चा केल्यावर असे लक्षात आले की, जवळपास 70, 80 टक्के रुग्णांना प्राथमिक स्तरावरील उपचार म्हणून याचा फायदा होतो. ही 70, 80 टक्के औषधे सामान्य पाप्युलेशनला देणे आवश्यक आहे. त्याच्याऐवजी आरोग्य विभागाने टर्सरी लाईन ऑफ ट्रीटमेंट म्हणून आणि काही स्पेसीफिक प्रकरणामध्ये जी औषधे वापरायची असतात अशी औषधे खरेदीची निविदा काढली. सिटाग्लेप्टीन नावाचे औषध खरेदी करण्याचा निर्णय शासनाने घेतला. याचा वापर प्रायमरी स्टेजला होत नाही. विशिष्ट प्रकारचा मधुमेह असेल तर याचा प्रायोरिटीने वापर करतो. तरी देखील अशा महागड्या औषधांची निविदा काढण्याचा निर्णय शासनाने घेतला आणि हे करीत असताना एका विशिष्ट कंपनीकडूनच औषधे तयार केली जातात.

3D-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.......

कुठल्या प्रकारची औषधे खरेदी केली पाहिजेत, याची सर्वसाधारण चर्चा व विचारविनिमय न करता एखादी कंपनी डोळयासमोर ठेवून निविदा तयार करण्याचे काम केले गेले. या प्रकरणामध्ये सिताग्लेप्टीन या नावाचे औषध आहे ते एम.एस.डी. हया एकाच नावाच्या उत्पादक कंपनीने निविदा सादर केली. त्यांच्या कंपनीची गोळी बाजारामध्ये साधारणतः 20 ते 22 रुपयांना मिळते. तीच गोळी सरकारने 34/- रुपयांना खरेदी केली. या सर्व औषधांचे वितरण करताना साधारणतः प्रत्येक शहराची लोकसंख्या किती आहे हे लक्षात घेऊन वाटप केले जाते. मी उदाहरण देईन की, ठाणे, मुंबई, पुणे या ठिकाणी 1000, 2000, 3000 एवढया संख्येने औषधे दिली. अकोला महानगरपालिकेला 10000 गोळयांचा पुरवठा करण्यात आला. मुंबई, ठाणे आणि पुणे येथे 1000 ते 2000 गोळया पाठविल्या. परंतु अकोला महानगरपालिकेला 10000 गोळयांचा पुरवठा केला. हया निविदेमध्ये अनेक घोटाळे करण्यात आलेले आहेत.

या निविदा काढताना आकडेवारी पहावी. त्याबाबत विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, हाय ॲन्टीबायोटिक ॲमॉक्सच्या पुण्याला 3051 गोळया दिल्या. मुंबईला 4 लाख 41 हजार गोळया दिल्या. अकोल्याला 1 लाख 37 हजार गोळया दिल्या. गायनॉकॉलॉजीमध्ये कारबोप्लास्ट इंजेक्शन वापरले जाते. ते पुण्यामध्ये शुन्य, मुंबईमध्ये 6535, अकोल्यामध्ये 3688, भिवंडीमध्ये 41154 ही आकडेवारी यासाठी निदर्शनास आणतो की, मुंबई, पुणे, ठाणे या शहरांमध्ये जेवढी लोकसंख्या आहे. तेवढी अकोल्याला नाही, ठाण्यामध्ये आहे तेवढी लोकसंख्या भिवंडीला नसेल.

अध्यक्ष महोदय, हत्ती रोगावर एक डी.ई.सी.नावाचे टॅबलेट वापरले जाते, त्या पुण्याला 735 गोळया दिल्या, अकोल्याला 44087 गोळया दिल्या. सन्माननीय श्री.बापट साहेब मला आता हसावे की, रडावे हे समजत नाही ! अकोल्याला असे काय झाले ते मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. हत्तीरोगावर मुंबईमध्ये 18000 गोळया, भिवंडीला 3637, मिरा भाईंदरला 18000 गोळया, अकोल्याला 44000 गोळया दिल्या. मलेरियासाठी पुणे डिव्हीजनला 4000 गोळया दिल्या. हत्ती रोगाच्या गोळया पुण्याला जास्त द्यायला पाहिजे होत्या. पण 735 दिल्या, पुण्यावर तुमचा का राग आहे हे मला माहित नाही.

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .......

पण माननीय श्री.बापट साहेबांकडून बघून म्हणत असाल तर कादाचित योग्य असेल माझे काही म्हणणे आणि तक्रार नाही. मलेरियासाठी क्लोरोक्वीन गोळी घेतो ती पुण्याला 4000, अकोला डिव्हीजनसाठी अकोल्याला 2 लाख 83 हजार 982 गोळया पाठविल्या. पुण्याला 11 हजार 134 वेगवेगळया प्रकारच्या 9 औषधाच्या गोळया गेल्या. त्यावेळी अकोल्याला 5 लाख गोळया पाठविल्या. मीरा भाईंदरला 5 लाख 23 हजार गोळया पाठविल्या. वॉटर फॉर इंजेक्शन, पुण्याला शुन्य, नागपूरला शुन्य, 35 हजार 208 मुंबईला, वॉटर फॉर इंजेक्शन अकोल्याला 225, मीरा भाईंदरला 3 लाख 74 हजार, याचा अर्थ असा आहे की, याचे वाटप करताना लोकसंख्येचे परिमाण व मागणी किती आहे यावर या सरकारने विचार केला नाही.

अध्यक्ष महोदय, टेंडर करताना निविदेच्या अटीमध्ये काही बदल विशिष्ट कंपनीला फायदा मिळवून देण्यासाठी केला. टेंडर निघाल्यानंतर निविदेमध्ये बदल करणे हे योग्य नाही. पण अध्यक्ष महोदय, जनरली निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेण्याऱ्या एकूण कंपन्यांच्या एकूण टर्न ओव्हरची अट घातली जाते. एम.ए.सी.बी.चे टेंडर काढताना टर्न ओव्हरची अट घातली जात असेल. सर्व विभागामध्ये आणि आरोग्य विभागामध्ये अशाच पध्दतीने उलाढालीची पध्दत आहे.

अध्यक्ष महोदय, टर्न ओव्हरची एक अट असते. एका विशिष्ट कंपनीला फायदा व्हावा, म्हणून त्या कंपनीच्या विशिष्ट औषधांच्या उलाढालीची अट घालण्यात आली. म्हणजे तुम्ही ते औषध निर्माण केलेले असले पाहिजे. ते विशिष्ट संख्येने औषध विकले गेले पाहिजे. तुम्ही जर टर्न ओव्हरची अट घातली तर कन्व्हेन्सिग आहे. ज्यांची मनोपॉली आहे, अशा कंपनीला निविदा मिळावी यासाठी टर्न ओव्हरची अट काढली आणि त्या विशिष्ट औषधाच्या उलाढालीची अट घातली. याचा अर्थ ऐवढाच आहे की कुणाला तरी द्यायची आहे. बाकीच्या सर्व निविदा टर्न ओव्हरवर आधारीत होत्या. ही एकमेव निविदा ही औषधाच्या टर्न ओव्हरवर म्हणजे, तुम्हाला तेवढी औषधे पाहिजेत, अशी व्यवस्था केली. एम.एस.डी. कंपनीच्या सिटाग्लॅब्टीन औषधाच्या

..3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील....

बाबतीत ही एकच एम.एस.डी. कंपनी आहे की, ज्यांनी टर्न ओव्हरच्या अटीमुळे प्रक्रियेमध्ये पात्र ठरतील. स्पर्धा मर्यादित केली. 18 ते 20 रुपयांची बाजारात मिळणारी गोळी, आपल्या सरकारला 34 रुपयांनी खरेदी करावी लागली. बाजारामध्ये एखादी गोळी 18 ते 20 रुपयांना मिळते. गोळया घेताना वेगळया प्रकारच्या गोळया घेतल्या. त्या गोळया घेताना मॅन्युफॅक्चरींगची, टर्न ओव्हरची अट न घालता त्या विशिष्ट प्रकारच्या औषध निर्मितीची संख्या जर केली असेल तरच तुम्हाला टेंडर मिळेल, म्हणून सांगितले. एम.एस.डी. नावाच्या कंपनीला फायदा मिळवून देण्याचा अर्थ याच्यातून निघतो. म्हणून याला जास्त गांभीर्य प्राप्त होते. स्पेसिफिकेशनमध्ये ॲडजेस्टमेंट केली. निविदा करत असताना, टेंडर काढत असताना विशिष्ट उत्पादकाकडे असलेल्या उत्पादन व्यवस्थेनुसारच अटी निविदा प्रक्रियेमध्ये टाकून त्या उत्पादकाची निविदा कशी पात्र होईल, असे बघण्याची व्यवस्था देखिल टेंडरमध्ये केली गेली.

अध्यक्ष महोदय, प्रत्येकाचा ॲडव्हांटेज कसा कोणाला आहे हे पाहून टेंडर डिझाईन करण्यात आले. त्याला ती ऑर्डर मिळण्याची व्यवस्था केली. उदाहरण सांगतो ॲमॉक्सॉलिन, क्लॉव्हिलिक्लीन ॲसिड या औषधाकरिता निविदा मागविताना फाईन क्युव्हर फार्मास्यूटीकल या कंपनीला फायदा व्हावा म्हणून अट काय ? कोणीही विचार करा, कशीही अट घालू शकतो काय ? सहा गोळयांचे पाकीट असणाऱ्या कंपन्यांनाच निविदा प्रक्रियेत भाग घेण्याची अट जाणीवपूर्णक घातली. तुमचे 6 गोळयांचे पॅकेज तयार करत असाल तरच तुम्ही पात्र. तुम्ही 8 किंवा 10 चे पॅकेज केले तर टेंडर रद्द. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.नाईक साहेबांनी काही आक्षेप घेतले होते. 6 गोळया असतील तर तुम्ही व्हॅलिड नाहीतर तुम्ही अपात्र ठराल अशा प्रकारची अट सुरुवातीला घालण्यात आली. दुसऱ्या ज्या तीन कंपन्या आल्या भारत पॅरेंटल लिमिटेड पी.आय.एल. फार्मा आणि झी लॅबॉरेटरी यांना निविदेच्या प्रक्रियेतून बाद करण्यात आले.

3E-1...........

श्री.जयंत पाटील ....

या तीन कंपन्यांना निविदेच्या प्रक्रियेतून बाद करण्यात आले. कारण त्यांच्याकडे सहा गोळयांचे पॅकेट नव्हते. ठीक आहे आपण हे समजू शकतो की, त्या कंपन्यांचे औषधांचे 7-8-10 गोळयांचे पॅकेट कदाचित असेल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू म्हणतात की, वेस्टेज कमी व्हावे म्हणून असे असेल. 6 गोळयांचे एक पॅकेट करण्यास प्रॉब्लेम नाही याकरिता मी तुम्हाला पाठींबा देतो. ते सांगत आहेत की, 6 गोळया म्हणजे 3 दिवसांचा कोर्स आहे. मंत्री महोदय डॉक्टर असल्यामुळे त्यांनी जवळून मार्गदर्शन केलेले आहे हे यातून सिध्द व्हायला लागले आहे. पण तुमच्या व त्यांच्यातील अंतर आता कमी व्हायला लागले आहे.

अध्यक्ष महोदय, यामध्ये फाईनक्युअर फॉर्मासिटीकल या कंपनीचा फायदा झाला. ती एकमेव कंपनी निविदा प्रक्रियेत पात्र ठरली. बाकीच्या निविदा रद्द झाल्या कारण ते त्या कंडीशनमध्ये बसत नव्हते. सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू म्हणतात त्याप्रमाणे पेशंटला 3 दिवसाच्या कोर्सप्रमाणे 6 गोळया मिळाल्या पाहिजेत हे मलाही मान्य आहे. पण मंत्री महोदयांनी काय केले आहे याचे छोटसे उदाहरण देतो. ऑर्डर देताना 6 गोळया लिहिण्याऐवजी पुरवठयाचा आदेश देताना मात्र ही अट सोयीस्कररित्या वगळण्यात आली. कोणत्याही साईजचे पाकीट पुरविण्याची मुभा कंपनीला आपणाकडून देण्यात आली. मी हे यासाठी सांगतो की, वेगवेगळया कंपन्यांना डोळयासमोर ठेऊन कसे काम केले गेले. माननीय उर्जा मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे येथे उपस्थित आहेत. मी त्यांना सांगतो की, त्यांच्या खात्यात कोटयावधी रूपयाची खरेदी होते. पण त्यांच्याबाबतीत आमच्या ऐकण्यात अजूनपर्यत काही आलेले नाही. तुम्ही आमचे जवळचे मित्र असल्यामुळे मी त्या विषयावर फार बोलत नाही. रिव्हर्स बिडींगबाबतही संशोधन करण्याचे काम आम्ही सुरु केलेले आहे. आपण रिव्हर्स बिडींग शिवसेनेला शिकविणे आवश्यक आहे. आपण निविदेमध्ये 6 गोळया मागितल्या पण ऑर्डर देताना 6 गोळयांची अट काढून टाकली आहे. आता टेक्नीकली पात्र ठरलेल्या निविदा तर उघडल्या पाहिजेत. पण त्या निविदा न उघडण्याचेही कार्य आपल्याकडून व्हायला लागले आहे. कॅल्शीयम फॉस्फेट सीरप 2 कंपन्यांच्या निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्या. हिंदुस्थान लॅबोरेटरीज

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील ....

आणि अल्फा लॅबोरेटरीज या दोन कंपन्यांचे फायनान्शियल बिड उघडणे आवश्यक होते. आपण केवळ गल्फा या कंपनीच्या एकमेव निविदेचे बिड उघडले आहे. याद्वारे 5-6 रुपयाला बाजारात मिळणारी गोळी तुम्ही 18 रुपयापेक्षा जास्त रकमेने खरेदी केली. आता याला भ्रष्टाचार नाही म्हणायचा तर काय म्हणायचे. तो तुमच्या आर्शिवादाने झाला आहे किंवा नाही हा पुढचा भाग आहे. अजून आपण तेथे पोहचलो नाही. पण 5 रुपयांची गोळी 18 रुपयांना खरेदी होते म्हटल्यावर काही तरी शंका घेण्यासारखे आहे. तुमच्या सारख्या सुजान व अतिशय अभ्यासू सदस्यांनी व मंत्री महोदयांनी याबाबतीत अधिक जागरुक रहायला पाहिजे होते. तुम्ही जागरुक न राहिल्यामुळे खाली किती प्रश्न व्हायला लागले आहेत हे आपण लक्षात घेणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरी बाब अशी की, आपण संख्या करारावर औषधी खरेदी करायला लागलो. जगभरात अशी पध्दत आहे की, संख्या औषधांचे दर निविदेद्वारे निश्चित करुन टेंडराईज न करता त्याची खरेदी करतो. एकदा दर निश्चित झाले की, ज्यांना जेवढी क्वॉंटीटी पाहिजे तेवढी त्यांनी खरेदी करावी. आपल्या मेडीकल एज्युकेशनमध्येही हीच पध्दत वापरली जाते. आपल्या वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने कार्यपध्दती वापरत असताना निश्चित केलेल्या दराची यादी सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना सर्क्युलेट केली जाते. ही महाविद्यालये त्यांच्या गरजेपुरती मागणी नोंदवितात व अतिरिक्त व अनावश्यक औषधांची खरेदी टाळली जाते. मात्र आरोग्य विभागाने संख्या करार करुन औषधी खरेदी करण्याचे काम सुरु केलेले आहे. आता क्वॉंटीटीमध्ये आपण औषधी खरेदी करण्यास सुरुवात केल्यामुळे तुमच्याकडे औषधे आली असतील, संख्या करारापेक्षा दुप्पट किंवा तिप्पट ही औषधे ही असतील. 1978 चे महाराष्ट्र परचेस व स्टोअर मॅन्युअल आहे. त्याप्रमाणे संख्या कराराच्या बाबतीत 1992 ला राज्य खरेदी धोरणानुसार रिपीट ऑर्डर देण्याच्या बाबतीत केलेल्या सर्व तरतुदींचे गंभीर उल्लंघन काही वस्तु व औषधे खरेदी करताना केले गेले आहे. कॅल्शीयम फॉस्फेट खरेदी करण्यात आले. मुळ करारात 8 लाख बाटल्या खरेदी करण्याचे ठरविले. दिनांक 31 मार्च 2015 रोजी आपल्या मागणीचे टेंडर आले. 8 लाख बाटल्या निविदेत

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील ....

मागविल्या. माझ्या माहितीप्रमाणे ही खरेदी करताना 15 लाख बॉटलची ऑर्डर दिली. याच निविदेवर रिपीट ऑर्डर देत असताना 4 लाख बाटल्यांची ॲडीशनल ऑर्डर आपण दिली आहे. संख्या करारात निविदा पुरवठयांचे आदेश देण्यात आले. संख्येइतक्याच वस्तु खरेदी करीत असताना 8 लाख बॉटलचे टेंडर काढले याबाबत काही ऑब्जेक्शन नाही. पण त्याऐवजी आपण 15 लाख टेंडरची रिपीट ऑर्डर दिली. संख्या कराराच्या धोरणानुसार आपण रिपीट ऑर्डर देताना ज्या मर्यादा पाळल्या पाहिजे होत्या, त्याचे उल्लंघन केले. मुळ आदेश दिल्यापासून सहा महिन्याच्या आत बाजारातील या औषधाचे भाव कमी झाले किंवा नाही याची खातरजमा करुन भांडार खरेदी समितीसमोर जाऊन आपण ही खरेदी करावयास पाहिजे होती. याबाबत बरीच मोठी प्रोसीजर आहे, ती सांगून मी वेळ घेत नाही. पण त्या सर्व प्रोसीजरचे उल्लंघन करण्यात आले. मुळ आदेशाप्रमाण् रिपीट ऑर्डर देत असताना आपल्या खात्याचा कोणता इंटरेस्ट होता याचा अभ्यास करण्याची गरज आहे. या सर्व बाबतीत आरोग्य विभागाची भूमिका ही ठेकेदारांना मदत करण्याची आहे याची अनेक उदाहरणे पुढे यायला लागली आहेत. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे अप्रमाणित असणाऱ्या औषधांसाठी ठेकेदाराला मागे घालण्याचे काम विभागाने केलेले आहे. जिल्हा शल्य चिकित्सक वाशिम यांनी दिनांक 9 डिसेंबर 2015 रोजी मे.मॅब्रो हेल्थ केअर प्रा.लि. यांना लिहिलेल्या पत्राची प्रत माझ्याकडे आहे. या कार्यालयाकडून कंपनीला पॅरासिटीमॉल सिरप 60 एमएलच्या 10870 बॉटल अप्रमाणित औषध असल्याबाबत कळविले होते. परंतु आपण हा 10870 बॉटल हा अप्रमाणित औषध साठा अद्यापही परत नेलेला नाही. अन्न व औषध प्रशासनाने या रुग्णालयास भेट दिल्यास अप्रमाणित साठा जप्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर औषधांची एक्सपायरी डेट 31 डिसेंबर 2015 असल्याने या 10870 बॉटल परत घेऊन जाव्यात अश्‍ी त्यांनी विनंती केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, खालच्या अधिकाऱ्याने वर कळविणे किंवा मॅड्रो कंपनीला जिल्हा शल्य चिकित्सक वाशिम यांनी पत्र पाठवून सांगावे की, ही औषधे अप्रमाणित आहेत. ही परत घेऊन जावीत. ही औषधे सर्टीफाईड नाहीत. सर्टीफाईड नसलेली औषधे विकण्याचे धाडस आपल्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

12-04-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3E-4

PNG/ AKN/ MMP/ 19:20

श्री.जयंत पाटील ....

विभागाच्या खरेदी यंत्रणेतून व्हायला लागले आहे हा दुसरा महत्वाचा मुद्दा आहे. सामान्य माणसांच्या जीवनाशी खेळणे हे सर्वात मोठे पाप आहे.

यानंतर 3F-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदय, खाजगी मेडिकल कॉलेजेसमध्ये उपचार करीत असताना विद्यार्थ्यांना शिकविले जाते. त्यामुळे रुग्णांवर उपचार होतांना काही प्रमाणात त्यांच्यावर प्रयोग होत असतात, असे माझे ठाम मत आहे. या माध्यमातून शासन कशाची पाठराखण करीत आहे ? जिल्हा शल्यचिकित्सक सांगत आहेत की, अप्रमाणित औषध साठा परत नेण्यात यावा, याची शासनाने नोंद घेतली पाहिजे. एखादी कंपनी सबस्टॅण्डर्ड माल तयार करुन वितरित करीत असेल आणि तसे अधिकारी किंवा डॉक्टरांच्या निदर्शनास आले तर सर्वप्रथम एफडीएला कळविणे अपेक्षित असते. कायद्यानुसार अप्रमाणित औषधांचा साठा जप्त करण्यास भाग पाडणे आवश्यक आहे. अप्रमाणित औषध साठयाबाबत एफडीएला कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार असतात. आरोग्य खात्यात एफडीए आणि विभागाच्या ठेकेदारांचे एवढे प्रेम आहे की, असे काही निदर्शनास आल्यानंतर एफडीएच्या ऐवजी ठेकेदारांना कळविले जाते. औषधे लवकर न्यावीत, अन्यथा एफडीए तपासणी करेल, त्यात सापडले तर मोठा घोटाळा बाहेर पडेल,असा यामागे उद्देश असतो. एफडीए खाते हे माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांच्याकडे आहे. त्यामुळे या खात्यावर जरब आहे का ? माननीय आरोग्यमंत्री यांना आता स्पेअर करणार नाही, याची आम्हाला खात्री आहे. याची तपासणी एफडीएने करणे गरजेचे होते. त्यांना याचा फायदा झाला. एफडीएने या सर्व गोष्टींची तपासणी करणे आवश्यक होते. या भितीमुळे कंपन्यांना डॉक्टर्स लिहितात की, हा साठा लवकर घेऊन जा नाही तर माननीय अन्न व औषध प्रशासन मंत्री महोदय येतील.

अध्यक्ष महोदय, दरवर्षी 500 कोटी रुपयांची औषधे खरेदी होतात. विशिष्ट कंपन्यांसाठी विशिष्ट पध्दतीच्या निविदा काढण्याचे प्रकार या खात्यात कोणी केला ? याची चौकशी झाली पाहिजे. माननीय आरोग्यमंत्री यांचा यामध्ये हात नसेल तर ते सिध्द होणे आवश्यक आहे. काल रोजी माननीय आरोग्य मंत्री यांनी सभागृहात दंगा होऊ नये म्हणून लगेच केवळ दोन अधिका-यांना सस्पेंड केले. माननीय आरोग्यमंत्री यांच्यावर विश्वास ठेवून ही सर्व माहिती सांगत आहोत. माननीय आरोग्यमंत्री यांनी घाईघाईने काल त्या दोघांनाही निलंबित केलेले आहे. याचा अर्थ असा होतो की, आपल्यालाही हे मान्य आहे. उत्तरात आपण यातील अनेक मुद्दे कन्व्हिन्स कराल, याची आम्हाला खात्री आहे. यातील काही मुद्दे गंभीर आहेत. ...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील....

अध्यक्ष महोदय, इस्लामपूर नगरपालिकेचे सीईओ यांनी अतिरिक्त औषधसाठा नाकारुन तो परत घेऊन जाण्याचे आदेश दिले होते. एवढया औषधाची त्यांना गरज नाही, असे त्यांनी पत्रात सांगितलेले आहे. नगरपालिकेचे सीईओ यांनी अतिरिक्त औषध साठा नको असल्याचे शासनाला कळविलेले आहे. अशा अनेक नगरपालिकांच्या सीईओ यांनी शासनाला व खात्याला कळविले की, अतिरिक्त औषधाची गरज नाही. शासनाने औषधाचा साठा पाठविण्यापूर्वी महानगरपालिकांकडून त्यांची मागणीच घेतलेली नाही.

अध्यक्ष महोदय, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने केवळ 60 कोहिडॉन आयोडिन सोल्यूशनच्या बाटल्यांची मागणी केली होती. जास्तीत जास्त त्यांना या सोल्यूशनच्या 200 बाटल्या लागतात. त्याकरिता त्यांना 70 हजार बाटल्यांचा पुरवठा करण्यात आलेला आहे, याची चौकशी झाली पाहिजे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेने केवळ 60 आयोडिनच्या बाटल्यांची मागणी केली असता त्यांना सात ट्रक औषधांच्या बाटल्यांचा पुरवठा करण्यात आलेला आहे. अलिकडे पुणे येथे हसन अली नावाचा गृहस्थ जो 9 वर्षापासून अटकेत होता. त्याच्यामागे एनफोर्समेंट डायरेक्टोरेट लागले होते. आता तो सुटलेला आहे, त्याबाबत ई.डी.यांनी सांगितले की, त्याच्यावर जो 37,000 कोटी रुपयासंबंधीचा आरोप होता, त्यामध्ये टायपोग्राफिकल मिस्टेक होती. 38 हजार कोटीच्या ऐवजी तेथे 3 कोटी कोटी रुपये असा आकडा होता. आता ई.डी.कोणाचे काय करतील हे सांगाता येत नाही. आता ई.डी.सांगतात त्याप्रमाणे देश चालायला लागलेला आहे. ही टायपोग्राफिकल मिस्टेक कळल्यानंतर 09 वर्षापासून अटकेत असलेल्या हसन अलीला सोडण्यात आलेले आहे. ई.डी.ने एखाद्याला बोलाविल्यानंतर त्याचा कार्यक्रम झाला असे समजायची वेळ आलेली आहे. त्याची काही सुटका नाही. आत काय चौकशी करतात काय नाही हे कुणाला माहिती नसते. हसन अलीसंदर्भात जे काम झाले ते या 70 हजार बाटल्यांच्या बाबत शासनाला करता येणार नाही. या बाटल्या परत घेऊन जाण्यात याव्यात, असे उप संचालक, ठाणे यांनी सांगितले. याबाबत कोणीच काही करायला तयार नाही. आयुक्त राष्ट्रीय आरोग्य अभियान यांना सदर औषधांचा ट्रक मिरा-भाईंदर पालिकेत उभा असल्याने त्याबाबत मार्गदर्शन करावे असे विचारलेले आहे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

मिरा-भाईंदर महापालिकेमध्ये औषधांचा ट्रक उभा राहिल्यानंतर त्याबाबतचे तातडीचे मार्गदर्शन दिल्ली येथील आयुक्तांकडून मागितले होते. राज्य शासन औषधे वाटत आहे, मार्गदर्शन मात्र दिल्ली येथील आयुक्तांना मागण्याची गरज काय आहे ? याबाबत दिल्ली येथील आयुक्तांकडे मार्गदर्शन मागून केवळ टाईमपास करण्याचा हेतू दिसत आहे. हा ट्रक कोणी पाठविलेला आहे, याची चौकशी करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, चुकीची आणि जास्त क्वांटिटीची खरेदी केली गेली. याबाबत अनेक तुलना केल्या गेलेल्या आहेत. मीही यापूर्वी आकडेवारी सांगितलेली आहे त्यात जेवढी आवश्यकता असेल त्याच्यापेक्षा जवळपास 70-80 टक्के जास्त पुरवठा करण्याचे काम केले गेलेले आहे.

अध्यक्ष महोदय, चिपळूण येथील वैद्यकीय अधिका-यांनी अतिरिक्त औषध साठा वापरता येणार नाही म्हणून तो परत घेऊन जावा, असा वारंवार पत्रव्यवहार केलला आहे. डोंबिवली, ठाणे,कल्याण, नवी मुंबई, उल्हासनगर, मिरा-भाईंदर, वसई येथे अतिरिक्त पुरवठा झालेला आहे, औषध साठा अवास्तव असल्याने स्वीकारण्यास नकार दिलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मला तर यामध्ये दुसरीच शंका येते. हा अतिरिक्त औषध पुरवठा प्रत्यक्षात झालाच नाही. हा अतिरिक्त औषध पुरवठा केवळ कागदावरच झालेला आहे. या औषध पुरवठयाच्या एन्ट्रीज केवळ कागदोपत्रीच आहेत. माझा हा आरोप आहे या सर्व कागदपत्रावरील एन्ट्रीज झालेल्या आहेत, अशी डिलीव्हरी झाली असल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आलेले आहे. डिस्पोजल कोणाला करावयाचे ? सगळेच जबाबदारी टाळायला लागलेले आहेत. तो साठा परत घेऊन जा, असे सांगत आहेत. त्यामुळे आरोप सरळ साधा आहे खरेदी करण्याची केवळ कागदोपत्री व्यवस्था झालेली दिसते. ॲक्च्युअल डिलीव्हरी मात्र झालीच नाही. शासनाच्याच विश्वासातील कंपन्यांना खरेदीचे आदेश दिले गेले होते. शासनच खरेदी करीत असलेल्या गोळया आवश्यक नाहीत असे सांगून संख्येसाठी आणि क्वांटिटी प्रमाणित करण्यासाठी या गोळया नको असे सांगणा-या नगरपालिका दिसू लागल्या आहेत. याबाबतचा शासनाचा आणि महानगरपालिकेतील पत्रव्यवहार पाहिला तर महाराष्ट्रात याबाबत भ्रष्टाचार झाला, हे सिध्द करण्यासाठी हे पुरेसे आहे.

3जी-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष डॉ. सतीश पाटील )**

श्री. जयंत पाटील.........

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न आहे. औषधे ज्या ठिकाणी पाठविली जातात, अशा ठिकाणी स्टोअरेज करण्याची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. काही ठिकाणी औषधे स्टोअरेज करण्यासाठी 30 डिग्रीच्या आतील तापमान असण्याची गरज असते. अशा प्रकारे औषध स्टोअरेज करण्यासाठी नॉर्म्स निश्चित केलेले आहेत. औषधे ठेवण्यासाठी डीपफ्रिजची कोणतीही व्यवस्था नसताना अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणावर औषधे पाठविलेली आहेत. याचा अर्थ महानगरपालिका, नगरपालिकेने कमी दर्जाची, व्हॅलिडिटी संपलेली आहे, औषधाचा गुणधर्म नसणारी औषधांची खरेदी केलेली आहे. अशी अवस्था आज आरोग्य विभागामुळे निर्माण झालेली आहे. औषधे खरेदी न करता फक्त कागदोपत्री औषधे खरेदी करण्यात आलेली आहेत, असा माझा आरोप आहे. मिरा-भाईंदर महानगरपलिकेनी औषध खरेदी केलेली असून, त्यासंदर्भातील एक पत्र आहे. महानगरपालिकेतील अधिकारी भविष्यात सदर औषधसाठा खराब झाला असे सांगण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यानंतर औषधे नष्ट करण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करावा लागणार आहे. औषधांची पोटॅंशी नष्ट झाल्यानंतर अशी औषधे सामान्य माणसाला दिली पाहिजे असा आग्रह मागे घेण्याची गरज आहे. ज्या औषधांचा प्रभाव कमी झालेला आहे, अशी औषधे सामान्य जनतेला देणे म्हणजे त्यांचा विश्वासघात केल्यासारखा होणार आहे आणि ते योग्य आहे असे मला तरी वाटत नाही.

अध्यक्ष महोदय, मोठ्या प्रमाणावर औषधे पाठविण्यात आलेली आहेत. ज्या औषधांची 6,9 महिने किंवा 1 वर्षे व्हॅलिडीटी असणारी 260 औषधी बाटल्यांची मागणी केली जाते, अशा ठिकाणी उरलेल्या 70 हजार वजा 260 बाटल्या यामधील अंतर हे कोठे ठेवणार असा माझा प्रश्न आहे. प्रत्येक औषधांवर 3, 6, 9 महिने किंवा 1 वर्षाच्या आत वापरली पाहिजे अशा प्रकारे एक्सपायरी डेटचा उल्लेख केलेला असतो. यामधील जी औषधे मोठ्या प्रमाणावर खरेदी केलेली आहेत, अशी औषधे ऑगस्टपर्यंत वापरावी लागणार आहेत. परंतु, सप्टेंबरपर्यंत त्यातील 10 टक्के औषधसाठा खपणार नाही. औषधे किती प्रमाणात खरेदी करावीत, याबाबतचा आरोग्य विभागाने अंदाज काढलेला नाही. औषधे खरेदी केल्याशिवाय कोणाचा तरी फायदा होत नाही. अशा दृष्टीकोनातून औषधांची खरेदी केलेली आहे. महाराष्ट्रातील औषध खरेदीची चौकशी करण्यासाठी एफडीएमधील

......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.........

अधिकारी असला पाहिजे. माननीय मंत्री श्री. गिरीश बापट यांचे काम केंद्रातील पक्षाल देखील समजले पाहिजे. औषध खरेदीची योग्य पध्दतीने चौकशी केली पाहिजे. मी मंत्री महोदयांवर कोणतेही आरोप करणार नाही. शेवटी सत्य कधी दडून राहत नाही. सत्य शेवटी बाहेर येणारच आहे. औषध खरेदीची चौकशी निवृत्त आयएएस अधिकाऱ्यांकडून करण्याची गरज आहे. औषध खरेदीची चौकशी निवृत्त जज्जकडून करण्याची आवश्यकता आहे. तसेच आरोग्य विभागाचे ज्ञान ज्या व्यक्तीकडे असणार आहे, अशा तज्ज्ञ व्यक्तीकडून औषध खरेदीची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. रामशास्त्री प्रभुणेसारख्या व्यक्तींकडून औषध खरेदीची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. अलीकडच्या काळात एसआयटीकडून चौकशी करण्याची फॅशन सुरु झालेली आहे. एसआयटीने चौकशी केल्यानंतर अनेक प्रश्न उभे राहतात. एसआयटीने राज्याच्या मंत्र्यांची चौकशी करावी असे तरी आमच्या मनाला पटत नाही. म्हणून मी एसआयटीची मागणी करीत नाही. राज्यातील जनतेला औषध खरेदीचे सत्य काय आहे ते कळावे अशी आमची अपेक्षा आहे. भविष्यात अशा प्रकारच्या चुका होणार नाहीत, याबाबत माननीय आरोग्य मंत्र्यांनी योग्य ती काळजी घ्यावी, अशी माझी त्यांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय शिक्षणात काय चालले आहे, याबाबत देखील तपासणी करण्याची आवश्यकता आहे. मी माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. तावडे साहेबांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधणार आहे. अलीकडच्या काळात डॉक्टर कशा पध्दतीने तयार होतात, त्याबाबत वेगवेगळे प्रकार समोर येऊ लागले आहेत. काही डॉक्टर मेरीटनुसार येतात. काही डॉक्टर जास्तीची फी दिल्यामुळे होतात. तर काही डॉक्टर विदेशात शिक्षण घेऊन डॉक्टर होत असतात.

अध्यक्ष महोदय, मेरीट असून प्रवेश नाही अशी सन्माननीय सदस्य डॉ. सुनील देशमुख यांची अवस्था आहे. हीच अवस्था सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव नाईक यांची आहे.

अध्यक्ष महोदय, आता फोर्ज सर्टिफिकेट करुन पास होण्याची एक नवीन पध्दत पुढे यायला लागली आहे. महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल आहे. कोणत्याही डॉक्टरला प्रॅक्टिस सुरु करण्यापूर्वी

.......3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.........

महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलमध्ये जाऊन त्यांच्या नावाची नोंदणी करुन घ्यावी लागते. महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलने भोईवाडा पोलीस स्टेशमध्ये एक तक्रार दिलेली आहे. 16 बोगस डॉक्टर फोर्ज सर्टिफिकेट देऊन पास झालेली आहेत. आपण डॉक्टरांकडे उपचारासाठी जात असतो. डॉक्टरांकडून तपासणी केल्यानंतर आपण त्यांनी दिलेली औषधे घेत असतो. आपली डॉक्टरावर श्रध्दा असते. माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. तावडे यांच्याकडून माझ्या फार अपेक्षा आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक डॉक्टरने त्यांच्या क्लिनिकच्या बाहेरील बोर्डावर मेरीटने पास झालेला आहे, डोनेशन देऊन पास झालेला आहे, प्रायव्हेट मेडीकल कॉलेजमध्ये शिक्षण झालेले आहे की, रशियामधील युनिव्हर्सिटीमध्ये डॉक्टर झालेला आहे, त्याबाबतची माहिती देण्याची गरज आहे. एखादा रुग्ण डॉक्टरांकडे गेल्यानंतर तो मेरीटने पास झालेला आहे किंवा कसे हे संबंधित रुग्णाला कळण्याची आवश्यकता आहे. अनेक बोगस डॉक्टर रुग्णांना खेळवित असतात, असे प्रकार आपण सर्वांनी पाहिलेले आहेत. माझ्याकडे 5 बोगस डॉक्टरांच्या केसेस आहेत. बोगस डॉक्टर 15 ते 20 दिवस रुग्णांवर उपचार केल्यानंतर पुन्हा संबंधित रुग्णाला कोल्हापूर किंवा सांगलीला उपचार घेण्यासाठी पाठवित असतात. याबाबतची मी अनेक उदाहरणे देऊ शकतो. अशा रुग्णाचे निधन झालेले आहे. याचा अर्थ संबंधित रुग्णाने पहिली ट्रीटमेंट जी घेतली होती, ती त्याला चुकीची दिल्यामुळे त्याचे निधन झालेले आहे. महाराष्ट्रातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करुन त्यांचे प्रमाण कमी करण्याची आवश्यकता आहे. 16 सर्टिफिकेटच्या संदर्भात भोईवाडा पोलीस स्टेशमध्ये एफआयआर नोंदविलेला आहे.

3H-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील..

सर्वांना विचारण्यात आले, कसे काय तर ते म्हणाले आम्हाला पाच लाख रूपये द्यावे लागले. कोणीतरी स्नेहल ज्ञाती म्हणून आहेत. त्यांना आम्ही पाच लाख रूपये दिले त्यांनी आम्हाला सर्टिफिकेट आणून दिले. पोस्ट ग्रॅज्युएटचे एक सर्टिफिकेट देण्याची व्यवस्था पाच लाख रूपयात मिळत असेल तर उत्तम चाललेल्या महाविद्यालयामध्ये जेथे पोस्ट ग्रॅज्युएटचे कोर्सेस आहेत, त्यांच्या डिग्रींना काहीच अर्थ राहिलेला नाही. पोस्ट ग्रॅज्युएटचे डोनेशनचे आकडे बघितले तर एमबीबीएसचे पोस्ट ग्रॅज्युएशन करण्यासाठी दोन कोटी रूपये डोनेशन, दीड कोटी रूपये, तीन कोटी रूपयापर्यंत डोनेशन द्यावे लागते. यामध्ये मंत्री महोदयांनी बरेच लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. या सर्व वैद्यकीय महाविद्यालयातील पोस्ट ग्रॅज्युएटस सिटस् हे या महाविद्यालयांचे उत्पन्न झालेले आहे. दुसऱ्या बाजूने खोटे सर्टिफिकेट देण्याची व्यवस्था आहे. कॉलेज आफ फिजिशियन ॲण्ड सर्जन यांना सर्टिफिकेट देण्याचे अधिकार आहेत. मी मंत्री महोदय श्री.तावडे साहेबांच्या निदर्शनास आणून देतो की, कॉलेज ऑफ फिजिएशन ॲण्ड सर्जन हेच कॉलेजच्या सिटसचे अलॉटमेंट करतात. 500 खाटांचे हॉस्पिटल असेल तर 10 सिटस्, तुमच्याकडे 2000 खाटांचे हॉस्पिटल असेल मग तुम्हाला 50 सिटस् पोस्ट ग्रॅज्युएशनच्या मिळतात. हेच पेपर काढतात, हेच पेपर तपासतात, हेच प्रिंट करतात आणि हेच त्याचे गुण देतात. त्यांच्याकडून इश्यू झालेले सर्टिफिकेट हे बोगस आहे, असे निदर्शनास यायला लागले आहे. हर बोगस सर्टिफिकेट पाच लाख रूपयाला मिळतात, ही सर्वात गंभीर बाब आहे....(अडथळा).... मंत्री महोदयांचे लक्ष नाही परंतु, त्यांच्या मल्टी टॉस्कींगवर माझा पूर्ण विश्वास आहे. आपण या सर्व मेडिकल कॉलेजेसना सीईटी लागू करावी. पोस्ट ग्रॅज्युएटसाठी परिक्षा घेतली जाते, एम.डी.साठी परिक्षा घेतली जाते, त्यासाठी एखादी एंट्री परीक्षा घ्यावी. सीईटी करायची व्यवस्था केलेली आहे. खाजगी विद्यापीठांसाठी नीटची परीक्षा घेतली जाते. नीट परिक्षा ही खाजगी विद्यापीठांसाठी आहे. खाजगी संस्था म्हणतात की, त्यामध्ये आम्हाला सहभागी व्हावयाचे नाही कारण यांची बुध्दी वेगळी आहे. या सर्वांच्या बाबतीत मंत्री महोदयांनी लक्ष घातले पाहिजे. मंत्री महोदय श्री.विनोद तावडे आपण् कॉलेज ऑफ फिजिशियन ॲण्ड सर्जन कशा पध्दतीने ऑपरेट करतात आणि कशा पध्दतीने महाराष्ट्रात खोटे सर्टिफिकेट देऊन प्रॅक्टीस करायला परवानगी मिळते. चांगल्या मेडिकल

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील..

कॉलेजमधून डॉक्टर झालेली मुले बाहेर येऊन त्यांनी दवाखाना टाकला आणि त्यांच्या शेजारी खोट सर्टिफिकेट असलेला माणूस बसायला लागला तर याचे जास्त चालेल का त्याचा चालेल. जो गोड बोलेल त्याचा जरा जास्त दवाखाना चालेल, याकडे आपण लक्ष द्यावे.

अध्यक्ष महाराज, मी सभागृहाचा फार वेळ घेणार नाही....(अडथळा)... पण माझी अपेक्षा आहे. आमचे ते चिन्हच आहे. सर्वांनी घड्याळाकडे बघितले पाहिजे. सन्माननीय मंत्री डॉ.दिपक सावंत आपण या सर्व प्रकरणांची ताबडतोब चौकशी करावी. जुलै महिन्याच्या आत यातून आपण निष्कलंकपणाने बाहेर यावेत, अशी मी आपणास शुभेच्छा देतो. मला आपल्यावर आरोप करायचा नाही कारण मला आपला स्वभाव माहित आहे. आपण् हे केलेच नसेल असे म्हणायचे धाडस होत नाही, पण तुम्ही केले नाही असे मला वाटायला लागले आहे. तो "च" आपण आणला पाहिजे. तो "च" आपल्या कृतीशील धाडसी ...(अडथळा)... आपण दोघांना काढले आहे. ज्या कंपन्यांनी भ्रष्टाचार करण्यासाठी खालच्या यंत्रणांना उद्युक्त केले, त्या सर्वांना आपण धडा शिकविला तर स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेण्याचा पुन्हा आपल्याला एकदा अधिकार प्राप्त होईल. ते करण्यासाठी आपण धाडसाने काम करा. आपला "च" फार महत्वाचा आहे. तो "च" आपण चौकशी तर करावीच परंतु त्यात जे गुंतलेले आहेत, त्यांना आपण उघड्यावर पाडा. माझी अशी अपेक्षा आहे की, आपण या चौकशीतून क्लिनपणे बाहेर याल. आपली स्वच्छ प्रतिमा जपण्यासाठी निश्चितपणाने हा चांगला प्रयत्न कराल, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महाराज, बदल्यांचा मुद्दा मी घातलेला आहे, परंतु वेळ झाल्यामुळे मी बोलत नाही. शेवटी जाता जाता एवढेच सांगतो की, मंत्रालयात बदल्या होतात, परंतु माझी माहिती अशी आहे की, अलिकडे ओबेरॉय हॉटेलमध्ये खोल्या घेण्यात आलेल्या आहेत. ओबेरॉय हॉटेलमधील खोल्यांमध्ये बदल्यांची चर्चा व्हायला लागली आहे. मी आज कोठल्याही मंत्र्यांचे नाव घेत नाही. परंतु आपल्या सरकारची प्रतिमा बिघडू नये. ज्या विश्वासाने जनतेने आपल्याला निवडून दिले आहे, त्या विश्वासाला सार्थ करण्याचे काम आपण केले पाहजे. काल परवा मंत्री महोदय श्री.चंद्रकात पाटील यांना त्यांच्या खात्यामध्ये काय झाले ते सांगितले, परंतु त्यांनी ते फार किरकोळ घेतले. तीन महिन्यात मुख्य अभियंत्याच्या चार बदल्या, अधिक्षक अभियंत्यांच्या सहा बदल्या, चार महिन्यात एका अधिकाऱ्यांची तीन वेळा बदली, त्यांनी सांगितले की, हे नियमाप्रमाणे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील..

झालेले आहे. खाली सचिवांनी नस्ती पाठविली त्यावर सही केली, त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वाक्षरी केली. सर्व काही नियमाने झाले असे सांगण्यात येते. एका अधिकाऱ्याची नियमाने तीन महिन्यात चारवेळा बदली सन्माननीय सदस्य डॉ.सुनिल देशमुख साहेब होऊ शकते काय? बदलीचा कायदा आहे. काही तारतम्य तरी बाळगले पाहिजे. यामुळे सर्व अधिकाऱ्यांमध्ये नामोहरमता तयार होते. महाराष्ट्रातील अधिकारी येऊन आता आम्हाला सांगायला लागलेले आहेत की, आमचेवर अन्याय होत आहे, याला आपण तोंड फोडण्याची आवश्यकता आहे. माझी माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांच्या खात्यात असे काहीही चालले नाही. सन्माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना हे तर करायला वेळच नाही. आमचे मंत्री महोदय प्रा.राम शिंदे यांच्या गृह खात्यात काय चालले आहे, यावर बोलण्याची आवश्यकता नाही याचे कारण असे की, कायदा व सुव्यवस्थेचा विषय यामध्ये घेतलेला नाही. या अधिवेशनात त्यावर बोलायचेही नाही. या महाराष्ट्रातील काही मंत्र्यांकडून बदलीची चर्चा मंत्रालयाऐवजी ओबेरॉय मध्ये जाऊन करायला लागलेले आहे. मी कोणाचे नाव घेत नाही. मला खाती पण माहिती आहे, पण थोडेसे आपण कंट्रोल करा जास्त झाले की भडका होतो. आपण पाच वर्षासाठी निवडून आला आहात. 123 सदस्यांचे सरकार आहे. यांचा आज आणि उद्याही संबंध आहे असे मी मानत नाही. जर उद्या संध्याकाळी सूर्य मावळण्याच्या आत आमचे माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी उठून सांगितले की, यामध्ये आमचे सन्माननीय मंत्री डॉ.दिपक सावंत याचा काहीही हात नाही. अशी क्लिन चिट देत असतील तर मी समजू शकतो, खरेच युतीचे राज्य आहे. उद्या संध्याकाळपर्यंत जाहिर केले नाही तर याचा अर्थ असा निघेल की, क्लिन चिट फक्त भारतीय जनता पक्षाचे मंत्री महोदय श्री.विनोद तावडे, सन्माननीय मंत्री महोदया श्रीमती पंकजा मुंडे यांना क्लिन चिट मिळू शकते. कोणत्याही क्षणी पाठिंबा काढण्याची इच्छा बाळगणारे अनेक आमदार या सभागृहात आहेत. मग प्रश्न पडतो की, परत सरकार कसे येणार अशी चर्चा चालू आहे. चर्चा ॲडव्हॉन्स स्टेजला गेलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी उद्या संध्याकाळपर्यंत सभागृह संपण्यापूर्वी जर क्लिन चिट देऊन सांगितले की, काल सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जे भाषण केलेले आहे, त्यात काहीही भ्रष्टाचार झालेला नाही. त्यानंतर आपण निवृत्त न्यायाधिशांकडून याची चौकशी लावण्याचे धाडस केले तर मी निश्चितपणे समजेन की त्यांना तुम्हाला सपोर्ट करायचा आहे. पण खालच्या

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील..

अधिकाऱ्यांना करायचा नाही. एवढे काम मंत्री महोदयांकडून होईल, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. आपण उत्तम भाषण कराल, यात शंका नाही. आपण सांगाल सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना माहित नाही, ...आपण वर केलेले भाषण पटलावर ठेवा. आता 8.00 वाजलेले आहेत. ..(अडथळा)... भ्रष्टाचार एकच आहे. वेगळा कसे बोलणर. 70 हजार औषधांच्या बाटल्या घेतल्या असतील तर वर सुध्दा 70 हजार बाटल्यांचा विषय निघेल. ..(अडथळा)... किती सिक्रनायजेशन आहे.....

डॉ.दिपक सावंत : अध्यक्ष महाराज, वरती जे जे शब्द कोटी म्हणून वापरलेत तेच शब्द आपण वापरले आहेत. आपले भाषण त्यांच्याकडून आलेले आहे, मला माहित आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, किती विचाराने आम्ही दोन्ही सभागृह चालवितो, याचा अभ्यास करा. आपल्या काळात असे होत नव्हते त्यामुळे आपल्याला तिकडे जायला 15 वर्षे लागली. आमचे विचाराने विधानपरिषदेत आणि विधानसभेत चालले आहे, त्यामुळे आम्ही एकच टर्म इकडे राहण्याची शक्यता आहे.

यानंतर 3I-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील ...

हे मुद्दे सेम का आहेत तर भ्रष्टाचार, आरोप समान आहेत. जे सत्य आहे त्यावर आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने बोट ठेवण्याचा प्रयत्न विधानपरिषद व विधानसभेत केलेला आहे. तसेच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनीही प्रयत्न केलेला आहे. मला खात्री आहे की, लवकरात लवकर यातून सत्य बाहेर यावे आणि महाराष्ट्राला आपल्या निस्वार्थीपणाची पुन्हा एकदा साक्ष पटावी, धन्यवाद.

............

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभूराज देसाई (पाटण) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम 292 अन्वये माननीय विरोधी पक्ष नेते व विरोधी पक्षाच्या इतर सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेवर बोलण्याकरिता उभा आहे.

विरोधी पक्षाच्यावतीने माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या चर्चेला सुरुवात केली. त्याला अनुमोदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गट नेते ...

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मला असे वाटते की, आता आपण ही चर्चा थांबवूया. सन्माननीय सदस्य श्री. शंभूराज देसाई यांना आपण ऑनलेग ठेवू किंवा त्यांचे भाषण पूर्ण होऊ द्या, त्यानंतर आपण अर्धा तास चर्चा घेऊ व बाकीची चर्चा आपण उद्या सकाळी 10 वाजता कंटिन्यू करु

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, मघाशी मी हीच सूचना केली होती, त्यावेळेस आपण काहीच बोलला नाहीत. त्यामुळे आता सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. मी असे म्हटले होते की, आजच्या कामकाजपत्रिकेत 11 अर्धा तास चर्चा दर्शविलेल्या आहेत. आपण वेळेचे गणित सांगावे. परंतु, आपण ते संभाषण वेगळ्याच दिशेला नेले. माझे काही म्हणणे नाही उलट याकरिताच सभागृहाला अध्यक्ष महोदयांमार्फत विचारावे असे मी म्हटले होते.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री जे म्हणत आहेत त्याला आमचा आक्षेप नव्हताच परंतु, ती चर्चा दुसरीकडे निघून गेली. माझी अजूनही आपल्यामार्फत सूचना आहे की, आपण सन्माननीय सदस्य श्री. शंभूराज देसाई यांचे भाषण झाल्यानंतर अर्धा तास घ्याव्यात व या संदर्भातील चर्चा उद्या घ्यावी.

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, आमच्या पक्षातर्फे अजून पर्यंत कोणीही बोललेले नाही. आमच्या पक्षाच्यावतीने प्रथम मीच बोलत आहे. माझे भाषण झाल्यानंतर आपण ही चर्चा थांबवावी.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य आपणास बोलण्याची संधी दिली जात आहे. आपण शिवसेनेतर्फे बोलावे.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, या चर्चेवर बोलण्यासाठी मी उभा आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात केली. राष्ट्रवादी पक्षाचे नेते व आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी त्यांना अनुमोदन देणारे भाषण केले. मी या दोघांचीही संपूर्ण भाषणे ऐकलेली आहेत. या चर्चेमध्ये विशेषतः सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एका खरेदीबाबत किंवा झालेल्या अनावश्यक खरेदीच्या अनुषंगाने काही बाबी या दोघांनी सभागृहासमोर मांडल्या. ठीक आहे एखाद्या बाबतीत ज्या गोष्टी पुढे येतात, ज्या गोष्टीची माहिती विरोधी पक्षाकडे उपलब्ध होते, त्याबाबतीतील चर्चा उपस्थित करणे, ती सदनाच्या निदर्शनास आणणे, त्याबाबत सरकारचे लक्ष वेधणे हे विरोधी पक्षाचे कर्तव्य आहे व त्यांनी ते पार पाडलेले आहे.

या दोन्ही नेत्यांची भाषणे ऐकताना त्यांनी दिलेल्या आकडेवारीबाबत सांगावयाचे झाले तर, किती बाटल्या औषधांची मागणी केली, त्याच्या अगेन्स्ट औषधांच्या किती बाटल्या पोहोचविल्या, किती गोळ्यांचे पाकिट हवे होते व किती गोळ्यांचे पाकिट दिले गेले हे सांगितले गेले. मला थोडेसे आश्चर्य वाटले. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे राज्याचे वित्त मंत्री होते त्यावेळेस आम्ही सभागृहात या बाजूला होतो. ते सभागृहात बजेट मांडायचे त्यावेळेस त्यांचे राज्याच्या बजेटवरील आकडेवारी असणारे भाषण आम्ही ऐकायचो. आज आपण सत्ताधारी बाकावरुन विरोधी बाकावर आलेला आहात. परंतु, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी वित्त विभागात काम केलेले असल्याने आकडेवारीचा अभ्यास करण्याची त्यांची सवय त्यांनी या भाषणातून दाखविलेली आहे.

मला अधिक बरे वाटले असते की, त्यांनी एवढा बारकाईने त्या आकडेवारीचा अभ्यास केला. वित्त मंत्री असताना आपण ज्या विभागाला एवढे पैसे दिले नाहीत, त्या कामावर ते पैसे खर्च होतात काय, दिलेल्या पैशाचा 100 टक्के विनियोग होऊन ते काम त्याच पैशावर केले जाते आहे काय, याचा अधिक बारकाईने अभ्यास केला असता तर त्यांना जी सतत खंत वाटते की, आम्ही या बाजूला 5 वर्षांसाठीच आहे तर कदाचित त्यांच्यावर इतक्या लवकर 15 वर्षांनंतर इकडच्या बाजूला येण्याची वेळ आली नसती. त्यांनी ज्या वित्त विभागात काम केले, त्या वित्त विभागाच्या माध्यमातून प्रत्येक विभागावर नियंत्रण ठेवले जाते. मला आठवते की, तत्कालीन

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभूराज देसाई .....

मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी एका परिसंवादामध्ये सांगितले होते की, हजारो कोटी रुपये शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी देण्यासाठी राज्य सरकारने खर्च केले. परंतु, त्यातून 0.1 टक्कासुध्दा क्षेत्र सिंचनाखाली आले नाही, ही खंत किंवा वस्तुस्थिती त्यावेळेच्या राज्याच्या प्रमुखांनी बोलून दाखविली होती.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण आरोग्याच्या विषयावर बोलावे.

श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, त्यांनी या ठिकाणी जी आकडेवारी मांडली आहे, त्या आकडेवारीचा संदर्भ घेऊनच मी या ठिकाणी सांगत आहे. भाषण करताना माननीय विरोधी पक्ष नेत्यांपेक्षा सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सातत्याने डॉ. दीपक सावंत हे शिवसेनेचे मंत्री आहेत, त्यांना मुख्यमंत्री महोदय क्लीन चीट देणार काय, असे सांगून त्यामध्ये जाता जाता शेवटचे तेल ओतण्याचे काम केले. ठीक आहे या संदर्भात मुख्यमंत्री महोदय त्यांना जी भूमिका घ्यावयाची आहे ती घेतील. 6231 गोळ्या, 11552 गोळ्या अशाप्रकारे एक-एक गोळीचा हिशोब तत्कालीन वित्त मंत्री व आताच्या विरोधी पक्षाच्या आमदारांनी दिलेला आहे. मला त्यांना एकच सांगावयाचे आहे की, एखादी त्रुटी किंवा ज्यांनी कोणी तुम्हाला माहिती दिली असेल कारण अगदी बारकाईची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध झालेली आहे. सदनामध्ये जेव्हा सन्माननीय सदस्य एखादी माहिती मांडतात तेव्हा ती खरी आहे असे आपण समजतो. आम्हालाही याची उत्सुकता आहे की, एवढ्या एक-एक गोळीची ऑथेंटिक माहिती सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना कोणामार्फत मिळाली याची माहिती त्यांनी आम्हाला सदनात नाही तर, सदनाच्या बाहेर दिली तर आम्हीही आमच्या कामकाजासाठी त्याचा उपयोग कधी तरी करु

ठीक आहे तुम्ही या गोष्टी मांडल्या. दोन दिवसांपूर्वी वृत्तपत्रात ही बातमी आली आणि आज आम्हाला समजले की, या संदर्भातील जे दोन अधिकारी जबाबदार आहेत, त्यांच्याकडून काही अनियमितता झाली, या गोष्टी खरेदी करताना काही त्रुटी राहिल्या, त्या दोन अधिकाऱ्यांना माननीय आरोग्य मंत्र्यांनी बडतर्फ केले, निलंबित केले व या संदर्भातील पहिला निर्णय घेतला. याकरिता मी माननीय आरोग्य मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभूराज देसाई .....

माननीय आरोग्य मंत्र्यांनी गेल्या दीड वर्षात या राज्यात ज्या चांगल्या गोष्ट केल्या त्याबाबत एखादे तरी वाक्य बोलले पाहिजे होते. याचा अर्थ खोटे बोल, पण रेटून बोल ही जी मराठीतील म्हण आहे, त्याप्रमाणे मोठमोठे आकडे सांगायचे असे दिसते. मला विशेष वाटते की, त्यांना मिरा-भाईंदरच्या एका दवाखान्याचा उल्लेख केला की, टँकर भरुन औषधाच्या बाटल्या दवाखान्यासमोर उभ्या होत्या. तसेच ते म्हणाले की, तेथील अधिकाऱ्यांनी पत्र लिहिले. याचा अर्थ त्या दवाखान्यातून शासनाकडे पत्र यायचे, शासनाकडे ते पत्र पोहोचायचे, पुन्हा शासनाने त्याला उत्तर द्यायचे, एवढे दिवस ते टँकर त्या दवाखान्यासमोर उभेच होते का ? याकरिता या गोष्टींची सत्यता कोठे तरी तपासून पाहिली पाहिजे. अशा पध्दतीने केवळ मोठमोठ्या वल्गना करुन एखाद्या विभागाला, एखाद्या विभागाच्या मंत्री महोदयांना त्यामध्ये अडकविण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला जात आहे, असे माझे मत आहे.

माननीय आरोग्य मंत्र्यांनी काय चांगले केले, तर वैद्यकीय अधिकाऱ्यांची एका वर्षात साडेतेराशे पदे आरोग्य खात्यामार्फत महाराष्ट्रात भरली गेली. या सदनामध्ये या अगोदरच्या अधिवेशनामध्ये आम्ही चर्चा केल्या की, आरोग्य खात्यामध्ये, ग्रामीण रुग्णालयांमध्ये, प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर्स नाहीत. मला आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे लक्ष वेधून त्यांना हे सांगावयाचे आहे की, साडेतेराशे डॉक्टर्स एका वर्षात भरल्याचे या अगोदरचे एक तरी वर्ष आपण दाखवा.

3J-/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभुराज देसाई.....

डॉक्टर्स भरण्याची प्रक्रिया सुरु झाली. ग्रामीण भागातील रीमोट मधील जिल्ह्यामध्ये आरोग्य मंत्री महोदयांनी शिव आरोग्य योजना सुरु केली. रीमोट जिल्ह्यांमध्ये शिव आरोग्य योजनेच्या माध्यमातून टेलीमेडीसीन उपलब्ध होऊ शकणार आहे. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना येथील तज्ज्ञ डॉक्टरांकडून टेलीमेडीसीनची सुविधा उपलब्ध करुन रीमोट एरियामधील रुग्णांना म्हणजेच ज्याला मुंबईमध्ये येणे शक्य नाही, अशा रुग्णाला मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांकडून जे औषध दिले जाणार होते, ते त्या एरियातील आरोग्य केंद्रामध्ये, ग्रामीण रुग्णालयामध्ये उपलब्ध करुन देण्याची मंत्री महोदयांनी योजना आणली...(अडथळा)...

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय कुटे यांचे म्हणणे बरोबर आहे. जोरजोरात बोलायचे, आरोप करायचे, परंतु एखादा आमदार सभागृहामध्ये त्या आरोपाच्या संदर्भातील वस्तुस्थिती मांडत असताना ती ऐकून घेण्याचे सौजन्य देखील दाखविले जात नाही. आता आठ वाजले आहे. याचा अर्थ आपले बोलणे दुसऱ्या दिवशी वर्तमान पत्रात छापून आले पाहीजे, त्यामुळे त्या वेळेत बोलायचे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील मंत्री महोदयांना म्हणाले की, आपले उत्तर पटलावर ठेवा. म्हणजे मंत्री महोदयांना जे उत्तर द्यायचे आहे, त्यांना जी वस्तुस्थिती मांडायची आहे, ती वस्तुस्थिती देखील ऐकून घ्यायची नाही. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे विधानपरिषदेचे सन्माननीय विराधी पक्षनेते यांनी विधानपरिषदेमध्ये केलेले भाषण आणि सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी विधानसभा सभागृहात केलेले भाषण सारखेच वाटते. म्हणजेच मी मघाशी म्हटल्याप्रमाणे हे सर्व ठरवून चालले आहे काय, अशी आमच्या सारख्या सदस्याला शंका येते.

अध्यक्ष महोदय, मी टेलीमेडीसीनवर बोलत होतो. माननीय आरोग्य मंत्री स्वतः डॉक्टर आहेत. त्यांनी स्वतः मोखाडा किंवा ठाणे जिल्ह्यातील पलीकडील भागातील गावे असेल, बुलडाणा, वाशिम, जळगाव, अमरावती भागातील गावे असतील किंवा नागपूर, गडचिरोली जिल्ह्यातील गावे असतील, अशा ठिकाणी चांगली कामे केलेली आहेत. मी काही दिवसांपूर्वी एका मराठी न्युज चॅनेलवर रीमोट एरियामध्ये बोट ॲम्ब्युलन्स सुरु केल्याचे पाहिले. माझ्या मते नंदुरबार जिल्ह्यामध्ये बोट ॲम्ब्युलन्स सुरु केलेली आहे. ज्या ठिकाणी दळणवळण केवळ बोटीच्या माध्यमातून होते.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभुराज देसाई.....
आरोग्य मंत्री महोदयांनी अशा अतिदुर्गम वैद्यकीय सुविधांची आवश्यकता असलेल्या भागातील लोकांकरिता बोट ॲम्ब्युलन्सच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करुन दिली.

अध्यक्ष महोदय, मेळघाटातील गरोदर स्त्रिया असतील, कुपोषित बालके असतील, त्यांचे प्रमाण कमी करण्याचे काम विशेषत: गेल्या दीड वर्षामध्ये आरोग्य विभागाच्या माध्यमातून मंत्री महोदयांच्या माध्यमातून सुरु आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यांनी शिव वडा पावचे नाव बदलून उद्धव वडा पाव असे ठेवावे किंवा इतर दुसरे नाव द्यावे, असा उल्लेख केला. सन्माननीय विरोधी पक्षनेते कदाचित दालनामध्ये बसून चर्चा ऐकत असतील तर मला त्यांना नम्रपणे सांगायचे आहे की, मेळघाटामध्ये, नंदुरबार जिल्ह्यामध्ये, आदिवासींच्या दुर्गम भागामध्ये शिव आरोग्य सेवा, बोट ॲम्ब्युलन्सची सुविधा मंत्री महोदयांनी सुरु केली. परंतु ह्या सेवा सुरु करण्याची मूळ प्रेरणा सुरुवातीलपासूनच माननीय शिवसेना प्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे आणि आताचे पक्षप्रमुख सन्माननीय श्री. उद्धवजी ठाकरे साहेबांकडून मिळालेली आहे. शहरामधील लोकांना, मेन रोडवर असलेल्या गावातील लोकांना सुविधा उपलब्ध होऊ शकतात. परंतु जी माणसे आरोग्याची सेवा घेण्याकरिता दवाखान्यापर्यंत जाऊ शकत नाही, त्याच्यापर्यंत सुविधा पोचल्या पाहीजे, हे शिवसेनेचे धोरण आहे.

अध्यक्ष महोदय, आम्ही आज सत्तेमध्ये आहे, 1995 ते 1999 या काळात आम्ही सत्तेमध्ये होतो. परंतु शिवसेना सत्तेसाठी काम करीत नाही. गोरगरीब माणसाला, गरजुवंताला, अडल्यानडल्याच्या पाठीशी उभे रहाण्याचे शिवसेनेचे धोरण आहे. त्यानुसार आरोग्य विभागामार्फत दुर्गम भागातील लोकांकरिता सेवासुविधा पोचवल्या जात आहेत.

अध्यक्ष महोदय, आत्महत्त्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जास्त असलेल्या जिल्ह्यांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे तातडीने भरण्याकरिता थेट भरतीची प्रक्रिया गेल्या वर्षी आरोग्य विभागामार्फत सुरु झाली. परिक्षा न घेता थेट भरती करण्याचे अधिकार त्या त्या ठिकाणच्या जिल्हाधिकारी यांना देऊन तेथे आरोग्य विभागातील पदे भरण्याचे काम करण्यात आले.

अध्यक्ष महोदय, आपल्या सर्वांचीच नेहमीची तक्रार होती की, वैद्यकीय अधिकारी सेवानिवृत्त झाल्यावर नवीन अधिकारी लवकर उपलब्ध होत नाहीत. राज्य सरकारने वैद्यकीय अधिकाऱ्यांचे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभुराज देसाई.....

सेवानिवृत्तीचे वय 58 वरुन 60 वर्षे करण्याचा गेल्या वर्षी मे महिन्यामध्ये निर्णय घेतला. म्हणजेच या अधिकाऱ्यांना दोन वर्षाची मुदत वाढ दिल्यामुळे किमान दोन वर्षे तरी त्यांचा जास्तीचा लाभ घेता येईल. दोन वर्षे सेवानिवृत्तीचे प्रमाण कमी होईल. दीड वर्षाच्या काळात 1350 पदे भरल्यामुळे आरोग्याची सुविधा रुळावर आणण्याचे काम मंत्री महोदयांच्या माध्यमातून सुरु आहे. मी विचारु इच्छितो की, गेली 15 वर्षे आपण सत्तेमध्ये होतात. या 15 वर्षामध्ये आपण एकदम 1350 डॉक्टरांची पदे भरण्याचे काम कधी केले, हे सांगावे.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये 108 या क्रमांकावर फोन केल्यावर ॲम्ब्युलन्स उपलब्ध होते. आज एखाद्या खेड्यातील सिरियस पेंशटला तातडीने रुग्णालयात न्यायचे असल्यास कुठूनही 108 क्रमांकावर फोन केल्यावर तास भराच्या आत ॲम्ब्युलन्स त्याच्या दारामध्ये येते. म्हणजेच गतीने आरोग्य सुविधा देण्याचे काम केले जात आहे.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी टेलीमेडीसीनचा उल्लेख केला. नंदुरबार, मोखाडा या दुर्गम भागातील रुग्णांना स्पेशलिस्ट डॉक्टर्स मिळत नाहीत. पुणे, मुंबई, नागपूर, औरंगाबाद शहरामध्ये तज्ज्ञ डॉक्टर्स आहेत. त्यांच्या ज्ञानाचा, बुद्धीचा, त्यांच्याकडील तंत्रज्ञानाचा उपयोग झाला पाहीजे. नंदुरबार, मोखाडा या दुर्गम भागातील रुग्णांना टेलीमेडीसीनच्या माध्यमातून अशा डॉक्टरांची सुविधा देण्याचे काम झालेले आहे. मेळघाटातील बालमाता मृत्युचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न शासनाकडून झालेला आहे. मध्यंतरी स्वाईन फ्ल्यु सारखे साथीचे रोग आले. त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. व्हेंटीलेटरची व्यवस्था असलेल्या ठिकाणी दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना त्याचे पैसे भरावे लागत नाही. मधुमेहाचा आजार असलेल्या पेशंटला डायलेसिस करावे लागते. जवळजवळ प्रत्येक जिल्हा रुग्णालयात डायलेसिसची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. राजीव गांधी जीवनदायी योजना जुनी असली तरी या माध्यमातून अधिक चांगल्या सुविधा देण्याचे काम सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, मी गेल्या दोन दिवसापासून हे ऐकत आहे. माझ्या सारख्या आमदाराला वाटले. औषधांची खरेदी झाल्याची बाब वर्तमान पत्रामध्ये छापून आली. त्यामध्ये दोन अधिकारी निलंबित झाले. याची वस्तुस्थिती काय आहे. मला मिळालेल्या माहितीवरुन मी याबाबत थोडे

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभुराज देसाई.....

सांगणार आहे. राज्य सरकारने परचेस कमीटी नेमलेली आहे. मला सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांच्या माहितीकरिता सांगायचे आहे की, 2011 साली आपलेच सरकार असताना आपण सेंट्रल परचेस कमिटी नेमली. या विभागाचे सचिव कमिटीचे अध्यक्ष असतात. वैद्यकीय विभागाचे सचिव, डायरेक्टर हेल्थ सर्व्हिसेस हे देखील कमिटीवर आहेत. या कमिटीवर जवळपास 30 अधिकारी हे सदस्य आहेत. किती गोळ्या घ्याव्यात, कुठल्या गोळ्या घ्याव्यात, कुठल्या दवाखान्याला द्याव्यात ही कामे देखील मंत्री महोदयांनी बघावी, अशी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांची अपेक्षा आहे काय. त्यांचे सरकार असताना त्यांचे आरोग्य मंत्री देखील हे बघत होते काय. कुठले औषध घ्यायचे, कुठल्या दवाखान्याला द्यायचे, किती बाटल्या द्यायच्या, कुठल्या ट्रकने द्यायच्या, कुठल्या टँकरने पाठवायच्या हे सुद्धा आपले आरोग्य मंत्री बघत होते काय.

...3K/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई.....

आरोग्य मंत्री हे त्या विभागाचे धोरणात्मक निर्णय घेणारी यंत्रणा आहे. वित्त मंत्रालयाकडून अधिक निधी विभागाला मिळवून दिला व त्यामधून "शिव आरोग्य" योजना व "बोट ॲम्ब्यूलन्स" योजना या सारख्या चांगल्या योजना लोकांसाठी आणल्या, 1,350 डॉक्टर नियुक्त करण्याचा निर्णय घेतला, अशा प्रकारचे निर्णय आरोग्य मंत्री महोदयांनी घेतले आहेत आणि यासारखे धोरणात्मक निर्णय मंत्री महोदयांकडून घेण्यात येत असतात. परंतु तुमच्या विभागात मोठ्या प्रमाणात खरेदी झाली, अनावश्यक पैसा वापरला गेला, अशा पध्दतीने मंत्री महोदयांच्या बाबतीत आभास निर्माण करण्याचा प्रयत्न सदनामध्ये झाला आहे. मला वाटते की, या चर्चेमधून केवळ राजकारण करण्याचा प्रयत्न विरोधकाकडून होत आहे.

अध्यक्ष महोदय, आपण माझ्या पक्षासाठी दिलेली वेळ पहावी. माझ्यापूर्वी बोललेले वक्ते किती वेळ हेही पहावे.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी आपले बोलणे थांबविले नाही.

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, आपण बेल वाजविली त्यामुळे मला वाटते की आपण मला बोलण्यासाठी थांबवत आहात. आम्ही शाळेत असताना बेल वाजली की खाली बसत असत, त्याप्रमाणे आपण बेल वाजवून आम्हाला खाली बसण्यासाठी सांगत आहात असे वाटले.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सदरहू चर्चा ऑन लेग राहील, त्यावर आपण उद्याही बोलू शकता.

श्री.शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, शिवसेना पक्षातर्फे मला बोलू देण्यात यावे, त्यानंतर आपण चर्चा ऑन लेग ठेवू.

अध्यक्ष महोदय, या चर्चेतून मला एकच सांगावयाचे आहे की, मंत्री महोदय श्री.बापट मघाशी म्हणाले होते की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील बोलताना हसत आहेत. त्यांना या विषयावर गांर्भीयाने बोलावयाचे नाही किंवा त्यांना या चर्चेचे गांभीर्य नाही. मी याप्रकरणी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील विरोधी बाकावर आले आहेत, त्यांना 15 वर्षे मंत्री म्हणून बोलण्याची व काम करण्याची सवय लागली आहे आणि आता दीड



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई.....

वर्षामध्येच विरोधी बाकावर त्यांना कसनुसं व्हायला लागले आहे. त्यांना सारखे वाटते की, पाच वर्षांनी ते सत्ताधारी बाकावर येणार आहेत असे ते म्हणत असले तरी या टर्ममधील त्यांची साडेतीन वर्षे अजून शिल्लक आहेत. ते जर माझे म्हणणे ऐकत असतील तर मला त्यांना सांगावयाचे आहे की, पाच वर्षामध्ये सत्ताधारी बाकावर याल अशी स्वप्ने त्यांनी कृपा करुन पाहू नयेत. कारण पंधरा वर्षे तुमच्या सरकारचा अनुभव राज्यातील जनतेने घेतला असून त्यानंतरच त्यांना विरोधी बाकावर जनतेने बसविले आहे. मी त्यांना आठवण करुन देऊ इच्छितो की, शिवसेना व भारतीय जनता पक्षामध्ये..... तुम्हाला जर सरकारने क्लीन चीट दिली तर आम्ही तुमचे सरकार आहे असे समजू असे ते मघाशी जाता जाता म्हणाले होते. मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांना सांगू इच्छितो की, राज्यातील विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर त्यांनी व त्यांच्या पक्षाने भारतीय जनता पक्षाला बाहेरुन पाठींबा देण्याचा प्रयत्न केला होता. त्यांचे सदरहू स्टेटमेंट वर्तमानपत्रामध्ये छापून आले होते. त्यानंतरच्या काळात काही गोष्टी घडल्या व राज्यात शिवसेना व भारतीय जनता पक्षाचे सरकार अस्थित्वात आले. यापूर्वीही सन 1995 ते 1999 या काळात युतीचे सरकार होते.

अध्यक्ष महोदय, या सरकारमध्ये काम करीत असताना माननीय शिवसेना प्रमुखांनी आमच्याकडे जबाबदारी दिली आहे. ती जबाबदारी पार पाडताना शिवसेनेच्या सर्व मंत्री महोदयांची धारणा आहे की राज्यात "शिवशाही" यावी. राज्यात "शिवशाही" यावी हे माननीय शिवसेना प्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे साहेबांचे स्वप्न होते.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री डॉ.दीपक सावंत यांच्याबाबत सांगावयाचे झाले तर आरोग्य विभाग हा सर्वसामान्य माणसाशी निगडीत विभाग आहे, गोरगरीब माणसाला नवीन जीवदान देणारा हा विभाग आहे. माझ्या सारख्या सदस्याला खात्री आहे की, डॉ.दीपक सावंत हे मंत्री म्हणून आरोग्य विभागाचे निर्णय घेताना आमच्या पक्षाच्या धोरणानुसार व आताच्या माननीय शिवसेना प्रमुखांच्या विचारानुसार ते 100 टक्के यशस्वी करण्याचे काम ते करतील. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेब व माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विखे-पाटील साहेब आपण या शिवसेना पक्षामध्ये कितीही दरी निर्माण करण्याचा प्रयत्न केला तरी आमच्या पक्षावर सरकारच्या माध्यमातून

3....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई.....

जी जबाबदारी आहे ती आमचे मंत्री महोदय योग्य पध्दतीने पार पाडतील. तसेच, ते गैरव्यवहाराला निश्चितपणे कधीच जबाबदार असणार नाहीत. गैरव्यवहार प्रकरणी जो काही निर्णय व्हावयाचा तो बाहेर येईल, त्यासंदर्भात मंत्री महोदय चौकशी करतील, त्यांना योग्य निर्णय घ्यावयाचा असेल तो ते घेतील. सदर प्रकरणी त्यांना सकृतदर्शनी वाटले म्हणून त्यांनी दोन अधिकाऱ्यांना निलंबित केले, तो त्यांचा अधिकार आहे. आज चर्चा झाली आणि त्यावर उद्या माननीय मुख्यमंत्र्यांनी निर्णय घ्यावा, हे विरोधकांचे म्हणणे गैर आहे. याप्रकरणी जो निर्णय व्हावयाचा आहे तो होईल परंतु जे चांगले केले ते राज्याच्या समोर आले पाहिजे. केवळ एक घोटाळा झाल्याचे भासवून, भ्रष्टाचार झाल्याचे चित्र निर्माण करुन व आभास निर्माण करुन आरोग्य खात्यामध्ये जे चांगले काम झाले आहे त्यावर पांघरुन घालण्याचे काम होता कामा नये. आरोग्य विभागासंदर्भात ज्या गोष्टी चांगल्या होत्या त्यांचा मी माझ्या भाषणात उल्लेख केला आहे.

अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांचा सहकारी आमदार असलो तरी त्यांना सांगू इच्छितो की, आरोग्य विभागामध्ये अधिक डॉक्टरांची भरती करणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी रुग्णालये तयार झाली आहेत तेथे अधिक इक्वीपमेंट देण्याची आवश्यकता आहे. मी एकदा चर्चेच्या वेळी विनंती केली होती की, ढेबेवाडी येथील ग्रामीण रुग्णालय तयार झाले आहे, त्यास सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्या सरकारच्या काळात त्यासाठी एक पैसा देण्यात आला नव्हता. मंत्री महोदयांनी सदरहू रुग्णालयाच्या इमारतीच्या कामास सुधारित मान्यता दिल्याने काम पूर्ण झाले आहे. सदर रुग्णालयासाठी आवश्यक साहित्याचा पुरवठा करण्यात आला तर पुढील महिनाभराच्या कालावधीमध्ये रुग्णालयाची इमारत पूर्ण क्षमतेने वापरात येऊ शकते. एका प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी दोन मेडिकल ऑफिसर देण्यात येतात परंतु सदरहू ठिकाणी एकच मेडिकल ऑफिसर आहे. माहे जून-जुलै पासून पावसाळ्यास सुरुवात होईल, आमच्या येथील डोंगराळ भागातील लोकांना 8-8 दिवस खालील भागामध्ये येता येत नाही. अशा या इंटेरियल भागात असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किमान दोन मेडिकल ऑफिसर नियुक्त करण्यात यावेत व मेडिकलचा

4...





UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई.....

स्टाफ देण्यात यावा. काल आरोग्य विभागाच्या मंत्री महोदयांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, मल्हारपेठ येथील ग्रामीण रुग्णालयाचा प्रश्न आहे तेथे जागा कमी असल्याने तेथील उप केंद्राची इमारत दुमजली केली तर त्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय होऊ शकते. सदरहू ग्रामीण रुग्णालय सन 2009 साली मंजूर झाले असून त्याकरिता निधी मंजूर करण्यात यावा. मी मागणी केलेली दोन कामे मंत्री महोदयांनी करावीत, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आरोग्य मंत्री महोदय अतिशय चांगले काम करीत आहेत. निंदकाचे घर असावे शेजारी अशी म्हण आहे त्यामुळे कोणी कितीही आरोप केले तरी त्यासंदर्भातील सत्य बाहेर येणार आहे. तेव्हा आपल्यासमोर त्यासंदर्भातील चित्र येईल. मंत्री महोदयांचे काम अतिशय चांगल्या प्रकारे सुरु असून त्यांनी आरोपाकड दुर्लक्ष करावे व कामामध्ये मागे न पडता ते अधिक वेगाने करावे. तसेच, राज्याचे आरोग्य कशा प्रकारे चांगले राहील, राज्यातील गोरगरीब जनतेला व सामान्य माणसाला आरोग्य विभागाच्या माध्यमातून दिलासा कसा देता येईल, असे काम त्यांनी करावे. आरोग्य मंत्री महोदयांच्या चांगल्या कामाला शुभेच्छा देतो व अध्यक्ष महोदयांनी मला बोलण्यासाठी वेळ वाढवून दिल्याबद्दल आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद !

--------------------

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे नाव घेतले म्हणून मी बोलणार नाही पण त्यांनी सुंदर भाषण केले आहे. मी त्यांचे भाषण ऐकत होतो. मागील 5 वर्ष ते सभागृहात नव्हते त्यामुळे त्यांना सदर कालावधीमध्ये सभागृहामध्ये काय काय झाले हे माहीत नाही. माझी डॉक्टर साहेबांना विनंती आहे की, मंत्रिमंडळामध्ये आता विस्तार करण्यात येणार असून सन्माननीय सदस्यांना त्यांनी आपल्या शेजारी बसवून घ्यावे. माझा त्यांना पाठींबा असून माझी एक तरी शिफारस आपल्या पक्षापर्यंत पोहोचविण्यात यावी. मंत्रिमंडळ विस्तारामध्ये जे काही अर्धा-दीड तुमच्या वाट्याला येईल त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.शंभूराजेंचा विचार करण्यात यावा. मी तुमचा हितचिंतक आहे. "एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ", असे आपले सूत्र आहे. तुमच्या हिताची चर्चा... मी पुन्हा राईट ऑफ रिप्लायच्या वेळी बोलेन. पण सरसकट सर्वांना नोकरीवरुन काढणे हे सुत्र योग्य नाही. मंत्री महोदयांनी दिसेल त्याला काढण्यापेक्षा सदर प्रकरणी चौकशी करावी. फार मोठे आरोप झाले आहेत त्यामुळे सर्वांना निलंबित करण्यापेक्षा चौकशी करुन योग्य तो निर्णय घ्यावा. परंतु सन्माननीय सदस्य श्री.शंभूराजे यांच्यासाठी काही तरी करा.

....यानंतर 3L

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी नियम 292 अंतर्गत जो ठराव या ठिकाणी मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. या चर्चेमध्ये 2-3 विषय समाविष्ट आहेत. पण मी फक्त पहिल्या विषयावर म्हणजे राज्यात जून ते ऑक्टोबर 2015 या कालावधीमध्ये शासनाने व्यापाऱ्यांना साठेबाजी करण्याकरिता जी खुली मुभा दिली आणि त्यामुळे ज्या डाळीच्या किंमती वाढल्या, त्यावरच मी बोलणार आहे. इतर दोन्ही नेते औषधाबद्दल खूप बोलले आहेत. अध्यक्ष महोदय, मी ऑनलेग राहून थांबतो. मी फक्त दुसरे एक महत्वाचे सांगणार आहे की, आतापर्यंत ज्या ज्या घोटाळ्यांची चर्चा झाली आहे, त्यामध्ये त्या त्या मंत्र्यांबद्दल वैयक्तिक चर्चा उपस्थित केली आणि त्यावर मंत्र्यांनी मग त्यामध्ये चिकीचा असेल किंवा औषधाचा असेल किंवा आदिवासी विकास विभागाचा असेल यासंबंधी खुलासा करण्याची त्या त्या मंत्र्यांची जबाबदारी होती. मी उपस्थित करणारा विषय असा आहे की, तो स्वतः माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीने निर्गमित झालेला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांना कोणी चुकीची माहिती दिली का, त्यांनी नीट चौकशी केली नाही का, सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. बापट साहेब आले आहेत त्यांनी सही केली आणि त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी सही केली आहे. सचिवांनी मिसलीड केले का, सचिवांनी चुकीची माहिती दिली का, मुख्य सचिवांनी आपली भूमिका निभावली का नाही, याबद्दल मी बोलणार आहे. मला असे वाटते की, आपल्या निर्देशानुसार मी हा विषय उद्या बोलणार आहे. धन्यवाद.

**तालिका सभाध्यक्ष :** आता आपण ही चर्चा येथे थांबवित आहोत. सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब ऑनलेग आहेत. सभागृहाची बैठक आता स्थगित......

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महाराज, उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे आणि उद्या कामकाजही खूप आहे. आजचा रिप्लाय राहिला आहे आणि अंतिम आठवड्यावरील भाषणे देखील राहिली आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य अर्धा तास चर्चा होईल या अपेक्षेने थांबलेले आहेत. मंत्री महोदय देखील थांबलेले आहेत. कोरम नसला तरी सर्वांना न्याय मिळेल म्हणून आपण अर्धा तास चर्चा घ्यावी.

**तालिका सभाध्यक्ष :** बऱ्याचशा सदस्यांना असे वाटले की, अर्धा तास चर्चा उद्या होणार आहे त्यामुळे ते गेले आहेत आणि त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होईल.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, आज तिसरा दिवस आहे की, अर्धा तास चर्चा होण्यासाठी थांबलेलो आहेत. त्यामुळे जे सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत आणि जे मंत्री उपस्थित आहेत त्यांचे विषय घेण्यात यावेत व बाकीचे मग उद्या सकाळी घेण्यात यावे.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे. आता आपण 2-3 अर्धा तास चर्चा घेऊ.

--------

3........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : "शाहूवाडी (जि. कोल्हापूर) येथील पोलिस ठाण्याच्या जुन्या इमारतीमध्ये असलेल्या अनेक समस्यांबाबत"

**मु. शी.** : "शाहूवाडी (जि. कोल्हापूर) येथील पोलिस ठाण्याच्या जुन्या इमारतीमध्ये असलेल्या अनेक समस्यांबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 29106 ला दिनांक 22.12.2015 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. सत्यजित पाटील-सरुडकर यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री.सत्यजित पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने "शाहूवाडी (जि. कोल्हापूर) येथील पोलिस ठाण्याच्या जुन्या इमारतीमध्ये असलेल्या अनेक समस्यांबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 29106 ला दिनांक 22.12.2015 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात नियम 94 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, आमच्या शाहूवाडी तालुक्याच्या पोलिस ठाण्याची इमारत आणि त्यामध्ये असलेल्या असंख्य अडचणी व त्यामुळे पोलिस कर्मचाऱ्यांना होणारा त्रास या बाबतीत मी अनेकवेळा आवाज उठविला आहे. या शाहूवाडी पोलिस ठाण्याची चांगली सुसज्ज इमारत असावी यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत. 2007 सालापासून आमचा या ठिकाणी पाठपुरावा सुरु आहे. पण अद्यापही या इमारतीच्या बांधकामाला प्रशासकीय मंजूरी मिळालेली नाही. आपण बघितले तर शाहूवाडी तालुक्यामध्ये अगदी हाकेच्या अंतरावर तहसिलदार कार्यालय असून त्याची इमारत सुसज्ज आहे आणि पलिकडे पंचायत समितीची इमारत असून ती सुध्दा चांगल्या पध्दतीने बांधली गेली आहे. पण या पोलिस ठाण्यासाठी कर्मचारी, अधिकारी आणि महिला कर्मचाऱ्यांसाठी आपण आतापर्यंत सुसज्ज इमारत देऊ शकलो नाही. पोलिस ठाण्याचा तो परिसर पाहिला तर त्या ठिकाणी ड्रेनेजची सुध्दा व्यवस्था नसल्यामुळे पोलिसांच्या आरोग्याचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या विषयावर आम्हाला या माध्यमातून एवढ्यासाठीच विचारणा करण्याची गरज भासली आहे, कारण मी यापूर्वी अनेकवेळा हा प्रश्न तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून उपस्थित केला आहे. परंतु या इमारतीसंबंधी डीएसआरप्रमाणे शासनाकडे जो प्रस्ताव यायला पाहिजे होता तो अद्यापी आलेला

4......



PPD/ MMP/ AKN/ 20:30

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सत्यजित पाटील-सरुडकर......

नाही त्यामुळे या कामाची प्रशासकीय मंजूरी थांबली आहे. आमची एवढीच अपेक्षा आहे की, या शासकीय इमारती असून खास करुन पोलीस विभागाच्या आहेत. पोलिसांना आज बळ देण्याची गरज आहे आणि पोलिस काम करताना सुविधा दिल्या नाहीत तर तो काम कसे करणार, तालुक्याच्या ठिकाणी जवळपास 50 जणांचा स्टाफ असतो आणि या स्टाफसाठी आपण केले पाहिजे. मला खंत वाटते की, शासकीय इमारतीच्या कामकाजासाठी लोकप्रतिनिधींना पाठपुरावा करावा लागत आहे. मला मंत्री महोदयांना निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, गेल्या टर्ममध्ये मी आमदार नव्हतो तरी सुध्दा त्याच्या आधीच्या टर्ममध्ये मी हा प्रश्न उपस्थित केला होता. मात्र त्यावेळी या प्रश्नाला न्याय मिळू शकला नाही. या मंत्रिमंडळातील कर्तबगार मंत्री प्रा. राम शिंदे यांच्याकडून आमच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत. या निमित्ताने मला त्यांना एवढाच प्रश्न विचारावयाचा आहे की, या इमारतीसाठी नवीन डीएसआरप्रमाणे 1.95 लाख रुपयांचा खर्चासंबंधीचा प्रस्ताव आपण तात्काळ मागवून घेऊन त्यास प्रशासकीय मंजूरी देणार आहात काय, दुसरा प्रश्न असा आहे की, यास प्रशासकीय मंजूरी दिल्यानंतर आपण या इमारतीचे टेंडर किती दिवसात फ्लॅश करणार आहात, याचे माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर अपेक्षित आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

5......

प्रा. राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, अर्धा तास चर्चेच्या आयुधाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री. सत्यजित पाटील यांनी जो प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे, त्यासंबंधी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी वारंवार विविध आयुधाच्या माध्यमातून या प्रश्नाकडे त्यांनी 2007 सालापासून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. यापूर्वी वेगवेगळ्या माध्यमातून 20 लाख रकमेचा निधी सुध्दा उपलब्ध झाला होता. परंतु तो खर्च न झाल्यामुळे शासनाकडे परत आला आहे. त्यामुळे आता सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यासाठी त्याचा डीएसआर बदली झाल्यामुळे आपण आता तातडीने त्याचे अंदाजपत्रक मागविले आहे. यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे आजच प्राप्त झालेला आहे. हा प्रस्ताव 1,92,68,574/- रुपयांचा असून पोलिस हाऊसिंग कार्पोरेशनच्या माध्यमातून एसीएसकडे येत्या बैठकीमध्ये या प्रस्तावाला तातडीने मंजूरी देण्यासंबंधी राज्य शासनाकडून आदेश निर्गमित करण्यात येतील. तातडीने त्याचे टेंडरही फ्लॅश करता येईल आणि म्हणून या कालावधीत त्यांनी केलेला प्रयत्न आणि सातत्याने केलेला पाठपुरावा राज्य सरकारने सकारात्मक दृष्टीकोनातून घेतला असून शाहूवाडी येथे एक वर्षभराच्या आतमध्ये अतिशय प्रगतीने पोलिस व गृह विभाग काम करील व त्याला मंजूरी देईल.

श्री. सत्यजित पाटील-सरुडकर : अध्यक्ष महोदय, मी मंत्री महोदयांचे आभार मानतो. कारण हा प्रश्न अनेक वर्षे रखडला होता. आपल्या धडाडीच्या काम करण्याच्या पध्दतीमुळे आपण हा प्रश्न आता निकाली काढला आहे त्यामुळे मी आपल्याला धन्यवाद देतो.

**तालिका सभाध्यक्ष :** अर्धा-तास चर्चा संपली आहे.

----------

6.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : आटपाडी (जि. सांगली) तालुक्यामध्ये निकृष्ट दर्जाच्या कापूस बियाणांचा पुरवठा करण्यात येणे

**मु. शी.** : आटपाडी (जि. सांगली) तालुक्यामध्ये निकृष्ट दर्जाच्या कापूस बियाणांचा पुरवठा करण्यात येणे या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 35964 ला दिनांक 9.12.2015 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. अनिल बाबर यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. अनिल बाबर (आटपाडी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने आटपाडी (जि. सांगली) तालुक्यामध्ये निकृष्ट दर्जाच्या कापूस बियाणांचा पुरवठा करण्यात आल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 35964 ला दिनांक 9.12.2015 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात नियम 94 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या वर्षी माझ्या मतदार संघामध्ये दुष्काळी परिस्थिती असताना मोठ्या प्रमाणात बोगस बियाणे आले आणि जालना येथील कृषीधन सीड्स प्रा. लि. या कंपनीने 905 शेतकऱ्यांना विकलेले हे बियाणे जवळपास 600 हेक्टर जमिनीकरिता बोगस निघालेले आहे. यासंबंधी शासनाच्या कृषी विभागास धन्यवाद देईल की, गेल्या वर्षी अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित केला असता त्यावर लगेच कार्यवाही केली. प्रोसिजरचा भाग असल्यामुळे त्यासाठी बराच कालावधी गेला. परंतु त्या बियाण्यांमध्ये दोष असल्याने अधिकाऱ्यांनी सांगितले आणि त्या बाबतीत 1,51,04,337/- रूपयांचा दंड केल्याची ऑर्डर गेल्या आठ दिवसांपूर्वी निघालेली आहे. या दंडाच्या कार्यवाहीसंबंधीच्या प्रोसिजरमध्ये 1 वर्षाचा कालावधी गेला आहे. आता यामध्ये असा धोका आहे की, 30 दिवसापर्यंत त्या शेतकऱ्यांना पैसे मिळाले पाहिजेत असे आपल्या आदेशामध्ये आहे.

MMM-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल बाबर...

30 दिवसात पैसे मिळाले नाही तर 24 टक्क्याने त्या शेतकऱ्याला व्याज दिले पाहिजे असे आदेशात म्हटलेले आहे. त्यामधील धोका असा आहे की, कंपनी या शेतकऱ्यांना सहजासहजी पैसे देईल असे वाटत नाही. कंपनी पुढच्या काळामध्ये न्यायालयात जाण्याची शक्यता आहे आणि शेतकरी काही न्यायालयामध्ये येऊ शकणार नाहीत. शासनाने तेवढ्याच परखडपणे शेतकऱ्याची बाजू मांडली तर या 905 शेतकऱ्यांना नुकसान भरपाई निश्चितपणाने मिळेल. माझी शासनाला विनंती आहे की, जर कंपनी न्यायालयामध्ये जाणार असेल तर शेतकऱ्यांचे पैसे दिल्यानंतर न्यायालयात जाता येईल अशी अट घालता येते का हे पाहावे. या कंपनीचे तात्पुरते लायसन निलंबित केलेले आहे. सदर कंपनीला राज्यामध्ये पुढील काळात बियाणे विकण्यासाठी कायमची बंदी करावी. 1 कोटी 50 लाख रुपये शेतकऱ्यांचे पैसे एक महिन्याच्या आत मिळतील अशी व्यवस्था करण्यात यावी.

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनिल बाबर यांनी प्रश्न विचारलेला आहे. आटपाडी तालुक्यात कापसाच्या बियाण्यांच्या संदर्भात कृषी धन सिडस् प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांनी ग्रीन गोल्ड सिडस् प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आणि कविता गोल्ड कंपनीचे बियाणे सन 2015 मध्ये वापरण्यात आले होते. हा प्रश्न उपस्थित केल्यानंतर कृषी विभागाकडून यासंदर्भात चौकशी करण्यात आली. या चौकशीच्या दरम्यान कृषी धन सिडस् प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा जो बीजी वाण आहे. या वाणामध्ये सुपर फायबर केडीसीएसबी-40-सी-1 हा वाण निकृष्ट दर्जाचा असल्याचे आढळून आले आहे. त्याची उगवण क्षमता तसेच विविध अंगानी तो दोषी आढळून आला. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले ही बाब खरी आहे. यासंदर्भात संचालनालयाकडे त्याची रितसर सुनावणी देखील झाली. त्या सुनावणीदरम्यान दिनांक 14.3.2016 रोजी निर्णय देखील झाला आणि या निर्णयामध्ये 1 कोटी 51 लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे ठरले आहे.

अध्यक्ष महोदय,हा जो दंड देण्याचे ठरविले आहे त्याची अपिलीय कमिशनर ॲग्रीकल्चर आहेत. म्हणून त्यांनी अपिल केलेले आहे. हा शेतकऱ्यांच्या हिताचा प्रश्न असल्याने आयुक्तांना सूचित करण्यात येईल की, लवकरात लवकर सुनावणी घेऊन याचा निर्णय देण्याची आवश्यकता आहे. कृषी धन सीडस् प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा बियाणे परवाना रद्द केलेला आहे. यांना

.......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे.......

परत बियाणे निर्मिती करण्यासाठी परवाना दिला जाणार नाही. हे दोन प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारले होते. परंतु हा शेतकऱ्याचा प्रश्न असून कंपनी दोषी आढळलेली आहे. म्हणून राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या माध्यमातून आयुक्त, कृषी यांना सांगण्यात येईल की, आपल्याकडे दाखल झालेले अपील तात्काळ निकालात काढून याबाबत उचित कार्यवाही करावी.

श्री.अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, आयुक्तांकडे नुसते अपिल होणार आहे असे नाही. न्यायालयात सुध्दा अपील होईल. माझी विनंती आहे की, जर ते अपिल करणार असतील तर कृषी आयुक्तालयात किंवा न्यायालयात शेतकऱ्यांचे पैसे डिपॉजिट केल्याशिवाय अपील दाखल करु नये. यादृष्टीने काही करता येईल काय?

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, आपण त्यांना दोषी ठरवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे आणि 1 कोटी 51 लाख रुपयांची नुकसान भरपाई त्यांच्याकडून घेत आहोत. संचालक निविष्ठा व गुणनियंत्रक यांनी निकाल दिलेला आहे. निकालानंतर अपील हे आयुक्तांकडे झालेले आहे. या निर्णयाविरुध्द जर त्यांनी अपिल केले असेल आणि त्यांच्याकडून जर आधी पैसे डिपॉजिट करुन घेतले तर ते अपिलच नेमके कशासाठी करतील. म्हणून जो निर्णय झाला त्या निर्णयाच्या अधीन राहून अपिलीय ॲथॉरिटी आहे त्यामध्ये त्यांनी नेमके काय आहे, शेवटी त्यात डिले होऊ नये हाच आपला त्यामागाचा हेतू आहे. या प्रक्रियेला वर्ष होऊन गेलेले असल्याने जास्त उशीर न होता अतिशय कमी वेळामध्ये ही हेअरिंग घ्यावी आणि ही हेअरिंग घेतल्यानंतर जो निर्णय घ्यायचा असेल तो आयुक्त घेतील. म्हणून त्या निर्णयाच्या अधीन राहून पुढील कारवाई करावी लागेल. परंतु असे सु-मोटो करता येणार नाही की, संबंधित कंपनीकडून जर पैसे भरुन घेतले तर ते कोणत्या हेतूसाठी फायर ऑथॉरिटीकडे अपिल दाखल करतील. म्हणून सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यादृष्टीकोनातून सकारात्मक विचार करण्यात येईल.

श्री.अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, कृषी आयुक्तांकडे जे अपिल आहे त्याचा निर्णय तीन महिन्याच्या आत होईल काय?

......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, कृषी आयुक्तालयाला शासनाच्या वतीने सांगण्यात येईल की, हा प्रश्न जास्त दिवस सुरु आहे. म्हणून यात कोणताही डिले करण्यात येऊ नये. त्यांना जजमेंट म्हणून घ्यायचे असेल तर काही ठराविक मर्यादेच्या पलीकडे काही गोष्टी सांगता येणार नाहीत. परंतु हा शेतकऱ्यांचा प्रश्न विधानसभेत उपस्थित झालेला आहे. म्हणून या निर्णयाबाबत योग्य वेळेत आणि लवकरात लवकर घेण्यासाठी सूचित करण्यात येईल.

-----------

.........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर रुग्णालयासाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असणे

**मु. शी.** : नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर रुग्णालयासाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असणे यासंबंधी श्री. सुनिल केदार,वि.स.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनिल केदार (सावनेर ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 94 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

***"नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर रुग्णालयात येणाऱ्या कॅन्सरग्रस्त रुग्णांची संख्या लक्षात घेता या रुग्णालयात आधुनिक तंत्रज्ञान व अनेक महत्वाच्या सोयी सुविधा मिळणे आवश्यक असणे, या रुग्णालयासाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळण्याबाबतचा*** प्रस्ताव ***राज्य शासनाकडे*** गत ***दीड वर्षापासून प्रलंबित असून*** अधिकाऱ्यांच्या उदासिनतेमुळे ***उक्त प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात न आल्याने अनुदान मिळण्यास विलंब होत असल्याने कॅन्सरग्रस्त रुग्णांचा आधुनिक उपचाराअभावी*** होत असलेला ***मृत्यू,*** तसेच ***रुग्णालयातील सोयी सुविधांअभावी*** रुग्णांना ***अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे येथील रुग्णांना मुंबईतील टाटा रुग्णालयात*** उपचारासाठी ***जावे लागत असणे, टाटा रुग्णालयात देशभरातून रुग्ण दाखल होत असल्याने उपचारास विलंब होणे, या गंभीर बाबींचा विचार करता राज्य शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने यादृष्टीने राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करुन उक्त प्रस्ताव मंजूर करुन केंद्र शासनाकडून त्वरित अनुदान मिळण्यासाठी पाठपुरावा करणे अत्यंत गरजेचे असल्याने यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."***

अध्यक्ष महोदय, मी या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय मंत्री महोदयांना एक गोष्ट आवर्जुन सांगू इच्छितो. सन 2015-2016 मध्ये केंद्र सरकारने राज्याला एक पत्र पाठविले होते की, त्यात स्टेट कॅन्सर सेंटर, टर्सरी केअर सेंटरसंबंधी आपण आपल्या राज्यातील प्रस्ताव

श्री.सुनिल केदार.....

पाठविण्यास सांगितले होते. त्यास अनुसरुन नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटलमध्ये मागच्या वर्षी तशा प्रकारचा प्रस्ताव पाठविला. मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी सुध्दा या कॅन्सर हॉस्पिटलला मंत्री असताना आणि त्यानंतर सुध्दा व्हिजीट दिलेली आहे. त्यामुळे सदर हॉस्पिटलची आपल्याला संपूर्ण रुपरेषा माहिती आहे. परंतु ही गोष्ट मला याठिकाणी आवर्जुन सांगाविसी वाटते की, कामे होत राहतील. पण यंत्रणेबाबत कशा प्रकारचा दृष्टीकोन असावा. नागपूरला 40 वर्षापूर्वी हे कॅन्सर हॉस्पिटल तयार झालेले आहे. या हॉस्पिटलचा अध्यक्ष खाजगी माणूस नसून त्याठिकाणचा रेव्हेन्यु कमिशनर आहे. एखादा राजकारणी माणूस अध्यक्ष नाही. रेव्हेन्यु कमिशनर हा त्याठिकाणचा अध्यक्ष आहे. असे असतानाही मागचे संपूर्ण वर्ष केंद्राला प्रस्ताव सादर करुन शकलो नाही. मागचे फायनांसिअली वर्ष गेले.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या माहितीसाठी एक गोष्ट सांगू इच्छितो की, या हॉस्पिटलची निर्मिती जेव्हा झाली. त्यावेळेस तत्कालीन मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक होते. ज्यावेळेस कै.वसंतराव नाईक हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना भेटायला गेले, त्यावेळेस त्यांना कॅन्सर झाला होता. त्यावेळेस राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या मनातील कल्पना त्यांना बोलून दाखविली. या गोष्टीला अनुसरुन या हॉस्पिटलची निर्मिती त्याठिकाणी करण्यात आली. आज मध्य भारतामध्ये छत्तीसगड, मधप्रदेश, आंध्रप्रदेश असो याठिकाणची सर्व लोक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटलमध्ये येतात. गेल्या 40 वर्षापासून एक सेवाभावी संस्था या हॉस्पिटलचे काम करीत आहे. केंद्र सरकारने त्याठिकाणी एक पत्र पाठविले, योजना पाठविली. या योजनेमध्ये त्यांचे काही क्रायटेरियाज होते. सदर क्रायटेरियामध्ये असे होते की, सदर हॉस्पिटल हे 50 बेडचे असायला पाहिजे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हास्पिटल हे 100 बेडचे आहे. सदर हॉस्पिटलमध्ये चांगल्याप्रकारे काम चालते याची आपल्या व्हिजीट बुकमध्ये नोंद केलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल केदार.........

म्हणून मला असे विचारायचे आहे की, त्या ठिकाणी कुठली अडचण निर्माण झाली, अशी कुठली व्यवस्था निर्माण झाली ? सन 2015-16 या आर्थिक वर्षामध्ये केंद्राची योजना असतानाही या सेवाभावी संस्थेचा प्रस्ताव का पाठविला नाही ? याबाबत पाठपुरावा झाला, नागपूर येथे अधिवेशन होते त्यावेळी आपली बैठक झाली. तसेच मुंबईमध्ये अनेक बैठका झाल्या. त्यानंतर प्रस्ताव गेला नाही. शेवटी ज्यावेळी प्रस्ताव गेला ती शोकांतिका आपल्याला सांगायला हरकत नाही. याबाबतचे दिनांक 28 मार्च 2016 रोजीचे पत्र केंद्र सरकारकडे गेलेले आहे. त्या पत्राचा पूर्ण मजकूर वाचला तर त्यातील शेवटचा पॅरेग्राफ अत्यंत दुर्देवी आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. आपल्याला केंद्र सरकारने सांगितले की, दोन सेंटर निर्माण करायचे आहेत. तशा प्रकारचे प्रस्ताव तुम्ही आम्हाला पाठवा.

अध्यक्ष महोदय, दुर्देवाने या राज्याने निर्णय करायचा असताना केंद्राला लिहून पाठविले की, आम्हाला चार सेंटर पाहिजे. जो पर्यंत आमचे चार सेंटर मान्य करत नाहीत तो पर्यंत आम्ही डिटेल प्रस्ताव पाठविणार नाही. कॅन्सरच्या रोगाबद्दल आपण सर्वच चर्चा करतो. अशा प्रकारचे पत्र पाठविले याचा अर्थ असा आहे की, या पत्राला काही हरकत नाही. सर्वांना माहित आहे की, केंद्र शासनाचा हा पॉलिसी मॅटर आहे. प्रत्येक राज्याला दोन सेंटर देण्याचे मान्य केलेले आहे. दोन सेंटर मान्य केल्यानंतर तेथे चार देणार कसे ? याचा अर्थ असा आहे की, सन 2015-16 गेले सन 206-17 मध्ये सुध्दा मिळेल असे बिलकूल मला वाटत नाही. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, एखादी सेवाभावी संस्था, खाजगी मेडीकल कॉलेज नाही, खाजगी रुग्णालय नाही. ही अशी संस्था आहे की, It is as good as Government. त्या ठिकाणी गव्हर्मेंटचा आय.ए.एस. अधिकारी त्या ट्रस्टचा अध्यक्ष आहे असे असताना असा दृष्टीकोण असेल तर याला दुर्देव म्हणावे नाही तर काय म्हणावे ? केंद्र सरकारने नॉर्मस् करुन पाठविले आहे. त्या नार्मस् प्रमाणे राष्ट्र संत तुकडोजी महाराज हॉस्पिटल हे एकमेव हॉस्पिटल आर.सी.सी. मध्ये बसते. केंद्र सरकारने क्रायटेरिया ठरवून दिलेला आहे. आर.सी.सी. मान्यता केंद्र सरकार देते. केंद्र सरकारच्या मेडीकल बोर्डाने राष्ट्र संत तुकडोजी महाराज हॉस्पिटलला

....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल केदार......

आर.सी.सी. चे स्टेटस दिलेले आहे. चार नावे जी पाठविलेली आहेत. त्याच्यामध्ये आर.सी.सी. चे स्टेटस असणारे एकमेव हे हॉस्पिटल आहे. मी म्हणत नाही की, दुसरे काही करा. पण दृष्टीकोन पहावा. माझ्या दोनच विनंत्या आहेत, हे काम आम्ही थांबू शकत नाही कारण कॅन्सरच्या रूग्णांच्या लोंढयाचा जास्त प्रेशर आमच्यावर आहे. दोन-दोन, तीन-तीन महिने आमचे वेटींग लिस्ट आहे. म्हणून अगोदरच एक्सपॅनशनचे काम सुरु केले आहे. आपण डॉक्टर असल्यामुळे आपल्याला त्याची पूर्ण कल्पना आहे. तातडीने तेथे लिनिअर एक्सीलेटरचे कामाची सुरूवात करुन द्या. आम्ही ऑर्डर बुक केलेली आहे. रेडिओ ॲक्टीव्हेटरचे बंकर तयार करायला फार वेळ लागतो. बंकरचे काम सुरु होऊन गेलेले आहे. वेळेच्या आत मशिनरीची डिलिव्हरी घ्यायची आहे. आम्हाला असे वाटले होते की प्रपोजल जाईल आणि केंद्राकडून ..... हे रेकॉर्डवर आणणे गरजेचे आहे. प्रशासनाला ही गोष्ट समजली पाहिजे. कुठल्या गोष्टीवर किती छळले पाहिजे. कुठल्या गोष्टीचा कसा दृष्टीकोन असला पाहिजे ? आज आम्हाला हे लिनिअर एक्सीलेटर लावण्यासाठी 10 कोटी रूपयांची नितांत गरज आहे. वेळेच्या आत केंद्राकडून पैसे मिळतील की नाही हे माहित नाही. म्हणून माझी हात जोडून विनंती आहे, मला दोन गोष्टींची अपेक्षा आहे. हे प्रपोझल स्पेशल केस म्हणून वेगळे काढून, आर.सी.सी.चे स्टेटस असणारे एकमेव हॉस्पिटल आहे. एप्रिल महिन्याच्या आत हा आर.सी.सी.चा क्रायटेरिया पकडून केंद्राला हे प्रपोझल पाठवाल का ? तातडीने लिनिअर एक्सीलेटरचे पैसे भरायचे आहेत. ते मशिन लावायचे आहे. कारण तीन तीन महिन्यापासून वेटींग सुरु आहे. 10 कोटी रूपये जर आपल्या जवळ नसतील तर बिन व्याजी कर्ज द्यावे. विदर्भातील लोक पैसे ठेवणार नाहीत. ते परत करू. बिनव्याजी कर्ज राज्य शासनाकडून मिळवून देण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांकडे तशा प्रकारचा प्रस्ताव पाठवावा किंवा माननीय मुख्यमंत्र्यांकडे नावीन्य पूर्ण योजनेच्या अंतर्गत जो फंड असतो त्यातून 10 कोटी रूपये मिळण्यासाठीचा प्रस्ताव असे दोन मार्ग आहेत. अशा त-हेचा प्रस्ताव राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांकडे येत्या 8 दिवसात खास बाब म्हणून पाठवाल का ? यावर आपल्याकडून उत्तर अपेक्षित आहे.

....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत (सार्वजनिक आरोग्य मंत्री): अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनिल केदार यांनी अतिशय जिव्हाळयाच्या प्रश्नाला हात घातला आहे. नियम 94 अन्वये अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे. नागपूर येथे राष्ट्र संत तुकडोजी महाराज रूग्णालय हे सर्वांना माहिती आहे. ते कॅन्सरग्रस्त रुग्णांना वरदान ठरलेले आहे. नागपूरला एम.पी. मधून एक कॅन्सर एक्सप्रेस येते. त्यातून उतरणारा प्रत्येक माणूस कॅन्सरग्रस्त असतो तो ट्रिटमेंट घेण्यासाठी या हॉस्पिटलमध्ये येतो. त्यांनी जे सांगितले ते खरे आहे. कॅन्सरग्रस्त रूणांचा प्रचंड लोंढा आहे. त्यामुळे याचा विचार वेगळया पध्दतीने होणे आवश्यक आहे. हे 100 खाटांचे रूग्णालय असून ते संपूर्ण कॅन्सरसाठी आहे. तेथे फक्त कॅन्सरवर उपचार होतात. आम्ही चार नावे रिकमेंड केली होती. त्या चार नावांमध्ये राष्ट्र संत तुकडोजी महाराज रुग्णालय आहे. त्याच बरोबर प्रादेशिक संदर्भ रूग्णालय नाशिक, प्रादेशिक संदर्भ रूग्णालय अमरावती, राष्ट्र संत तुकडोजी महाराज कर्करोग रूग्णालय नागपूर आणि विवेकानंद मेडिकल फाऊंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर लातूर अशी चार नावे होती. सुरुवातीच्या काळामध्ये हे प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र सरकारला पाठवायचे होते. या संस्थांसाठी केंद्र सरकारकडून 25 टक्के निधी उपलब्ध करुन दिला जाणार होता. राज्य शासन किंवा संबंधित विभाग बाकीचा निधी उपलब्ध करुन देणार होता. मी आपल्याला सांगू इच्छितो की, केंद्र शासनाच्या नियमानुसार एस.सी.ई.आय.करिता 120 कोटी रुपये आणि दर्शनी कॅन्सर केअरसाठी 45 कोटी रुपये इतका निधी उपलब्ध झालेला आहे. राष्ट्र संत तुकडोजी महाराज रूग्णालयाला मदत करण्याच्या भावनेने मी स्वतः मुख्यमंत्री महोदयांना पत्र दिलेले आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री यांना मी स्वत: दिनांक 29.1.2015 रोजी पत्र पाठविले. त्याच बरोबर केंद्रासाठी सतत पाठपुरवा सुरु आहे. मी सतत केंद्रीय मंत्री महोदयांशी बोलतो आहे. आमच्याकडे नागपूर भागामध्ये आणि इतरत्र महाराष्ट्रामध्ये कॅन्सरचे प्रमाण आहे. त्याला टाटा कॅन्सर हॉस्पिटल आणि राष्ट्र संत तुकडोजी महाराज रूग्णालयाशिवाय

......4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत.

दुसरी सोय नाही. त्यामुळे कॅन्सर रुग्णांची संख्या बघता आम्ही कमीत कमी चारचे प्रपोझल दिले आहेत. त्यापैकी कमीत कमी तीन तरी सेंटर करुन द्यावी. अशा प्रकारचे पत्र दिलेले आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी जी चिंता व्यक्त केली, त्याच्याशी मी सहमत आहे. आर.सी.सी. असलेले राष्ट्र संत तुकडोजी महाराज रुग्णालय एकच आहे. हे मला मान्य आहे. म्हणून त्यांच्या स्पेशल रिकमंडेशन प्रमाणे केंद्राकडे या एप्रिल महिन्याच्या आत प्रस्ताव पाठवू. हा प्रस्ताव तयार करुन देऊ. तसेच लिनिअर एक्सलेटर बाबत माझे प्रॉमिस होते. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेब आपण तेव्हा मुख्यमंत्री होता. त्यावेळी तुम्ही राष्ट्र संत तुकडोजी महाराज रुग्णालयासाठी 150 कोटी रुपये प्रस्तावित केले होते. दुर्दैवाने त्यावेळी ती सोय झाली नाही. पण निश्चितपणे हा विषय माझ्या जिव्हाळयाचा आहे. 10 कोटी रुपयांसाठी माननीय मुख्यमंत्र्यांना आपण दोघे मिळून साकडे घालू तसे त्यांना पत्र देईन की, कुठल्याही हेड खाली बिन व्याजी म्हणा किंवा मदत म्हणून, जेथून आपल्याला 10 कोटी रुपये मिळतील अशा हेडमधून मिळावेत. तसा प्रस्ताव देऊ व तो मंजूर करण्याचा 100 टक्के प्रयत्न करु. त्याकरिता आपला व माझा इन्फ्ल्युऐन्स वापरुन रुग्णालयाला मदत करण्याचा प्रयत्न करु.

3O-1 ..........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत.....

याकरिता असलेले पैसे इकडे तिकडे जाणार नाहीत याची खात्री आहे. बंकरचे काम सुरु झाल्यामुळे लिनियर एक्सलेटर करणे अत्यंत आवश्यक आहे. बंकरचेच काम मोठे असते त्यामुळे ते देखील करणे आवश्यक आहे याची मला जाणीव आहे. याबाबत मी निश्चितपणे आपल्या भूमिकेशी सहमत आहे. या विषयी शासन सकारात्मकपणे आपणास मदत करील.

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, चिखली जि.बुलढाणा येथे उप केंद्र, जिल्हा उप रुग्णालय मंजूर आहे. निधी उपलब्ध करुन देऊन हे काम कधी सुरु होणार असा माझा प्रश्न आहे. हा प्रश्न स्कोपच्या बाहेर असला तरी मंत्री महोदय याबाबत उत्तर देतील अशी अपेक्षा आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य उप जिल्हा रुग्णालयाबाबत बोलत आहे. तो विषय या अर्धा-तास चर्चेशी संबंधित नाही.

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सदस्यांनी याकरिता वेगळी अर्धा-तास चर्चा द्यावी, आपण त्याला उत्तर देऊ.

**तालिका सभाध्यक्ष** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : गोरेगाव विक्रोळी जोड रस्त्याच्या कामामुळे बाधित होत असलेल्या झोपडयांचे पुनवर्सन करणे

**मु. शी.** : गोरेगाव विक्रोळी जोड रस्त्याच्या कामामुळे बाधित होत असलेल्या झोपडयांचे पुनवर्सन करणे यासंबंधी श्री.सुनिल प्रभू यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 94 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे गोरेगाव-विक्रोळी या जोड रस्त्याचे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या विकास कामामध्ये बाधीत होत असलेल्या झोपड्या, चाळी, दुकाने, शौचालये इत्यादी वास्तूंची जागा प्राधिकरणास रस्त्याच्या कामासाठी उपलब्ध करुन देणे, प्रकल्प बाधीत ८५% नागरिकांचे पुनर्वसन करण्यात आले असून या रस्त्याच्या बाजूला राहिलेल्या १५ % नागरीकांचे पुनर्वसन करण्यात येणार नसल्याचे संबंधितांकडून सांगितले जात असणे, तसेच त्यांना एस.आर.ए. प्रकल्पसुध्दा जागेच्या अभावी राबविता न येणे, त्यामुळे या नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविण्याचे झाल्यास खर्चिक बाब असून त्यांचे बाधित नागरिकांबरोबर पुनर्वसन केल्यास शासनावर त्याचा जास्त अतिरिक्त भार न पडणे, ही बाब विचारात घेऊन १५% नागरिकांचे एक खास बाब म्हणून पुनर्वसन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरातील गोरेगाव-विक्रोळी जोडरस्ता म्हणजे आरओबी नॉर्थ या उड्डाणपुलाच्या कामाला 2003 पासून सुरुवात झाली. माझ्या माहितीप्रमाणे 1997 साली मुंबई महानगरपालिकेत याबाबतची चर्चा उपस्थित झाली होती. एमयुटीपी प्रोजेक्ट-2 अंतर्गत जागेश्वरी नार्थ, गोरेगाव विक्रोळी लिंक रोड हे दोन उडडाणपुल विशेष बाब म्हणून घ्यावीत अशा प्रकारचा प्रस्ताव महानगरपालिकेने राज्य सरकारकडे पाठविला. एमएमआरडीएने याचे सर्वेक्षण केले परंतु त्या काळात ते काम होऊ शकले नाही म्हणून पुन्हा महानगरपालिकेने उड्डाणपूल बांधावा असे धोरणानुसार नगरविकास खात्याने मुंबई महानगरपालिकेला सांगितले. त्यानुसार जोगेश्वरी विक्रोळी जोड रस्ता हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुलाची सुरुवात वाहतुकीसाठी झाली. आपण गोरेगाव विक्रोळी जोड रस्त्यास आरओबी नॉर्थ म्हणतो. वेस्टर्न

....3



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.राहुल बोंद्रे)**

श्री.सुनिल प्रभू ....

एक्सप्रेस हायवे ते गोरेगाव वेस्ट असा जोडला जातो. त्याचे काम आता पूर्ण झालेले आहे. त्याला या सदनाच्या माजी विरोधी पक्ष नेत्या श्रीमती मृणालताई गोरे यांचे नाव देऊन सन्मान करण्यात येणार आहे. त्याचे लोकार्पण लवकरात लवकर होणार आहे.

अध्यक्ष महोदय, या संपूर्ण उड्डाणपुलाच्या हद्दीमध्ये 145 घरे पूर्व भागात येत होती. पश्चिमेला काही इंडस्ट्रीज होत्या. कोर्ट केस क्लियर करुन आपण त्या सर्वांना स्थलांतरीत केलेले आहे. या उड्डाणपुलाचे काम महानगरपालिका ठराविक कालावधीमध्ये पूर्ण करीत आहे. माझ्या माहितीप्रमाणे 30 किंवा 1 तारखेला त्याचे लोकार्पण होऊ शकेल. असे असताना पूर्व भागातील 145 घरांना आपण स्थलांतरीत केले. त्यांना एमएमआरडीएच्या सर्वेक्षणानुसार नेसको कॉलनी येथे व उर्वरित लोकांना राममंदीर येथे, काही लोकांना दहीसर येथे शिफ्ट केले गेले. परंतु या ब्रिजच्या अलाईनमेंटमध्ये येणाऱ्या घराच्या व्यतिरिक्त बाजूला जी घरी आहेत ती सुध्दा या प्रोजेक्टमध्ये ॲफेक्टेड होतात. याचे कारण ब्रीजचे प्लींथ उंच केल्यामुळे सहाजिकच सर्व्हीस रोडची लेवल वाढली आहे. त्यामुळे पावसाचे पाणी तेथे येते. येथे 10-15 टक्के उर्वरित असलेल्या लोकाच्या घरामध्ये हे पाणी जाणार आहे. पावसाचे पाणी त्यांच्या घरात गेल्यास प्रचंड पूर परिस्थिती निर्माण होणार आहे. त्यांचे तेथील राहणीमान अगदी अशक्यप्राय होणार आहे. अशा वेळेला हे पाणी पूर्वी बाजूला असलेल्या न्यू स्टँडर्ड इंजिनियरींग कंपनीतून मुख्य नाल्याला जोडले जात होते. तिथे न्यायालयाच्या निर्णयानुसार सदर कंपनीच्या मालकाने तो नाला बंद केला. त्यामुळे आज अशी परिस्थिती आहे की, सॉसो सारख्या भागात  व त्या झोपडयांमध्ये पाणी जाते. त्यामुळे प्रचंड मोठया प्रमाणात तेथे वित्त हानी होते. मला असे वाटते की, दर पावसाळयात या घरांमध्ये 5-5 फूट पाणी येते. 2-3 सरी पडल्या तरी तेथे पाणी तुंबते. त्यांचे जीवन अशक्यप्राय झालेले आहे. तेथे 10-15 टक्के उर्वरित लोक आहेत जे ब्रीजची व रस्त्याची लेवल उंच झाल्यामुळे बाधीत झालेली आहेत. ज्यांच्या घरामध्ये पाणी साचले जाते. त्यामुळे त्यांना पावसाळयात अत्यंत वाईट अवस्थेत राहावे लागते. अशा 10-15 टक्के म्हणजे 50-60 लोकांना एसआरए स्कीम सुध्दा व्हायबल होत नाही. त्यामुळे त्यांच्याकरिता एसआरए करणेसुध्दा शक्य नाही. तो प्रयत्नही त्या सर्व मंडळींनी केलेला आहे. पावसाळयात तेथे शिरणाऱ्या पाण्यापासून नागरिकांना दिलासा देण्यासाठी बृहन्मुंबई

....4



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल प्रभू ....

महानगरपालिका व राज्य सरकारने याबाबतचा निर्णय तत्काळ घेणे आवश्यक आहे. मला असे वाटते की, 50-60 घरांचा एसआरए होऊ शकणार नाही कारण तेथे छोटी स्ट्रीप आहे. 10-15 टक्के लोक येथे राहतात त्यांचे स्थलांतर करावे. जसे अलाईनमेंट येणाऱ्या घरांसाठी म्हणजे 145 लोकांची आपण व्यवस्था केली तशी या 10-15 टक्के लोकांचेदेखील आपण स्थलांतर करावे अशी माझी विनंती आहे. मला असे वाटते की, हे स्थलांतर करण्याचा निर्णय या सदनामध्ये मंत्री महोदयांनी घ्यावा. गेल्या 3-4 वर्षापासून म्हणजे हे काम सुरु झाल्यापासून पावसाळयात 2-3 सरी पडल्या तरी यांच्या घरात पाणी जाते व त्यांची परिस्थिती दयनीय होते. अशा सर्व मंडळींना यामुळे आपल्यामुळे दिलासा मिळणार आहे. आजच्या या चर्चेच्या निमित्ताने मी मंत्री महोदयांकडे मागणी करतो की, याबाबत उचित निर्णय आपण घ्यावा. एक तर या 50 लोकांना एसआरए करण्याची परवानगी द्यावी. नियमात बसत नसेल तर 10-15 टक्के म्हणजे 50-60 लोकांचे पर्यायी स्थलांतर करावे. पण याबाबतचा निर्णय आज घ्यावा जेणेकरुन येणाऱ्या पावसाळयापूर्वी याबाबत कार्यवाही होईल. त्यांचे स्थलांतर केले जाईल. पावसाळयात त्यांच्या घरात 5 फुट पाणी शिरुन त्यांना ज्या परिस्थितीचा सामना करावा लागतो. तो यावर्षी त्यांना करावा लागणार नाही. यासाठी त्यांना सरकारने दिलासा द्यावा अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

......5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांनी सदरील अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. मुंबई महानगरातील रहदारीची व्यवस्था सुधारण्यासाठी वेळोवेळी केलेल्या प्रयत्नाकरिता एमयुटीपी-2 मध्ये सदरील प्रकल्प आहे, ज्याला वर्ल्ड बँकेने अर्थसहाय्य केलेले आहे. त्याला जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड म्हणजे जेव्हीएलआर म्हणतात. याचे वाईडनिंगचे काम एमयुटीपीने एमएसआरडीसीला दिले. पण यातील पुनर्वसनाचे काम एमएमआरडीएने केले. यामध्ये 1400 कुटूंबे बाधीत होती. त्यांची पात्रता निश्चिती एमयुटीपीने आपल्या धोरणानुसार केलेली आहे. त्यांचे पुनर्वसन एमएमआरडीएने केले आहे. यामध्ये लिंक रोड होता पण आजूबाजूला बाधित झालेली लोक आहेत. 2009 साली एमएमआरडीएने पत्र लिहून कळविले होते की, हा महानगरपालिकेचा रस्ता असल्यामुळे याचे पुनर्वसन त्यांनी करावे. 2012 मध्ये पत्र दिले होते की, याची पात्रता निश्चित करताना एमएमआरडीएने धोरण आखले होते. त्याबाबतची माहिती, सर्वेक्षणाची लांबी, नकाशा, पात्रता यादी, वितरणाचे तपशील घेऊन महानगरपालिकेला ते करावयाचे होते. कारण तो त्यांच्या अखत्यारीतील रस्ता होता. मुळ प्रोजेक्टचा तो भाग नव्हता. पण या प्रकल्पामुळे टोपोग्राफीकल कंडीशन चेंज झालेल्या आहेत. हे स्ट्रक्चर एलीमीनेट झाल्यामुळे बाजूच्या स्ट्रक्चरवर परिणाम होऊन तेथे पावसाचे पाणी घसून 15 टक्के लोकांची कुचंबना होत आहे. एवढया छोटया स्ट्रीपसाठी एसआरए फिजीबल होत नाही म्हणून त्याबाबत सहानुभूतीने विचार व्हावा, कारण तेथील प्रकल्पांमुळे या लोकांची अशी परिस्थिती झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांना मी निश्चित सांगू शकतो की, या पुलाच्या बांधकामाच्या वेळी 10 बांधकामे निश्चित असून आपण सांगता त्याप्रमाणे 8 बांधकामांना जागा देऊन आपण महानगरपालिकेमार्फत पुनर्वसन करण्याबाबत सांगितले आहे. आपण 15 टक्के स्ट्रक्चर म्हणता, पण जी माहिती आलेली आहे त्यामधे् एवढे स्ट्रक्चर बाधीत नाहीत असे लक्षात येते. या 10-15 टक्के लोकांकरिता पुन्हा सर्वेक्षण करुन महानगरपालिकेचे अधिकारी, सन्माननीय सदस्य, नगरविकास विभागाची एकत्रित बैठक माझ्या दालनात घेण्यात येईल.

यानंतर 3P-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.....

महानगरपालिकेच्या व नगरविकास विभागाच्या संबंधित अधिका-यांना घेऊन माझ्या दालनात याबाबत विशेष बैठक घेण्यात येईल. याबाबत आवश्यकता वाटली तर माननीय मुख्यमंत्री यांच्या कानावर विषय टाकून त्यांचे मार्गदर्शन घेऊ. या सर्वांचा याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल. यामध्ये जी काही थोडीफार लोक राहिलेली आहेत, त्यांच्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल.

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, 10-15 लोक यामुळे बाधित होत आहेत, असे जे मंत्रिमहोदयांनी म्हटलेले आहे, ते रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून बोलत आहे. माझ्या माहितीप्रमाणे आपल्याला अधिका-यांनी अर्धवट माहिती दिलेली आहे. 10-15 लोक सर्व्हिस रोडला लागून आहेत. त्यांच्या इलॅमेंटमध्ये घरे येतात. त्याच्या पूर्ण टप्प्यामध्ये आणि जो टप्पा बाधित होतो, ज्यांच्या घरामध्ये पाणी येते अशा 50-60 झोपडया आहेत. या सर्वांनी एसआरएमार्फत इमारत बांधण्याकरिता प्रस्ताव दाखल केला होता,याकरिता त्यांनी प्रयत्न केला होता परंतु तो प्रस्ताव एसआरएअंतर्गत फिजीबल होत नाही. जर या उड्डाण पूलामुळे बाजूच्या परिसरातील झोपडया बाधित होत असतील तर त्या घरांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी शासनाची आहे. जी परिस्थिती सत्य आहे, ते सांगण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी आश्वासनांतर्गत असे सांगितले की, त्यांच्या दालनात नगरविकास खाते व महानगरपालिकेतील अधिका-यांना बोलवून विशेष बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. माननीय मंत्री यांनी येणा-या आठ दिवसांमध्ये हा निर्णय घ्यावा. कारण पावसाळा तोंडावर आलेला आहे. ही सर्व मंडळी जीव मुठीत घेऊन तेथे वावरत आहेत. पाऊस पडल्यानंतर त्यांच्या घरात पाच फूट पाणी साठते त्यांना आपल्याच घरात बच्चे कंपनींना घेऊन जीव मुठीत घेऊन छपरावर बसावे लागते. ही परिस्थिती मुंबई शहरामध्ये उड्डाण पूलाच्या बाजूला राहणा-या घरांमध्ये निर्माण होते. ही दुर्दैवी बाब आहे. येणा-या काळामध्ये या ठिकाणी वित्त हानी व मनुष्य हानी होऊ नये याकरिता शासनाने विशेष बाब म्हणून याबाबतचा निर्णय सहानुभूतीपूर्वक व मानवतेच्या दृष्टीकोनातून घ्यावा. या संदर्भात होणा-या विशेष बैठकीमध्ये या 15 टक्के लोकांच्या बाजूने निर्णय व्हावा, अशी मी विनंती करीत आहे.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या जे लोक बाधित झालेले आहे, त्यांच्या जीवनमानावर परिणाम झालेला आहे. याबाबतची जबाबदारी कोणावर फिक्स करण्यापेक्षा त्यातून मार्ग काढणे आवश्यक आहे. सन 2009 मध्ये 2012 मध्ये जे काही पत्र दिले असतील,त्याबाबत मला काही बोलायचे नाही. याबाबत माझ्या दालनात सर्व संबंधितांना घेऊन एक विशेष बैठक लवकरात लवकर घेतली जाईल. ही बैठक अधिवेशन संपल्यानंतर 10-15 दिवसांमध्ये घेण्यात येईल, त्यामध्ये याबाबत वचार करण्यात येईल.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री.राहुल बोंद्रे ) :** आता सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 13 एप्रिल,2016 रोजी सकाळी 10 वाजता पुन: भरेल. सकाळी 10 ते 10.45 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यानंतर सकाळी 11.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक 09 वाजून 23 मिनिटानी, बुधवार, दिनांक 13 एप्रिल,2016 रोजीच्या सकाळी 10 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION